मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबरावमहाराजविरचित सूक्तिरत्नावलि

प्रथमयष्टि

तृतीय आवृत्ति

कलिवर्ष : ५१०४ / इ. स. २००२

प्रकाशक

॥ श्री ज्ञानेश्वर मधुराद्वैत सांप्रदायिक मंडळ ॥

दहिसाथ, अमरावती, दूरभाष -०७२१-६७६३०७

मुद्रक :– ऋ चा ग्राफिक्स, स्वा. सावरकर चौक, खामलारोड, नागपूर.

श्रीगुलाबरावमहाराजांचे रेखाचित्र - कै. प्रा. मनोहर इंदापवार.

संपर्क

* सुधाकर फणसाळकर, सिद्धान्त बी-३, सुयोग मंगल कार्यालयामागे, शनिवार, पुणे ३०
टेली. ०२०-४४८०६४५

* डॉ. राम पंडित,पंचलतिका ग्रंथन्यास,१४/४५९,नेहरूनगर, कुर्ला (पूर्व) मुंबई ४००३४
टेली. ०२२-५२२०४१३

* श्रीरंग घटाटे, गोकुळ, श्रीमंतबाबासाहेब घटाटे चौक,सिव्हिल लाईन्स नागपूर ४४०००१
टेली. ०७१२- ५२९७७० / ५३३९९७

रु. ४०

प्रथम यष्टि : अनुक्रम

१. श्रीनिवृत्तिनाथस्तव
२. श्रीज्ञानेश्वरस्तव
३. पालखीचे अभंग
४. आरती ज्ञानेश्वरांची
५. आरती हैबतीरायांची

*

१. भक्तिपदतीर्थामृत. ओ.३३३ **१**
(तत्त्वमसि महावाक्यातून भक्ति)
१. भक्ति-उपक्रमै ओव्या ६४ **१**
२. तत्पदार्थ निरूपण ओव्या ७९ **६**
३. त्वं-पद निरूपण ओव्या ४९ **११**
४. असि-पद निरूपण ओ. ६७ **१४**
५. भक्तिफल निरूपण ओ. ७४ **१९**

२. निगमान्तपथसंदीपक **२५**
(सार्थ- श्रीबाबाजीमहाराज पंडित)
१.गुरुमहिमा **२५**
२.हृद्गत **२८**
३.कारणसंबंधपदार्थनिर्णयः **३१**
४.कार्यसंबंधपदार्थनिर्णयः **३५**
५.पदत्रय ऐक्य **४३**

३. चौसष्टी ओ. ६४ **४७**
अमृतानुभव १ला अध्याय- निरूपण.

४. योगसाधनेची ११ पत्रे
१. **आत गुरुप्रेम, बाहेर आत्मदृष्टि** ओ. ३२. **५१**
उदासवृत्तीचा निषेध - आत गुरुप्रेम बाहेर आत्मरूप- सद्गुरु लक्षण- कैवल्याचा वर.
२. **योगमुद्रा** **५३**
गुरुलक्षण - आत्मप्राप्तीकरता बहु ग्रंथ वाचन नको- योगमुद्रा- चमत्कार निषेध-स्वप्नाची आठवण दिली.
३. **सोहं साधना** - ओ. २३. **५६**
श्रीगुरूचे निर्गुण स्वरूप- तूं निर्गुणाची अधिकारी - पंढरी यात्रेचे पुण्यप्रदान.
४.**निर्गुणाचा उपदेश** **५८**
गुरुप्रेम असावे पण शोक नको- गुरूचे स्वरूप- निर्गुणाचा उपदेश- अनधिकाऱ्यास सांगण्याचा निषेध.
५. **मीचा लय** - ओ. १३. **६०**
सर्वपुण्यप्रदान- प्रेमाश्रु- नास्तिक-वृत्ति, बुद्धि व अहंकार यांचा नाश- समाधीचा प्रत्यय.
६. **समाधीतील विघ्ननिवरण** **६२**
श्रीगुरु व अवतार ब्रह्मसमुद्रातील तरंग- जीवत्वाचा त्याग- विघ्ननिवारण- समाधि- ३ कल्पना- जडचेतन विवेक- ईश्वर- पुनःपुनः अभ्यास- आश्वासन.
७. **कर्म, भक्ति, ज्ञान, वैराग्य, प्रेम, आत्मानुभव** - ओ. १२. **६६**
सर्व कल्पनाच- 'नरकातूनहि उद्धरीन' - कर्म, भक्ति, ज्ञान, वैराग्य, प्रेम, आत्मानुभव- ज्ञानदृष्टीने स्वर्गनरक नाही- अभयदान.
८.* **मलदोष निवारण** - **६७**
बुद्धीचे ३ दोष - दुष्ट विषयांचे आचरणाने पुढील जन्म- सत्कर्माने मलदोष निवृत्ति- गुणभेदाने मनुष्यांचे सहा प्रकार- प्रारब्धावर विसंबू नये.
* **विक्षेप दोष निवारण**- **७१**
उपासनेचा अधिकारी- विक्षेपाची उपासनेने निवृत्ति- ईश्वरोपासनेचे १३ व गुरूपासनेचे १२ प्रकार- आपला अधिकार आपणच ठरवावा.

*** आवरण दोष निवारण** **७३**
ईश्वरानुग्रहानेच गुरुप्राप्ति- देवापेक्षा गुरु श्रेष्ठ - निर्गुण उपासना- आवरण ज्ञानानेच नष्ट- तुझ्यापोटी जन्म घेईन- चमत्कारनिषेध- महावाक्याचा अर्थ.

९. **ब्रह्मप्रयत्न** (ओ. १०) **७५**
कर्माने अनुभवाचा रोध होत नाही- ब्रह्मप्रयत्न मांडावा- लयविघ्न- महावाक्यसंवृत्ति- खरासाधु.

१०. **ब्रह्मरूपाचा सोपान** - **७७**
(अभंग १२) ब्रह्मनिष्ठेचा उपदेश - विवेक-वैराग्य-शमादिषट्क-मुमुक्षेचे लक्षण- महावाक्यबोध- व्यतिरेक व अन्वयाचा अनुभव- सर्व वृत्ती ब्रह्मरूप- भक्ति योग ज्ञानांचे विश्रांतिस्थान- वृत्तिसाक्षी व ब्रह्मस्थ हो- 'जन्मोजन्मी तुझा पुत्र होईन' -जीवन्मुक्तांचे जन्म लीलामात्र.

११. **स्वानुभव घे** (ओ.२२) **८०**
श्रीगुरुवचन- खेचरी मुद्रा- मिथ्या शरीराचे रक्षण व्यर्थ- योगाने वृत्तिताटस्थ्याची स्थिति नको.

५. श्रीमद्भगवद्गीतासंगति **८२**
(ओव्या ५१५)

६. निदिध्यासनप्रकाश **११५**
योगग्रंथ (ओव्या ५२७)
१.हरिनामप्रक्रिया (४१) **११५**
२.ॐकार प्रक्रिया (३८) **११९**
३.दृष्टिसृष्टिवाद/भक्ति(१००)**१२२**
४.भक्तिपूर्वकसंधिसमाधि(२७)**१३०**
५.ज्ञानउपरतिविरक्तिभक्ति(८०)**१३२**
६.सत् चित् आनंद(६६) **१३८**
७.सांख्ययोगवेदान्तसमन्वय(१६१)**१४९**
८.भक्तिनिष्ठा (११०) **१६१**

७. कान्तकान्तावाक्यपुष्पम्
संस्कृत श्लोक २६ **१७९**

८. सूचनाप्रकरण (१) **१८२**
ओव्या २१

९. गायत्री अन्वयार्थ **१८४**

*** भक्तिपदतीर्थामृताचा अर्थ** **१९७**
श्री बाबाजीमहाराज पंडित

० ० ०

॥ अभिनंदन ॥

*प्रथम यष्टीच्या या तिसऱ्या आवृत्तीत **'गायत्री अन्वयार्थ'** हा ग्रंथ आदरणीय कै. कुर्याभाई भट यांचे चांदूर बाजार येथील राहते घरी, त्यांचे पणतू श्री.प्रभाकरराव भट यांना अत्यंत जीर्ण अवस्थेत मिळाला. त्यांनी अतिशय परिश्रमपूर्वक लॅमिनेशन वगैरे करून त्तो छापण्यायोग्य केला. तसेच डॉ. श्री. गुणाकर पिंपळापुरे व श्री. बाळासाहेब चांदले या दोघांनी सारस्वत व्याकरणाचे संदर्भ शोधून अत्यंत काळजीपूर्वक मुद्रणप्रत तयार केली. या सर्वांच्या सामुहिक प्रयत्नांमुळे श्रीमहाराजांच्या उपलब्ध ग्रंथात भर पडली. त्यांच्या सहभागाचा आम्हाला अतिशय आनंद होत आहे.*

*- **श्रीज्ञानेश्वरमधुराद्वैत सांप्रदायिकमंडळ.***

*

मनोगत

॥ श्रीज्ञानेश्वर माउली ॥

*परमसद्गुरु श्रीगुलाबरावमहाराजांच्या शिष्यपंचायतनाच्या नमस्काररूप मंगलाचरणामध्ये ज्यांचा महाराजांनी अन्तर्भाव केला आहे ते कै. दत्तात्रेय उर्फ **श्री भाऊसाहेबजी खापरे** यांनी चाळीस वर्षे महाराजांच्या ग्रंथांचे साक्षेपाने अखंड अध्ययन करून एक फार मोठा- जवळ जवळ ६५० पृष्ठांचा- **मधुराद्वैत दर्शनाचा ''माधुर्य मधुकोश''** नावाचा सूचीग्रंथ तयार केला आहे.यात कोणता विषय कोणत्या पानावर आहे हे चटकन सांपडते. महाराजांचे कोणत्याही विषयांवरील विचार एकत्रित रीतीने अध्ययन करता येतील, अशी अभ्यासूंना फार मोठी सोय श्री भाऊसाहेबजींनी करून ठेवली आहे. हा सूचीरूप कोशग्रंथ मुद्रित झाल्यानंतर कोणत्याही विषयावरील महाराजांचे विचार समजण्यास अभ्यासूंना फारच सोपे जाणार आहे.*

*या मधुराद्वैतदर्शनाच्या माधुर्य मधुकोशाचे अनन्यसाधारण महत्व लक्षात घेऊन श्री भाऊसाहेबजींचे पुत्रद्वय **श्री बाबूराव खापरे** व प्रा. **डॉ. माधवराव खापरे** यांनी आणि भाऊसाहेबजींचे नातू **श्री मधुकर खापरे, भंडारा** यांनी, आपल्या खापरे कुटुंबियांचा पारमार्थिक वारसा सर्व विषयातील तज्ञांपुढे बौद्धिक मेजवानी म्हणून मुद्रितरूपाने उपलब्ध करून देण्याचे ठरविले आहे.*

त्यात कोणता विषय कोणत्या पानावर आला आहे त्या संदर्भाचे पृष्ठ क्रमांक दिले आहेत. परंतु ते क्रमांक पहिल्या आवृत्तीनुसार असल्यामुळे -

या आवृत्तीत - पहिल्या आवृत्तीतील पान जेथे संपते तेथे, कंसात, त्या जुन्या आवृत्तीतील पृष्ठक्रमांक दिला आहे. उदा. (य.१-२४)

कोणत्याही विषयावरील महाराजांचे मत चटकन शोधण्यासाठी प्रथमावृत्तीतील या पृष्ठ क्रमांकांचा उपयोग होणार आहे. हे लक्षात घेऊन अभ्यासकांना अत्यंत उपयोगी अशी नवी आवृत्ति छापण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे.

दुसऱ्या आवृत्तीत प्रथम यष्टि / द्वितीय यष्टि / व दोहींचा उत्तरार्ध अशा प्रकारचा अनावश्यक फेरबदल झाल्यामुळे अभ्यासूंची अडचण झाली होती ती आता या आवृत्तीत दूर करण्यात येत आहे.

- किसनराव केकरे, उपाध्यक्ष,
श्रीज्ञानेश्वर मधुराद्वैत सांप्रदायिक मंडळ
दहिसाथ, अमरावती.

*

.ज्ञानेश्वरकन्या श्रीगुलाबरावमहाराज जीवनाचा आलेख

* नाव : श्री गुलाब गोंदुजी मोहोड, इ. स. १८८१ ते १९१५.
* माता - पिता : श्री गोंदुजी व सौ. अलोकाबाई मोहोड.
* ६ जुलै १८८१, आषाढ शु. १०. अमरावतीजवळ लोणीटाकळी येथे जन्म.
* नवव्या महिन्यत अंधत्व आणि अल्पायुषी : वय चौतीस वर्षे.
* वयाची पहिली चार वर्षे माधानला वास्तव्य.
* इ. स. १८८५ : मातृवियोग
* त्यानंतरची सहा वर्षे आजोळी-लोणीटाकळीला वास्तव्य.
* या काळात प्रज्ञाचक्षुत्वाचा प्रत्यय.
* यांनतरचा इ. स. १९०० पर्यत माधानाच्या घरी वास्तव्य. या काळात दैवी गुणांचा उदय आणि सर्वज्ञतेचा परिचय. लोकांकडून ग्रंथ वाचवून घेण्यासाठी आत्यंतिक परिश्रम.
* इ. स. १८९६ : विवाह. पत्नी : सौ. मनकर्णिका.
* इ. स. १८९७ पासून निबंध व अभंगांची रचना, आनंदमार्ग खंडन. पितृवियोग
* इ. स. १९०० बालसवंगड्यांना अनुग्रह सिरसगाव, चांदूरबाजार, यावली इत्यादी ठिकाणी लोकोद्धारासाठी भ्रमंती. घरच्या विषप्रयोगादि कटकटींना कंटाळून आणि पाटीलकीवर पाणी सोडून गृहत्याग..
* इ. स. १९०१ श्रीज्ञानेश्वरमाउलीचा साक्षात् अनुग्रह.
* इ. स. १९०२ - ग्वाल्हेरचे स्वानंदसाम्राज्यकर्ते श्रींमत जठार यांना पत्र. त्यात *मानभावमत समीक्षा, * डार्विन मतसमीक्षा, * स्पेन्सरमत समीक्षा केली. *स्त्रीगीते या झोपाळ्यावरील व जात्यावरील लोकगीतांची रचना. * पंढरपूर यात्रा. * अमरावतीला आगमन. * हरिभाऊ केवले या शिष्योत्तमाची भेट.
* इ. स. १९०३ - * कात्यायनी व्रताचा आरंभ. देउरवाडा
* इ. स. १९०४ - * पूर्वजन्म - गुजरातेतील झुंझुरवाडा येथील सत्पुरुष बेचरानंदस्वामीसंबंधी संस्मरण. * आर्वीचे सत्पुरुष दामोदर आपाजी महाराज यांची भेट. * ज्ञानेश्वरीच्या निरूपणास आरंभ- * ज्ञानेश्वरीतील उपलब्ध प्रतीत नसलेली ओवी सांगितली. * माधुर्यामृतसागरास भरती, * विविध विषयावर निरूपणे, बालसवंगडी व प्रथम शिष्य असलेल्या रामचंद्रबापूंना मृत्युसमयी दिलेल्या सूचना. * आळंदीवारीचा आरंभ. * स्त्रीव्रतांचा आरंभ. * रुक्मिणी स्वयंवराची रचना.
* इ. स. १९०५ - * महाराजांचा श्रीकृष्णाशी विवाह. * श्रीकृष्णमूर्ती व ज्ञानेश्वरमाउलीच्या

पादुकांची प्राप्ति. * नित्यपूजा. * प्रियशिष्य आणि उत्तराधिकारी नारायण पंडितांशी भेट. * मुलगा-अनंत यांचा जन्म. * ल. रा. पांगारकरांची व लोकनायक बापूजी अणे यांची भेट.
* इ. स. १९०७- *नागपूर येथे ज्ञानेश्वर मुद्रणालयाची स्थापना, व ग्रंथछपाईला आरंभ. * जगदीशचंद्र बोसांच्या ग्रंथांची समीक्षा. * कलकत्ता येथे प्रा. प्रियनाथ मुकर्जीकडे मुक्काम. * जगन्नाथपुरीयात्रा. * मायर्सच्या ग्रंथाची समीक्षा. * योगप्रभाव निरूपणे. चित्तोपदेश व सद्वैजयंतिरचना. * शिवपार्थिवपूजनाचा आरंभ. * प्रियलीलामहोत्सवादि ग्रंथांची रचना.
* इ. स. १९०९ - * अंतर्विज्ञानसंहिता, * अलौकिक व्याख्यानमालादि ग्रंथ-रचना. * वृन्दावनाची यात्रा.
* इ. स. १९१० - * डॉ. मुंजेना पत्र,* न्याय वैशेषिकातून भौतिक विज्ञानासंबंधी मार्गदर्शन. * साहित्यसम्राट न. चि. केळकरांशी भेट.
* इ. स. १९११ ते १९१३- विविध विषयांवर पत्रे, लेख व अनेक ग्रंथांची निर्मिती.
* इ. स. १९१४ - * श्रीनिवृतिनाथांचा दृष्टांत, * देवासच्या राजांशी पत्रव्यवहार व देवासभेट. * संगीतकार पं. भातखंडेशी चर्चा व गानसोपानाची रचना. * धुळ्याचे सत्पुरुष बाबा गर्दे यांचेशी भेट.
* २० सप्टेंबर १९१५ - भाद्रपद शु. १२, पुणे मुक्कामी चाकण ऑइलमिलच्या परिसरातील घरातून महाप्रयाण.

कार्याचा आलेख

* नाव : श्री गुलाब गोंदुजी मोहोड, इ. स. १८८१ ते १९१५.
* नवव्या महिन्यात अंधत्व
* गोपीभाव : ज्ञानेश्वकन्या आणि कृष्णपत्नी.
* शांकर अद्वैत आणि भक्तीचा पूर्ण समन्वय.
* भक्तिशास्त्राची निर्मिती.
* भक्तीच्या नव्या १६ प्रकारांची मांडणी.
* ज्ञान, उपासना आणि भक्तीतील भेदविवेचन.
* माधुर्यभक्तीवरील आक्षेपांचे निराकरण आणि तिच्या सर्वोतेचे शास्त्रीय प्रतिपादन.
* भगवद्विग्रहाचे अनध्यस्तविवर्तत्व : वेदान्तातील नवीन परिभाषा.
* नाममहात्म्य अर्थवाद आहे या आरोपाचे सविस्तर खंडन.
* योगी, ज्ञानी व भक्त यांच्यातील सूक्ष्म भेदांचे प्रतिपादन.
* धर्म आणि तत्वसमन्वयाच्या नऊ प्रकारांचे विवेचन.
* षड्दर्शने परस्परविरोधी नसून परस्परपूरक आहेत याची नवीन संदर्भात मांडणी.
* सांख्य सेश्वर आहे याची सप्रमाण सिद्धी.
* आधुनिक योग्यांच्या चुकीच्या संकल्पनांचे खंडन.
* योगदर्शनात अनेक नवीन प्रक्रियांची निर्मिती.
* स्वप्नातून परमार्थ प्राप्तीची प्रक्रिया.
* आन्तर् आणि बाह्य समाधीचे नवे मूलगामी विवेचन.
* पूर्व मीमांसेचे काही अंशी खंडन व उत्तरमीमांसेसाठी तिचा उपयोग.
* उत्क्रांतिवाद, अणुवाद, अज्ञेयवाद, संशयवाद वगैरे पाश्चात्यतत्त्वज्ञानांची भारतीयसिद्धांताशी तुलना आणि मूल्यमापन.
* नीतिशास्त्रातील युरोपियन मतांचे खंडन. त्यांचा भारतीय नीतीशी वेगळ्या रीतीने समन्वय आणि दैनंदिन सदाचाराचा उपदेश.

* पाश्चात्य आणि भारतीय मानसशास्त्रांशी तुलना.
* ॲलोपॅथी व आयुर्वेदाची तुलना आणि मानसायुर्वेदाची निर्मिती.
* इस्लाम, ईसाई, पारशी, बौद्ध, जैन, वगैरे सर्व वैदिक धर्माच्या शाखा आहेत या सिद्धान्ताचे प्रमाणपुरस्सर शास्त्रशुद्ध विवेचन.
* वर्णाश्रम व्यवस्थेचे मूल्यमापन.
* ब्राह्मण-ब्रह्मणेतरवाद आणि आर्य-अनार्य वादासंबंधी तौलनिक विवेचन.
* लो. टिळक, विवेकानंद, रामतीर्थं वगैरेंच्या काही मतांची परखड चिकित्सा.
* बुवाबाजीचा दंभस्फोट.
* धर्मसंकर, धर्मसुधारणा आणि धर्मसमन्वय यातील भेद विवेचन.
* वेदांवर आणि पुराणांवर समन्वयात्मक सूत्रग्रंथांची रचना.
* प्राचीन आर्यांची विविध शास्त्रे आधुनिक विज्ञानाचे आणि तत्त्वज्ञानांचे मूळ स्रोत असल्याचे युक्तिसिद्ध प्रतिपादन.
* न्याय वैशेषिकातून प्राचीन आर्यांचे भौतिक विज्ञान कसे विकसित करावे याचे मार्गदर्शन.
* मनोविज्ञान, काव्यशास्त्र, संगीत, आयुर्वेद वगैरे शास्त्रांचे षड्दर्शनानुसार प्रस्तुतीकरण.
* इतिहास कोणी कसा लिहावा आणि कोणत्या इतिहासावर विश्वास ठेवावा याचे मार्गदर्शन.
* आर्य वंश नाही, आर्य बाहेरून आले नाहीत, शूद्र वर्ण हा आर्यांचाच भाग आहे या ऐतिहासिक सिद्धांतांचे मुद्देसूद प्रतिपादनः लो. टिळकांच्या उत्तरध्रुवीय मताचा परामर्श.
* तीन हजार वर्षापूर्वी आर्य संस्कृती विश्वव्यापक होती या ऐतिहासकि सिद्धान्ताची पुनर्स्थापना.
* डार्विन, स्पेन्सर, ॲनीबेझंट वगैरेंच्या उत्क्रांतिवादाचे खंडन.
* सुधारणा आणि बहुमत यांचे संबंधी परखड विचार.
* शिक्षणासंबंधी मूलभूत विचार.
* प्राचीन व अर्वाचीन संगीताची तुलना,भातखंडेंचे खंडन व तात्त्विक प्रश्नांचा उहापोह.
* प्राचीन सूत्र कायम ठेवून नवीन साहित्यशास्त्राची निर्मिती.
* ''प्रक्षिप्त आणि भाषाभिन्नतेवरून लेखकभिन्नता'' हे आधुनिक संकेत संत किंवा आर्ष वाङ्मयाला लागू पडत नाहीत याचे स्व-उदाहरणावरून प्रतिपादन.
* कौटुंबिक व सामाजिक संबंधात प्रश्नोत्तर रूपाने मार्गदर्शन.
* मुलांसाठी उपदेश.
* स्त्रियांसाठी खास गीतांची निर्मिती.
* लोकगीतातून समाजप्रबोधन.
* नवीन १२३ मात्रावृत्तांची रचना.
* नवीन लघुलिपीची (सांकेतिकलिपी) निर्मिती.
* नवीन 'नावंग' भाषेची निर्मिती.
* नवीन व्याकरण सूत्रे.
* आत्मचरित्र लेखन.
* नाटक लेखन.
* आख्यानांची रचना.
* खेळातून परमार्थप्राप्तीचा उपाय : मोक्षपट.
* संस्कृत, हिंदी, मराठी, वऱ्हाडी आणि व्रजभाषेत एकूण १३० ग्रंथांची रचना.
  *अभंग-२०९९, *पदे-२२५२, *गीत-१२५०, *श्लोक-१०००,
  *ओव्या- २३०००, *एकूण पृष्ठे ६०००.

० ० ०

श्रीगुलाबरावमहाराजांची ग्रंथसूची

अनुक्रम		यष्टी
सूत्रगंथ		
१. अन्तर्विज्ञानसंहिता	(सं)	य १६
२. ईश्वरदर्शनम्	(सं)	य १६
३. समसूत्री	(सं)	य १६
४. दुर्गातत्त्वम्	(सं)	य १६
५. काव्यसूत्रसंहिता	(सं)	य १६
६. शिशुबोधव्याकरणम्	(सं)	य १६
७. न्यायसूत्राणि	(सं)	य १६
८. एकादशीनिर्णयः	(सं)	य १६
९. पुराणमीमांसा	(सं)	य १६
आकर ग्रंथ		
१०. संप्रदाय सुरतरु, (भा. १-२)		य ११
भाष्यग्रंथ		
११. नारदीयभक्त्यधिकरण-न्यायमाला	(सं)	य १६
१२. भक्तिसूत्रभाष्यम्	(सं)	य १६
१३. भक्तिसूत्रभाष्यम् भाष्य	(सं)	य १६
१४. प्रियलीलामहोत्सव (भागवतभाष्य) निमंत्रणविलास		य १४
१५. प्रियलीलामहोत्सव (भागवतभाष्य) आमंत्रणविलास		य १४
१६. श्रीधरोच्छिष्टपुष्टिः	(सं)	य १६
१७. श्रीधरोच्छिष्टपुष्टिलेशः	(सं)	य १६
१८. ब्रह्मसूत्रव्याख्या		य १५
१९. निगमांतसुभा		य १५
२०. ब्रह्मसूत्रांवर निरूपणे		य १८
२१. भगवद्गीतासंगति		य १
२२. मनोहारिणी (हिन्दी)		य १८
२३. गीतेवरील निरूपणे		य १७
२४. गीतेवरील प्रवचने		य १७
२५. गीतेवरील निरूपणे		य १८
२६. गीतेवरील स्फुट निरूपणे		य १८
२७. ऐश्वर्यार्थदीपिका (ईश्वरगीता)		य १५
२८. षट्पद्ध्वनिः	(सं)	य १६
२९. ईशावास्योपनिषद्	(सं)	य १६
३०. ऋग्वेदटिप्पणी	(सं)	य १६
३१. चौसष्टी		य १
३२. चिरंजीवपदाभ्यास		य २
३३. बालवासिष्ठ	(सं)	य १६
३४. योगवासिष्ठ तत्त्व		य १७
३५. योगवासिष्ठ निरूपणे		य १८
शास्त्रग्रंथ		
३६. सुखवरसुधा		य १३
३७. वेदान्तपदार्थोद्देशदीपिका		य १३
३८. शास्त्रसमन्वयः	(सं)	य १६
३९. आगमदीपिका	(सं)	य १६
४०. युक्तितत्त्वानुशासनम्	(सं)	य १६
४१. प्रेमनिकुंज		य १०
४२. शांतिसुधाकर		य २
४३. वेदान्तप्रक्रियासमुच्चय		य १५
४४. वेदान्तनिरूपण		य १५
४५. तत्त्वबोधः	(सं)	य १६
४६. षड्दर्शनलेशसंग्रहः	(सं)	य १६
भक्तिग्रंथ		
४७. भक्तिपदतीर्थामृत (तत्त्वमसि)		य १
४८. निगमांतपथसंदीपक		य १
४९. भगवद्भक्तिसौरभ		य २
५०. प्रीतिनर्तन		य २
५१. नित्यतीर्थ		य २
५२. प्रिय पाहुणेर		य २
५३. भक्तितत्त्वविवेक	(सं)	य १६
५४. प्रियप्रेमोन्माद	(सं)	य १६
५५. गोपिकापादपीयूषलहरी		य १५
५६. गोविंदानंदसुधा	(सं)	य २
योग		
५७. निदिध्यासनप्रकाश		य १
५८. ध्यानयोगदिवाकर		य २
५९. सोपानसिद्धि		य २
६०. हिरण्ययोग (स्वप्नयोग)		स १५
६१. योगांगयमलक्षण		य १५
६२. योगप्रभाव (पद्य)		य १५
६३. योगप्रभाव १-२ (गद्य)		
६४. ज्ञाने. कुंडलिनीजगदंबानिरूपण.		य १५
सांख्य		
६५. सांख्यसुरेंद्र		य १४
६६. सांख्यतत्त्व सूत्रावरील विचार		य १५
६७. सांख्यसार एक निबंध		य १५

अनुक्रम		यष्टी
६८. सांख्यसार		य १८
संगीत		
६९. छंद प्रदीप		य १५
७०. गानसोपान		य १५
आयुर्वेद		
७१. मानसायुर्वेद	(सं)	य १६
७२. मानसायुर्वेद	(मराठी)	य १५
७३. मिषगिंद्रशचीप्रभा	(सं)	य १६
७४. वैद्यवृंदावन		य १५
प्रकरणग्रंथ		
७५. स्वमतनिर्णयः	(सं)	य १६
७६. संप्रदायकुसुममधु	(सं)	य १६
७७. सूत्रिनिर्णयः	(सं)	य १
७८. कांतकांतावाक्यपुष्पम्	(सं)	य २
७९. चित्तोपदेश		य २
८०. सद्वैजयंती		य २
८१. बाराखडी		य २
८२. त्रिकांडसार		य २
८३. प्रमादकल्लोळ		य १५
गाथा		
८४. अभंगांची गाथा		य ९
८५. पदांची गाथा		य ९
निबंध		
८६. अलौकिक प्रवास		य २
८७. अमोघनिरूपण		य २
८८. बौद्ध निबंध		य १५
८९. वेदान्तनिरूपण		य १५
९०. सिद्धिसार		य १५
९१. अलौकिकाख्यानमाला		य ५
९२. युक्त्या		य १७
९३. गुरुचरणकौमुदी		य १८
९४. निरूपण		य १७
संवाद		
९५. साधुबोध		य ८
९६. मणिमंजुषा		य १२
९७. सुवर्णकण		य १७
९८. स्वमंतव्यांश-सिद्धान्ततुषार		य ६
९९. दुर्मद्दयभंजन		य १५
१००प्रश्नोत्तरे		य १५
१०१. वृत्तिक्षीरसागर		य १५

अनुक्रम		यष्टी
१०२. बालबुद्धिविवर्धिनी		य १७
पत्रे ११८		
१०३. अकरा पत्रे		य १
१०४. वीस पत्रे		य २
१०५. अडतीस पत्रे		य ७
१०६. सत्तेचाळीस पत्रे		य १२
१०७. एकपत्र		य १५
लोकगीते		
१०८स्त्रीगीते य ४		
१०९. स्त्रीगीतसंग्रह		य ४
११०. तुंबडी		य २
१११. रुक्मिणी स्वयंवर		य ९
११२. रुक्मिणी पत्रिका		य ९
स्तोत्रे		
११३. ज्ञानेश्वर-मातृपितृ-भावनाष्टक		य २
११४. कृष्णपंचपदी		य २
११५. गुरुपंचपदी		य २
चरित्र - आख्याने		
११६. आत्मचरित्र य १५		
११७. सूचना प्रकरण		य १
११८. सूचना प्रकरण		य २
११९. अभंगात्मक १९ आख्याने		य ९
१२०. पदात्मक ७ आख्याने		य ९
१२१. पतिव्रताचरितामृत		य १५
विविधरचना		
१२२. सुखपर्व (नाटक)		य १५
१२३. मात्रामृतपानम्	(सं)	य १६
१२४. पत्नीप्रेमपराग		(चरित्र)
१२५. नवीन भाषा - 'नावंग'		य १६
१२६. शब्दकोष		य १५
१२७. सांकेतिक भाषा (लघुलिपी)		य १५
१२८. मोक्षपट (क्रीडा)		य १५
१२९. हरिपाठाच्या प्रतिज्ञा		य १५
१३०. हरिपाठाचा अर्थक्रम		य १५
१३१. मायर्सवरटीपा		य १५
१३२. शिक्षणरत्नाकर (अप्रकाशित)		(चरित्र)
१३३. ज्ञानबोध		य ९ पू.
१३४. गायत्री : अन्वयार्थ		य १

श्रीनिवृत्तिनाथस्तव

कवि - श्री मोरोपंत विरचित

आर्या - सद्योगगुणमणींची, ज्याच्या हृदयीं सदा सुखनिवृत्ति ।
तो मज दीना दासा देवो, दावुनि पदा सुख निवृत्ति ॥१॥

श्रीज्ञानेश्वरस्तव

आर्या

जो ज्ञानराज भगवान् श्रवणीं सुज्ञान दे वदे वाचा ।
अवतार गमे अकरावा का सुज्ञानदेव देवाचा ॥२॥
श्रीविष्णुसा न तारी जन काय ज्ञानदेव वेगाने ।
हा दे तें, स्वर्गाच्या जनका यज्ञा, न देववे गाने ॥३॥
यास्तव, या स्तवनार्हा स्तवितो, कवि तो नव्हे, यथाबुद्धी ।
स्तवितां भावे, देतो ज्ञानेश्वर विष्णु हा मनःशुद्धी ॥४॥
ज्ञानेशा, भगवंता, भगवज्जनवल्लभा, महासदया ।
कलियुगवर्ती जन जो, देशी स्मरणेचि, मुक्तिचे पद या ॥५॥
त्वन्नाम महामंत्र ज्ञानप्रद होय यासि जो भावें ।
जपतो, ज्ञान तयाचें त्या जनकाचें तसेंचि, शोभावे ॥६॥
कोणा जडा न होशिल सुगतिप्रद जाहलासि भिंतीतें ।
श्रीरामाचें तैसें, तव यश सज्जनसमाज चिंती तें ॥७॥
ज्ञानेशा ! जें जाड्य, त्त्वत्तेजें क्षिप्र तें विरें; डाजो ।
खळमानसीं प्रताप श्रुति वदला विप्र तेविं रेडा जो ॥८॥
श्रीमद्भगवद्गीताव्याख्या केली जगासि ताराया ।
सारा या सदग्रंथा सेविति, संसारताप साराया ॥९॥
श्रीहरिहरकीर्ति तशा बा! विश्वास प्रिया तुझ्या ओव्या ।
जो व्यास तोहि बहुधा ह्मणतो, 'श्रुतिशाचि या मला होव्या' ॥१०॥
ज्ञाता शिष्यासि ह्मणे, 'प्राकृत दिसतो, परंतु न तसा रे ।
गोपप्रभुसा अमृतानुभव, तया पायिं सुजन नत सारे' ॥११॥
ज्ञानेशा ! त्वत्कृतितें करिती ज्ञाते समस्तही प्रणती ।
ज्ञानेश्वरी भवानी होय महामोह महिष हे म्हणती ॥१२॥
शंकर निवृत्ति, हरि तूं ज्ञानेश, ब्रह्मदेव सोपान ।
विद्या मुक्ता; तुमच्या कीर्तिसुधेचे सदा असो पान ॥१३॥
त्वां बहुजड उद्धरिले, प्रकट ज्ञानेश्वरा दयालो हें ।

तारी मयूरहि तसा, परिसासि हिणाविजे न या लोहें ॥१४॥

॥ श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरमाऊली समर्थ ॥

पालखीचे अभंग

१

आदिनाथाहुनि गुज प्रकटले । मत्स्येन्द्रा लाधले सहजस्थिती ॥१॥
मत्स्येंद्रानें मंत्र गोरक्षासी दिला । गोरक्षे बोधिला गैनीराजा ॥२॥
गैनीरायें खूण निवृत्तिसी दिली । तेणें कृपा केली ज्ञानराजा ॥३॥
ज्ञानेश्वरें बोध जगासि पै केला । एका जनार्दनी झाला पूर्ण बोधू ॥४॥

२

चला आळंदीसी जाऊ । ज्ञानेश्वर डोळा पाहूं ॥१॥
ज्ञानेश्वर ज्ञानेश्वर । मुखें ह्मणतां चुके फेर ॥२॥
होती संतांचिया भेटी । सांगू सुखाचिया गोष्टी ॥३॥
जन्म नाही रे आणिक । तुका ह्मणे माझी भाक ॥४॥

३

जयाचिये द्वारीं सोन्याचा पिंपळ । आंगी ऐसे बळ रेडा बोले ॥१॥
करील तो काय नव्हे महाराज । परी पाहे बीज शुद्ध आंगी ॥२॥
जयानें स्थापिली मुक्तीची गवांदी । मेळविली मांदी वैष्णवांची ॥३॥
तुका ह्मणे तेथें सुखा काय उणें । राहे समाधाने चित्ताचिया ॥४॥

४

ज्ञानेश्वर माझी योग्याची माउली । जेणें निगमवल्ली प्रकट केली ॥१॥
गीता अलंकार ग्रंथ ज्ञानेश्वरी । ब्रह्मानंदलहरी हेलावल्या ॥२॥
अध्यात्मविद्येचे दाखविले रूप ॥ चैतन्याचा दीप उजळला ॥३॥
तुका ह्मणे श्रेष्ठ ग्रंथ ज्ञानदेवी । एक तरी ओवी अनुभवा ॥४॥

५

ज्ञानियांचा गुरु स्वामी महाराज । ह्मणती ज्ञानराज तुह्मां ऐसे ॥१॥
मज पामरासी काय थोरपण । पायीची वाहाण पायिं बरी ॥२॥
ब्रह्मादिका जेथें तुह्मा ओळंगण । इतरा तुळन काय तेथें ॥३॥
तुका ह्मणे नेणो युक्तीचिया खोली । ह्मणोनी ठेविली पायी डोई ॥४॥

०००

आरती ज्ञानेश्वरांची

आरती ज्ञानराजा । महाकैवल्यतेजा ।
सेविती साधुसंत । मनु वेधला माझा ॥धृ॥
लोपले ज्ञान जगी । हित नेणती कोणी ॥
अवतार पांडुरंग । नांव ठेविले ज्ञानी ॥आरती० ॥
ज्ञानेश्वर विश्वमूर्ती । सोहंप्रकाशज्योती ॥
विश्वजग व्यापुनीया । तुझी अगाध कीर्ती ॥ आरती० ॥
प्रकट गुह्य बोले । विश्व ब्रह्मचि केले ॥
रामाजनार्दनी पायीं मस्तक ठेविले ॥ आरती ॥

०००

आरती हैबतरायाची.

जयदेव जयदेव हैबतराया ।
आरती वोवाळीते वंदुनि तव पाया ॥धृ॥
जैस पंढरिये नामदेव संत ।
तैसे अलकावती हैबती भगवन्त ॥ जयदेव ० ॥
ज्ञानेश्वरकन्या विनवी निजभावें ।
येउनि श्रीहरिनें मज पर्णुनिया न्यावे ॥ जयदेव ० ॥

श्रीबाबाजीमहाराज पंडित विरचित ग्रंथ

* हरिपाठरहस्य (रु.४०)
* अमृतानुभव कौमुदी (रु.१००)
* ज्ञानेश्वरीगूढार्थदीपिका (रु.१००/३००)
* अभंगगाथा (रु.६०)
* आर्यधर्मोपपत्ति (६०)
* पंचदशी प्रवचने
* विविध लेखसंग्रह
* भागवतप्रवचने
* वेदस्तुतिदीपिका
* सार्थ प्रीतिनर्तन
* संतकथा (रु.१५)
* सार्थ गीता
* विचारमौक्तिकमाला (रु.६)
* सार्थ हरिपाठ (रु.५)
* सार्थ भक्तिपदतीर्थामृत (रु.८)
* सार्थ स्वमतनिर्णः (रु.५)
* सार्थ भगवद्भक्तिसौरभ (रुक्मिणीपत्रिका)
* पत्रे (रु.३०)

मंगलाचरण

श्रीगुलाबरावमहाराजांचे नाथसांप्रदायिक नाव 'पांडुरंगनाथ' होते. त्यांनी कोणतेहि सांप्रदायिक कार्य करताना प्रथम उपास्यपंचक व शिष्यपंचकाला नमन करण्याचा अनिवार्य दंडक घालून दिला आहे.

*

नमः श्री आदिनाथाय नमो मत्स्येन्द्ररूपिणे ।
गोरक्षप्रभवे गैनीनाथायाथ निवृत्तये ॥१॥
परं ब्रह्म परं धाम सच्चिदानंदविग्रहम् ।
ज्ञानेश्वरमितिख्यातं प्रणमामि गुरुं हरिम् ॥२॥
ज्ञानेशो भगवान् विष्णुर्निवृत्तिर्भगवान् हरः।
सोपानो भगवान् ब्रह्मा मुक्ताख्या ब्रह्मचित्कला ॥३॥
यद्वस्तुतस्सच्चिदिकापकारी भक्त्यर्थमेवावयवीव भूतम् ।
ज्ञानेश्वराचार्यपदं हृदब्जे बिभ्राजते तन्मुनयोर्विशन्ति ॥
कस्तूरीतिलकं ललाटपटले वक्षस्थले कौस्तुभम् ।
नासाग्रे नवमौक्तिकं करतले वेणुः करे कंकणम् ।
सर्वांगे हरिचंदनं सुललितं कंठे च मुक्तावलिः।
गोपस्त्रीपरिवेष्टितो विजयते गोपालचूडामणिः॥५॥
वंदे नंदव्रजस्त्रीणां पादरेणुमभीक्ष्णशः।
यासां हरिकथोद्गीतं पुनाति भुवनत्रयम् ॥६॥
श्रीमान् ज्ञानेश्वराचार्य, उमा माता, शिवः पिता ।
पतिः कृष्णो राधिकाद्या भगिन्यो गोपिका मम ॥७॥
पंचायतनमित्येतत् हृद्यारस्थाप्य प्रपूज्य च ।
नमस्कृत्वा च याचेऽहं ज्ञानेश्वरसुतानुतिम् ॥८॥
॥ ॐ नारायणाय नमः ॐ ॥
॥ ॐ हरये नमः ॐ ॥ ॐ दत्तात्रेयाय नमः ॐ ॥
॥ ॐ व्यंकटेशाय नमः ॐ ॥ ॐ लक्ष्मणाय नमः ॐ ॥
वाचकं लेखकं वंदे गुरुं नारायणं हरिम् ।
दत्तात्रेयं व्यंकटेशं पुनर्लक्ष्मणमाभजेत् ॥९॥
नमो अन्येभ्यो लक्ष्मीनायककृष्णपर्यायादि पालकेभ्यः
नमः श्रीसच्चिदानन्दमात्रैक तनुधारिणे
श्रीपांडुरंगनाथाय नतः क्षेमकराय च ॥

*

संसारांबुधिनिमग्नानां लीलयोद्धारणाय वै ।
स्फुटीकृतं भक्तितत्त्वं भक्तेश्चालंबनं तथा ॥१०॥
गुरुभक्तिस्वरूपाय विशुद्धं ज्ञानमूर्तये ।
भक्तिमार्गप्रदीपाय स्कंददासाय ते नमः ॥११॥

*

भक्तिपदतीर्थामृत - विषयानुक्रम

तरंग १ ला — **पान १**

भक्ति उपक्रम (ओव्या ४७)

गुरुपरंपरा, उपास्यपंचायतन व वाचकलेखकांला नमन. ओवी १
तीन योगसूत्रे २
अनव्यस्तविवर्त श्रीगुरु सगुण होण्याची चार कारणे १-६
ग्रंथनिर्मितीचा आशीर्वाद ७-१०
भक्तिपेठेसाठी ग्रंथारंभ ११-१२
ज्ञानाने वासना उपाधीचा नाश नाही, (जास्वंदाचा दृष्टांत) १४-२८
भक्तीनेच उपाधीचा नाश २९-३०
ज्ञान व कर्माचा निषेध
गीतेचे प्रामाण्य ३१-३३
भक्तीनेच त्रिगुणरहितत्व ३३
भक्ताच्या वासना ब्रह्मरूप ३४-३६
भक्तीचा अधिकारी ३७
भक्तीचे लक्षण ३८-४३
तत्त्वमसीत विरहभक्ति ४३-४५
संतांना विनंति ४६
अध्यायसमर्पण ४७

तरंग २ रा — **पान ८**

तत्पद निरूपण (ओव्या ७९)

विश्वाचे अधिष्ठान श्रीगुरु १
सांख्य-योग- वेदान्ताचा समन्वय २
जीवाचे लक्षण ३-४
जीवोद्धारार्थ गुरूंचा अवतार ५-९
सद्गुरूंना नमन १०
'तत्त्वमसि' तून भक्तिबोध ११-१२
गुरुप्रेमापुढे ब्रह्माचे न्यूनत्व १३
महावाक्याचा अर्थ १४
'तत्त्वमसि' श्रेष्ठ कां? १५-१६
तत्पदनिरूपणाचे कारण १७-१८
महावाक्याचा विषय १९
'तत्पदाची' दोन लक्षणे २०
१- तटस्थ लक्षण २१-२४
२- स्वरूप लक्षण १५
ईश्वराचे तटस्थ लक्षण २६-२७
प्रतिबिंबवाद निराकरण २७-३०
भक्ताला जगदाभास नाही (मृग-मनुष्य-चक्रवाक व पतिव्रता-वेश्या) ३१-३३
गुरुकृपेनेच महावाक्यातून भक्तिप्रतीति ३४
भगवद् भजनाचा वाच्यांश
पहिला प्रकार ३५-३९
दुसरा प्रकार ४०-४२
त्वंपदाचा लक्ष्यांश जाणणाराच अधिकारी व त्याचेच 'असि' पदी ऐक्य ४३-४८
स्वरूपगुणांची सिद्धी ४९-५५
तटस्थ लक्षण भयदाते ५६-५७
स्वरूपलक्षण प्रेमरूप ५८-५९
गोपींचा व्यापक अनुभव ६०
सगुणाचे सत्यत्व (सर्प-रज्जु व सुवर्णालंकार) ६१-७४
लययोगाने सगुण-सिद्धी ७५-७६
सगुणावर पातिव्रत्यप्रेमाचे स्थापन व

अध्याय समर्पण ७७-७९

तरंग ३ रा पान १८

त्वंपदनिरूपण (ओव्या ४९)

श्रीगुरुमहिमा १-१३
महावाक्याचा अधिकारी १४
भक्त्यनुसार 'त्वं' पद निरूपण १५
मलीन त्वं पदवाच्यांश १६-१७
शुद्ध त्वंपदवाच्यांश १७-१८
ईश्वर व जीव दोन्ही आभास पण सामर्थ्य दृष्ट्या फरक १९-२०
परमार्थात द्वैताद्वैत नाहीं २१
त्वंपदाचा वाच्यांश २२-२६
त्वंपदाचा लक्ष्यांश २७-२९
भक्तिशिवाय ज्ञान व्यर्थ कां?
(स्वामिनीचा आणि सुवर्णबेडीचा दृष्टांत) २९-४३
'त्वं' पदाने तत्पदाचे भजन ४४
स्वरूप भजनाची खूण ४५
आत्मनिवेदन ४८-४९

तरंग ४ था पान २४

असिपद विवरण (ओव्या ६७)

श्रीज्ञानेश्वरांची स्तुति १-७
ऐक्यभजनाचे स्त्रीच्या अवस्थांप्रमाणे तीन प्रकार ८-९
(१) अलंकार भजन १०-१३
(२) स्वरूप भजन १४-१७
(३) ऐक्यभजन १८-२१
भक्तीसाठीच निर्गुणाची गोडी २२
सत् चित् व आनंदाचा अर्थ २३
खरे ऐक्यभजन २४-२५
सत् चित् आनंदाचे ऐक्य २६-३२
भक्ताचे दुःख ३३
भक्तांना समाधीतून व्युत्थान नाही ३४
भगवंताच्या नाम-रूप-प्रेमाचे ऐक्य ३५
तस्य त्वं, तदेव त्वं, तत्त्वमसि यांचे नवीन अर्थ ३६-३७
ब्रह्म निर्गुण नसून सगुणच आहे ३८
सगुणता ब्रह्माला अर्पून दास व्हावे ३९-४१
(गृहिणी, दिवा, सूर्य यांचे दृष्टांत)
भक्तीने प्रारब्धदुःखाची निवृत्ति ४१
जाणीवेने सच्चिदानंदत्व किंवा कृष्णरूप दोन्ही मिळत नाही ४९

दहा रस

भक्तींत श्रृंगार, वीर, करुण, शान्त, हास्य, भयानक, अद्भुत, बीभत्स, रौद्र, माधुर्य इ.सर्व रसांची प्रतीति. रसरूपत्व रसग्राहकत्व व रसाधिष्ठान भगवान श्रीकृष्ण ६०-६२
तातचरणी जन्मोजन्म सेवेची मागणी ६३-६७

तरंग ५ वा ३३

भक्तिफल निरूपण (ओव्या ७५)

श्रीगुरुस्तुति १-५
भक्तींतील अन्वयात सगुणाचीच प्रतीती ६-९
अन्वयांत गौणी/परा हा भेद नाही १०-१२
प्रेमरूप भक्तींत ऐक्य १२-१३
भक्ताचे सर्वच व्यापार प्रेममय झाल्याने सर्वच आश्रम संन्यासरूप १३-१८
अन्तर्बाह्य प्रेमच १९
योगातील प्राणायाम- प्रत्याहार-

धारणा- ध्यान- समाधी इ. भक्तीत एकवटतात २०-२१
प्रेमाने द्वैताद्वैताचा नाश व राधेसहित श्रीहरीची प्राप्ति २२
प्रेम शब्दापलीकडचे असून विश्वाच्या अविरोधी आहे २३
श्रीकृष्णप्रेमाची आतुरता २४-२५
गोपींना जारपणाचा दोष नाही किंबहुना त्यांचा कामच मोक्षसुखापेक्षा श्रेष्ठ २६
गोपी व श्रीकृष्णाला नमन२७-२९
श्रुतिरूप सखींच्या साह्याने श्रीकृष्णभक्ती ३०-३२
परमप्रेमाचे आलंबन श्रीकृष्णच कां? याची मीमांसा ३३-३६
प्रेमात भोळा व ज्ञानी समान ३७
प्रेमातच 'तत्त्वमसि'चा अर्थ व्यापक व दृढ होतो ३८-४३
वेदांचा निषेध हीच स्तुति ४४-४५
संधि-स्थितीत प्रेम ४५
श्रीकृष्णावर वृक्षाचे रूपक, अर्पणरूपी प्रेमाचे वर्णन ४६-५०
श्रीकृष्ण सच्चिदानंदस्वरूप व षडगुणैश्वर्याने युक्त असून रासामध्ये प्रगट आहे ५१-५२
गोपींच्या नमनाने रास-प्राप्ति ५३
वाचाऋणाचे मोचन भक्तीनेच ५४
भक्त्यभिमान-मोचन व ऐक्य ५५

ग्रंथपठनाने नित्यसुखदात्री हरिसेवेची प्राप्ति ५६-५९
अमृतानुभवपठनाचे पुण्य आणि जीव, प्राण सर्व माउलीच्या चरणी अर्पण व प्रेमपान्हा पाजण्याची विनंति ६०-६४
गुरुपरंपरेला मागणे ६५-७४

ग्रंथाचा श्री 'ज्ञानेश्वरमाउली' हाच अर्थ - ७५

तत्त्वमसि

धारावाही रसो भक्तिः
ईशे तत्पदगोचरे ।
त्वं-पदज्ञो परो भक्तः
इति स्वमत निर्णयः ॥

*

माधुर्य प्रेम

जारिणीचे परपुरुषीं मन ।
की विरहिणीचा विरह गहन ।
तो विषयभाव वेगळा करून ।
हरिरूपी प्रेमयोजन ते भक्ती ॥

श्रीगुलाबरावमहाराजविरचित सूक्तिरत्नावलि प्रथम यष्टि

१. भक्तिपदतीर्थामृत

*

('तत्त्वमसि' महावाक्याचे भक्तिपर विवेचन)

तरंग पहिला

॥ भक्ति-उपक्रम ॥

॥ श्रीमत् सद्गुरु ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

*

नमः श्री आदिनाथाय नमो मत्स्येन्द्ररूपिणे ।
गोरक्षप्रभवे गैनीनाथायाथ निवृत्तये ॥१॥
परं ब्रह्म परं धाम सच्चिदानंदविग्रहम् ।
ज्ञानेश्वरमितिख्यातं प्रणमामि गुरुं हरिम् ॥२॥
ज्ञानेशो भगवान् विष्णुर्निवृत्तिर्भगवान् हरः।
सोपानो भगवान् ब्रह्मा मुक्ताख्या ब्रह्मचित्कला ॥३॥

*

मोक्षो यत्प्रणिधानेन प्रणवो यस्य वाचकः।
क्लेशकर्मविपाकाद्यैरविमृष्टं हरिन्नुमः॥

अर्थ :- भगवान् पतंजलींनी योगशास्त्र प्रतिपादन करताना योगसिद्धि ज्या ईश्वरप्रणिधानांनी सांगितली, ती तीन सूत्रे ग्रहण करून चवथी आमची उपास्य देवता श्रीकृष्ण, त्याप्रत वंदन करितो.

पंतजलिप्रणीत योगदर्शन समाधिपाद सूत्रेः -

१) ईश्वरप्रणिधानाद् वा ॥
२) तस्य वाचकः प्रणवः ॥
३) क्लेशकर्मविपाकाशयैरपरामृष्टः पुरुषविशेष ईश्वरः ॥

अर्थ :- १. ॐ हेच ज्याचे नांव आहे. **२.** अविद्या, अस्मिता, राग, द्वेष,

अभिनिवेश हे पांच क्लेश; **३.** संचित, क्रियमाणादि कर्म, **४.** शरीरादि विपाक; व **५.** सुख-दुःखादि आशय या सर्वांहून रहित.

*आकाश म्हणजे दहर **(यष्टि १ पान १)**
*अग्नि = ज्ञान व सूर्य
*लक्ष्मी = भगवच्छक्ति
*काम = प्रीति
*चंद्र = आल्हाद व मन
*शिव - परमानंद ! ही सर्व मिळून झालेले ज्याचे नाम त्या हरिप्रत आम्ही स्तवितो. 'हरि' शब्दाचा (उद्धार) उद्गार अथर्ववेदोक्त मातृकायंत्रातून केला आहे व वेदाच्या आरंभीहि 'हरिःॐ' असे स्मरण करावे

(हरिः = ह म्हणजे आकाश / र् म्हणजे अग्नि / इ म्हणजे लक्ष्मी / विसर्ग (:) म्हणजे आनंद)

ॐ नमः श्री आचार्या । ब्रह्मोपदेशक गुरुवर्या ।
जी जी स्वामी आत्मचर्या । कारणकार्या विरहिता ॥१॥
सर्वांसी द्यावें आपुले सुख । निवृत्त करावे त्रिविध दुःख ।
यालागी सगुणात्मक । जाहलेती देवा ॥२॥
साचा पोहणार असोनी भला । मृगजळडोही बुडाला ।
हे जाणोनि कर दिधला । काढावया ॥३॥
कां अमृते न होवोनी तृप्त । लाळ घोटी क्षुधार्थ ।
तयाच्या प्रेमदुग्धदानार्थ । आगमन की ॥४॥
तरी तुमचे कृपाबळे । परम प्रीतीच्या कल्लोळे ।
पतिपत्नीभक्तीचे डोहळे । की सोहळे स्वानंद-सुखाचे ॥५॥
ते आपण एकीची न भोगावें । कांहीं दुजियासीही द्यावें ।
हें उदारपण स्वभावें । तुमचा प्रसादू ॥६॥
तो उल्हासरूपें चित्तीं । अधिष्ठाता होवोनि ग्रंथीं ।
प्रारंभ करी महावाक्यार्थी । भक्तिपदतीर्थामृत नामे ॥७॥
तरी माये आतां । माझी ग्रंथकर्तेपणाची वार्ता ।
नेवोनि, कृपाकर माथां । ठेविजे स्वामी ॥८॥
इया बोबडिया बोला । प्रभू तात संतोषला ।
मग ग्रंथीं आश्रयो दिधला । उठी म्हणे ॥९॥
ती ज्ञानेश्वर माउली । करूनी कृपेची साउली ।
प्रेमप्रसादे पान्हावली । मुखीं स्तन घाली स्नेहवशें ॥१०॥
तें दुग्ध पिऊनि गोमटें । जन न्यावया भक्तिपेठें ।

ग्रंथ जहाज प्रकटें । पंचके केलें ॥११॥
तेथ प्रथम अध्यावो । भक्त्युपक्रम नांवो ।
बोलिजे सावेवो । संतकृपा ॥१२॥
तरी हे जीवाप्रती । व्हावी कीं ब्रह्मप्राप्ती ।
याचि नांव श्रुती । मोक्ष वदती ॥१३॥
जीव आणि ब्रह्माचें । अत्यंत ऐक्य साचें ।
परी जीवा संसाराचें । दृढ बंधन ॥१४॥
तो संसार उपाधिकृत । केवळ ज्ञानें नाही जात ।
उपाधि नासलियावीण त्वरित । ऐका दृष्टान्त, ये विषयीं ॥१५॥
दर्पणाच्या समोर । जपाकुसुमाकार ।
धरितां रक्तप्रकार । दर्पणी उठे ॥१६॥
तें दर्पण नेत्रें पाहातां । तरी न जाय रक्तता ।
यासी उपाय तत्त्वता । एकचि आहे ॥१७॥
दर्पण फोडोनि टाकावे । अथवा जपाकुसुम वेकावें ।
किंवा संबंधी न राखावे । एकमेकां ॥१८॥ **(यष्टि १.पृष्ठ. २)**
यांतून एक केलियाविण । मूळरूपा नये दर्पण ।
रक्तभ्रांति तेही जाण । निवृत्त नव्हे ॥१९॥
या दृष्टान्तावरोनी आतां । निश्चय साधू दार्ष्टान्ता ।
श्रुति याचि सिद्धान्ता । प्रतिपादिती ॥२०॥
विपरीत ज्ञानोपाधि गाढी । जीवासी बंधन वासनाबेडी ।
ते ज्ञाने निवृत्त नव्हे फुडी । साधक म्हणोनि ॥२१॥
ज्ञाने उपाधि मात्र कळे । परि न निरसे कोणे काळे ।
येथे उपाधि उपाधेय वेगळे । करितांही न येती ॥२२॥
सर्वसत्तास्फुरण आत्मा । तयाची नाशरूप नाही प्रमा ।
विपरीतज्ञान वासना गरीमा । तत्संबंधही सुटेना ॥२३॥
आणि उपाधी नाशिलियावीण । न प्रकाशे सत्-सुख-ज्ञान ।
उपाधी तंव वासना गहन । ती ज्ञानेकरून नाशेना ॥२४॥
श्रुति - ''भिद्यते हृदयग्रंथिच्छिद्यन्ते सर्व संशयाः।
क्षीयन्ते चास्य कर्माणि तस्मिन् दृष्टे परावरे ॥''

(मुंडकोपनिषद् २-२-८)

''यदा सर्वे प्रमुच्यन्ते कामा यऽस्य हृदि स्थिताः ॥''

(कठोपनिषद् २-६-१४)

या सर्व स्फुट श्रुती । स्वये ऐशा बोलती ।
कीं हृदयातील जाती । वासना जेव्हां ॥२५॥
तेव्हांचि तो जीवन्मुक्त । अन्यथा पांडित्यावृत ।
येणे बोलें अनुमित । उपाधिनाश ॥२६॥
केवळ ज्ञानेंकरून । उपाधीसीं नाहीं मरण ।
आणि उपाधि मेलियावीण । अपवर्ग नाहीं ॥२७॥
हा शुद्ध सिद्धान्त । तरी उपाधी नाशावया निश्चित ।
अन्य कारण यथार्थ । शोधिले पाहिजे ॥२८॥
ते कारण ईश्वरभक्ती । निष्कामरूपा अलौकिकी प्रीती ।
देवगुरूंचे ठायीं रीती । समानची ॥२९॥
''यस्य देवे पराभक्तिर्यथा देवे तथा गुरौ ।
तस्यैते कथिताह्यर्थाः प्रकाशन्ते महात्मनः॥''

(श्वेताश्वतरोपनिषद् ६-२२)

श्रुत्यर्थः - जैसी परमप्रीती ईश्वरीं । तैसीचि गुरुचरणावरी ।
तेणे तत्प्रतिपादित अविकारी । अर्थप्रकाशू होय ॥३०॥
आणि गीतेमाजी भगवंत । स्वयें भक्त्युत्कर्ष सांगत ।
ज्ञानकर्मादि समस्त । निषेधुनी ॥३१॥
''तत्र सत्त्वं निर्मलत्वात् प्रकाशकमनामयम् ।
सुखसंगेन बध्नाति ज्ञानसंगेन चानघ ॥६॥ गीताअ१४ (य१-३)
रजो रागात्मकं विद्धि तृष्णासंगसमुद्भवम् ।
तन्निबध्नाति कौन्तेय कर्मसंगेन देहिनम् ॥७॥ गीताअ१४
तमस्त्वज्ञानजं विद्धि मोहनं सर्व देहिनाम् ।
प्रमादालास्यनिद्राभिस्तन्निबध्नाति भारत ॥८॥'' गीताअ१४
सत्त्वगुणपाशे बांधी ज्ञान । रजोगुणपाशे कर्मबंधन ।
तमोगुणपाशे व्यर्थ मरण । येत देहा ॥३२॥
''मां च योऽव्यभिचारेण भक्तियोगेन सेवते ।
स गुणान्समतीत्यैतान्ब्रह्मभूयाय कल्पते ॥'' गीता अ.१४-२६
एवं हे सकळ बांधिती । म्हणोनी अव्यभिचारिणी भक्ती ।
माझी करितां, त्रिगुणाप्रती । वेगळा होय ॥३३॥
त्याच्या ब्रह्मरूप वासना । तोचि ब्रह्मप्रापक जाणा ।

कीं जीवन्मुक्तीच्या गृहीं पाहुणा । तोचि एक ॥३४॥
जीवन्मुक्तही जालियावरी । निरपेक्ष कृष्णसेवा करी ।
तयाचा विकला हरी । जीवे भावे ॥३५॥
एवं हरिभक्त्युत्कर्ष भला । नारद-शांडिल्ये निरूपिला ।
तोचि अवलंबूनि वहिला । सांगिजेल ॥३६॥
(शांडिल्यप्रणीतभक्तिमीमांसा प्रथमान्हिक सूत्रे) –
अथातो भक्ति-जिज्ञासा ॥१॥
सा परानुरक्तिरीश्वरे ॥२॥
जेणे करूनि कर्म योग ज्ञान । अलंबुद्धी पावला जाण ।
तो अधिकारी भक्तिकारण । ते भक्तिलक्षण ऐकावे ॥३७॥
फलाशा गौणी प्रीती । ती विषवत् त्यागूनि चित्ती ।
नित्य राखणे परानुरक्ति । या नांव भक्ति शांडिल्य म्हणे ॥३८॥
आणि नारदांचे मत । ऐसेचि असे विख्यात ।
असाध्य स्वयंफलरूप निश्चित । अनिर्वचनीय ॥३९॥
''सा तु अस्मिन् परमप्रेमरूपा ॥''(नारदभक्तिसूत्र २)
गौणी परा त्यागूनि निश्चिती । जे अखंडसंयोगीं वियोगप्रीती ।
ती प्रेमलक्षणा पूर्ण भक्ती । श्रीनारदोक्ति अनुवादू ॥४०॥
प्रेमाचे कैसे लक्षण । प्रभु सूत्रे वदती आपण ।
तेंचि येथे प्रमाण । बोलिजेल ॥४१॥ **(य१-४)**
''अनिर्वचनीयं प्रेमस्वरूपम् ॥५१॥'' नारदभक्तिसूत्र
अज्ञानकाळी देहप्रीती । ज्ञानकाळी अहंब्रह्मासक्ती ।
दोहों त्यागें-अन्वयें शुद्ध प्रीती । त्या नांव भक्ति अनिर्वाच्य ॥४२॥
जारिणीचे परपुरुषीं मन । की विरहिणीचा विरह गहन ।
तो विषयभाव वेगळा करून । हरिरूपी प्रेमयोजन ते भक्ति ॥४३॥
पुत्रादिरूपा गौणीभक्ती । विरहिणीरूपा परम प्रीती ।
ही नारदीय भक्ती । महावाक्यार्थीं स्थित असे ॥४४॥
तो महावाक्योपदेशू । ज्ञानेश्वरकृपा सौरसू ।
पुढिलिये प्रसंगी विशेषू । ओसंडेल ॥४५॥
तो संती सेविजे सुखे । मज अवधान द्यावे निके ।
आपुले जाणोनि कृपाटकें । पहावे मज ॥४६॥
असो या समस्त ओविया । विषयसूत्री गुंफोनियां ।
श्रीज्ञानेश्वराचार्यपायां । कुसुममाळ अर्पिली ॥४७॥

हरिः ॐ तत्सदिति श्रीसद्गुरु ज्ञानेश्वरकृपाप्रसादे ओवीछंदबद्धे
भक्तिपदतीर्थामृते श्रीगुरुस्तवनरूप मंगलाचरणपूर्वक भक्त्युपक्रमनिरूपणं नाम
प्रथमस्तरंगः॥१॥

श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

तरंग दुसरा

॥ तत्पदार्थ निरूपण ॥

॥ ॐ तत्सत् श्रीसद्गुरु सर्वत्र यशस्वी श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥
नमो श्रीसद्गुरुमाये । प्रेमे वंदोनिया पाय ।
हा बालपणाची होये । विश्वाधिष्ठाता ॥१॥
सांख्याचिया आळणी । योगाचिया पाणी ।
वेदान्ताचिया तरुवनीं । वसंत तूं ॥२॥
कनकबीज सेवितां । आपणा स्वयें विसरतां ।
ब्राह्मण असोनि तत्त्वतां । शूद्र मी म्हणे ॥३॥
तेवीं आत्मयाच्या विस्मृती । जे जे देखे द्वैतापत्ती ।
ती अविद्या, तेथ आरूढ चिती । तो जीव बोलती मलबद्ध ॥४॥
तिये अविद्येचा चुरा । करावया दातारा ।
धरूनि आलेती अवतारा । कारुण्ययोगे ॥५॥
आणि आपुले म्हणोनि मग । मोक्षाचें तंडूल सुरग ।
भोजनयोगे अनुराग । वाढिसी कृपे ॥६॥
तुझिया कृपादृष्टीपुढे । बंधासी मोक्षपण रोकडे ।
चैतन्याचैतन्य फुडे । एकवट होय ॥७॥
मोक्ष द्यावया उदार । न पाहसी कोणाचा अधिकार ।
पाहतां पाहणे हा विचार । नसे तव ठायी ॥८॥
नाही ते जेव्हां आहे वाटे । तेव्हां विस्मृती हे थाटे ।
माये तूं भेटलीस **(य१-५)** जरी वाटे । तरी हे गोमटे परब्रह्म ॥९॥
ऐसिया वो मायबहिणी । जीवभाव-तनु-मन चरणीं ।
वाहिले, आतां कृपा करोनी । अवधान द्यावे ॥१०॥
मागां उपक्रमू बोलिला । जो भक्तिबोधू आला ।
तो पाहिजे कीर झाला । महावाक्योपदेशू ॥११॥

तेथ गुरुचेनि कृपे । महावाक्यही सोपे ।
भक्तीचेनि आटोपे । रूपासी ये ॥१२॥
असो हें काय बोलणें । सद्गुरु भक्तीचिया पुढे वाणे ।
परब्रह्महि न्यून होणे । निःसंशय ॥१३॥
तरी तो महावाक्यार्थू । सद्गुरु-कृपा-स्फूर्ति-परमार्थू ।
ज्ञानेश्वरनामे प्रेमार्थू । फळला ठाके ॥१४॥
चारी वेदांचे चार । असती पै साचार ।
त्यामाजीं परिकर । तत्त्वमसि ॥१५॥
''वेदानां सामवेदोऽस्मी''ति । स्वयें मत्कान्तोक्ति ।
म्हणोनी त्या वेदीचे निश्चिती । वाक्य श्रेष्ठ ॥१६॥
तेथ तत्पद विवरण । करावे हे उपपन्न ।
लागे म्हणोनि निरूपण । अवश्य वाटे ॥१७॥
जंव ज्ञात नाही पदार्थ । तंव न कळे महावाक्यार्थ ।
यालागीं तत् पदार्थ । निरूपिजेल ॥१८॥
अखंड सच्चिदानंद ब्रह्म । हा महावाक्य-विषय परम ।
वाच्यांश-लक्ष्यांशतः उपरम । अर्थ कीजे ॥१९॥
'तत्' पदार्थाचे द्विविध लक्षण । 'ताटस्थ्य' आणि 'स्वारूप्य' जाण ।
वाच्यांश तें तटस्थ लक्षण । स्वरूप लक्षण लक्ष्यांशू ॥२०॥
तटस्थ लक्षणाचेनि योगे । ईश्वरा बंधन नाहीं अंगे ।
गौणभजनमार्गे । यालागी विवरिजे ॥२१॥
जैसे प्रधानादि रणी झुंजतां । जय आणिती प्राप्ता ।
परी जयश्री तत्त्वतां । रायासीचि वरी ॥२२॥
तैसे मायेने निर्मिले । आणि हरीवरी कर्तृत्व आले ।
परी स्वये नाही केले । म्हणोनि तटस्थ ॥२३॥
हे तटस्थलक्षण निर्गुण । तो वाच्यांश निरसोन ।
स्वरूपलक्षण सगुण । लक्ष्यांशें घेईजे ॥२४॥
सच्चिदानंद अखंड लीला । षड्गुणैश्वर्य आनन्त्यमाला ।
अभिमानरहित स्वातंत्र्याला । स्वरूप-लक्षणाश्रितत्व ॥२५॥
कार्याहूनि जिचे । वेगळेपण न बोलवे वाचे ।
तें स्वरूप मायेचें । सद्-असद्-विलक्षण ॥२६॥
तेथ आभासे अधिष्ठान । ते ईश्वराचें तटस्थ लक्षण ।
येथ आभासवादे करून । प्रतिबिंब न घेईजे ॥२७॥

सत्योपाधिसंयोगें । सत्याधिष्ठानाचेनि संगे ।
जे असत् प्रतीती होऊं लागे । त्या नांव प्रतिबिंबता ॥२८॥
आणि रज्जूवरी सर्पाध्यास । तो विवर्तभ्रम आभास ।
सर्पाभासें रज्जूनाश । कदापि नोहे ॥२९॥ **(य१-६)**
आणि प्रतिबिंबवादे तत्त्वतां । उपाधीसि येत सत्यता ।
आणि उपाधि सत्य होतां । द्वैतचि नित्य ॥३०॥
म्हणोनि ऐसे येथ नाही । हा मृगजलवत् आभास पाही ।
मृगाप्रती बंधनही । मानवां दर्शन नुसुधे ॥३१॥
आणि चक्रवाकांप्रती । कांहीच नसे प्रतीती ।
तेवीं भगवद्भक्तांप्रती । नाहीच विश्व ॥३२॥
कां सत्य-पतिव्रतेचे ठायीं । वेश्या-स्त्रीपणाची कल्पना नाहीं ।
तेवीं भगवद्भक्तां कांही । उमटेचि ना हे ॥३३॥
ती यावया भगवद्भक्ति । सद्गुरुकृपाचि उपपत्ती ।
तन्मुखे महावाक्योपदेश प्राप्ति । भजन प्रतीती तै लाहे ॥३४॥
द्विविध भजनाचें शीळ । मर्यादा आणि प्रेमळ ।
मर्यादा तो वाच्यांश केवळ । प्रेमळ तो लक्ष्यांश की ॥३५॥
ईश्वर आहे जगत्कर्ता । तोचि कर्मफळदाता ।
तयासी आपण न भजतां । तो शिक्षा देईल ॥३६॥
ऐसें मानोनि करणे भजन । तेथ मायारूप (भय) अधिष्ठान ।
आणि ईश्वर जरी जाहला प्रसन्न । तरी तटस्थ राहे ॥३७॥
कां भानूचिया साह्याकारें । यज्ञयागादि कीजे द्विजेन्द्रें ।
भानू आपुलेनि आकारें । तटस्थ असे ॥३८॥
तेविं आपुलेनि विसरे । शरीरभय वाटे दुसरे ।
तदर्थ जें भजन बा रे । ते मायाव्यापारें तटस्थ ॥३९॥
ऐसा हा वाच्यांशू पहिला । आतां दुजा पाहिजे ऐकिला ।
जेणे मोक्षकाम चित्तीं धरिला । तदर्थे भजन करी ॥४०॥
आधीं आपणां बंधन कल्पिले । मग मोक्षासाठीं हरीस पूजिले ।
ते सात्त्विक मायारूप जहाले । तटस्थ भजन ॥४१॥
ऐसें तटस्थ-युक्त भजन । ते वाच्यांशे मिथ्या जाण ।
आता लक्ष्यांश स्वरूपलक्षण । निरूपिजेल ॥४२॥
जाणोनि आपल्या स्वरूपासी । भेद कांही न ठेवी मानसीं ।
मग द्वैत (तेचि) अद्वैतविशेषीं । होऊनि राहे ॥४३॥

हा त्वंपदाचा लक्ष्यांश विचार । तो पुढील प्रसंगीं प्रकार ।
प्रस्तुत सगुण साक्षात्कार । लक्ष्यांश कीजे ॥४४॥
'त्वं' पदलक्ष्यांशें आपण उमजला । तो येथ अधिकारी जाहला ।
जयाचा समूळ गेला । विपरीत भावो ॥४५॥
जेव्हा देहाभिमान गळे । तेव्हाचि कर्मे आटलीं सकळें ।
मग सुख-दुःखरूप कर्मफळें । बाधतीच ना ॥४६॥
जेवि पतीगृहीं राहणे । तैं मातृगृहाभिमान त्यागणे ।
तरीचि ऋतुसमयीं भोगणें । कान्तसुखा ॥४७॥
तैसा 'तत्पद' लक्ष्यांश घेणें । तरी 'त्वंपदे' कामना सोडणें ।
आपणा उमजूनीं होणें । 'असि' पदीं (प्रीति-) ऐक्य ॥४८॥
रज्जुवरीं सर्प भासला । तरी रज्जू सर्प नाही जाहला ।
तैसा मायागुणें **(य१-७)** हरी कर्ता वाटला । परी अकर्ता तो ॥४९॥
सापाचे पिळादिक धर्म । तें दोरीतही उपलब्ध परम ।
तैसे स्वातंत्र्यादिक उत्तम धर्म । स्वरूपें सत्यचि हरिपायी ॥५०॥
यालागीं शिक्षा देईल मातें । ऐसिया धरूनि भयातें ।
राखों पाहणें शरीरातें । नीच भजन तें, हा ठावो ॥५१॥
आणि कर्मफळें होतु कांहीं । तयातें आश्रयचि नाहीं ।
हें जगचि भासे लवलाही । सगुणाकारें ॥५२॥
जैसा सर्पाभास गेला । तरी रज्जु वर्तुळ नाहीं झाला ।
तो पीळरूपें पसरला । जैसा तैसा ॥५३॥
तेविं हे जग मिथ्यां वाटलें । तरी हरीचें साकारपण नाही मोडले ।
ते सत्य म्हणोनि राहिले । लीलाविग्रहें ॥५४॥
मग गंगेचा बिंदू मुखीं येतां । श्लेष्में जेवीं गंगारूपता ।
तेवीं एकदेशीय ही मूर्ति तत्वतां । पवित्र करी ॥५५॥
जोवरी नाही ऋतुप्राप्ती । तोवरी कान्तभय चित्तीं ।
आणि एकवेळ अनुभविलिया प्रीती । मग दर्शनीं भीती नाकळे ॥५६॥
तेविं जंव नुमटे श्रीहरीभजन । जंव स्वरूपसाक्षात्कार नव्हे गहन ।
तोंचि हे तटस्थलक्षण । भयदाते ॥५७॥
श्रवणापासोनि आत्मनिवेदनावरी । स्वरूपसाक्षात्कार कुसरी ।
चढतां लीलाविग्रहा धरी । ऐश्वर्यमंदिरी सुख ठाके ॥५८॥
मग स्वतंत्र षड्गुणैश्वर्यसंपन्न । साकार अखंड सच्चिदानंदघन ।
हें तत्पद लक्ष्यांश स्वरूप लक्षण । प्रत्यया येत तत्कृपें ॥५९॥

मग विषय जे जे दिसती । ते ते साकार श्रीपती ।
ही व्रजगोपींची प्रतीती । वाखाणिली ॥६०॥
जेवी आपुले धन देता । अलंकारी सोन्याची वार्ता ।
सोनार पाहे त्याचि अर्था । येथहि ठावो ॥६१॥
आधीच सोन्याचे प्रियपण । वरी अलंकार सुंदर पूर्ण ।
दोहीं दृष्टीं पाहतां जाण । सौंदर्यचि पिकलें ॥६२॥
तेवीं स्वरूपें स्वतंत्र हरी । परी चतुर्भुज सगुणाकारी ।
दोहीं दृष्टीं निर्विकारी । लीलाचि ते ॥६३॥
एवं चिन्मय लीलामात्र । हें विश्वचि झालें स्वतंत्र ।
आतां द्वैताद्वैतवाद अणुमात्र । प्रत्यया न येती ॥६४॥
रज्जू सर्पाभासीं पाहतां । सर्पभय वाटे तत्वता ।
म्हणोनि तो निरसन करितां । सुख बहू ॥६५॥
आणि सुवर्णाचे अलंकार । चित्ता वाटती मनोहर ।
ते मोडावे हा विचार । मूर्खही नाणी ॥६६॥
जोंवरी सुवर्ण तोंवरी पाही । अलंकारासी मिथ्यता नाहीं ।
कोणी तरी अवस्था ही । घडलीच राहे ॥६७॥
तैसा नोहे सर्पाभास । दीप आणितां मिथ्यात्व त्यास । **(य१-८)**
तेवींचि या सिद्धांतास । अबाध्यता ॥६८॥
'मी देह' हा अविद्या भुजंग । तेणें भय वाटे चांग ।
तो निरसणें हा राग । सहजची ॥६९॥
परी अधिष्ठानसुवर्णी । चतुर्भुज चक्रपाणी ।
तो निरसावा हें मनीं । आणी तो मूर्ख ॥७०॥
न मानलिया एकमूर्ती । तरी काय मोडे लीलाकीर्ती ।
आणि साकारत्वचि तयाप्रती । भूषणावह ॥७१॥
केवळ मन हरणें । हें तो नव्हे सुवर्णे ।
तें कार्य करणे । अलंकारेचि ॥७२॥
आणि अलंकार मोडतां दृष्टी । सोन्यासी कोणी तरी आकार शेवटी ।
तरी मोडणियाच्या हठीं । पडावें कां ॥७३॥
तैसा मनासी अस्पर्शन । नयनासी अदर्शन ।
तेथ जीवभाव लीन । करितांचि नये ॥७४॥
आणि वास्तवपणें पाहता । प्रभूसी सत्यचि साकारता ।
'लययोगें' या शुद्धार्था । जाणतीं संत ॥७५॥

मग परमाणूंचा पुंज । कां लय-योगीं रूपकंज ।
तो हा तत्पदलक्ष्यांश निकुंज । स्वरूपें श्रीकृष्ण ॥७६॥
तेथ पातिव्रत्याची वार्ता । मिळवोनिया परमार्था ।
चरणीं वाहिली समर्था । ज्ञानेश्वरांचिया ॥७७॥
श्रीज्ञानेश्वर सद्‌गुरु आई । आत्मा निवेदिला तव पायीं ।
आता 'त्वं' पदार्थभक्ति कथनीं देई । अवधान पुढे ॥७८॥
तुझेचि कृपें करून । जननी हा ग्रंथ हो पूर्ण ।
आणि शेखीं अर्पण । ज्ञानेश्वर माय तव चरणीं ॥७९॥

हरिःॐ तत्सदिति श्रीसद्‌गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे ओवीछंदबद्धे भक्तिपदतीर्थामृते तत्पदार्थलक्षणद्वयनिरूपणानुरूप श्रीकृष्णसाक्षात्कारजन्य भक्त्युपदेशो नाम द्वितीयस्तरंगः॥

॥ श्री सद्‌गुरु ज्ञानेश्वरार्पणमस्तु ॥

०००

तरंग तिसरा

॥ त्वं-पद निरूपण ॥

॥ श्रीसद्‌गुरु सर्वत्र यशस्वी श्रीज्ञानेश्वरमहाराज की जय ॥

जय जय वो स्वानंदसिद्धे । स्वसुखोदारे प्रसिद्धे ।
माये तुझिया अविरोधें । विश्व राहे ॥१॥
जंव जंव तुझें पदकमळ । हृदयीं राहती केवळ ।
तंव हे मायाजाळ । पाहिलेंच नाही ॥२॥
तूं स्नेहाची खोली । निगमफळें भरिली ।
परमकृपेची साउली । आपुलिया ॥३॥ (य१-९)
वेदाचा निरसावया अभिमान । तयाचा नियम टाकिला मोडोन ।
आपुली अन्यथा-कर्तृम् शक्ति पूर्ण । उघड जनां दाविली ॥४॥
सखे जे शीणले संसारीं । ते तुझिया नामाधारी ।
नाहींच या प्रत्ययाकारी । सुखावले ॥५॥
तरी जे कां ज्ञान । तंव कृपेचें आसन ।
किंबहुना तव अनुग्रहाविण । ज्ञान ते अज्ञान निश्चयें ॥६॥
जरी तव अनुग्रह जाहला जननी । तरी ज्ञान ते अज्ञानचि वाटे स्वमनीं ।
एवं दोन्हीं दिठीं अज्ञान काहाणी । मिथ्या जाहाली ॥७॥

तरी आतां ज्ञानाची चाड । उगीच कां करावी जळफड ।
म्हणोनि तंव भक्तीच गोड । वाटे माये ॥८॥
अंगे पूर्ण ब्रह्म जाहला । आणि तव पायां विसरला ।
तरी त्या ब्रह्मत्वाहुनी वहिला । नरक मानिला श्रेष्ठ आम्ही ॥९॥
जंव तुझी भक्ति घडे । तंव ब्रह्म तें पायां पडें ।
हें जाणोनि रोकडें । तुजचि नमिलें ॥१०॥
ऐसिया वो कृपाळे । ज्ञानेश्वर माते स्नेहाळे ।
तव पद सेवा प्रेम सोहळे । जन्म जन्म देई कां ॥११॥
यावीण अन्य कांहीं । सर्वथा मागणेंचि नाही ।
आणि प्रोत्साहन देई । तूंही यातें ॥१२॥
तुझेनि बोलें हा ग्रंथ । तव दास्य करो अखंडित ।
आणि ग्रंथकर्तृत्व हें जावोनि त्वरित । तव दास्ययुत मी होवो ॥१३॥
मागें 'तत्' पदलक्ष्यांश निरूपण आधीं । निरूपिलें या शब्दीं ।
कीं त्वंपद जाणें तोचि अवधीं । अधिकारी येथ ॥१४॥
माते त्वंपद वाच्य-लक्ष्यें । निरूपिजेल भक्त्यपेक्षें ।
आणि श्रीगुरुकृपा पक्षें । आश्रवूनि स्वयें ॥१५॥
कर्मफळांची कामना मनीं । आणि दृढ देहाभिमानी ।
या अविद्येचा आश्रय करोनी । राहे जीव ॥१६॥
हा मलिन त्वंपद वाच्य पक्ष । आतां शुद्ध बोलिजे प्रत्यक्ष ।
जो आपणा इच्छी मोक्ष । संसार तोडूनी ॥१७॥
तो जीव त्वंपदवाच्य सात्त्विक । आभासरूपें सकलंक ।
परी हा अनादि कंटक । बद्ध आहे ॥१८॥
ईश्वर आभास तटस्थलक्षणें । जीव आभास आरूढपणें ।
यालागीं श्रुती ऐसी म्हणे । आभास दोन्ही ॥१९॥
स्वरूपें जीवहि परब्रह्म । चेतनैक्यत्वें परम ।
परी सामर्थ्य-दृष्ट्या उपरम । दोघांमाजीं ॥२०॥
हें द्वैतचि परी अद्वैत । आणि परमार्थी नाहीं द्वैत ।
तें अकृत्रिम-भक्ति-प्रतीत । तैचि घडे ॥२१॥
कर्मफळकामना धरूनि भजन । तें त्वंपदाशुद्धत्वें मिथ्या जाण ।
आणि मोक्ष इच्छा ही पूर्ण । तेवींचि असें ॥२२॥
राजा आणि भिकारी स्वप्नींचा । जागेपणीं अधिकार नाहीं दोहींचा ।
(य१-१०) तेवींचि विपरीतज्ञान-स्वप्नींचा । बद्ध मुक्त हा ॥२३॥

एक मृगजळीं बुडाला । दुसरा पार निघोनि गेला ।
या दोहीं शब्दांला । याथार्थ्य नाही ॥२४॥
तेविं बद्ध आणि मुक्त । हें कांहींहि नसोनि निश्चित ।
मृग धांवती तैसा प्रतीत । विपरीत ज्ञानें धांवतसे ॥२५॥
हा सकळ त्वंपदवाच्यांश । या दोहोनी वेगळा लक्ष्यांश ।
तो बोलिजेल आतां विशेष । सद्‌गुरुकृपें ॥२६॥
व्यतिरेकें चारी देह सांडोनी । अन्वयें ब्रह्मत्व तेथें मांडोनी ।
बुद्ध्यादि व्यापार तटस्थपणीं । साक्षी राहे ॥२७॥
कामनेचा खेळ सांडी । संचिताची मोडी मुंडी ।
पुढें वंशजात न मांडी । क्रियमाणाची ॥२८॥
प्रारब्ध भोगीं उदार । हा त्वंपद लक्ष्यांश विचार ।
परी भक्तिविणें साचार । सकळही व्यर्थ ॥२९॥
मातृकुळासी संबंध सुटला । स्वामिनीपणाचा ठावो लाधला ।
इतुक्यानेच न मानी पतीला । तरी पतिव्रता ते नव्हे ॥३०॥
जरी वंदील पतीचे चरण । तरीच शोभे स्वामिनीपण ।
नातरी वेश्या हे बोलणं । माथांचि ये ॥३१॥
मग भलताचि चालवी सत्ता । तेणें अनेक कष्ट तत्वतां ।
आणि कष्ट करूनीहि मधुरार्था । बोलती न कोणी ॥३२॥
तैसा ज्ञानाभिमानें फुगला । 'मी ब्रह्म' पणें चवताळला ।
तो सर्वस्वी मुकला । भक्तिसुखाते ॥३३॥
लोह शृंखला त्यागुनी । कनक शृंखला घातली चरणी ।
तरी चोर नेतील या भयें करूनी । व्याकुळ चित्त ॥३४॥
सोनेहि आपुलें नाहीं झालें । पाय दुखणें तैसेचि राहिले ।
बंधन असोनि उगेंचि आलें । रक्षकत्व माथां ॥३५॥
तैसा 'अहंब्रह्मास्मि' ज्ञानें फुगला । तो अभिमानबंधीं साच राहिला ।
आणि व्युत्थानभयें तयाला । व्याकुळता न सोडी ॥३६॥
प्रारब्धाचे दुखणे । न सुटे भोगल्याविणे ।
ब्रह्म होऊनी जगीं विचरणें । लाजिरवाणें हेंही एक ॥३७॥
न भजतां व्रजराजबिंडा । तो सर्वदेशीं काळतोंडा ।
आम्ही ऐसिया भांडा । पुढें न राहूं ॥३८॥
ज्याच्या वेदोपदेशें वहिले । ब्रह्मज्ञानी पूर्ण झाले ।
शेखीं तयाची सोडितां पाऊलें । ते ऋणदार जाहले हरीचे ॥३९॥

आणि ज्ञानाभिमानें हा एक न मानी । तरी काय हरिसत्ता होतसे उणी ।
परि हाचि अभिमानी । मेला ठाकें ॥४०॥
जेणे कामें तारिल्या गोपिका । ते सामर्थ्य तुज नये लेका ।
त्यालागीं तो भजावा निका । नंदनंदनू ॥४१॥
तूं जरी ब्रह्म जाहला आंगीं । तरी भौतिक देह न सोडी तुजलागीं ।
(य१-११) आणि हरिभक्ति करितां देहसंगी । ब्रह्मरूप होशील ॥४२॥
हरि असोनि ब्रह्म पूर्ण । ब्रह्मचि तनु ये घेऊन ।
तूं अन्वयव्यतिरेकें ब्रह्म होऊन । भौतिक तनु कैशी राहे? ॥४३॥
तरी बापा ऐसे न करी । ब्रह्मज्ञानशोभा निर्धारी ।
त्वंपदलक्ष्यांश जाणोनि हरी । तत्पदलक्ष्य भजावा ॥४४॥
व्यतिरेकें टाकूनि देहाभिमान । अन्वये साधावे दासपण ।
हे स्वरूपभजनाची खूण । सद्‌गुरुकृपें ओळखावी ॥४५॥
तो सद्‌गुरुकृपेचा विचार । 'असिपद' विवरण प्रकार ।
पुढिलिये प्रसंगी सविस्तर । निरूपिजेल ॥४६॥
तेथ फिटेल सकळ भ्रांति । प्रकाशेल शुद्ध भक्ति ।
वेश्येसारखी लाजोनि मुक्ति । उभी राहील तटस्थ ॥४७॥
तें सुख मिळावया समग्र । आधीं वंदावे ज्ञानेश्वर ।
सांडोनि सकळ अहंकार । शरण साचार रिघावें ॥४८॥
शरणागता अभयदात्री । ज्ञानेश्वर आई जगद्धात्री ।
तियेचिया अंगुष्ठपात्रीं । आत्मनिवेदनतंत्री राहू ॥४९॥

॥ हरिः ॐ तत्सदिति श्रीमत्सद्‌गुरुश्रीज्ञानेश्वरकृपाप्रसादे ओवीछंदबद्धे भक्तिपदतीर्थामृते 'त्वं'पद निरूपणपूर्वक ज्ञानगर्वनिषेधसहित हरिभक्त्युपदेशो नाम तृतीयस्तरंगः ॥३॥

॥ श्रीसद्‌गुरु ज्ञानेश्वरार्पणमस्तु ॥

०००

तरंग चवथा

॥ असिपद निरूपण ॥

॥ श्रीसद्‌गुरु सर्वत्र यशस्वी ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

जय जय वो मायबहिणी । साष्टांग प्रणाम तव चरणी ।
ज्ञानेश्वर आई कृपारूपिणी । सद्‌गुरुमाये ॥१॥

सखे तव कृपेची नवाई । हे ब्रह्म पडे ठायी ।
आपुले परावे कांही । नेणवेजेते ॥२॥
पूर्ण प्रेमाचे सुख । तुझे कृपे निष्कलंक ।
मिळे हाचि एक । शुद्ध भाव ॥३॥
म्हणोनि सखे आई । तुजविण कांही ।
न लगे हे ठायी । ठेलेचि आहे ॥४॥
कां नवयौवना सुंदरींतुनी । आपुली जे जननी ।
ती काढावी निवडुनी । तरीच बाळ ॥५॥
तैसे धुंडतां त्रिभुवन । हेचि लाधलें पूर्ण ।
श्रीज्ञानेश्वर जननी चरण । स्तनपान तेची ॥६॥
तेथील पय पिऊनि गाढे । आणि तियेचेचि केलेनि कोडे ।
हे असि पद फुडे । विवरिजेल ॥७॥
तत् त्वम् पदांचे ऐक्यकरण । या नांव असि पद विवरण ।
(य१-१२) आणि हेंचि ऐक्यभजन । सार सकळांचें ॥८॥
तरी भजन त्रिविध असे । ते दृष्टान्ते सांगिजे आपैसे ।
तरी दृष्टान्तविवरण दिसे । करणे आधीं ॥९॥
अहो कुमार-वयापासुनी । कपाळीं कुंकू लावी कामिनी ।
तैसें तत्पदवाच्यांश स्मरणीं । अलंकार भजन ॥१०॥
आणि उपवर जै होय । तै लग्ननाम निघे स्वयें ।
पतिनाम ग्रहण होय । तेच वेळी ॥११॥
त्या नामे करूनि जाण । पतीसी ओळखे आपण ।
आतां दार्ष्टान्ता निरूपण । ऐसेचि कीजे ॥१२॥
प्रेमळ पाहूनि सद्गुरुनाथ । द्वादशाक्षरी उपदेश करीत ।
तो जपतांचि अंतरस्थ । प्रकटे श्रीहरी ॥१३॥
येथवरी अलंकारभजन । आतां ऐका स्वरूपभजन ।
जेविं झालियावरी लग्न । श्वशुराज्ञें करावी पतिसेवा ॥१४॥
तैसें ध्यानीं भरता हरी । संतआज्ञे परम कुसरी ।
सेवावा श्रीहरी । जगद्व्यापक ॥१५॥
आणि जेव्हा होय ऋतुप्राप्ती । तेव्हां पहुडणे मंचकावरुती ।
तैसा भावें सेवितां श्रीपती । सगुणाकृती पुढें ठाके ॥१६॥
येथवरी स्वरूपभजन । आतां ऐकिजे ऐक्यभजन ।
हेचि असिपदीं विवरण । निरूपिजेल ॥१७॥

कामे व्यापिता स्त्रीपुरुष । जेविं मीनती सुरतसुखास ।
तेविं अंतर्बाह्य श्रीहरीस । पाहणे घडे ॥१८॥
दोहीमधील एक काम । तैसे दोहीमधील एक प्रेम ।
हें असिपद परम । विवरण असे ॥१९॥
*तत्पदवाच्यांश तटस्थ श्रीपती । *त्वंपदवाच्यांश कृत्रिम प्रीती ।
*तत्पदलक्ष्यांश स्वरूपलक्षण मत्पती ।
आणि शुद्ध प्रीती *त्वंपदलक्ष्यांश ॥२०॥
या दोहींचे ऐक्यकरण । ते अकृत्रिम भक्तिलक्षण ।
सर्वांभूती सुंदर सगुण । सांवळे दिसे ॥२१॥
अलंकारार्थ सोन्याची आवडी । तेविं भक्तिसाठींच ब्रह्मगोडी ।
भक्तीनेच तुटे बेडी । पशुत्वाची ॥२२॥
सत्पदे जड जग भासे । चित्पदे जीव विलसे ।
आनंदपदे प्रत्यय असे । श्रीहरीचा ॥२३॥
हे ऐक्यभजन परी औपचारिक । याहूनि वेगळे पारमार्थिक ।
काम भोगितां न भोगितां देख । पति सेवा करणे हा पतिव्रता धर्म ॥२४॥
तेविं हो न हो आनंद प्राप्ती । परी हरिपदी सहज प्रीती ।
ते पारमार्थिक भक्ती । अकृत्रिम ॥२५॥
पांढरें परिमळयुक्त नम्र । हो तिन्ही मिळूनि कापूर ।
तेविं सद्‌दिानंद साचार । तिन्हीही एक ॥२६॥
सत्पदें असे । चित्पदें भासे ।
आनंदपदें विलसें । एकत्वपणें ॥२७॥
परी हें बोलणें काय । सद्‌दिानंद हा ठाय । **(य१-१३)**
अस्ति, भाति, प्रियत्व होय । सहजचि जे ॥२८॥
जीभ आणि साखर । त्यांत रस एकचि मधुर ।
तेवि सेव्य-सेवक द्वैताकार । परी प्रेम साचार एकरूप ॥२९॥
सेव्य श्रीहरी तत्पदलक्ष्य । सेवकान्वयी जीव त्वंपदलक्ष्य ।
दोहींचे ऐक्य जो प्रेमपक्ष । असिपद तें ॥३०॥
सत्ता तेचि चैतन्य जाण । कीं चैतन्य ते आनंद पूर्ण ।
एवं 'सत्' 'चित्' 'आनंद' मिळोन । एकचि वस्तू ॥३१॥
वृत्ति उठे तें सत्पद । वृत्ति मुरे तें चित्पद ।
अखंड हरिप्रीति तो आनंद । सच्चिदानंद स्वयंरूप ॥३२॥
जेविं पिता उत्तम शिकवी । तेंविं शिक्षार्थ हरि दुःख दाखवी ।

येन्हवी हें ठेवी । स्वानंदाची ॥३३॥
केवळ अहंब्रह्मास्मि म्हणता । व्युत्थान न चुके सर्वथा ।
तैसें नाहीं हरिभक्तां । म्हणोनि या पथा अनुसरावें ॥३४॥
अहो सत्पद तें नामस्मरण । चित्पद तें रूप सगुण ।
एक प्रीतीसुख गहन । आनंद तोचि ॥३५॥
त्याचा तूं आहेसी हा मलिनगुण । तें ब्रह्म तूं आहेसी हा सत्त्वगुण ।
हे हरी, तें सर्व तूंचि हे स्तवन । शुद्धलक्ष्यांश महावाक्याचा ॥३६॥
'तस्य त्वमसि' हे विपरीत ज्ञान । 'तदेव त्वमसि' हा ज्ञानाभिमान ।
'तत्त्वमसि' रूप सगुण । हे ऐक्यभजन प्रेमरूप ॥३७॥
उपाधि उपाधेय कांही । सांगावया वेगळे नाही ।
म्हणोनि निर्गुणता नाही । सगुणचि हे ॥३८॥
'तें मी' म्हणता अवघे सगुण । तरी येईल विराटाभिमान ।
यालागीं श्रीहरीसी अर्पून । घ्यावे दासपण आपणाकडे ॥३९॥
आपण आपुले काम करितां । जेवि संकोच न ये गृहिणी चित्ता ।
आणि पतिप्रार्थने जातां । लीन होय ॥४०॥
तैसा दासपणी न लाजे । प्रभुपूजनी अनुरंजे ।
येरा सकळां विरजे । ज्ञानादिकां ॥४१॥
मग तयाचिया दृष्टीं । अज्ञानाची नाहीं गांठी ।
तेथ ज्ञानाची उठाउठी । कां करावी ॥४२॥
दिवसा लावितां दिवा । तरी शीण मात्र व्हावा ।
एरव्हीं कार्य-ठेवा । कांहीच नोहे ॥४३॥
तैसा हा संकेत पूर्ण । येथे जे अहंब्रह्मपण ।
तो उगाचि असे शीण । अकार्यरूप ॥४४॥
तरी ऐसे न करावे । दिवसां डोळां सूर्येचि पाहावे ।
तैसे सकळहि अर्पूनि भजावे । पूर्ण हरीतें ॥४५॥
ज्ञाने हरवावे विपरीतज्ञान । भजनें सांडावे ज्ञानोत्थान ।
मग जे प्रारब्ध दुःखरूप जाण । लागतां हरिचरण सुखरूप ॥४६॥
जे जे विश्वीं असे कांहीं । ते ते अवघे शेषशायी । (य१-१४)
तयाचे सुखग्राही । व्रजराज तो ॥४७॥
अमृताचां बिंदु घेतां । सिंधुसामर्थ्य चढे हाता ।
आणि सिंधुमाजी बुडोनि जातां । घाबरता, बिंदुही घेववेना ॥४८॥
तेवि भजतां कृष्णरूपडे । सच्चिदानंद हातां चढे ।

आणि सच्चिदानंद बोलतां कोरडे । दोन्ही न मिळे ॥४९॥
एवं हे सकळ । जाणोनि भजे घननीळ ।
तोचि गा प्रेमळ । पूर्ण भक्त ॥५०॥
मग मर्यादा करी पालन । तरी तो प्रेमचि जाण ।
एवं पदद्वय वाच्य-लक्ष्य मिळोन । भक्तीचि उरे ॥५१॥

॥ भक्तीतील १० रस ॥

ह्या भक्तिसुखाची नवाई । सकळ रसांची आई ।
करुणा दाखवी ठायीं । शान्तिगुणे ॥५२॥
विश्वीं सच्चिदानंद प्रतीती । या नांव * शृंगाररस भक्ती ।
उल्हासे विश्व न भासे चित्ती । या नांव * वीररस ॥५३॥
जगदर्पणीं जळभरी नयन । हें * कारुण्य असे गहन ।
जग चळे, हरि न चळे, हा अनुभव पूर्ण ।
* शान्तिरस जाण या नांव ॥५४॥
अखंड प्रेमानंद उन्मादस्थिती । या नांव * हास्यरस भक्ती ।
मर्यादा-पालन-रूप प्रीती । * भयानक स्थिती या नांव ॥५५॥
भगवन्माहात्म्यज्ञान । हा * अद्‌भुतरस पूर्ण ।
तिटकारानि पळे ज्ञानाभिमान । * बीभत्सरस जाण या नांव ॥५६॥
प्रणय कोपाची रीती । ही * रौद्ररसाची ख्याती ।
परम हरि-विरहासक्ती । * माधुर्यभक्ति हा रसू ॥५७॥
जैसा आम्रवृक्षाचा सार । फळामाजींच अवघा साचार ।
तेविं रासक्रीडेमाजीं निर्धार । रसलीला सकळही ॥५८॥
'सर्व गंधः सर्व रस' इति । हरिविषयींच बोले श्रुती ।
आणि 'रसं ह्येवायं लब्ध्वाऽऽनंदी भवति'।
हे भक्त्या परमानंद प्राप्ती श्रुती सांगे ॥५९॥
रसरूप रसात्मा श्रीहरी । प्रेमरस द्यावा त्या माझारीं ।
मग रस पावूनि अविकारी । सुखाकारी नांदावे ॥६०॥
हें 'तत्' 'त्वं' ऐक्य 'असि'पद विवरण । रसरूप रसग्राहक रसाधिष्ठान ।
प्रेमे निर्भय ऐक्यपण । परी स्वामी श्रीकृष्ण स्वतंत्र सेव्य ॥६१॥
हें द्वैतचि पूर्ण अद्वैत । हाचि शुद्ध भगवत्पंथ ।
येणे ज्ञानेश्वरचरणीं विश्रान्त । व्हावे संती ॥६२॥
ही भक्तिरसाची कावडी । अभिषेकावया परवडी ।
ज्ञानेश्वर मातृचरणगोडी । धरूनि वाहिली ॥६३॥

तें चरणाभिषेक तीर्थ । उत्तर प्रसंगीं बोलिजेत ।
सावधान श्रोते संत । होवोनी अवधान देईजे ॥६४॥
सर्व सुखाची पुरवणी । सखे ज्ञानेश्वर माय बहिणी ।
जीवभाव वाहिला चरणी । कृपाकर जननी शिरीं ठेवी ॥६५॥
(य१-१५) सख्या सद्‌गुरु मायबापा । ज्ञानेश्वरप्रभो करूनि कृपा ।
तुमचा चरणमार्ग सोपा । सर्वदां मिळो ॥६६॥
तरी जन्म जन्म आतां । द्यावें याचि परमार्था ।
यावीण अन्य सर्वथा । न लागे कांहीं ॥६७॥

हरिःॐ तत्सदिति श्रीमत्सद्‌गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे ओवीछंदबद्धे भक्तिपदतीर्थामृते संकेतदृष्टिमय परमगुह्य 'असि' पदविवरणपूर्वक त्रिविधभजन शुद्धभजनरूप भक्त्युपदेशो नाम चतुर्थस्तरंगः॥४॥

श्रीसद्‌गुरु ज्ञानेश्वरार्पणमस्तु ॥

०००

तरंग पांचवा

॥ भक्तिफल निरूपण ॥

॥ ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥
ॐनमोजी विश्वंभरा । सच्चिदानंदा करुणाकरा ।
भक्तवत्सला ज्ञानेश्वरा । स्वसुखोदारा सगुणरूपा ॥१॥
तूं आपुलिया माउली । पूर्ण प्रेमे पान्हावली ।
हे सकळही साऊली । तुझीच माये ॥२॥
''एकाकी न रमते'' या बोला । साच करावयाच्या लीला ।
प्रीतीवशे धरिला । सगुणाकारू हा ॥३॥
अन्वयें जाणावयाचे राहे । मग जाणणें अवघेचि होय ।
तेही आटोनि सगुणपाय । फळले आम्हां ॥४॥
ऐसिया निजजननी । मौनें सकळ वाहिली चरणीं ।
आतां नित्यचि नमुनीं । ऐसे ठेवी ॥५॥
पतिकामभोगाचें फळ । पतिवीर्यचि उमटें बाळ ।
तरी पतीचें चरणकमळ । चिरंतन होती ॥६॥
तेविं महावाक्योपदेशें भक्ति । करितां पति होय श्रीपती ।

मग प्रेम पुत्र प्रेमचि पती । प्रेमरूप युवति आपण ॥७॥
कामनेची रात्र गेली । प्रेमाची पहांट फुटली ।
प्रखरता समूळ तुटली । ज्ञानसूर्य किरणांची ॥८॥
कोटी सूर्यासम सोज्वळ । कोटी चंद्रासम शीतळ ।
श्यामस्वरूप घननीळ । अंतर्बाह्य ॥९॥
नवविधा ती गौणी । जिज्ञासु अर्थार्थी भेदें करूनी ।
आर्त जे कां सत्त्वगुणीं । तेही गौणी बोलिजे ॥१०॥
करितां आत्मनिवेदन । तत्काळ तुटती त्रिगुण ।
'मी सच्चिदानंद' हा अभिमान । विरहभक्तीने गळतसे ॥११॥
मग गौणी आणि परा । या भेदासी नाही थारा ।
अवघीच एकाकारा । प्रेमलक्षणा ॥१२॥
* श्रवणे हरिगुणश्रवण । * मुखें हरिगुण कीर्तन ।
* करें श्रीहरीअर्चन । * चरणे पथगमन हरीगृहाचा ॥१३॥ (य१-१६)
* घ्राणें निर्माल्यगंध । * नेत्रे देखणे श्याम शुद्ध ।
* मनबुद्धि ते सिद्ध । प्रेमामाजी ॥१४॥
प्रेमचि इंद्रियद्वारें उमटे । प्रेमचि बुद्धीं आत्मीं थाटे ।
परमात्ममाहात्म्यें एकवटें । प्रेमचि तो ॥१५॥
प्रेमाची पहावया परीक्षा । प्रेमचि प्रभू दे शिक्षा ।
प्रेमळ सख्याची प्रतीक्षा । प्रेमळाते ॥१६॥
प्रेमळपणे दोनी । स्वयें गेले विरोनी ।
प्रेमळाचीच खाणी । सर्वेन्द्रियां ॥१७॥
बुडालें लौकिकाचरण । तुटलें वैदिक बंधन ।
जितुके दिसती आश्रमवर्ण । संन्यासचि ते ॥१८॥
कर्मफळांचा लाहो सुटला । कर्माचाही ठावो पुसला ।
अंतर्बाह्य स्पर्शिला । श्रीकृष्णप्रेमा ॥१९॥

॥ भक्तीतील योगसाधना ॥

प्रेमसद्‌गद प्राणयमन ।
प्रेमी प्रत्याहारे मन । प्रेमधारणा रूप सगुण ।
प्रेमचि ध्यान । कृष्णसेवा ॥२०॥
प्रेम ओसंडण समाधि । पूर्व यमनियमासनादि ।
आदि अंती त्रिशुद्धी । प्रेमचि एक ॥२१॥

प्रेमींच एकपणें द्वैत । प्रेमेंच द्वैतीं अद्वैत ।
प्रेमेंच नाशे द्वैताद्वैत । रासेश्वरीसहित हरि भेटे ॥२२॥
ऐसा हा प्रेम शब्दें । बोलतां न ये विनोदे ।
याच्याचि अविरोधें । सकळ हें ॥२३॥
व्रजराज तात जया । आम्ही लंपट तत्पायां ।
कमळीं भ्रमरी होवोनिया । जये रीती ॥२४॥
कां गोपिकांची रजधूळ । आम्हांसि करील प्रेमळ ।
हा विश्वास मनीं प्रबळ । धरोनि घननीळ चिंतितसे ॥२५॥
माहात्म्यरूपें प्रेम पाही । जारपणही न ये देही ।
कामचि परी अधिक ठायीं । मोक्षाहूनि पै केला ॥२६॥
ऐसी जियांची स्थिती । त्या गोपिकापदीं प्रीती ।
वंदनादि पुढतपुढती । पन्नासो कीं ॥२७॥
जया स्थळीं विरूपाक्ष । मृदंगवादन धरी पक्ष ।
ते सावळे ब्रह्म प्रत्यक्ष । प्रीतीने होऊ ॥२८॥
आणि ब्रह्म होणेही सकळ । जयाच्या पायांहूनि केवळ ।
ओवाळिजे तो घननीळ । सबाह्यान्तरीं पाहूं ॥२९॥
'शिवो भूत्वा शिवं यजेदिति'। ही साह्य नेऊं सखी श्रुती ।
मग तीलाचि प्रार्थोनि भक्ती । मागोनि घेऊं ॥३०॥
प्रेमाचा करूं कळस । हरीस अर्पू ब्रह्मरस ।
श्रीकृष्णपदीं सावकाश । सख्यांनो, भृंगी होऊं चला ॥३१॥
वाच्य लक्ष्य मिथ्या पक्ष । सर्वदेशी एकदेशी प्रत्यक्ष ।
स्वयें श्रीकृष्ण सगुण अपरोक्ष । अनुभव साक्ष प्रीतीचा ॥३२॥
परम प्रेमाचें रूप । तो हा व्रजींचा भूप ।
वेणुनाद संकल्प । सत्यत्वें ठेला ॥३३॥
सनकादिकांची ध्येयमूर्ती । नारदप्रभूची गेय कीर्ती ।
रासमंडळी प्रेममूर्ती । चला पाहू सख्यांनो ॥३४॥ (य१-१७)
व्यापक सुख जे भरलें । तें संपुटीं एकवटलें ।
हें ब्रह्ममुसें वोतलें । सांवळें रूप ॥३५॥
जयाचें नाम घेता वाणी । ब्रह्मरूपत्व शरीरालागुनी ।
अस्मत्कान्त ते प्रेमदानी । पदनिर्वाणी सेवू त्यांचे ॥३६॥
कल्पना आणि अभिमान । दोन्ही प्रेमरूप जाण ।
सच्चिदानंद हे खूण । प्रेमामाजीं ॥३७॥

भोळा आणि ज्ञानवंत । प्रेमीं समानचि निश्चित ।
हें फळ तोडतां महावाक्यार्थ । तरुसम झाला ॥३८॥
वसंत शृंगार रती । मोह मन्मथ स्थिती ।
सकळही श्रीकृष्णप्रीती । रूपा आली ॥३९॥
वृत्तीचें वृत्तिपण गेलें । जीवाचें जीवपण मेलें ।
मुक्तिबीजासी अंकुर आलें । भक्तिसुखाचे ॥४०॥
हें काय गौण बोलणें । बीज आणि फल भक्तीच होणें ।
त्यांतील प्रेमरस चाखणें । नंदनंदनें मत्कान्ते ॥४१॥
पडला अविद्येचा विसर । बुडाला विद्येचा अंकुर ।
अवघा झाला अविकार । श्रीकृष्ण प्रेम ॥४२॥
जळाली बंधनस्थिति । पळाली लाजोनि मुक्ति ।
आविष्करिली भक्ति । अकृत्रिम ॥४३॥
हा आविर्भावो भला । परम गुह्ये निरूपिला ।
दशोपनिषदां आला । निषेध भावो ॥४४॥
तो निषेधचि स्तवन-विधी । श्रुतीपणें गोपीमांदी ।
प्रेम साधोनिया संधी । श्रीकृष्णपदीं उडी घाली ॥४५॥
करुणेचे काढोनि कोंब । श्रीकृष्णवृक्ष स्वयंभ ।
प्रेमतारुण्ये सप्रभ । टवटवीत ॥४६॥
लता गोपिका वेष्टित । रसपुष्पीं सुगंधित ।
ऐक्य फळभारें डोलत । प्रेमरसे ॥४७॥
आम्हां पक्षियांतें सुख जाणा । घ्यावया प्रीतीरसरूप रसना ।
अचल तरूपतिचरणा । करिता अर्पणा स्वानंदू ॥४८॥
हा स्वानंद वाचाऋण । न फिटेचि उपायें करून ।
या लागीं मौनेचि चरण । वंदिले प्रभूचे ॥४९॥
त्या चरणीं होतां ठावो । गेला सर्वही भावाभावो ।
सबाह्यान्तरीं लाधली ठेवो । कृष्णरूपाची ॥५०॥
सच्चिदानंदवंदनगर्भ । प्रेमशोभासुखसुरभ ।
एकचि परी पूर्णप्रभ । व्याप्यव्यापकवर्जित ॥५१॥

॥ रासमंडळ ॥

षड्गुणैश्वर्ययुक्त । ऐश्वर्य तें विश्व समस्त ।
विश्वैक्यकरण तो सगुण भगवंत । परी प्रकट सिद्धान्त रासामध्ये ॥५२॥
तें रासमंडळ गोपीप्रेमे । आम्हां दिधलें गुणोत्तमें ।

यालागी तत्पदप्रेमें । रसत्वें सेवूं ॥५३॥
त्या रसाची प्रीति । तेणे हृदयीं धरूं श्रीपती ।
साधोनियां अकृत्रिम भक्ति । वाचाऋण निश्चिती फेडूं ॥५४॥
फिटलियाही वाचाऋण । न यावा भक्तिधनाभिमान ।
यालागीं ऐक्यत्वें श्रीकृष्णचरण । प्रीतीनें सेवूं ॥५५॥ (य१-१८)

॥ वरदान ॥

तें सेवासुकृत जे कांहीं । निश्चयें घेवोनि सर्वही ।
अर्पियलें पायीं । ज्ञानेश्वर श्रीगुरूच्या ॥५६॥
हें करितांचि अर्पण । सद्‌गुरूनें दिधलें वरदान ।
हा ग्रंथ एकवीस वेळ पठण । संपुटीं लावूनी करावा ॥५७॥
'ज्ञानेश्वर माऊली' अनुलोम । प्रेमे तोचि प्रतिलोम ।
पठण करितां प्रकाशे परम । नित्य सुखदात्री हरिसेवा ॥५८॥
या श्रीगुरुवचनें भलें । आम्हां पठणचि फळलें ।
प्रेमे वंदिली पाउलें । वंदनचि असो ॥५९॥
'अमृतानुभव' संपुटी । 'ज्ञानेश्वर'पदसंपुष्टी ।
स्वप्रेम स्वानंदे गोष्टी । लाधल्या, ज्या की ॥६०॥
त्या आणि तन मन धन । जीव प्राण ईश्वरपण ।
पायीं अर्पोनि हृदयी चरण । वंदोनि स्थापिलें ॥६१॥
एकत्वें दोहींची पूजा । अर्चिले श्रीगुरुराजा ।
अर्चनपुण्य वाहिलें वोजा । श्रीगुरुज्ञानेश्वरचरणी ॥६२॥
चरण पाहाता विराले मन । तेणें ग्रंथबोला पडले मौन ।
आता जयजयकार करून । ज्ञानेश्वर उत्कर्ष ॥६३॥
नमो ज्ञानेश्वर जगन्माते । कडिये घेवोनि मातें ।
पाजोनि स्तन प्रेमातें । पायींच ठेवी ॥६४॥
या विनंती आदिनाथ । कृपें तोषलें समर्थ ।
चरण वंदिता मच्छेंन्द्रनाथ । ओसंडलें प्रेमें ॥६५॥
नमितां मत्स्येन्द्रमाउली । गोरक्षनाथा कृपासाउली ।
गोरक्ष नमितां माय माउली । गैनी पाउलीं शिर ठेवू ॥६६॥
श्रीनिवृत्तिनाथ शंकर । त्या लोटांगण वारंवार ।
तत्कृपे माय ज्ञानेश्वर । मिळाली आम्हा ॥६७॥
सोपानदेव कृपाळू तात । मुक्ताबाई कृपावंत ।
चांगदेव, खेचर, नामयादि संत । जनी, मीरा समस्त नमियेले ॥६८॥

ज्ञानेश्वर प्रभूचिया करकमळें । हृदीं उदेलीं प्रेमफळे ।
म्हणोनिच नंदबाळें । अंगिकारीलें ॥६९॥
यापरी गुरुपरंपरा स्मरणीं । प्रेमे राहोनी ज्ञानेश्वरचरणीं ।
अंगुष्ठ चोखितां धणी । न पुरेचि हे ॥७०॥
यालागीं तें पदकमळ । हृदयी धरिले नित्यकाळ ।
ज्ञानेश्वरनामें कल्लोळ । अन्तर्बाह्य ॥७१॥
ज्ञानेश्वरगुरुमुखपीकप्रसाद । तेथें आटलें दुःखानंद ।
शेखीं अर्पणरूपें शुद्ध । प्रेमचि उरला ॥७२॥
जयजय ज्ञानेश्वर माउली । सद्‌गुरुरूप कृपासाउली ।
आतां बळकट पाउलीं । हृदयीं राखी ॥७३॥
आणि हें मागणें मना । पायीं करो सुमना ।
प्रेमरसे रसना । अंगुष्ठ चाखो ॥७४॥
ज्ञानेश्वर सद्‌गुरुनाथ । हाचि येथ निघो अर्थ ।
सर्वत्र यशस्वी सद्‌गुरुनाथ । ज्ञानेश्वरमाउली ही ॥७५॥ **(य१-१९)**

॥ हरिः ॐ तत्सदिति श्रीमत्सद्‌गुरु ज्ञानेश्वर कृपाप्रसादे ओवीछंदबद्धे
भक्तिपदतीर्थामृते फलानंत्यपूर्वक उर्वरित भक्त्युपदेशो नाम पंचमस्तरंगः ॥
॥ श्रीसद्‌गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

०००

२. निगमान्तपथसंदीपक

अध्याय १ ला

सद्गुरुमहिमा

॥ श्री ज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥
ॐ नमो श्रीसद्गुरु सर्वेशा । शिष्यचकोरचंद्रा पूर्णपरेशा ।
जय सच्चिदानंदा निरस्ताभिलाषा । ज्ञानचंडांशा चित्सुखा ॥१॥
नसतियेचे घरी । ही जी व्यष्टि अहंकारी ।
तीते मोचनकारी । कारुण्याचा ॥२॥
पाहे ईशत्व त्रासलें । तें त्वद्बोधें सुखावलें ।
मग येवोनि ओटंगले । तव संकेतीं ॥३॥
पाहे तुझिया साविया दिठीं । अनुपम उल्हासु आपण उठी ।
हा मीचि परी बैसों पाठीं । महेशाच्या ॥४॥
रोहिणीउदकें शिणलें । ते तव पायी मीनले ।
आणि मानुखे इये वहिले । रमले तेथ ॥५॥

श्रीगुलाबरावमहाराजांचे उत्तराधिकारी
सद्गुरु श्रीबाबाजीमहाराज पंडित यांनी केलेला **अनुवाद**

अर्थ - अहो सर्वाधिपते ओंकारस्वरूपी सद्गुरुराया, आपल्याला नमस्कार असो. आपण शिष्यरूपी चकोर पक्ष्याला जीवन देणारे पूर्ण चंद्र असून साक्षात् ईश्वरच आहांत. आपली सच्चिदानंदलीला निष्प्रयोजन आहे. चिदानंद प्राधान्याने आपले विशेषस्वरूप, अज्ञान अंधःकाराचा नाश करणारा केवळ प्रखर सूर्यच आहे. आपला जयजयकार असो.१. नसणाऱ्या अविद्येंत सांपडून आपल्या मिथ्या मर्यादित देहाचा अभिमान बाळगणारा जीव होय. त्याची दुःखातून सुटका करणारे करुणामूर्ति सद्गुरु आपणच आहात. २. पहा! (जीवाच्या अपेक्षेने शुद्ध ब्रह्माच्या ठिकाणी आरोपित झालेले ईश्वरत्व जणुं आपल्या स्थितीला कंटाळले होते पण आपण, जीवाला अद्वैतदृष्टि देऊन बोध केल्यामुळे, ते आपल्या मूळच्या शुद्ध स्वरूपाला प्राप्त झाले व सुखी झाले) वस्तुतः ईश असलेलाही जीव ईशत्व विसरल्यामुळे जीवदशेला प्राप्त होऊन त्रस्त झाला होता. पण आपण दिलेल्या अद्वैतबोधाने तो अद्वैतस्वरूपांत मिळून सुखी झाला. ३. पहा ! आपल्या कृपादृष्टीने जो अपूर्व आनंद

स्वाभाविकपणें उदय पावतो त्यामुळे हा मी म्हणणारा, जीव असूनहि त्याला ईश्वरपदापेक्षा उच्च स्थिति प्राप्त होते. ईश्वराची आरोपित स्थिति त्या मानाने गौणच आहे. ४. विषय मृगजलवत् वाटून त्याला कंटाळलेले मुमुक्षु आपल्या चरणाच्या ठिकाणी प्रेमाने लगटतात. उलट विषयाचे ठिकाणी सत्य बुद्धि ठेवून आसक्त होणारे बद्धजीव निश्चयाने तेथेच रमतात. ५.

ऐसा जिया थोर सानां । पाहूनि टकी नयना ।
उभा असशी दाना । अपवर्गाच्या ॥६॥
माये तुझिया अपांगपातें । दिसाव्याचें देखतें ।
होऊनि ठाके परौतें । भावभूत ॥७॥
चहूं दोषां इया । आश्रो नाहीं पायां ।
म्हणूनि जातिगुणक्रिया- । लोप स्वीकारिती ॥८॥
इये देखणें समस्तें । तोंडाळपणें गलितें ।
मग आपसया प्रियते । तुझेनि माये ॥९॥
पाहे हा महच्छ्वास । तव कृपेचा वास ।
कां आपुलें तयास । नेणिवेजेते ॥१०॥

मोक्ष देण्याकरितां आपण सदैव तयार असता. तो देतांना हा लहान (बद्ध) हा थोर (मुमुक्षु) हा भेदभाव आपण बाळगत नाही. ६. आई ! तुझा कृपाकटाक्ष पडताच दृश्य हे मूळ द्रष्टृस्वरूपांत मिळून दृश्य द्रष्टा हे दोन्ही भाव तिन्ही काळी निवृत्त होतात. ७. आपल्या चरणापाशी चारही वाणींची पोहोंच नाही म्हणून जाति, गुण, क्रिया ह्या आपोआपच लोप पावतात. (टीप :- जाति, गुण, क्रिया ह्या जेथे असतील त्याच वस्तूचे शब्दाने वर्णन होऊ शकते. आत्मस्वरूप निर्गुण आहे म्हणून तेथे गुण नाहीत. अविकारी म्हणून क्रिया नाही व अद्वय म्हणजे त्याशिवाय दुसरी वस्तुच नाही म्हणून जातीही नाही.) ८. वेदान्तादि षड्दर्शने आत्मस्वरूप वर्णन करण्याचा आव आणून नुसती बडबड करतात व व्यर्थ ठरतात. मग जे तुझे प्रियस्वरूप ते केवळ तुझ्या कृपेनेच आपोआप प्राप्त होते. ९. पहा ! हा भगवंताचा निश्वास म्हणजेच वेद होत. ते अप्रयत्नपूर्वक जे निर्माण झालें ते केवळ तुझ्या कृपेनेच; पण तूं त्यांना आपले स्वरूप कळू दिले नाहीस. १०.

स्थानांतरी तिहीं । आश्रवूनि ठायीं ।
निःशेष देत ग्वाही । महिम्याची ॥११॥
हा गा जाणिवेच्या मिठी । सुवोनि आपुले पोटीं ।
मग दे प्रसाद गाठीं । प्रसन्न परी ॥१२॥
स्वाच्या प्रीतिपणीं । येशी आंगवळणीं ।
येर पथ धणी । न पुरशी ॥१३॥
हे फिरलिया तारका । ज्ञप्ति इया कणिका ।

मग वस्तु भेद्या मुका । दोघांही करिसी ॥१४॥
जैं तुझे आम्ही होणें । तैं ये सुखा येणें ।
मा कृत्रिम बोलणें । काइसें तें ॥१५॥ (य१-२०)

कर्मकांड व उपासनाकांड परमेश्वराच्या सोपाधिक स्वरूपाचे वर्णन करतात व ज्ञानकांड हे निरुपाधिक स्वरूपाचे वर्णन करते. एवंच, तिन्ही कांडात भगवंताचेच परोक्ष भाषेत वर्णन केले आहे. (टीप :- 'परोक्षप्रियाः हि देवाः'. ''देवांना आपले वर्णन सांकेतिक रीतीने केलेलेच आवडते'' असे वचनहि आहे.) ११. हे श्रीगुरो, आपण शिष्याला आत्मस्वरूपाची जाणीव करून देऊन तात्काळ आपल्या स्वरूपात सामावून घेता व प्रसन्न होऊन महाप्रसाद देता.१२. आपल्या ठिकाणी आत्मवत् प्रेम केल्यानेच आपली प्राप्ति होते. इतर मार्गाने ती साध्य होत नाही. म्हणजे इतर साधनांनी आपण वश होणे शक्य नाही. १३. आपल्या कृपेने वृत्ति अंतर्मुख झाली असता ती ज्ञानस्वरूप ज्ञानैकमात्र होते. मग वस्तुभेद राहात नाही. शिष्य व श्रीगुरु या दोघांची अबोलणी स्थिति होते. १४. पण ही सुखस्थिति आम्ही सर्वस्वी तुझे व्हावे तेव्हाच प्रत्ययास येते. मग नुसते बोलणे व्यर्थ ठरते. १५.

हा वाणीपरी गोठो । मग एकलिया भेटो ।
गौण बोला फुटो । वेगळीये ॥१६॥
अंगुष्ठ निरियाच्या । लया प्रमाणादीच्या ।
पाहूनि यतनाच्या । भरीं न पडे ॥१७॥
सामर्थ्य पुरुषा जिते । म्हणोनि ना भाते ।
तेणे अन्वयीं पदातें । क्रमोनि ठेले ॥१८॥
तरी ते हृदयींचें । फावे तैं साचे ।
पारणें जिवाचे । फिटलेंचि आहे ॥१९॥
ऐसिया जननी जनका । ज्ञानेश्वरा निष्कलंका ।
श्रीसद्गुरु तनुमनग्राहका । अभयें बालकवाक्य स्वीकारा ॥२०॥
आतां मौनेंचि वाहिले । वाहतेसी राहिले ।
चोखावया उरले । अंगुष्ठ ते ॥२१॥
हरिःॐतत्सदिति श्रीनिगमांतपथसंदीपके, श्रीसद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे,
ओवीछंदबद्धे, वस्तुतः सद्गुरुमहिमारूप मंगलाचरणंनाम प्रथमोध्याय :॥

चारी वाणी नाहीशा झाल्या की हा संसारहि नाहीसा होतो व आपले मूळचे अद्वितीय स्वरूप प्राप्त होते. मग इतर नुसते बोलणे व्यर्थ आहे असा प्रत्यय येतो. १६. अन्वयः- अंगुष्ठ नीरीयाच्या प्रमाणादीच्या लया पाहूनि यतनाच्या भरी न पडे ॥ अर्थः- श्रीगुरूंचे चरणतीर्थ प्रमाणादिकांच्या म्हणजे त्रिपुटीच्या पलीकडे असल्यामुळे त्रिपुटीच्या स्वाधीन असलेला प्रयत्न तेथे खुंटतो; हे जाणून त्याच्या प्राप्तीसाठी प्रयत्न करण्याच्या भरीस मी पडलो नाही. म्हणजे मी ती खटपट सोडून दिली. १७. ज्या शक्तीला पुरुषामुळे सामर्थ्य आहे व म्हणून जी स्वतंत्र भासूं शकत

नाही, ती शक्ति अन्वयदृष्टीने पाहता आपल्या चरणाचे ठिकाणीच आहे म्हणजे ब्रह्मस्वरूपच आहे. १८. म्हणून जेव्हा ते आपलें पद हृदयाचे ठिकाणी स्थापन होते तेव्हाच भक्ताच्या सर्व इच्छा परिपूर्ण होतात म्हणजे जीवदशा सुटते.१९. अहो श्रीज्ञानेश्वर महाराज ! माझे आईबाप आपणच आहात. तसेच ब्रह्मस्वरूप श्रीगुरुही आहात. मी माझे तनमन आपले ठिकाणी जे अर्पण केले ते ग्रहण करणारे आपणच आहात. तेव्हां मला अभयदान देऊन या बालकाच्या बोबड्या बोलाचा स्वीकार करा.(टीपः- ''जननी'' हा शब्द ममतावच्छिन्न सामर्थ्य व परमप्रेम सुचवितो व ''जनक'' हा शब्द पालनावच्छिन्न सामर्थ्य व मर्यादाप्रेम सुचवितो)२०. न बोलतां, बोलले गेलेल्या या बोलांचा प्रवाह स्वाभाविकच बंद पडून सेवन करण्याकरिता आपल्या चरणांगुष्ठाचा आनंद मात्र उरला २१.

श्रीनिगमांतपथसंदीपकातील पहिल्या अध्यायाचा अनुवाद श्रीगुरुचरणी समर्पण असो !

०००

अध्याय २ रा

हृद्गतोपक्रम

॥श्री ज्ञानेश्वरमाउली समर्थ॥

आतां तिया माये । आश्रवूनि ठाये ।
म्हणे हो स्वयें । वदिजे आतां ॥१॥
हे अपरिच्छिन्न तिहीं । स्वीकारूनि ग्वाही ।
हा अभिलाषुचि ठायीं । ऐसा म्हणे ॥२॥
ययातेंचि देखिजे । देशिक-मुखें ओळखिजे ।
निकें करूनि ध्यायिजे । आपुलिया ॥३॥
येथ दोन्हीं भले । एकेंचि परी विभागिले ।
शक्ति-शक्तिमत्वें बोलिले । प्रेर्य-प्रेरक ॥४॥
तेथ अनादि अनंतें । अध्यासें ओटंगतें ।
प्रेरकें समर्थे । ऐसें केलें ॥५॥

अर्थ :- आता ब्रह्मस्वरूप सद्गुरु आईचा आश्रय करून तिला - हा ग्रंथ आपणच सांगा, अशी विनंती करतो.१. श्रीमहाराज म्हणतात, वेदांनी सांगितल्या-प्रमाणे परमेश्वराचे ठिकाणी सत्, चित्, आनंद हे भाव; देश, काल, वस्तु या तीन परिच्छेदरहित म्हणजे अमर्याद असून परमेश्वर आपला सच्चिदानंद भाव न सोडताच बहुरूप होण्याची इच्छा करतो.२. याच स्वाभाविक स्थितीस जाणून सद्गुरुमुखाने तिची ओळख पटवून घ्यावी व तिच्या दृढ निदिध्यासनाने ऐक्य साधावे. ३. या ठिकाणी एकच ब्रह्मवस्तु शक्ति व शक्त अशा दोन अंगाने भासते. यांत शक्ति प्रेर्य व शक्त प्रेरक भासतो. (वस्तुतः दोहोंचा अभेदच असतो) ४. स्वरूपस्थिति अभेदच आहे, पण अनादि अनंत

अध्यासामुळे ब्रह्मज्ञान होईपर्यंत प्रेरक समर्थ आहे, असे मानले जाते. ५.

हें औपचारिकें जन्ही । भानु नयनीं तन्ही ।
तेवीं इयापरी । अलिप्तत्वचि ॥६॥
पाहे पां रोहिणी । मृगाच्या चाळवणी ।
परी नेणें तरणी । नेटकाचि ॥७॥
कां सर्पाभासें दोरा । शिवणें नाहीं विकारा ।
परी अवचनें थारा । द्रष्ट्यालागीं ॥८॥
तरी इये नेटकें । वारिलिया दीपकें ।
कायि आले ठके । आरोपाचे ॥९॥
परी दिसाव्याचे भेणे । हाचि बरवे म्हणे ।
ना गाठी येणें । मन्दान्धारें ॥१०॥

स्वरूपस्थितीच्या ठिकाणी प्रेर्य-प्रेरकभाव मिथ्या असले तरी ते शुद्ध ज्ञानाच्या दृष्टीने मिथ्या आहेत. वास्तविक दोन्ही भावांहून अलिप्त आहेत.६. हे पाहा! मृगजल पाहून मृग भुलतात. वस्तुतः सूर्याला मृगजलाची वार्ताही नसते. ७. दोरीच्या ठिकाणी सर्प भासला तरी दोरीच्या ठिकाणीं कोणताही विकार उत्पन्न झाला नाही. असे जरी आहे तरी जोपर्यंत कोणी सांगत नाही, तोपर्यंत पाहणाऱ्याच्या ठिकाणी सर्व भ्रम कायमच राहणार! ८. दीपाच्या प्रकाशामुळे ही भ्रमस्थिति पूर्ण निवृत्त झाल्यावरही दोरीवर केलेला सर्पाचा आरोप खरा राहील काय? ९. परंतु सर्प दिसून हा त्याला भ्याला म्हणून दोरीच्या ठिकाणी भासलेल्या सर्पाच्या निवृत्तीत सुख मानतो. येन्हवी अंधुक प्रकाशामुळे सर्पाचा भास झाला होता (सत्यत्वाने नव्हता) १०.

तरी इया दोरा । दीप दीपें थारा ।
परी सामोरा । ठावो नव्हे ॥११॥
आपण इया देखे । आपणा माजी पोखे ।
मग आश्रवूनि अनेके । हा मी म्हणे ॥१२॥
तरी तिये उपहिते । ये अनादि अनंतें ।
नैसर्गिके सातें । होइजेल ॥१३॥
पाहे युगपत् सारें । स्थल-काल-क्रमादि रे ।
नित्यचि नित्याधारें । अनिवर्तके ॥१४॥ (य१-२१)
परी उगे तें निवर्तले । आधेय तें अधिष्ठिलें ।
जाये म्हणोनि बोलिले । निवर्तक ॥१५॥

दृष्टीने दिवा व दोरी दिसली तरी ज्याची दृष्टी दोरीकडे नाही, त्याला भ्रम होतो.११. हा जीव दृश्याला पाहून आपल्याच ठिकाणी पुष्ट होतो व नंतर आपल्या व्यष्टित्वाच्या कामनेनुसार 'मी अनेक आहे' असे पाहतो. १२. अशा त्या जीवाने अनादि अनंत अशा भ्रमाचा आश्रय केल्यामुळे

स्वाभाविकच सात पदार्थ उत्पन्न होतात. १३. देश, काल, क्रम यासह सर्व सृष्टि भ्रमाने एकदमच निर्माण होते व ती नित्य अशा सत्य वस्तूवरच भासत असल्यामुळे नित्य व निवृत्त न होणारी अशी वाटते. १४. कारण नसतांनाच अध्यास- भ्रमाने अधिष्ठानावर उत्पन्न होतो व अधिष्ठानाच्या ज्ञानाने तो नाहीसा होतो. म्हणून निवर्त्य व निवर्तक असा आरोप अधिष्ठानावर येतो असे सांगितले.(वास्तविक निवर्तक व निवर्त्य हे दोन्ही भाव काल्पनिकच आहेत.) १५.

तरी मिथ्याबोंधें नाना । मार्गीं ओटंगे वासना ।
तेणें संगु जाणा । यथार्थसा ॥१६॥
हें उगे निवटावें । यालागीं कळवळे आघवें ।
तया उपहिते बोलवे । सुनिश्चितें ॥१७॥
तें हें शब्दब्रह्म फुडें । उपदेश-परंपरे गाढें ।
सानाच्याहि चढे । करसंपुटीं ॥१८॥
परी ते लाभे जेणें । तया ऐसें होणें ।
जे की बाह्यपणें । उगे सुटावें ॥१९॥
पार्थक्यें त्यागे रोधें धांवे । यांच्या पायीं पडावें ।
मग उगे निवर्तोनि व्हावें । हें ऐसें ॥२०॥

तरी मिथ्या बोधामुळे (विपरीत ज्ञानामुळे) नाना प्रकारच्या वासना उत्पन्न होतात. त्यामुळे संग होतो व तो सत्य वाटू लागतो. (टीपः- वासना व संग परस्परामुळे दृढ होत जातात, हा भाव.) १६. जीवाला जो व्यर्थच भ्रम झाला आहे तो नाहीसा व्हावा, असा कळवळा, जीवाचे दुःख पाहून परमेश्वराचे ठिकाणी उत्पन्न होतो व जीवाच्या भ्रमाच्या कल्पनेला तो आधार होऊन वेदरूपाने यथार्थ ज्ञान बोलतो.१७. असे हे वैदिक वाङ्मय निर्माण झाले व त्यांत सांगितलेले शुद्ध ज्ञान उपदेशपरंपरेने यःकश्चित जीवालाही प्राप्त होते. १८. उपदेशाने जेव्हा जीवाला परब्रह्माचा लाभ होतो तेव्हा आपण बाह्य भावांपासून सुटलो असे त्याला उगीच वाटते. वास्तविक तो सुटलेलाच असतो. (टीपः- बद्ध व मुक्त या कल्पना खोट्या आहेत, असा भाव) १९. स्वरूपस्थितीहून भिन्न असल्यामुळे जीव अज्ञानाने मर्यादित होतो, म्हणून त्याला अमर्याद सुखाची कामना होवून ते मिळविण्याकरिता तो परमेश्वरास शरण जाण्याच्या खटपटीत पडतो. व त्याच्या कृपेने तो पूर्वस्थितीला प्राप्त होतो. (टीपः- वास्तविक तो बद्ध नसून उगीच मुक्त होण्याचा प्रयत्न करतो) २०.

परी स्फूर्तिभावें । नाथिलें न यावें ।
या लागीं अर्पावें । उपहितीं तें ॥२१॥
ऐसिया सुखबोधपणीं । प्रीति ये अंगवळणी ।
मग अर्थपणी । अनर्थुही होय ॥२२॥
ऐसिये अंगुष्ठे चोखितां । अपूर्व ही अवस्था ।

ओव्या गुंफूनि प्रेमसुता । अर्पिल्या भावें ॥२३॥
अहो जी पूर्णब्रह्म सनातना । ज्ञानेश्वरा कृपाघना ।
ही दीनकन्या चरणा-। वरी आपुल्या ठेवा ॥२४॥
॥ 'हरिः ॐ तत्सत्' इति श्रीनिगमांतपथसंदीपके ज्ञानेश्वरकृपाप्रसादे
ओवीछंदबद्धे हृद्गतोपक्रमो नाम द्वितीयोध्यायः॥
॥श्री ज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

निर्वृत्तिक स्थितीतून व्युत्थान झाल्यावर पुनः वृत्तिदशा सत्य न वाटावी म्हणून संपूर्ण स्फूर्तिभाव भगवंताला अर्पण करावा. २१. या समर्पणभक्तीने चैतन्य व आनंद अंगवळणी येतात म्हणजे भक्त पूर्ण सच्चिदानंदस्वरूप होतो व संसारच परब्रह्मरूप होतो. (टीप :- 'अहंभावो दयाभावो बोधस्य परमावधिः')२२. अशी ही निरुपाधिक अवस्था श्रीसद्गुरुंच्या प्रेमपूर्वक चरणसेवेने मला प्राप्त झाली व प्रेमरूपी सुतांत ह्या ओव्या हीच कोणी फुले गुंफून ती माला त्यांच्याच चरणी प्रेमाने अर्पण केली. २३. अहोजी ज्ञानेश्वर महाराज! आपण पूर्ण सनातनब्रह्म व कृपाघन आहात तेव्हा आपल्या या दीन कन्येला आपल्या पायापाशीच ठाव द्या. २४.

श्रीनिगमांतपथसंदीपकातील दुसऱ्या अध्यायाचा अनुवाद
श्रीगुरुचरणी समर्पण असो.

अध्याय ३ रा

कारणसंबंधपदार्थनिर्णय

॥श्री ज्ञानेश्वरमाउली समर्थ॥

तधी तें त्रिविधें । चेतन शुद्धाशुद्धें ।
प्रतिष्ठ सामान्यविशेषसिद्धे । एकीचि येती ॥१॥
तेथ हा प्रभु अधिष्ठान । मुक्त तें होती समान ।
बद्धें विशेषें जाण । निर्णायिलें ॥२॥
तेहीं वैशेष्य ये समाना । ते न पविजे अधिष्ठाना ।
तरी एकीं एकपणा । न भंगे कहीं ॥३॥
इया एकें जाणिले । तेणें हे तिन्ही न नेले ।
आणि तिहीं नाहीं आणिले । एकपण उणें ॥४॥
तेथ एकाचे दोन । एक एकीं आपण ।
हा भेदु परी जाण । अभेद सत्ता ॥५॥

तेव्हा त्या एकाच चेतनाचे तीन प्रकारच्या परिच्छेदांमुळे शुद्ध व अशुद्ध असे दोन भाग

होतात व ते दोन्ही मिळून चेतनाचे प्रतिष्ठ, सामान्य व विशेष असे तीन भाग होतात. (टीपः- (१)*प्रतिष्ठ चेतन म्हणजे अधिष्ठान स्वरूप, शुद्ध स्वरूप, आधारचेतन. (२) *सामान्य चेतन म्हणजे मुक्त जीव. हा समान चेतन आहे, कारण त्याची साम्य स्थिती असते. (३) *विशेष चेतन म्हणजे बद्धजीव हा मायेच्या गुणांनी युक्त होऊन देहादिकांशी ऐक्य पावून विशेष स्वरूपाला येतो. १. तेथे शुद्ध चेतन ईश्वर हाच अधिष्ठान असून मुक्तजीव हा समान व बद्धजीव हा विशेष असा वेदान्तशास्त्राचा निर्णय आहे. २. हे विशेष चेतन सामान्य भावास आले की ते मुक्त होते, ''पण त्याला अधिष्ठानत्व येत नाही'' असे झाले तरी स्वरूपातला एकपणा मोडत नाही. ३. एकपणाच्या ज्ञानाने तीनपणास विरोध केला नाही व तीनपणाने एकपणात काही कमीपणा आणला नाही. (टीपः- तीनपणाचा भास मिथ्या ठरला तरी त्या भासाची प्रतीती येत नाही असे नाही :- 'नाप्रतीतिर्तयोर्बाधः किन्तु मिथ्यात्वनिश्चयः' (पंचदशी) ४. तेथे ईश्वरचेतन एक व जीवचैतन्याचे सामान्य व विशेष, असे दोन भाग पडल्यासारखे दिसले तरी त्या प्रत्येक भागास स्वतंत्र सत्ता नसल्यामुळे एकपणा मोडत नाही.५.

म्हणोनि मधिलेनी । जे हे त्रैविध्यानीं ।
आणि ते नित्यचि परी स्वस्थानीं । अविरुद्धत्वें ॥६॥
आतां तो निर्णयु ऐसा । ईश जीवमायाध्यासा ।
पृथकत्वेंचि ठसा । एकत्वाचा ॥७॥
पाहे ही महन्नीलिमा । महत्वें नित्यचि उगमा ।
यालागीं नाशोपमा । कदाही न ये ॥८॥ (य१-२२)
तेथचि जरी घनें । आणिली शोभा म्हणे ।
तरी नाहीं उणें । आल्या गेल्या ॥९॥
येथ अपरिच्छिन्नें जैसें । नैसर्गिकेंही तैंसें ।
हे नानात्व उमसे । म्हणोनियां ॥१०॥

ईश्वरचेतन, मुक्तचेतन व बद्धचेतन यापैकी 'मधिलेनि' म्हणजे मुक्त चैतन्याचे दृष्टीनेच त्रिविध-स्वरूपाची कल्पना आहे. नित्य परब्रह्माच्या स्वरूपाच्या ठिकाणी ही तिन्ही रूपे मिथ्या असल्यामुळे त्यांचा अविरोध आहे. (टीपः- सत्-चित्-आनंद या तीन वृत्तींमध्ये मधली म्हणजे चिद्वृत्तिच भेद दाखविते. सद्वृत्ती अभेदच दाखविते व आनंदवृत्तीच्या ठिकाणी दुसऱ्या भावाची प्रतीतिच नसते, असा भाव.) ६. आता याचे तात्पर्य असे की ईश्वर व जीव या दोघांच्याहि ठिकाणी मायाध्यास आहे. त्यामुळे जरी त्यांच्यात पृथकत्व भासले तरी एकत्व भंगत नाही. (टीपः- मायेचा जीवाशी संबंध होतो म्हणजे जीव मायावश होतो, म्हणून जीवाचे ठिकाणी मायाध्यास आहे. पण ईश्वराचे ठिकाणी माया हे व्यावर्तक लक्षण असल्यामुळे त्याचे ठिकाणी मायाध्यास होतो याचा अर्थ ईश्वर मायेला वश न होता तिला जवळ करतो.) ७. आकाश नित्य असल्यामुळे व आपल्या वृत्तिदृष्टीने ग्रहण होत असल्यामुळे वृत्ति मुरेपर्यंत आकाशाचे ठिकाणी नीलीमा नित्यच राहणार. ८.

त्याच ठिकाणी म्हणे मेघांनी शोभा आणली, पण मेघाच्या येण्याजाण्याने आकाशाच्या नीलीमेंत फरक पडत नाही. ९. अन्वयः- येथ हे नानात्व उमसे म्हणोनियां जैसें अपरिच्छिन्नें तैसें नैसर्गिकेही ॥ येथे एकत्वाचे ठिकाणी नानात्व भासमात्र असल्यामुळे म्हणजे एकत्व सोडून नानात्व सत्य नसल्यामुळे तें अपरिच्छिन्न व स्वाभाविकही आहे. (टीप :- नानात्वाने मूळ अद्वैतस्थिति नाहीशी होत नाही, हा भाव.) १०.

''एकाकी न रमतें'' । हें श्रुति साक्ष देते ।
या लागीं म्हणिपते । नानात्व एकीं ॥११॥
नाहो हें काहीं । हानि एका गेहीं ।
हो नानात्वा ठायीं । एकी नसे ॥१२॥
पाहे घटाचिया भीतरीं । परिच्छिन्नें वर्ते परी ।
एकलिया आधारीं । एकचि महत् ॥१३॥
कां भासकाच्या ठायीं । निसर्गे रोहिणी राही ।
द्रष्टृभिन्नें परिच्छिन्न तेंही । भासकु एक ॥१४॥
तैसें इये ठिके । हें आश्रयिलें निकें ।
नानापरिच्छिन्नें एकें । अपरिछिन्नें ॥१५॥

'एकाकी न रमते' हे श्रुतिवचन सांगते की एकाचेच ठिकाणी अनेकत्व राहू शकते. ११. अन्वयः- एका गेहीं हानि (असे) हो नानात्वा ठायी एकी नसे हे कांहीना हो. अर्थ :- एकत्वाची हानी होते किंवा नानात्वाच्या ठिकाणी एकत्व नसते, असे काही नाही. कारण - 'एकत्वाचा विलास म्हणजे नानात्व व नानात्वाचा संकोच म्हणजे एकत्व होय'

(टीपः- एकत्व व नानात्व ही एकाच द्वैताद्वैतरहित वस्तूची अंगे आहेत. १२. घटातील आकाश घटाच्या मर्यादेमुळे घटाच्या बाहेरील आकाशाहून भिन्न वाटते, पण त्याला बाहेरच्याच आकाशाचा आधार असल्या-मुळे भिन्न नाही. १३. जरी सूर्यप्रकाशाच्या ठिकाणी मृगजल निसर्गतः असते तरी आपण मृगजलाला भासविणाऱ्या सूर्यप्रकाशाहून भिन्न राहून पाहतो म्हणून ते आपणाला भिन्न दिसते. १४. त्याप्रमाणे येथेही एकाच अपरिच्छिन्न वस्तूवर परिच्छिन्नासारखे नाना भास भासतात. १५.

परी परिच्छिन्ना अपरिच्छिन्ना । ठावु ये अपरिच्छिन्ना ।
यालागीं उपपन्ना । आश्रयिजेल ॥१६॥
पाहे तें जें एकें पाहतां । चतुर्विधें दिसतां ।
मृग-मानुखां समस्तां । एकीचिये ॥१७॥
अदितिसुतोष्मपणीं । निसर्गेही रोहिणी ।
मानुखा मृगा पाणी । परि दुजा बांधी ॥१८।
कां दुजा भ्रमें बांधला । तो धावे धांवतचि मेला।
जरी होय पाळिला । तरी मनःपूर्ति ॥१९॥

आणि इये पहिलें । जरी भ्रमा सोडिलें ।
तरी नाहीं त्यागिलें । पाणी व्यवहारा ॥२०॥

परंतु एकाच अपरिच्छिन्नाच्या आधारावर परिच्छिन्न व अपरिच्छिन्न भाव भासतात, म्हणून जें सिद्ध आहे ते अपरिच्छिन्नच घ्यावे. (टीपः- परिच्छिन्नाचे अपेक्षेने अपरिच्छिन्नातही कृत्रिमता भासते; पण अपेक्षा निघून गेल्यावर अकृत्रिम असा अपरिच्छिन्न भावच राहतो, म्हणजे शब्दाचे निवारण होते, अर्थाचे नाही) १६. मृगजलाचा दृष्टांत घेतला असता एकाच वस्तूच्या ठिकाणी (सूर्यप्रकाशाच्या ठिकाणी) मृग, मनुष्य वगैरेंना त्यांच्या त्यांच्या वृत्तिमुळे वेगवेगळे चार प्रकार दिसतात. (*मृगास मृगजल सत्य वाटते. *मनुष्याला जलाभास वाटतो. चक्रवाकास *सूर्यकिरण दिसतात व *सूर्यास यापैकी कोणताच भास नाही. (टीपः- वरील दृष्टांताप्रमाणे *बद्धजीवांना परब्रह्माच्या ठिकाणी जगत् दिसते. *मुक्त जीवांना जगताचा भास दिसतो. *भक्त घनदाट श्रीकृष्णस्वरूपाशी ऐक्य पावले असल्यामुळे त्यांना यापैकी कोणताच भास भासत नाही. तसेंच *परमेश्वरास काहींच वार्ता नसते.) १७. सूर्यप्रकाशाच्या ठिकाणी हे मृगजल निसर्गतःच दिसते. मनुष्य व मृग या दोघांनाही ते सारखेच पाणी दिसते. पण मृगांना ते सत्य वाटत असल्यामुळे बंधन करते. १८. दुसरा जो मृग त्याला पाणी सत्य आहे असा भ्रम झाल्यामुळे पाण्याच्या लोभाने तो मृगजळाच्या मागे धावतां धावतां मरतो. पण तोच जर घरी पाळलेला असला तर त्याची मनःपूर्ति होते म्हणजे त्याचा मालक त्याला पाणी देऊन त्याची तृषा शांत करतो. १९. आता पहिला जो मनुष्य त्याला मृगजलाच्या ठिकाणी जल सत्य आहे, असा भ्रम नाही तरी तो मृगजलाच्या ठिकाणी 'पाणी' असा शब्द व्यवहार करतो. २०.

परी हें उठे कीं नुठे । तया ठाउके न गोमटें ।
तो तिसरा नेटें । आपण म्हणे ॥२१॥
येथ मृगा मानुखा इया । देशकालक्रमा ठाया ।
नानात्वें आरोपावया । लागे म्हणोनि सिद्ध ॥२२॥
परी दोघांहि । रोहिणी असे ठायीं ।
आतां उपनाई । करिजेल ॥२३॥
एवं प्रभुसत्तें । हें उणें नव्हें जीवातें ।
परी हें प्रभूतें । नेणवे जाणवे ना ॥२४॥
सत्ते नित्याचिया । नित्या म्हणिजे माया ।
तत्सत्ते जीवा इया । एकी नित्य भेदु ॥२५॥

पण हा तिसरा म्हणजे चक्रवाक पक्षी, त्याला हे मृगजल सत्य आहे की भास आहे याची कांहीच प्रतीति नाही व त्यातील सौंदर्याचीही त्याला कल्पना नाही. २१. मृग असो की मनुष्य असो, त्यांना देश, काल, क्रम परिच्छेदांचा प्रत्यय असल्यामुळे नानात्वाचा आरोप सुटत नाही. एकाला

नानात्व सत्य वाटते तर दुसऱ्याला मिथ्या वाटते. एकाची त्रिपुटी सत्य तर दुसऱ्याची मिथ्या असते. दोघांच्याहि बाबतीत त्रिपुटी आहेच. २२. मृग व मनुष्य दोघेहि सूर्य प्रकाशाचे ठिकाणी मृगजल पाहतात, हा दृष्टांत झाला. आता सिद्धांत सांगू. २३. प्रभूसत्तेने सिद्ध झालेले पदार्थ जीवाला सत्य व मुक्तास मिथ्या वाटत असले तरी परमेश्वराच्या ठिकाणी त्यांची वार्ताहि नसते. २४.

अन्वयः- नित्याचिये सत्ते माया नित्या म्हणिजे तत्सत्ते इया जीवा एकी नित्य भेदु ॥

अर्थ- मायेला नित्य अशा परब्रह्माची सत्ता असल्यामुळे तीही नित्यच व म्हणून तिच्या सत्तेमुळे जीवाला एका वस्तूत भेद नित्य वाटतो. २५.

तेथहि दुभागली । स्वभवें इया लागली ।
ते मृगापरी जाहली । बद्धे सकळे ॥२६॥
तेथ नसोनि अविद्या । तैशी बद्धाऽबाध्या ।
मुक्ता मानुखा विद्या । अबाध्या कीं ॥२७॥
परी दोघांही माया । साच दुरत्यया ।
म्हणोनि मार्गा इया । त्यजिजे तिहीं ॥२८॥
जे कीं सूर्यकमळें । अथवा किरणभक्षकें पाळें ।
न देखती हे डोळे । पोषणें म्हणोनि ॥२९॥
तेवींचि प्रभूचिया । न दिसे ही माया ।
लीलाविग्रही इया । आश्रयी तीतें ॥३०॥

''ही माया (शक्ति) स्वरूपभूत असल्यामुळे वस्तूस बद्ध करीत नाही''

पण जीव त्यापासून निराळा पडला म्हणून भवरूपाने म्हणजे कार्यरूपाने विद्या व अविद्या अशी विभागली गेली व अविद्यारूपाने ती जीवाला लागून मृगाप्रमाणे ते बद्ध झाले. २६. वस्तुतः अविद्या नाहीच पण ती सत्य मानल्यामुळे बद्ध जीवाला ती अबाध्या म्हणजे न टाळता येणारी झाली व तत्सापेक्षा विद्या मुक्तालाही न टाळता येणारी झाली. २७. परंतु बद्ध व मुक्त या दोघांनाही ही अलंघ्य आहे, म्हणून अविद्या म्हणजे विषयभोग प्राप्त करणे व विद्या म्हणजे संसारातून मुक्त होणे या दोन्ही भागांचा त्यांनी त्यागच करावा. २८. सूर्यकमळे नित्य सूर्याभिमुख असल्यामुळें व चक्रवाक पक्षी नेहमी सूर्याकडेच पाहत असल्यामुळे त्यांच्या डोळ्यांना मृगजळ दिसत नाही; कारण ते सूर्याचेच पोसलेले असतात. २९. त्याप्रमाणे ईश्वरभक्तास ही माया दिसत नाही. कारण परमात्मा (मायेचा) शक्तीचा आश्रय करीत असल्यामुळे भक्तांना ती त्याची सर्व लीलाच दिसते.३०.

तो विग्रहस्थान श्रीपति । जो कांत आम्हांप्रति ।
तया पूजिलें समस्तीं । ओव्या-पुष्पीं ॥३१॥
हो बद्धें मुक्ते पाळिलें । येणेचि पाणी दीधलें ।
तिया श्रीगुरूचीं पाउलें । मस्तकीं स्थिरे ॥३२॥ (य१-२३)

ती ही ज्ञानेश्वर माउली । अनुग्रहें पान्हावली ।
म्हणोनि पायीं समर्पिली । आघवी पूजा ॥३३॥

'हरिः ॐ तत्सत् श्रीनिगमांतपथसंदीपके, श्रीसद्गुरु ज्ञानेश्वरकृपाप्रसादे, कारणसंबंधपदार्थनिर्णयो नाम तृतीयोध्यायः॥ श्रीज्ञानेश्वर महाराजार्पणमस्तु ॥

लीलाविग्रही मायेचा आधार जो श्रीपति तोच आमचा पति होय. त्याची या सर्व ओव्यारूपी पुष्पांनी पूजा केली. ३१. बद्ध, मुक्त, भक्त कोणीही असो, त्यांची तृषाशांति यांनीच केली. तोच आमचा सद्गुरु होय. त्याच्या पादुका आमच्या मस्तकाचे ठिकाणी स्थिर होवोत.३२. तीच ही आमची श्रीज्ञानेश्वरमाउली आमच्यावर कृपा करून प्रेमाचा वर्षाव करती झाली म्हणून ही सर्व पूजा तिच्याच चरणाचे ठिकाणी समर्पण केली. ३३. श्रीनिगमांतपथसंदीपकांतील तिसऱ्या अध्यायाचा अनुवाद श्रीगुरुचरणी समर्पण असो.

०००

अध्याय ४ था

कार्यसंबंधपदार्थनिर्णय

॥श्री ज्ञानेश्वरमाउली समर्थ॥

आतां देशकालक्रमारोपे । उगेपणे हा वासिपे ।
परी ते वर्ध* संकल्पें । निरोपिजेल ॥१॥ (*व्यर्थ)
तरी स्वसुखें जो आथिला । भ्रमें जाला नाथिला ।
तो पहिलिया आला । निवर्तनीं ॥२॥
परी जें अनादि अनंत । नसूनियां असत ।
आमुच्या दिठीं भासत । हरिदिठीं नसे ॥३॥
सागराचा निस्पंधा । तोचि मीठपणाचा बांधा ।
परी पाणिया माजी द्वंदा । आपण करी ॥४॥
तेवीं हें सुख उल्हासिलें । तये आधी बांधले ।
हा हे म्हणोनि घेतलें । धावणपण ॥५॥

अवतरणिका :-

या अध्यायांत अध्यारोपाने ब्रह्मवस्तूवर ब्रह्मांडविस्तार कसा भासतो हे सांगितले आहे.

अर्थः- देश, काल, क्रम यांसहित ब्रह्मांडाचा विस्तार ब्रह्मवस्तूवर आरोपित केला गेल्यामुळे तो व्यर्थच असतो. वाढत्या संकल्पाबरोबर विस्तार कसा होत गेला ते आता सांगू. १. जो मूळचा स्वसुखाने संपन्न होता तो भ्रमामुळे त्या सुखाला मुकला व भ्रमनिवृत्ति झाल्यावर पुनः आपल्या

मूळ स्थितीला आला. २. परंतु ही अनादि अनंत अविद्या जीवाच्या दृष्टीने सत्य किंवा मिथ्या भासते परंतु श्रीहरीच्या दृष्टीने ती सत्यहि नाही व मिथ्याहि नाही. ३. सागराचे पाणीच सागरापासून भिन्न होऊन आटले म्हणजे मीठ या संज्ञेस प्राप्त होते. परंतु तो बांधाच (तुटलेला संबंध) पाण्याच्या ठिकाणी द्वैत उत्पन्न करतो. ४. त्याप्रमाणे स्वरूपच आपले सुख घेण्याकरिता प्रेमवृत्तीने उठते.जीवाने प्रथम आपले ठिकाणी अखंड सुख नाही, अशी कल्पना करून स्वतःस मर्यादित करून घेतले व ते सुख कोठे तरी बाहेर आहे, या कल्पनेने त्याच्या शोधार्थ त्याला धांवणे प्राप्त झाले.५.

येथ वास्तव तें नाहींपण । म्हणोनि हरि उपादान ।
आणि या हे न सुटे म्हणोन । निमित्तही तो ॥६॥
हें साचचि लटिकें । आरोपें नैमित्तिकें ।
अनादि कटकें । करोनि ठाली ॥७॥
तेथ देशाचेनि बळें । उडी घातली काळें ।
मा हे क्रमी सोहळे । ते कें नवल ॥८॥
पाहे श्रमो जैं बैसे । तैं बुडालें दिसे ।
उठे तो उमसे । दोघांहीं हें ॥९॥
तेथ समानू कारणें देखे । विशेषु कार्या लेखे ।
हा क्रमूचि मोटके । कांही नाहीं ॥१०॥

वस्तुतः विषयाचे ठिकाणी सुख नाही कारण विषयच नाहीत. अर्थात् जीवाला जे सुख मिळते ते त्याचेच मूळ स्वरूप जो श्रीहरी त्यापासूनच मिळते; म्हणून श्रीहरी येथे उपादान कारण आहे. जीवाला विषय किंवा धांवपण सुटत नसल्यामुळे जीवास सुखाच्या ठिकाणी प्रवृत्त करणारा व प्राप्त करून देणाराहि परमात्माच आहे; म्हणून तो निमित्त कारणही आहे. (टीपः- ज्या विषयाच्या ठिकाणी हा जीव धांव घेतो तेथे सुख नाही; कारण विषय म्हणून वस्तुच नाही मग विषयांपासून सुख होते असे कां वाटते? याचे उत्तर असे की जीव आपले परब्रह्मस्वरूप विसरून स्वतःला त्याहून निराळे करतो व विषयोपहित ब्रह्माशी संलग्न होतो. विषयोपहित ब्रह्माशी एकाग्र झाल्यावर त्याचा विषयाविषयी असलेला ज्ञेयभाव सुटतो व त्याला चैतन्यसुखाचा अनुभव येतो. विषय आपण निर्माण केले अशी जीवास प्रतीति नसल्यामुळे विषयसुख निर्माता व सुखदाता हरीच राहतो. ६. परब्रह्मवस्तु सत्य असताना जीवाने केलेल्या विषय-वासनांच्या निमित्ताने अनादि समुदायात्मक सृष्टि मिथ्याच निर्माण झाली. ७. कल्पनेबरोबर वस्तु, त्यांना अवकाश मिळावा म्हणून देश व त्याबरोबरच त्यात पूर्व-पश्चात् भाव दाखविणारा काळ ही सर्व क्रमप्राप्तच झाली. यांत नवल ते काय? ८.मग सृष्टि युगपत् कशी? तर (स्वप्न जागृतीच्या दृष्टांन्तानें सांगतात-) हे पहा की - जीव श्रमाने थकून झोपला म्हणजे तो जगताला एकदम विसरतो व जागा झाला म्हणजे एकदम जगताचा प्रत्यय येतो. (मुक्ताला जगताचा मिथ्या प्रत्यय तर बद्धाला सत्य प्रत्यय येतो.) ९. मुक्ताची कारणैकदृष्टि असते व बद्ध कारण विसरून कार्य पाहतो. कार्यदृष्टीतच क्रम म्हणजे कार्यकारणभाव भासतो, तो वस्तुतः

नाही. (टीपः- या क्रमानंतर बुद्धि दोन प्रकारची होते ते पुढील ओवीने सांगतात) १०.

येथ स्व-पर ऐसें । उजाळ-मैळें दिसे ।
तें मैळे विशेषें । समाने उजाळी ॥११॥
मैळें उजाळी उजाळे । आणि तया अपेक्षें उजाळे ।
देव सुखाचे सोहळे । समर्थे इये ॥१२॥
तें एकीं बहुपणा । परी येथ सदीक्षणा ।
म्हणोनि नाहीं कारणा । नाहींसें हो ॥१३॥
येथ भोक्त्याही प्रती । आरोपें जन्मापत्ती ।
तरी हे गोठी निगुती । व्यासेंचि केली ॥१४॥
'उत्पत्त्यसंभवात्' ऐसें । जीवु जन्म न असे ।
हो कां समान विशेषें । नित्ये तिये ॥१५॥

या क्रमानंतर 'ऐक्य किंवा शुद्ध' व 'भेद किंवा मलिन' अशा दोन वृत्ति उत्पन्न होतात. हा मलिन सत्त्वामुळे जीवभावाला व शुद्धसत्त्वामुळे समानभावाला म्हणजे मुक्त स्थितीला येतो. ११. बद्धजीव सात्त्विकांच्या संगतीने सत्त्ववृद्धि होऊन सात्त्विक होतात. सात्त्विक पुरुषाच्या अपेक्षेने जीवसृष्टीहून स्वभावतः सात्त्विक सामर्थ्याने समर्थ असलेले देव श्रेष्ठ असतात. पण या सर्वांचा अनुमंता परमेश्वर आहे. त्याच्याच सत्तेने हे सर्व आपआपले भोग भोगतात. १२. एकाच परब्रह्माचे ठिकाणी जीवाच्या कल्पनेच्या अपेक्षेने बहुपण आले, तरी याला कारण सदीक्षण. म्हणजे ''एकोऽहं बहुस्याम्'' हा ईश्वरी संकल्प आहे. म्हणून भगवंताकडे असलेले सृष्टीचे कारणपण नाही असे नाही. १३. जीव उत्पन्न होतो हा व्यर्थच आरोप आहे. व्यासांनी ब्रह्मसूत्रांतील ''उत्पत्त्यसंभवात्'' (२-२-४२) या सूत्राने जीवाची उत्पत्ति होत नाही असा सिद्धान्त केला आहे. १४. ''उत्पत्त्यसभवात्'' या ब्रह्मसूत्राने जीवाची उत्पत्ति होत नाही. तो बद्ध असो वा मुक्त असो. तो नित्यच आहे. १५.

आणि एकीं समर्थे वेगळें । तेंहि उठे किडाळें ।
उगे देखते डोळे । आभास म्हणुनी ॥१६॥
तो आभास घेउनी उठे । मग सत्य ऐसा पैठे ।
तेणें भोग्य दाटे । भावो बहू ॥१७॥
तया भावें याचिलें । तेंचि तेथ सांचिलें ।
तंव अधिक माचिलें । नैमित्तिकें इये ॥१८॥ (य१-२४)
ऐसिया हो गौणा । जैं जाहली चोदना ।
तैं उगाचि गुणा । तिहीं आली ॥१९॥
हें ईक्षणेंचि केलें । काळें नसे झालें ।
म्हणूनियां गेलें । आरंभाक्षेपें ॥२०॥

एकाच परब्रह्म वस्तूचे ठिकाणी ''समर्थ व असमर्थ'' हे दोन भिन्न भाव दिसतात. तेही

खोटे म्हणजे डोळ्यास दिसण्यापुरते, आभासमात्र आहेत. वस्तुतः भेद म्हणून काही नाही. १६. परमेश्वराचा विसर पडला की हे आभास उठतात व जीवाने ''मी मर्यादित आहे'' असा निश्चय केला की तोच आभास नाना (प्रकारच्या) भोग्य भावाला त्याच्या वासनेनुसार प्राप्त होतो व भोग्य रूपाने पुष्कळ स्वरूपाचा होतो- म्हणजे द्रष्टा आपणच दृश्य स्वरूपाला येऊन दृश्यस्वरूप पाहतो. १७. त्या जीवाने ज्या सुखाची याचना केली ते सुख त्याच्याच ठिकाणी आहे, परंतु हे तो जाणत नाही. जीवाच्या सुखाच्या वासनेस ईश्वराचे अनुमोदन मिळून ब्रह्मसुखच अनंत भावांनी नटते. १८. ह्याप्रमाणे जीवाची वासना त्रिगुणजन्य झाली म्हणजे तिला ईश्वराचे अनुमोदन मिळून, वस्तुतः मिथ्या, असा त्रिगुणात्मक धर्म उत्पन्न होतो. १९. पण जीवाची वासना, तिला ईश्वराचे अनुमोदन मिळून झालेली तृप्ति, हा सर्व विस्तार ईश्वराने आपल्या सत्यसंकल्पानेच केला. काळाने किंवा दुसऱ्या कोणत्याहि कारणाने झाला नाही, म्हणून आरंभवाद, परिणामवाद इत्यादि वाद स्वभावतःच खंडित झाले. २०.

इया भाव याचका । ईक्षणें नैमित्तिका ।
गणितपूर्ति याचका । याचक्य वृद्धि ॥२१॥
इये अध्यात्में । आतां मैळे जे उमे ।
ते होवोनि रमे । आरोपेसीं ॥२२॥
वैभवें हा त्याचा । भागु म्हणिपे साचा ।
आयता परि क्रियेचा । अनधिकारी ॥२३॥
ईक्षणाभाव संयोगें । पूर्ति वृद्धि भावा लागे ।
न देतांहि घे । आपणची ॥२४॥
परी दिधलें म्हणें । तया ईक्षणींच देणें ।
कल्पतरु माने । आरोपें वळवी ॥२५॥

अशा रीतीने जीवाच्या वासनापूर्तीची याचना व तिला परमेश्वराचे अनुमोदन मिळून ती अनेक परींनी पुरविली जाणे, या कारणांनी जीवांच्या वासनेचा प्रवाह वाढत जातो. २१. येथपर्यंत अध्यात्माचे निरूपण झाले. आता जीव हा जेव्हा रजस्तमयुक्त होऊन वासनेने काल्पनिक भाव निर्माण करतो तेव्हा ते सत्य मानून तेथेच रममाण होतो. २२. ईश्वराच्या वैभवाच्या दृष्टीने जीव हा खरोखरच ईश्वराचाच अंश आहे, परंतु जीवाने आपल्यास मर्यादित करून घेतल्यामुळे त्या वैभवाचा उपयोग करण्याचा अधिकार त्याने गमाविला आहे. २३. ईश्वराच्या नसलेल्याच अनुमोदनामुळे तो आपल्या वासनाची पूर्ति करतो किंवा वृद्धि करतो असे जीवाला वाटते. वस्तुतः ईश्वर विषय देत नाही, जीव आपणच ते घेतो. (टीपः- ईक्षणाभावसंयोगेः- परमात्म्याच्या दृष्टीने विषयच नाहीत म्हणून त्याचे अनुमोदनही संभवत नाही.) २४. असे असले तरी, जीवाच्या विषय-संकल्पाला एका दृष्टीने तो अनुमोदन देतो व ईश्वराने मला विषय दिले असे जीव म्हणतोही. कल्पतरूच्या छायेत

बसून संकल्प सिद्धीस जावा व कल्पतरूवर संकल्पसिद्धीचा आरोप करावा, तद्वत् ईश्वरानुमोदन त्याला फळते. म्हणजे जीव हा ईश्वरावर ईक्षणाचा आरोप करून ईश्वरावर अनुमोदकत्वाचा आरोप करतो.२५.

तो भावो अधिभूतीं । मैळे अध्यस्ती ।
जैं तैं आकृती । लिंगाचि इया ॥२६॥
महदाद्यनंत भूतें । जे कीं श्रुति निरुतें ।
तें कारणीं होतें । भगवदुक्ती तें अष्टधा ॥२७॥
मैळें आड पडले । केवळ तम जाले ।
तेथें निपजले । भूतें इये ॥२८॥
तेंचि भावा बाह्यगुणें । रजत्वें इंद्रियां होणें ।
भाव राखी अंतर्गुणे । उजाळ घेउनी ते सत्त्वा ॥२९॥
तें सत्त्वकरण हा तिहींचा । कारण ठावो भ्रमाचा ।
महाकारण अध्यासाचा । मैळभावाचा कार्य ठावो ॥३०॥

तो मलिनभाव अधिभूताला धरून उठला म्हणजे त्याला लिंगदेहाची आकृति येते. २६. ज्या महदादि भूतांचे श्रुतीनी निरूपण केले, तीच अष्टधा प्रकृति भगवंतांनी गीतेत सांगितली आहे. ही अष्टधा प्रकृति भगवदुक्तिप्रमाणे कारणाच्या ठिकाणी गणली जाते. २७. या सूक्ष्मापासून सत्त्वरजांच्या आड तम आल्यामुळे मूळ स्वरूप तिरोहित होऊन त्या तमापासून ही स्थूल पंचमहाभूते उत्पन्न झाली. २८. जीवाचे मूळ शुद्धस्वरूप, तो बहिर्मुख झाल्यामुळे, रजोगुणाच्या आविर्भावाने इंद्रियत्वास येते व भोक्ता होते. तथापि आंत सत्त्वरूपाने मूळ शुद्धभाव कायम असतोच. याप्रमाणे सत्त्वाचा आश्रय घेऊन अंतर्दृष्टीने तो जीवभाव राखतो. २९. जीवाने स्वतःचे अस्तित्व मर्यादित करणे हेच आध्यात्मिक आधिभौतिक आधिदैविक अशा भ्रमरूप सृष्टीचे कारण होते.सात्त्विक भाव हा मूळ कारण आहे व रजस्तमभाव कार्यरूपाने उठतात.३०.

येथ भ्रमूं भावें । अध्यासु राखावें ।
हेंचि इया होआवें । स्पष्ट लिंग ॥३१॥
तेथ अंतर्गुणें दोन । अध्यात्मारोहण ।
आणि हें पंचक जाण । अष्टधा ऐसें ॥३२॥
हे अपरा म्हणो त्यागिजे । शुद्ध प्रकाशे इया सहजें ।
ते परा म्हणे धारिजे । जगज्जीवा ॥३३॥
भावस्वातंत्र्यें इया । अंशें मैळ्याचिया ।
पांचांहि करूनि तया । भोग्यें आणिलें ॥३४॥
तें याचनकर्म । उठवी भोगधर्म ।
म्हणोनि भोगायतन परम । बहुला देहा ॥३५॥

येथे भ्रमाने दुसऱ्या वस्तूची ओळख करून द्यावी व अध्यासाने तिच्याशी ऐक्य करावे हेच बद्ध जीवाचे स्पष्ट चिन्ह आहे. ३१. मीपणा मानण्यात मन व बुद्धि अशी दोन अंतर्गुणाने राहतात, तेव्हा अहंकार, मन, बुद्धि अशी तीन व शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध या पंचन्मात्रा मिळून अष्टधा प्रकृति होते. ३२. ही. अपराप्रकृति अध्यासात्मक असल्यामुळे त्याज्य आहे. ज्या शुद्ध जीवामुळे ही अपरा प्रकृति चैतन्यात्मक होते त्यालाच पराप्रकृति म्हणतात, असे जाण. किंवा जिच्यामुळे सहज-शुद्ध प्रकाशित होते तिला पराप्रकृति (विद्या) म्हणावयाचे. तीच जग-जीव आहे. हिने जीव-जगताचे धारण होते. (टीपः- ''जीवयति चेतयति इति जीवः'' शुद्धजीव = ईश्वर. एकजीववादांत ज्याला जीव म्हटले आहे तो ईश्वरच. दुसरा अशुद्ध वासनात्मक जीव. शुद्ध जीवच वासनेने अशुद्ध भासतो) ३३. जीवाने आपल्या स्वातंत्र्याने (इच्छेने व प्रयत्नाने) रजस्तमाचा आश्रय करून स्थूल पंचमहाभूतांला भोग्य केले शब्दस्पर्शादि विषय निर्माण केले व त्यांना भोग्यत्व आणून आपण त्यांचा भोक्ता झाला. ३४. हे सर्व आपण निर्माण केले हे जीव विसरतो व स्वतःस असमर्थ समजून भोगाची याचना करतो म्हणजे वासना धारण करतो. वासनापूर्तिकरता भोग मिळविण्याचे साधन जो देह त्याला निर्माण करतो. असे नानाप्रकारचे देह तो घेत राहतो. किंवा ''बहुला देहा'' म्हणजे देहरूपी बोहल्यावर भोगाशी लग्न लावतो म्हणजे भोग भोगण्यांत निमग्न होतो. ३५.

ऐसें अनादि अधिष्ठिलें । लीलें मैळभागा स्पर्शिलें ।
यया अर्थी केलें । आपुलिया श्रुत ॥३६॥
ती श्रुति-आचरण पुराणें । आपुलिया या कारणें ।
दिलें म्हणोनि उदार गुणें । स्वा म्हणविलें ॥३७॥
तया अचुक पाणीपणें । जैं होय देखणें ।
तैं आपसयात म्हणे । पोसणा-भावें ॥३८॥
मग एकादिया स्थानीं । उल्हासु उठे ईक्षणीं ।
तो इतरां गुणीं । तैसेंचि करी ॥३९॥
म्हणोनि श्रमें बैसिजे । मग हें कांही देखिजे ।
परी न धाविजे । तया पाठीं ॥४०॥

अशा रीतीने हा सर्व संबंध अनादिच चालत आला आहे. परंतु हे सर्व रजस्तमांना लीलामात्र आश्रय दिल्यामुळे झाले आहे, असा याचा अर्थ श्रुतीमुखाने सांगितला, म्हणजे जीव हा त्रिगुणांनी बद्ध नाही असे श्रुतीचे सांगणे आहे. ३६. श्रुतीने हे आप्तत्वाने सांगितले व त्याप्रमाणे जे वागले त्यांचे पुराणांनी वर्णन केले. जीवाला आपले समजून त्याच्यावर एवढे उपकार केले; म्हणूनच तो परमात्मा उदार गुणांचा म्हटला जातो. ३७. तरंगाने आपल्या स्वरूपास पाणीपणाने पहावे त्याप्रमाणे जो जीव प्रमादरहित होऊन परमेश्वरास आत्मस्वरूपाने पाहतो तो ब्रह्मस्वरूप होतो. व नंतर पोसणाभाव म्हणजे भगवंताचा मी पाल्य असा ममत्वभाव उत्पन्न होऊन भगवद्भक्त होतो. ३८.

अशा स्थितीत एखादे वेळी स्फुरण झाले तर तें आत्मस्वरूपास धरूनच उठेल. ईक्षणापुरता उल्हास उठला तरी तो सर्व जीवांचे ठिकाणी स्फुरण उत्पन्न करीलच. (टीपः- सर्व जीवांचे ठिकाणी वृत्ति उत्पन्न करणारा ईश्वरच आहे, हा भाव.) ३९. मग वृत्ति थकून तिचे स्फुरण बंद झाले (समाधीत किंवा सुषुप्तीत) तरी हा साक्षीरूप होऊन राहतो. वृत्तीच्या मागे धांवत नाही. ४०.

उठण्यातें कर्म । बैसण्यातें परम ।
आतां उद्‌गम । परम प्रीतीचा ॥४१॥
तेथ कर्म त्रिविध । बैसवितें द्विविध । (य१-२५)
एक उजाळी नित्य । बैसे प्रसिद्ध । मिथ्या देखतां ॥४२॥
मैळी क्षणक्षणा बैसे । ते व्यष्टि निद्रा जागरसे ।
विलक्षण समष्टि दशे । जन्मादि ते ॥४३॥
हा तटस्थ भावो निर्गुण स्थिति । सगुण लीलास्वरूप प्रतीति ।
निर्भाव तेथ अत्यंत प्रीति । ती भक्ति लीला-प्रदर्शक ॥४४॥
एकीच परी दोहों लीले । हें विलक्षण संचलें ।
तया ठायें भलें । येरा नोहे ॥४५॥

वृत्तीच्या उठण्याला कर्म म्हणतात व वृत्तिरहित स्थितीला परम प्राप्ति म्हणतात. परंतु - **वृत्ति उठणें व मुरणे ह्या एकाच ब्रह्मस्वरूपाच्या ठिकाणच्या क्रीडा आहेत'** असे ज्ञान झाले म्हणजे परम प्रेम उत्पन्न होतो. (टीप :- वृत्ति उठणे व वृत्ति रहित होणे या दोन्ही अवस्थेत ब्रह्मस्वरूपच समावले आहे असे पाहणे म्हणजे आत्मस्वरूप कळणे होय.

हे स्वरूप कळले म्हणजे प्रतिकूलता राहत नाही. सर्वत्र अनुकूलत्व होते. या अवस्थेत परम प्रेम उत्पन्न होते.) ४१. तेथे कर्म तीन प्रकारचे आहे. * एक सुषुप्ति, * दुसरे समाधि व * तिसरे सर्व मिथ्या जाणून सत्त्वगुणाच्या आश्रयाने मी साक्षीरूप आहे. असे नित्य धारण करणे. ४२. व्यष्टि जीव रजस्तमोगुणात्मक असल्यामुळे त्याच्या वृत्ति क्षणोक्षणी जागृतीत व सुषुप्तीत अनुक्रमे लय पावतात. या व्यष्टीच्या उत्पत्ति-प्रलयाहून विलक्षण असे सृष्टीचे उत्पत्ति-प्रलय होतात. पण समष्टि-परमेश्वर व्यष्टि-जीवाप्रमाणे अज्ञानाशी ऐक्य पावून प्रलयात जात नाही. तो समष्टि-दशेत उत्पत्ति- स्थिति- प्रलय साक्षीरूपाने पाहतो. (टीप :- ज्ञानी पुरुषाच्या उत्पत्तिलय ह्या अवस्था साक्षिभास्य आहेत. म्हणजे ज्ञानी त्यांत लिप्त होत नाही. हे बद्धजीवाहून वैलक्षण्य आहे.) ४३.

१.ईश्वराच्या ठिकाणी जन्मस्थितिलय मिथ्या पाहून केवळ सत्‌प्रतीति घेणे ही निर्गुणस्थिति होय.

२.सर्वच ब्रह्म असल्यामुळे मिथ्यात्वाला जागाच नाही. तेव्हा हा सर्व चिद्विलास आहे अशी ज्या ज्ञान्याला अन्वय-प्रतीति येते, ती सगुणस्थिती होय

३.पण-जेथे हे साक्षित्वही मुरते. तेथे या परमप्रेमात भक्ति-लीला प्रकट होते. ४४. एकाच परब्रह्म-स्वरूपाच्या ठिकाणी परमेश्वरलीला विलक्षण अशा दोन प्रकारांनी प्रकट होते.

(१) एक व्यावहारिक लीला जगद्व्यापार व (२) दुसरी पारमार्थिक सच्चिदानंद लीला.

* सच्चिदानंदलीलेची भक्तांनाच प्रतीति येते. इतरांना फक्त व्यावहारिक लीलाच दिसते.४५.

भावप्रेरकत्वें जीव स्वतंत्र । याचन पूर्तिपणें परतंत्र ।
न याची तो लीलामात्र । होवोनि ठाये ॥४६॥
हें एकीपरी सिनालिलें । स्थूल सूक्ष्मत्वा आलें ।
समष्टि-व्यष्टि विभागलें । विराट-हिरण्यगर्भ विश्व-तैजस ॥४७॥
समष्टि प्रळय जीवु प्राज्ञ । व्यष्टि निदे तैसा अज्ञ ।
येरु अंतस्थ सर्वज्ञ । ईक्षिता जो ॥४८॥
परी हें कायि ईक्षण । लीलागुणें एकपण ।
तें कीजेल निरूपण । पुढेंही ॥४९॥
आरोह सांडोनि सातें । अधिक उजाळे सहितें ।
भूरादि सत्यातें । अधिक मैळे साततळे ॥५०॥

जीव वासनेचा प्रेरक म्हणून स्वतंत्र आहे, पण वासनापूर्तिकरिता तो ईश्वराची याचना करतो. या नात्याने तो परतंत्र आहे. याचनावृत्ति गेली म्हणजे त्याचे ते निर्वासन कर्म लीलामात्र होते. ४६. एकच शुद्धजीव उपाधिनुसार सूक्ष्म, स्थूल, समष्टि, व्यष्टि, विराट, हिरण्यगर्भ, विश्व, तैजस अशा अनेक भावांनी विभागला गेला. ४७. १.समष्टिप्रलयाचा अभिमानी जीव ज्ञानी असतो. २.सुषुप्तीत असणारा व्यष्टिजीव अज्ञानी असतो. व ३.सर्वाच्या अंतर्यामी ईक्षण करणारा परमेश्वर होय. ४८. त्याला ईक्षणकर्ता सृष्टिचालक म्हणणे हे सृष्टि सत्य आहे, या कल्पनेला धरूनच आहे. खरोखर पाहिले तर एक सच्चिदानंदलीलाच काय ती सत्य आहे. यात एकपण भंगत नाही. या लीलेचे निरूपण पुढे करू. ४९. अहंकार सोडून अष्टधा प्रकृतीतील बाकीचे सात, मन, बुद्धि व पंचतन्मात्रा यांचा सात्त्विक उत्कर्ष होईल, तसतसे एकापेक्षा अधिक सात्त्विक असे भूःरादि सप्तस्वर्ग निर्माण होतात व रजस्तमाच्या आधिक्याने एकाखाली एक असे तल-वितलादि सप्त पाताळ निर्माण होतात. ५०

देश काल निमित्त क्रिया । क्रमें पूर्ति याचनें इया ।
आणि ते संपलिया । याचक होणें ॥५१॥
तेथ मैळे जरी ठाये । तरी तिर्यगादि जाये ।
अंतर उजाळें होये । फळिया उपरी ॥५२॥
आणि शुद्ध उजाळ प्रसंगें । चौदा चोदनायोगें ।
सम विषम भागें । याचका इये परी ॥५३॥
आनि??? अनादिरूपें लीलेक्षणें । वैकुंठादि होणें ।
तें प्रेमळा प्रेमगुणें । ठावोनि येती ॥५४॥

आतां एक उजाळी बहुपण । तें आश्रयें त्रिदेवत्व जाण ।
आणि तैसें त्रयत्रिंशें पूर्ण । आदित्यादिकें ॥५५॥

देश, काल व निमित्त यांना धरून वासनेमुळे जी कर्मे होतात. त्यांची क्रमाने पूर्तता होऊन फलभोग मिळतात व ते संपले म्हणजे पुनः कर्म करणे व याचक होणें सुटत नाही. ५१. मरणसमयी जीवाचे ठिकाणी रजस्तम प्रधान असले तर तो तिर्यगादी योनीत जन्म घेतो व सत्त्वाधिक्य असेल तर स्वर्गादिलोकांत जन्म घेतो.५२. भगवंतांनी सांगितलेल्या धर्माचे अनुष्ठान करून जीवाच्या ठिकाणी त्रिगुणांचा जसजसा उत्कर्ष होईल त्याप्रमाणे त्याला वर सांगितलेल्या चौदा भुवनांची प्राप्ति होते, (हे सर्व भोग्य लोक आहेत) (टीप :- येथपर्यंत भगवंताची व्यावहारिक लीला सांगितली.) ५३. पण अनादिस्वरूप परत्म्याचा जो पारमार्थिक वास्तवलीलास्वरूप संकल्प त्या योगाने प्रेमळ भक्तास भक्तीने मिळणारे वैकुंठादि लोक आहेत. त्यांचा प्रेमळ भक्तांना प्रेमाने अनुभव येतो. ५४. एकच शुद्ध सत्त्वगुणी परमेश्वर, जे कारण ब्रह्म आहे, ते बहुपणास येते. त्याच्या आश्रयाने कार्यब्रह्म हे जगत् उत्पत्ति- स्थिती- प्रलय = ब्रह्मा, विष्णू, शिव अशा त्रिदेवत्वाला प्राप्त होते. त्याच रजोगुणमिश्र सत्त्वगुणाने आदित्यादि तेहतीस देवांचा परिवार उत्पन्न होतो. आठ वसु, अकरा रुद्र, द्वादश आदित्य प्रजापति व इंद्र इ. हे तेहतीस देव होत, ५५.

परिवारें नाना तेंही । चित्स्वातंत्र्यें पाहीं ।
आणि आश्रयाधिकारेंही । मत्कांताधीनें ॥५६॥
ऐसा हा प्रणवु । वाचकानें शब्द बहू ।
वाच्यत्वें देवू । देवतारूपें ॥५७॥
संबंधें जीव जग । परमार्थे एकांग ।
वस्तुत्वें चांग । लीलाप्रियत्व ॥५८॥
हा लीलाप्रिय भावो । माला गुंफोनि पहा हो ।
श्रीज्ञानेश्वरपदीं वाहो । आनंतींही ॥५९॥
श्रीज्ञानेश्वरमाउली । जे लीलासुखा साउली ।
नित्य तयांच्या पाउलीं । तन मन अर्पिलें ॥६०॥
तेथ ओवियाकर्ता । हेहि न ये अहंता ।
आणि ज्ञानेश्वर माता । तत्पदीं अर्पिता उल्हासु ॥६१॥
'हरिः ॐ तत्सत् इति श्री निगमांतपथसंदीपके, श्रीसद्गुरु
ज्ञानेश्वरकृपाप्रसादे, ओवीछंदबद्धे 'कार्यसंबंधपदार्थनिर्णयो नाम,
चतुर्थोध्यायः॥ (य१-२६)
॥ श्रीज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

परमेश्वराची जगत्कारण-शक्ती अनेक शक्तीत विभागली म्हणजे एका एका शक्तीस एक एक नांव दिले जाते. ती शक्ती चैतन्यदृष्टीने स्वतंत्र परंतु आधिकारिक या नात्याने मत्पति जो

भगवान् श्रीकृष्ण त्यांचे स्वाधीन आहे. ५६. असा हा प्रणवच वाचक भावाने बहु-शब्दरूप झाला आहे. एका परमेश्वराचे ठिकाणी शब्दामुळे नाना प्रकारची सृष्टि झाली; म्हणून तोच एक वाच्य होय. तीन देवतारूप सृष्टि हे सर्व शब्दमात्र आहेत. ५७. शब्दाचा संबंध ईश्वराशी लावला की जीव-जगत् भासते. जीव ज्या शब्दाचा जो अर्थ करतो, तत्स्वरूप ब्रह्मच नटते व संसार भासू लागतो. पारमार्थिक दृष्टीने परब्रह्म ही एकच वस्तु आहे. बाकीचें जीव–जगत् त्याचेच लीलाप्रियत्व म्हणजे प्रेमळ क्रीडाच होय. ५८. ही लीलारूपी- अत्यंत आवडता भाव- हीच कोणी पुष्पमाल अनंतरूप श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या चरणी समर्पण करू. ५९. जिच्या छायेच्या आश्रयाने हे लीलासुख प्राप्त होते. त्या नित्यस्वरूप ज्ञानेश्वरमाउलीच्या चरणी हे तन, मन समर्पण केले. ६०. ओव्यांचे कर्तृत्व समर्पण झाल्यामुळे त्याची अहंताहि राहिली नाही. पण श्रीज्ञानेश्वरआईच्या चरणी केलेल्या समर्पणाचा उल्हास मात्र कायम राहिला. ६१.श्रीनिगमांतपथसंदीपकांतील चवथ्या अध्यायाचा अनुवाद श्रीगुरुचरणी समर्पण असो.

ooo

अध्याय ५ वा

पदत्रयैक्यविवरण

॥श्री ज्ञानेश्वरमाउली समर्थ॥

आहे, कळे, आवडे । या त्रयीं तीनी उडे ।
कधींही न पडे । भेदारोगी ॥१॥
आहे म्हणे व्यतिरेके । तों गिवसिजे अभेद दुःखे ।
कळे ऐसे म्हणे देखे । तो खोटे दुःखें अभिभूत ॥२॥
हें आवडे म्हणे वेगळे । ते खोटें आणि न कळे ।
हें असें म्हणूनि डोळे । न देखती भेदू ॥३॥
नम्र श्वेत सौरभे । असिजे की राभे ।
ती ही उणे गर्भे । एकत्वें तये ॥४॥
नरम हें पांढरे । पांढरी नम्रे ।
दुणी विहिते खरे । सौरभे उठे ॥५॥

* आहे म्हणजे सत्, * कळे म्हणजे चित् व * आवडे म्हणजे आनंद. यांनी असत्-जड-दुःख ही नाहीशी झाल्याबरोबर त्यांच्या अपेक्षेने, भासणारा भेद नाहीसा होऊन त्रिविधभेदरहित असे ब्रह्मस्वरूपच उरते. (टीपः- परब्रह्मस्वरूप अनिर्देश्य आहे व त्याचे सृदानंद पदांनी वर्णन केले आहे. अनिर्देश्य परब्रह्मवस्तूचा या तीन पदाने कसा निर्देश होतो? याचे उत्तर असेः- आपल्याला

असत्, जड व दुःख यांची प्रतीति आहे. सत्पदाने असताचे, चित्पदाने जडाचे व आनंद पदाने दुःखाचे निवारण होते. म्हणून सृदानंद शब्दाने ब्रह्मस्वरूप निर्देश्य झाले आहे, असे म्हटले जाते. पण असत् जड दुःखाची प्रतीति नाहीशी झाल्याबरोबर त्याच्या सापेक्ष शब्दांचीही निवृत्ति होऊन अनिर्देश्य ब्रह्मस्वरूपच राहते) १. आपल्याहून * सदंश अलग काढला तर बाकीची दोन पदें मिथ्या ठरून व त्यांच्याशी बळेच अभेद होऊन अभिन्न दुःखप्राप्ति होईल. * चिदंश अलग केला तर न कळणाऱ्या खोट्या दुःखाने तो युक्त होईल. २. * आनंदांश वेगळा केला तर ते असत् खोटे व अचिद् (ज्ञानरहित) अस्तित्व होईल. म्हणून विचार दृष्टीने पाहतां त्यात भेद सिद्ध होत नाही. ३. कापुरात मऊपणा, पांढरेपणा, व सुगंधपणा हे तीन गुण आहेत त्यांचा भिन्नभिन्न प्रत्यय येतो. पण कापुराचा खडा हातात घेतला तर त्याच्यात हा तीनपणा भासत नाही. एकत्वाचाच प्रत्यय येतो.४. हे नरम, हे पांढरे हा दोनपणा न भासता एक सुगंधच खुलून उठतो. ५.

तैसी तीही । श्रुती दे ग्वाही ।
परी आवडीच्या ठायीं । उणें जाले ॥६॥
कळे तेंचि आवडे । कीं आवडे तें कळे फुडे ।
अथवा हें जोडे । आहे ते गा ॥७॥
हें उगे निवडिती । तें ख-पेंधे होती ।
संभव म्हणती । संभवे त्यागू ॥८॥
पुनवेच्या सतरा । अपरिच्छेदें चंद्रा ।
राहती तैसे स्वतंत्रा । इया घडे ॥९॥
हें सिद्ध मोटके । परी घेपिजे केटकें ।
स्पंधे मिठे पिऊखे । निवाडे असम ॥१०॥

श्रुतीने परब्रह्माचे सत् चित् आनंद असे त्रिविध वर्णन केले आहे. पण हा तीनपणा ज्ञानदृष्टीने भासतो. पण परब्रह्माचे सत्चित् हे मुरून एका आनंदाचीच प्रतीति येते. ६. जे चित् तोच आनंद किंवा जे कळते त्याच्याच बद्दल आनंद उत्पन्न होतो किंवा जो आनंद तोच चित् किंवा जे 'आवडते' तेच स्पष्ट कळू लागते अथवा जे आहे तेच कळते. ७. या तीन अंशात जे व्यर्थच भेद पाहण्याचा प्रयत्न करतात त्यांचा तो प्रयत्न ''खपेंधे'' म्हणजे गंधर्वनगराप्रमाणे निरर्थक होईल. कोणी म्हणतील की हा भेद करणे संभवनीय आहे. तर संभव हे काही प्रमाण नव्हे. ते त्याज्यच होय.८. भिन्नत्वाने पाहणाऱ्यास चंद्राच्या ठिकाणी सतरा कला दिसतात पण चंद्राच्या ठिकाणी अंशत्वाची जाणीव नाही. तो आपल्या ठिकाणी सदा पूर्णच आहे. त्याप्रमाणे ब्रह्माहून भिन्न राहणारा तेथे तीनपणा पाहो, ऐक्यत्वाने राहणाऱ्यास तेथे भेद दिसत नाही. (टीप :- वृत्ति-उपाधीने भेद-प्रतीति. उपाधि (न) राहिल्याने अभेद प्रतीति.) ९. परब्रह्माचे हे असे अंश कल्पावे लागतात. उदाहरणार्थः- सागराहून अलग राहणाऱ्यास जरी लाट, मीठ, अमृत अशी समुद्राची वृत्तीने तीन प्रकारची विषम प्रतीति येते तरी सागरदृष्टीने त्यांचे ऐक्यच आहे. १०.

आतां धर्मे हे ये । तो धर्मू ना श्रये ।
मा क्रिया ठाये । आणि जे के ॥११॥
देखे येणें ठाये । देखते तें होये ।
आणि सर्व सिद्धि आणावे । साधने कायीं ॥१२॥
व्याप्तीचे अभावे । दोही या नयावे ।
वाचे काय घेयावे । नसते हे ॥१३॥
अटके नाहीं । मा केटके तिहीं ।
म्हणोनि प्रथमा नाहीं । तद्वाक् संख्येची ॥१४॥
आतां इये लखे । विषमें समीपे खे ।
आघवी इये बाधके । अननुकरे ॥१५॥

आता ते ब्रह्म ज्या सत्, चित्, आनंद या धर्मास आल्यासारखे दिसते त्या धर्मांनाच तर ते आश्रय होत नाही मग तेथे क्रियेला आश्रय कोठून मिळणार? तेथे जाति, गुण, क्रिया इत्यादि कशाचाच आरोप करता येत नाही. ११. ब्रह्मदृष्टीने पाहता सर्व द्रश्यच द्रष्टा होतो व तो द्रष्टा पूर्वीच सिद्ध असल्यामुळे त्याला सिद्ध करण्यास साधनांची आवश्यकता नाही. १२. भेद ज्या अनुमानाने ठरवावयाचा ते अनुमान सिद्ध करण्याकरिता त्याला जी व्याप्ति लागते तीच येथे सिद्ध होत नसल्यामुळे दोनपणाच सिद्ध होत नाही. मग नसतांच भेद वाचेने मानण्यात काय अर्थ ? १३. जेथे एकपणास ठाव नाही तेथे तीनपणा कोठून सहन होणार? म्हणून आत्म्याचे ठिकाणी शब्दसंख्येची महती नाही. १४. आता या लक्षणाच्या दृष्टीने पाहता संपूर्ण भेद शून्यवत् खोटे आहेत. ते स्वरूपस्थितीस बाधक आहेत. अतएव त्याज्य आहेत. म्हणून त्यांच्या ठिकाणी वृत्ति जाऊ देणे योग्य नाही. १५.

ऐसे हे घेईजे काई । ओळखावया नाहीं ।
परी ओळखचि ठायीं । ठाकली कीरूं ॥१६॥
तळमळो पेगे । के कीजे बागे ।
वरी खोल तेवी माघे । दाबणें कीरू ॥१७॥
तेवीं इये गुण साखिके । देख तया आपटके
न बोलती नेटके । उगेचि तिये ॥१८॥
आहे तें नाहीं । नसे हे कांही ।
आरशीया ठायीं । मुख जैसें ॥१९॥
तेवीं हे कळे । आरिसा वेगळे ।
येणेंचि आंधळे । विचारकरीं ॥२०॥

ज्या ठिकाणी ज्ञान करून घेण्याजोगी शब्दांची प्रवृत्ति नाही अशी वस्तु कशी घ्यावी? ती घेण्यास जाणारा तत्स्वरूपच होतो. तेथे दृश्य-द्रष्टाभाव नसून ती केवळ ज्ञानमात्र स्थिति आहे. १६.

तळमळीच्या आवेशात भ्रमरूप वस्तूच्या पुष्कळ मागे लागले व नाना उपाय केले तरी त्याचा काय उपयोग? जितके पुढे जावे तितका वाव आहेच. प्रयत्न संपणेच शक्य नाही. अखंड सुख प्राप्त करून घेण्याचा एकच मार्ग आहे. तो म्हणजे प्रवृत्ति मागे दाबणे- म्हणजे प्रवृत्ति अंतर्मुख करणे. हा होय. (टीप :- जेथे अखंड सुखाची इच्छा उत्पन्न होते तेथेच त्याची प्राप्ति होते, म्हणून तेथेच वृत्ति स्थिर करावी) १७. त्याप्रमाणे जो गुणांचा साक्षी होतो त्यालाच स्वरूपप्राप्ति होते. यापुढे शास्त्रेंही काही सांगू शकत नाहीत.१८. आरशात जे मुख दिसते ते आपले मुख नव्हे, असे समजून आपण ग्रीवस्थ म्हणजे मानेवरील मुखाची प्रतीति घेतो. त्याप्रमाणे ज्ञानाने स्वरूपाची ''भिन्न इव'' प्रतीति घेतल्यानंतर ती वृत्तिही सोडून स्वरूपमात्र राहावे.१९. आपले रूप इतके एकरूप आहे की ते काही झाले तरी आरशात येऊ शकत नाही. तद्वत् अनिर्देश्य आत्मस्वरूप दृश्यभावास येणे शक्य नाही. तेथे विचारही आंधळा होतो म्हणजे लटका पडतो. २०.

अर्थ हे आपुला । तो अदुःखें स्थापिला ।
म्हणूनी सोपिला । ठावूं एकीं ॥२१॥
एकी नये उपाया । अपायीं लक्षणा इया ।
उगेचि प्रत्यया । जल्पके हें ॥२२॥
अवादन वाद्य नादें । मत्सुत तृप्ती साधे ।
तैं बोधमदें । घटे ऐसें ॥२३॥
हें आवडलें नाही । ना न म्हणे काहीं ।
एकी वा दोन्हीं । दोही एकें ॥२४॥ (य१-२७)
हा अप्रत्ययू एकोपा । नुठे कोणि या कोपा ।
जेवीं मी तापा । भयें न काढी ॥२५॥

उपाय, उपेय व कर्ता हे एकरूपाला येऊन, अखंडसुखरूप होऊन राहणे हाच पुरुषार्थ होय. यांतच अत्यंत दुःखनिवृत्ति व परमानंद प्राप्ति असून येथे सर्व प्रयत्न संपतात. २१. ही स्थिति एकाकी असल्यामुळे तेथे उपायांची पोंच नाही. तेथे लक्षणा करून प्रत्यय घ्यावा हेहि म्हणणे शुद्ध बडबडच होय. (टीपः- लक्षणादि उपाय शास्त्राने वस्तुप्राप्त्यर्थ सांगितले नसून ते प्रतिबंधनिवर्तक आहेत.) २२. (येथे स्वरूपस्थिति कशी आहे ते सांगतात -) वाद्याच्या द्वारे नाद प्रगट होण्यापूर्वी जशी कामना तृप्ति असते तशी निरुपाधिक आनंद स्थिति ज्ञानोत्तर होते ती येणेप्रमाणे (टीप :- भगवान शंकरानी कामाला जाळल्यानंतर तो श्रीकृष्णाचा मुलगा प्रद्युम्न या नांवाने प्रगट झाला. श्रीगुलाबरावमहाराज श्रीकृष्णाला आपला पति समजत असत; म्हणून कामाला त्यांनी ''मत्सुत'' म्हटले) २३. येथे सुख घेण्याची प्रवृत्ति झाली नाही, म्हणून सुखाची जाणीव अनुभवास आली नाही हे जरी खरे असले तरी सुखस्थिति नाही असे म्हणू नकोस. ती आहे. येथे आपेक्षित असे सत् चित् आनंद नसून केवळ सन्मात्र, चिन्मात्र, आनंदमात्र सच्चिदानंद आहे. या स्थितीला द्वैत अद्वैत यापैकी काहीच म्हणता येत नाही. सुखपणास न आलेले असे हे सुख आहे. २४. हे एकत्व अनुभवाचा विषय

न होणारे आहे. ही स्थिति ज्ञेय होण्याजोगी नाही. ही वस्तुस्थिति आहे. मग कोणी काही म्हणो. येथे मी-पणाचा ऐक्यानुभवही तापदायक होतो.या भयाने तो एकपणातून आपणास बाहेर काढीत नाही.२५.

हें साच उघडे । अबोलणे फुडे ।
बोलणे गाढे । उगे नसे ॥२६॥
मा प्रत्ययू आला । ते नसी तो गेला ।
कें वा राहिला । एको पाहा ॥२७॥
ऐशिया सोई । ज्ञानेश्वर आई ।
लाभली म्हणूनि पायीं । डोईचि दिधली ॥२८॥
हें मस्तक ती पाउलें । अपार्थक्यें झाले ।
वाटणे संचले । अर्पणरूपें ॥२९॥
ऐशा ओंविया अक्षता । सौभाग्यें लिहित पिता ।
लोभें पायीं अर्पिता । अर्पिलो मी ॥३०॥
आतां ज्ञानेश्वर माउली । समस्ती इये ठाउलीं ।
जे कृपापात्रा साउली । पाउली तियेची हृदिस्थे ॥३१॥
हरिःॐतत्सत् इति श्रीनिगमांतपथसंदीपके ओवीछंदबद्धे
पदत्रयैक्यविवरणं न्नाम पंचमोध्यायः॥

॥श्रीज्ञानेश्वर महाराजार्पणमस्तु॥

आम्ही हे उघड बोलतो खरे, पण वस्तुतः तें अबोलणेच आहे. हे बोल गूढ रहस्यमय आहेत. व्यर्थ नव्हेत.२६. ज्याला या ऐक्याचा अनुभव आला तो त्या अनुभवांतच विरून गेला. मग एकपणा तरी राहीला कोठे? व त्याला 'एक आहे' असे म्हणणार कोण? २७. अशा निरुपाधिक स्थितीत श्रीज्ञानेश्वर आई लाभली म्हणून तिच्या चरणी मी माझे मस्तक ठेविले. २८. हे मस्तक व ते चरण एक झालेत. व त्यांत जो अनुभव मिळाला तोहि अर्पणरूपाने तेथेच स्थिर होऊन राहिला. २९. अशा निर्दोष ओव्या माझ्या पित्याने म्हणजे श्रीज्ञानेश्वर महाराजांनी लिहिल्या व त्या प्रेमाने त्यांच्याच पायी अर्पण करीत असता तेथेच मीही समर्पण झालो म्हणजे अकृत्रिम भाव उत्पन्न झाला.३०. आतां श्रीज्ञानेश्वरमाउलीच सर्वत्र अधिष्ठान आहे. तिच्या कृपेला जे अधिकारी असतील त्यांना ती छायेप्रमाणे सुखदात्री आहे. तिची पाउले माझ्या हृदयात अखंड राहोत! ३१.श्रीनिगमांतपथसंदीपकांतील पाचव्या अध्यायाचा अनुवाद श्रीगुरुचरणी समर्पण असो.

०००

३. चौसष्टी

(अमृतानुभवाच्या प्रथमाध्यायावरील निरूपण)

॥श्रीमत्सद्गुरु सर्वत्र यशस्वी ज्ञानेश्वरमाउली समर्थ॥

ॐ नमो ज्ञानेश्वर सद्गुरु आई । मस्तक ठेवूनि तुमचे पायीं ।
तुम्ही शिकविल्याची परीक्षा लवलाही । तुम्हांपुढें देते ती ऐका ॥१॥
ज्ञान शिव शक्ति वृत्ति । हे निरुपाधिकचि संकेती ।
आणि जगत्कारणें निश्चिती । ते म्यां वंदिलीं दोघे ॥२॥
ज्ञान तेचि वृत्ती । विषयप्रेमें भासे पालथी ।
आणि पाहतां संकेती । एकचि सरळ ॥३॥
हरिप्रेम अंगी चढे । तैं दोघांचे दोनपण मोडे ।
आणि विश्वद्वैत भासतां गाढे । तरी दोनपण पुढती ये ॥४॥
ज्ञान वृत्ति म्हणावें दोन । तरी एकचि असे ज्ञान । आणि एक म्हणावें तरी
वृत्ती-ज्ञान । दोघे म्हणोनि साकार निवडतां नये ॥५॥
भक्ति सुखाची प्रीति मोठी । तेथ ज्ञान वृत्ति रूप जगजेठी । (य१-२८)
आणि आश्चर्य हें शेवटीं । दोनपणचि नसे ॥६॥
ऐसे एकरूप दोघे । यातुनि निघतीं जगें ।
एकचि दोहों अंगें । दिसो लागे ॥७॥
अवघे जग जरी पाहिलें । ते आपुल्या वरीच ओळखिलें ।
परी ज्ञान वृत्ति वांचोनि नाहीं आले । तिसरें कोणी ॥८॥
दोन्हीही आहेती । ज्ञान आणि वृत्ति ।
अनादि असती । ज्ञानरूप ॥९॥
प्रेमामाजीं भेद गेला । तो आनंदामध्यें बुडाला ।
अद्वैताचा भोक्ता झाला । तोही हरपला भक्ति योगें ॥१०॥
ज्ञानावांचोनि वृत्ती नाहीं । वृत्तीवांचोनि ज्ञान नाहीं ।
दोन्ही नसोनि पाही । एक आनंद ॥११॥
हा आनंद एवढा प्रकट । परमाणूंतही दिसे स्पष्ट ।
जग व्यापोनिया वरिष्ठ । उरोनि राहे ॥१२॥
ज्ञान वृत्तीवांचोन । गवतही नाहीं झालें निर्माण ।
जणो हे जीव प्राण । एकमेकांचे ॥१३॥
विश्वरूप संसार करिते । ज्ञान जेव्हां विसरतें ।

तैं दोनपणा वृत्तीतें । येत असे ॥१४॥
जरी एखादें स्मरलें ज्ञान । तरी नव्हतेंच विस्मरण ।
मग विश्व सारें गिळोन । ज्ञानचि होय ॥१५॥
हरपोनि ज्ञान वृत्ति । एकचि असे हरिप्रीति ।
विश्व असणें ही प्रतीति । केवळ असे ॥१६॥
ज्ञान विषयि वृत्ति विषय । कीं वृत्ति विषयि ज्ञान विषय ।
हे दोन्हीं असोनी स्वयें । सुखचि होय ॥१७॥
दोन वीण्यांत एक नाद । दोहीं फुलांत एक सुगंध ।
दोहों दीपामाजी अभेद । प्रकाश एक ॥१८॥
दो ओठांत एक शब्द । दोन्ही डोळ्यांत रूप अभेद ।
तैसे विश्व हें प्रसिद्ध । एकचि ज्ञान-वृत्तिरूप ॥१९॥
ज्ञान आणि वृत्ति । दोनपण मात्र दिसती ।
परी स्वानंदप्राप्ति । एकचि असे ॥२०॥
ज्ञानावांचूनि वृत्ती न राहे । वृत्तिवीण ज्ञान विषय न पाहे ।
कर्तृत्व भोक्तृत्वही नोहे । दोहींविण ॥२१॥
ज्ञानरूपचि वृत्ति आहे । म्हणोनी वेगळी करितां नोहे ।
आणि वृत्तिरूपचि ज्ञान आहे । म्हणोनी वेगळीक नसे ॥२२॥
साखरेची गोडी । कापुराची गंध परवडी ।
काढितां नये वेगळी । बुद्धी पांगुळी म्हणोनियां ॥२३॥
दिव्याचा प्रकाश अवघा उचलितां । तरी दिवाचि येत असे हाता ।
तैसी वृत्ति उठवितां मुरवितां । ज्ञानचि होय ॥२४॥
बिम्बचि प्रतिबिम्बा प्रकाशीत । प्रतिबिम्बें बिम्बाचें अनुमान होत ।
तैसें द्वैतमिषे अद्वैत । अनुभवे कीं ॥२५॥
सर्व नाहींपण गेलें । ज्ञानचि वृत्तिरूप झालें । (य१-२९)
वृत्तिपण ही आलें । ज्ञानानेच तिसी ॥२६॥
संस्कारा सहित वृत्ति । विश्वरूपें विराजती ।
ज्ञानचि होऊनि नाना आकृती । ज्ञानरूप संचलें ॥२७॥
नामरूप ज्ञानांत नाहीं । परी वृत्ति आटणीं होवोनि पाही ।
एवढें विश्व नवाई । नाम रूप तेंची ॥२८॥
एका सत्यपटावरी । मिथ्या चित्रें नानापरी ।
काढोनि लीला प्रकारी । श्रीहरी जो ॥२९॥

वृत्ति आटतां ज्ञान । ज्ञान आटतां वृत्ति स्फुरण ।
दोघांचेहि एकपण । संकेतें कळें ॥३०॥
वृत्ति पाहे तेव्हां पाहणारे ज्ञान । वृत्ति न पाहे तरी न राहे ज्ञानपण ।
हे अनुभवाची खूण । जाणती संत ॥३१॥
वृत्तीने ज्ञान विश्व आहे । वृत्ति नसतां कांहींच नोहे ।
परी नाहीं तेंचिं आहे । वृत्तिरूपें विश्व ॥३२॥
येथवरी सूक्ष्म निरूपण । प्रकटचि परी लोपल्या समान ।
हें संकेतें पूर्ण । विश्वीं विश्वचि आहे ॥३३॥
वृत्तीनें ज्ञानासि विषय दिधले पुष्कळ । त्या विषयां सहित वृत्ति
आटली सकळ । उरलें तें केवळ । ज्ञानचि एक ॥३४॥
वृत्ति ज्ञानाची दर्पण । ज्ञान वृत्ति दर्पण ।
दोहींचे एकपण । भक्तीमाजीं ॥३५॥
तें वृत्तीचि होय हरिप्रीति । तै आनंद मिळे आपणाप्रती ।
परी तो आनंदभोग वृत्ति- । वांचोनि नसे ॥३६॥
ज्ञान तेचि वृत्ति । वृत्ति तेचि ज्ञानमिति ।
एकत्र जाणोनि दोहींप्रती । हरिप्रेम सेविती प्रान्न ॥३७॥
वायु गति एक जाण । कीं पिवळेंपण मिळोनि एक सुवर्ण ।
तैसें वृत्तीचि ज्ञान । अवघें असे ॥३८॥
अग्निसहित उष्णता । कीं सुगंधासहित कर्पूरता ।
तैसी वृत्तिसत्ता । तत्वतां ज्ञान ॥३९॥
रात्री आणि दिवस । दोहींचा सूर्यास नाहीं भास ।
तैसे भक्ती माजीं ज्ञान वृत्तीस । पृथक्त्व नसे ॥४०॥
किंबहुना वेदाचा पिता । जो ॐकार तो हेंचि तत्वतां ।
ज्ञान वृत्ति पृथक्त्वे असतां । विरुद्ध वाटती ॥४१॥
वृत्ति आणि ज्ञान । हे शब्द मात्र भिन्न ।
एरवीं अवघें एकपण । त्या हरीतें नमन सद्भावें ॥४२॥
निश्चय करितां कांहीं । तरी शब्दासी ठाव नाहीं ।
समुद्रासहित नदी ही । प्रळय पाण्यांत मिळे जैसी ॥४३॥
वायू आकाशांत गेला सकळ । कीं प्रळयाग्नींत नसे सूर्यमंडल ।
तैसें सोज्वळ । जाणावें गुरुमुखें ॥४४॥
दोन्हींच्या भेटी । नाहीं दोनपणाची गोठी ।
परी एकपण उठाउठी । भक्तीनें गौण ॥४५॥

आणि वृत्ति असली जरी । विषय-विषयि भाव नसे तरी । (य१-३०)
उलट ज्ञान वृत्ती दोहीं परी । भक्तींत हरविती संत ॥४६॥
तेथ नमस्कार म्यां केला । तो एकत्वेंचि झाला ।
दुसरा नाहीं आला । लाक्षणिकही ॥४७॥
अलंकार आणि सुवर्ण । न होता भिन्न ।
परी शोभे अलंकारपण । सोन्याचि वरी ॥४८॥
तैसें म्या नमस्कारितां । प्रेमचि शोभा तत्वतां ।
पतिपत्नीभाव भक्तां । एकत्वें आला ॥४९॥
समुद्र आणि नदी । एक मिळे ही प्रसिद्धी ।
परी पाणीपणाची बुद्धी । दुसरी नाहीं ॥५०॥
कां चंद्राचाचि प्रकाश । जितुका फांकेल भरोनी आकाश ।
तितुकें चंद्रपणास । भूषणचि कीं ॥५१॥
कां दिव्याची दीप्ति । उणी न करी दिव्याप्रती ।
आणि दिव्यास सोडोनि दीप्ति । राहतां नये ॥५२॥
मोत्याचें सुंदरपण । जितुकें निघेल परीक्षून ।
तितुकें मोल पूर्ण । अधिक तया ॥५३॥
अकार, उकार, मकार । मिळोनी एकचि ॐ कार ।
कीं तीन रेघा परी 'ण'कार । एकचि असे ॥५४॥
तैसे चिदेक पण नाहीं मोडलें । आणि भक्तींत विशेष प्रेम जोडलें ।
तरी तरंग समुद्र झाले । गोड पाण्याचें ॥५५॥
तैसें एक करोनी ज्ञान वृत्ति । साधूनिया हरिप्रीति ।
नमन करावयाची रीति । तेही ऐका ॥५६॥
वायू राहातां तरंग नुठे । तैसे सगुणपणीं दोनपण नुठे ।
मग हें गोमटें । सावळें रूप ॥५७॥
निद्रेमाजी जैसी कांही । आपुली आठवणची नाहीं ।
आणि नाहीं हें ही । म्हणता नयें ॥५८॥
तैसी बुद्धी संकेती गेली । कृष्ण आणि प्रीति एक झाली ।
मग ध्येयत्वें कां बाह्यांतर प्रकटली । ते मूर्ति वंदिली कृपामय ॥५९॥
कठिणपणा सांडोनी लवण । स्वयें समुद्र झालें आपण ।
तैसे तोडोनि ज्ञानाहंपण । झालें अर्पण हरिपायीं ॥६०॥
हरि आणि प्रीति एक । ज्ञान वृत्ति आणि सुख ।
संकेतासहित सम्यक । कृष्णचि हा ॥६१॥

कापुर आकाशीं विरे । परी वास जैसा उरे ।
तैसा संकेतही अर्पितां खरें । प्रेमें बरें उरलें हरिदास्य ॥६२॥
ही अद्वैतप्रेम खूण । जेणें संतोषलें पति कृष्ण ।
त्याचि जळें ज्ञानेश्वरतातचरण । अभिषेकिलें ॥६३॥
दयाळें ज्ञानेश्वर जननी । सद्गुरु सखे माय बहिणी । हें मम सहित अर्पिलें
तव चरणीं । आतां दासी करोनी दुग्ध पाजी ॥६४॥ (य१-२९)

(चूर्णिका-वार्तिक) 'हरिः ॐ तत्सदिति श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरजननीकृपाप्रसादे गुरु अग्रपरीक्षाबोधे, बोबड्यावचनप्रबंधे' निरूपिलें, तें सर्वत्रयशस्वी ज्ञानेश्वरचरणीं, उत्कर्षपणीं तद्वाक्यबोधपरीक्षादानशुद्धनिरुपणंन्नाम प्रथमोऽध्यायः ॥

(श्रीबाबाजीमहाराज पंडितांच्या अमृतानुभवकौमुदीत चौसष्टीचा पूर्ण अनुवाद केलेला आहे)

॥श्रीज्ञानेश्वर महाराजार्पणमस्तु॥

०००

४. मातोश्री भागीरथीबाईंना ११ पत्रे

योगसाधना

पत्र १ ले योगाचा आरंभ

* मातोश्री भागीरथीबाई या कै. माधवराव खोलखुटे, सिरसगांव यांची कन्या
(त्रिपुरवारकृत चरित्र प्रकाशनवर्ष २००१ पान ८१-८२)

*

(विषय :- उदासवृत्तीचा निषेध- अंतःकरणात गुरुप्रेम ठेवून बाहेरहि सर्व आत्मरूप पहा- आत्मज्ञानाशिवाय सर्व व्यर्थ- सद्गुरुलक्षण- कैवल्यप्राप्तीचा वर)

॥ श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

कन्या मनी भागीरथी* । तुज सांगतो एक युक्ती ।
धरूनिया उदास वृत्ती । व्यर्थ भ्रांती पडूं नको ॥१॥
दाखवू नको ही उदासी । सुखी ठेव मायबापासी ।
घरीचिया सासरियासी । चिंताग्रस्त करू नको ॥२॥
लोकलज्जेचा पडदा । ठेवूनि करी सर्व धंदा ।
परी अंतरी परमानंदा । सर्वथा विसरू नको ॥३॥
जैसा वनींहूनि आला राम । तैं अयोध्येस सुख परम ।

तैसा चढता वाढता प्रेम । दिवसेंदिवस असो दे ॥४॥
जेवी वत्स धेनू वनीं । किंवा पाडस आणि हरिणी ।
तैसा कळवळा असता गुरुचरणी । तरी बंधन मग कैचे ॥५॥
जैसी जननी कार्यास जाय । तान्हिया बाळास वियोग होय ।
तैसे चिंतितां सद्‌गुरुपाय । तरी बंधन मग कैचे ॥६॥
जैसे दरिद्रियाचे हरपता धन । सर्वदा त्यांतचि खेळे मन ।
तैसे धरिता सद्‌गुरुचरण । तरी बंधन मग कैचे ॥७॥
कां टिटवी फिरता हाट । सदा पाहे पिलियाची वाट ।
तैसे गुरुपाय धरिता बळकट । तरी बंधन मग कैचे ॥८॥
जेव्हा तुझी भेट झाली । तेव्हाची मी कृपा केली ।
अंतरी प्रेमाची साऊली । करूनि ठेविली तुजसाठी ॥९॥
जे जे आहे मज जवळ । ते तुज हळु हळु देईन सकळ ।
परी चित्त स्थिर करूनि केवळ । होई निश्चळ निजचित्तीं ॥१०॥
तूं धुंडिसी ज्याचे साठी । ते असे तुझ्याच पाठीपोटी ।
जिकडे जिकडे फिरवावी दृष्टी । तिकडे नेहटी तेचि ते ॥११॥
डोळां जे जे देखावे । किंवा कानांनी जे जे ऐकावे ।
ते ते करूनि ठेवावे । आत्मरूप ॥१२॥
कस्तूरी असता नाभीकमळी । हरिण फिरे आळोआळी । (य१.३२)
तैसी तूं विसरोनि ब्रह्मपाळी । शब्द धुमाळी पडलीस ॥१३॥
तो संशय सांडूनि सर्व । चित्ती धरी शुद्ध भाव ।
मग आत्मब्रह्म अनुभव । सांगेन उपाव तुजप्रती ॥१४॥
जेव्हा आत्मरूप होय दृष्टी । तेव्हा ब्रह्मरूप भासे सृष्टी ।
मग जातिकुळाच्या गोष्टी । हारपती सर्व ॥१५॥
जातिकुळ देहाचे ठायी । आत्मा देहाहूनि वेगळा पाही ।
त्याला कुळगोत्र नाही । सर्वांचे हृदयी सारिखा तो ॥१६॥
तूं नव्हेसि स्त्री ना पुरुष । मनी भागीरथी नांव देहास ।
तूं देहाहूनि वेगळी आहेस । सदा समरस आत्मत्वे ॥१७॥
तेथे तुज जन्ममरण नाही । जन्ममरण देहासि पाही ।
तो देहचि मी नाही । हे जाणूनि हृदयी सुखी हो ॥१८॥
जरी पढला नाना ग्रंथ । चारी वेद झाले मुखोद्‌गत ।
पुण्यकर्म केले बहुत । तरी व्यर्थ आत्मप्राप्तीवीण ॥१९॥

जो गर्भी जपत होतीस मंत्र । तो बाहेर येवून विसरली सर्वत्र ।
तो सद्‌गुरुमुखे घेवूनि पवित्र । पाव परत्र याच जन्मी ॥२०॥
याच देही याच डोळा । घेई जीवन्मुक्तीचा सोहळा ।
परी अंतरी प्रेमजिव्हाळा । सदा कळवळा असो दे ॥२१॥
पुत्राहूनि गाढे । शिष्यावरी प्रेम चढे ।
ऐसे पाहोनि गुरूचे रूपडे । त्यास शरण आधी जावे ॥२२॥
''जनीं बोले चाले हिंडे । परी ज्याची समाधी न खंडे ।''
ऐसे ब्रह्मज्ञान रोकडे । त्यास शरण आधी जावे ॥२३॥
तो गुरु असो भलती याती । ऐशा बोलती वेदश्रुति ।
ज्याने फेडिली सकळ भ्रांती । तोचि निश्चिती गुरुदेव ॥२४॥
तूं माझी सत्य कन्या । परम पवित्र वेदमान्या ।
मी आपुल्या अनुभवधान्या । संपूर्ण तुज दिधले ॥२५॥
तुज दावीन कैवल्य मंदिर । हा मी दिधला पूर्ण वर ।
परी काही काल राही स्थिर । करूनि विचार अंतरी ॥२६॥
जरी विश्वास असेल माझे वचनीं । तरी हे ओवीबद्ध पत्र पाहुनी ।
प्रेम ठेवूनि अंतःकरणीं । हरिस्मरणीं स्थिर होई ॥२७॥ (य१.३३)
हरिःॐतत्सत् इति प्रथम पत्रकं संपूर्णम् ॥
॥ श्रीज्ञानेश्वरार्पणमस्तु ॥

ooo

पत्र २ रे

योगमुद्रा

(सद्‌गुरुलक्षण- आत्मप्राप्तीकरता बहु ग्रंथ वाचनाची अनावश्यकता- योगमुद्रेची प्रक्रिया- चमत्कार निषेध- हें आवडेल तर कर नाहीतर सोडून दे- स्वप्नाची आठवण दिली)

॥ श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

कन्या मनी भागीरथी । आयकावी मम वचनोक्ती ।
संशयात्मक चित्तवृत्ती । टाकोनि निश्चिती देई कां ॥१॥
(आणि गंगाबाई माता । तुम्हा सांगणे तत्वता ।
संशय न धरावा चित्ता । आम्हां बालकाविषयीचा ॥२॥
जैसी आहे तुमची मनी । तैसाचि मीही तुम्हालागुनी ।
येथे साक्ष श्रीगुरु निर्वाणी । खऱ्या खोट्याचा ॥३॥

तुमच्या मुलीचे प्रारब्ध । अती उंच असे प्रसिद्ध ।
म्हणुनी माझे चित्ती आनंद । सांगावयाचा ॥४॥
. . . काळचे संशय । मला सर्व कळले स्वयें ।
मिथ्या मूर्खासारिखी सोय । हे बुद्धी नोहे उत्तम ॥५॥
एवढा संशय जरी जाला । तरी मी गणले नाही त्याला ।
माझा प्रेम राहिला । जैसा तैसा ॥६॥
तुम्ही खरे खोटे काही माना । 'मनी' ही माझी पूर्ण कन्या ।
मी आपुले हृदयीचे गुह्य . . . प्राण्या । सर्व तीजला देतसे ॥७॥
ऐक मुली भागेरथी । तूं भिऊ नको कोणाप्रति ।
विश्वास असेल जरी तुझ्या चित्ति । तरी मी सांगतो ती रीती ऐकावी ॥८॥)

(२ ते ८ ओव्या चांदूरबाजारचे कै. कुर्याभाई यांच्या घरी, त्याचे पणतू श्री.प्रभाकरराव भट यांचे घरी असलेल्या १०० वर्षापूर्वीच्या मूळ पत्रात अंतर्भूत आहेत. त्या येथे मुद्रित करीत आहोत.
-- माधव भास्कर चांदले, सदस्य - श्रीज्ञानेश्वरमधुराद्वैत सांप्रदायिक मंडळ, अमरावती)

म्यां तुज जे दिधले वचन । ते मी आपुले सत्य करीन ।
तुज एक वेळ दावीन । भगवंतमूर्ती ॥२॥
मी तंव अति अज्ञान । बहु मूर्ख बुद्धिहीन ।
परी ज्ञानेश्वरकृपे करून । आत्मज्ञान सांगेन तुज ॥३॥
ते या जन्मीं जरी नाही साधले । तरी पुढील जन्मी देईन वहिले ।
परी मी जे वचन दिधले । ते खोटे सर्वथा न करी मी ॥४॥
मज निंदो अथवा वंदो कोणी । त्याची खंती नाही मनीं ।
परी तुज कष्ट न व्हावे म्हणोनी । मागे पुढे पहात असे ॥५॥
देहास मायबाप जन्म देती । परी मोक्ष नाही त्यांचे हाती ।
म्हणोनि या नरदेहस्थितीं । सद्‌गुरुप्रती शरण जावे ॥६॥
गुरूस जातीचे नाही काम । त्याचे कोणीही असो कुलधाम ।
परी जो दाखवील आत्माराम । तोचि परम सद्‌गुरु ॥७॥
तेथ भीड नसावी कांही । कल्पना न घ्यावी देही ।
शरण जाऊनि तयाचे पायी । वस्तु लवलाही पुसावी ॥८॥
ज्यास करणे आहे तरणोपाय । त्याने जातिभेद पाहू नये ।
हे खरे किंवा खोटे आहे । ते शोधून पाही वेदीं आणि भागवती ॥९॥
तूं तंव माझे तान्हे बाळ । म्हणोनि वाटत असे कळकळ ।
परी तूं स्वतंत्र नाहीस केवळ । तेथ मम अन्याय कोणता ॥१०॥
तुज मी सांगतो कांही । तिकडे आता लक्ष देई ।

सांडोनि बहुत ग्रंथांची नवाई । धरी सोई आत्ममार्गाची ॥११॥

योगमुद्रेची प्रक्रिया

एकाग्रचित्ती एकांतीं । जाऊनि बैसे निर्मल क्षिती ।
सद्‌गुरुरूप आठवूनि चित्तीं । आत्मप्रीति साधावी ॥१२॥
मग डावे मांडीवरी उजवा पाय । तैसा उजवीवरी ठेवी डावा पाय ।
ऐसे आसन साधूनि स्वये । मग करावे स्थिर मन ॥१३॥
हनुवटी हृदयी लावी । दृष्टी भ्रूमध्ये घालावी ।
ऐशियापरी साधावी । योगमुद्रा ॥१४॥
मग आधी दिसेल रक्तवर्ण । पुढे दिसेल श्वेतवर्ण ।
जैसा चंद्राचा प्रकाश जाण । तैसे चांदणे चकचक ॥१५॥ (य१.३४)
पुढे दिसेल श्यामवर्ण । जया म्हणती देह कारण ।
नंतर दिसेल नीलवर्ण । महाकारण निर्मल जे ॥१६॥
पुढे दिसेल अति आंधार । तेथे चित्त न राहे स्थिर ।
परी धैर्य धरूनि साचार । पुढे दृष्टी फेकावी ॥१७॥
येथवर पुष्कळ योगी येती । शेवटी मागे पलटूनि जाती ।
जरी सद्‌गुरु भेटेल कृपामूर्ती । तरीच पावती पार ते ॥१८॥
जरी अनंत जन्मीचे नसेल सुकृत । तरी हे न सांपडेल निश्चित ।
पुनः पुनः नीलबिंदुगत । दृष्टी फिरे ॥१९॥
जरी नसती पुण्ये कोटी । तरी कधी न चाले पुढे दृष्टी ।
म्हणोनि सोहं मंत्र कोटी । जपावे आधी ॥२०॥
मग तो आंधार निरसोनि जाय । कोटिसूर्याची प्रभा होय ।
येथे कधी घाबरू नये । पुढे चालावे सावधपणे ॥२१॥
येथे जे कोणी घाबरती । ते अर्धवट विदेही होती ।
पिशासारिखे राहती । जगामध्ये ॥२२॥

चतुर्भुज भगवन्ताचे दर्शन

एथूनि सावध जाय वाटे । पुढे दृष्टी फेके नेटे ।
मग ब्रह्माण्ड उजळले वाटे । एकाएकी ॥२३॥
त्या प्रकाशामध्ये अकस्मात । एक सिंहासन दिसत ।
त्यावरी प्रत्यक्ष भगवन्त । चतुर्भुज दिसतसे ॥२४॥
शंखचक्रपद्मगदा । ऐसिया पाहतां गोविंदा ।
त्रिविध तापाच्या आपदा । तुटोनि जाती ॥२५॥

वेदाचे काही न चाले । शास्त्राचे मौन पडिले ।
अठरा पुराणें परतले । लाजोनि मागे ॥२६॥
ऐसी साधणे जीवन्मुक्ती । त्याला देवही शरण येती ।
परी भुलो नये तयांप्रती । भुलतां श्रीपती अंतरतो ॥२७॥
जो चमत्कारामध्ये पडला । तो काळाचे मुखी सांपडला ।
जो न भुले लोककीर्तीला । त्यासि सापडला भगवन्त ॥२८॥
ऐक कन्ये ताई । तुज आवडेल तरी हे घेई ।
नाही तरी सोडून देई । व्यर्थ खटपट करू नको ॥२९॥
तूं जरी पढलीस नाना ग्रंथ । चारी वेद केले जरी मुखोद्गत ।
तरी या वस्तुवाचून मुक्त । कधी न होसी ॥३०॥
म्यां तुझा शुद्धभाव पाहोनी । दृष्टांत दिधला स्वप्नी येउनी ।
प्रेमाचा वृक्ष लावोनी । ठेविला असे ॥३१॥
गंगाबाई निज जननी । मस्तक ठेवूनि तुमचे चरणी ।
हे ओवीबद्ध वाणी । बोलणे आता संपवितो ॥३२॥ (१.३५)
हरिः ॐ तत्सत् इति द्वितीयपत्रकं संपूर्णम् ॥
॥ श्रीसद्गुरुज्ञानेश्वरार्पणमस्तु ॥
०००

पत्र ३ रे : सोऽहं उपासना

(पत्र वाचून आनंद- निर्गुण सोहंचा उपदेश- श्रीगुरूचे निर्गुणस्वरूप- तूं निर्गुणाची अधिकारी- पंढरी यात्रेचे पुण्य प्रदान - आशीर्वाद)

॥श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ॥

ॐ नमोजी ज्ञानेश्वरा । भक्तवत्सला करुणाकरा ।
विश्वव्यापका दीनोद्धारा । स्वसुखोदारा श्रीसद्गुरु ॥१॥
कन्या मनी भागीरथी । पूर्ण होवो तव मोक्ष आरती ।
दिक्कालरहित तुजप्रती । सुख निश्चिती मिळो कां ॥२॥
उत्तम तुझी तिन्ही पत्रे । आली प्रेमबद्ध पवित्रे ।
ती वाचूनि विचित्रे । स्वानंदभरे मन धाले ॥३॥
ज्ञानेश्वरीचा विचार । तुज घडला साचार ।
येणे योगे मम अंतर । तृप्त आहे ॥४॥
सगुण योगाची प्रतीति । जरी अपूर्ण राहिली निश्चिती ।
तरी योग पहावयाची आसक्ती । सोडू नको ॥५॥

आणि मनपवनाच्या भेटी । घाली सोहंची गांठी ।
ब्रह्मउपासनेची कसोटी । लावी अंगी ॥६॥
आणि तुझे आत्मरूप जे निर्गुण । त्याते पाही सांडोनि त्रिगुण ।
'मी देह' ऐसा अभिमान । त्यागूनि उन्मन मना करी ॥७॥
वाचूनिया परमामृत* । तीन्ही देह निरसी त्वरित ।
घेऊनि आत्मरूपप्रचीत । मग शोकमोहार्थ भ्रमूं नको ॥८॥
सद्गुरुप्रेमे करिसी शोक । हे तंव अनुचित निष्टंक ।
आत्मा सर्वान्तरी साक्षी एक । तेथे नसती देख गुरुशिष्य ॥९॥
देहासीच गुरु मानिसी । तंव तो असे विनाशी ।
जरी आत्म्यासी गुरु म्हणसी । तरी तो सर्वांशी साक्षित्वे वर्ते ॥१०॥
यालागी विचार करूनि पाही । भ्रांती जाणूनि सर्वही ।
पडूं नको नसते प्रवाहीं । होवूनि विदेही रहा सुखे ॥११॥
आत्मा तुझा माझा एक । तो जाणुनि सोडी भेद विकल्प ।
याच देही जीवन्मुक्ति-सुख । निष्कलंक सेविजे ॥१२॥
जैसे घटीं बिंबले घटाकाश । घट फुटलिया तें महाकाश ।
परी कधीहि न घडे नाश । गगनाचा पै ॥१३॥
तैसे जड शरीराच्या लोपी । सर्वथा नाश नाही स्वरूपीं ।
म्हणोनि हे तों नारोपी । भ्रांति माये ॥१४॥
अहो हे साध्वी जननिये । या बोधामृती तृप्त राहे ।
मग विश्व व्यापूनि ब्रह्मचि आहे । हे वाटेल स्वयें तुजलागी ॥१५॥
हे तत्त्व न जाणता देख । (१.३६) वैकुंठी जातांहि न सुटे दुःख ।
यालागी सेवोनि आत्मसुख । सांडी शोक महाभागे ॥१६॥
परि तुज जे उपदेशिले काही । ते न उघडावे प्राण गेलियाही । कोणी
अधिकारी असलिया पाही । मग अर्पी ते ठायी किंचित ॥१७॥
तुझा सगुणयोग असे अपूर्ण । परी निर्गुणयोग असे पूर्ण । यालागी विशेषतः
करावा निर्गुण । सामान्यतः सगुणहि पहावा ॥१८॥
असो बोध जहाला एथवरी । इकडे कुशल आहे सर्वांपरी ।
मी गेलो होतो पंढरी । पहावया श्रीहरी भक्तसखा ॥१९॥
तेथे करूनि चंद्रभागा स्नान । घेतले पुंडलिकाचे दर्शन ।
पुजोनि विठ्ठलरुक्मिणीचरण । स्वग्रामा परतूनि आलो पै ॥२०॥
या पंढरीयात्रेचे सुकृत । ताई म्यां दिधले समस्त ।

यावरी आशीर्वाद अनंत । दिधले पुन्हा ॥२१॥
हे वाचूनिया पत्र । पुढे लवकरी पाठवी उत्तर ।
तुझी प्रेमळ वचने मधुर । वाटती माते ॥२२॥
सद्‌गुरु ज्ञानेश्वराचे पायी । प्रेमभावे तल्लीन होई ।
मग तत्प्रसादे याच देही । जीवन्मुक्त होई मम कन्ये ॥२३॥
॥ तृतीयपत्रकं संपूर्णम् ॥
॥ श्रीसद्‌गुरुज्ञानेश्वरार्पणमस्तु ॥
०००

पत्र ४ थे :निर्गुणाचा उपदेश

(श्रीगुरूचे प्रेम असावे पण शोक नको- गुरूचे स्वरूप- निर्गुणाचा उपदेश- इतरांना अवाक्षरहि सांगण्यास निषेध)

॥श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ॥

गंगाभागीरथी कन्या मनी उर्फ भागीरथीबाई हीस,

अनेक आशीर्वाद विशेष. तुझे विनयपत्र आलेले वाचून परमानंद झाला. परंतु तूं वारंवार खेदयुक्त होतेस हे उत्तम नाही. यद्यपि तुज असे वाटत असेल की, गुरुचरणी सदा प्रेमयुक्त असावे; तथापि तुला शोक करण्यास अवकाश नाही. कारण शोक, मोह, भय, राग, द्वेष, काम, क्रोध, दंभ, विकल्प इत्यादि मनाच्या उर्मी, केवळ देहच मी मानणाऱ्या अहंकाराच्या ठायी राहतात. आणि तूं तर त्या अहंकारास जाणून स्वात्मरूप निस्संग व त्याहून भिन्न आहेस; हा प्रत्यक्ष अनुभव तुला झाला असूनहि, शोकादि अहं-ऊर्मी, तुझे ठिकाणी कशा संचार करितात?

तूं लिहिले की, आपल्या उपदेशाप्रमाणे क्रम सुरू आहे पण मला असे वाटते की -

तुला अनुभव प्राप्त झाला हे खरें; परंतु वैराग्य प्राप्त झाले नाही.

म्हणूनच शोकादि ऊर्मी, तुझे ठायी बळेच संचार करितात.

कदाचित् गुरुप्रेमामुळे शोक करीत असशील; तर तेहि उचित नाही. बरे, तूं गुरु तरी कोणाला मानितेस? देहास, अहंकारास, किंवा आत्म्यास?

(१) देहास गुरु मानून शोक मानीत असशील, तर देह काष्ठवत् जड व पांचभौतिक असून नाशवंत आहे. याविषयी शोक करणे अनुचित होय.

(२) आत्म्यास जर गुरु मानीत असशील, तर तो निस्संग, चैतन्यघन, अव्यय, निर्मल, सर्वव्यापी, अविनाशी व नित्य असा आहे. तो तुझ्या आणि माझ्या

अंतःकरणात एकच आहे. मग भ्रमाने आपला आपण शोक कां करतेस?

(३) अहंकारास जर गुरु मानीत असशील तर तो मिथ्या व सर्वथैव भ्रांतिमूलक आहे. सर्वस्वी बंधनरूप व सुखदुःखहेतु हा अहंकारच आहे, हे तूं जाणत असूनही पुनःपुनः त्याला धरून वासनेच्या जालांत गुंतून, जन्ममरणाच्या भोवऱ्यांत सांपडतेस, तर आता तुझे ज्ञान किती म्हणून वर्णन करावे !

हे साध्वी,
या जगात कोण कोणाचे पुत्र!
कोण कोणाचे आईबाप!
कोण कोणाची भावंडें!
कोण कोणाचे गुरुशिष्य!
कोण कोणाचा पति!
कोण कोणाचे मित्र!

तस्मात् हे सर्व स्वप्नाप्रमाणे इंद्रजाल आहे. मग याविषयी शोक करणे मूर्खत्व नव्हे काय?

तस्मात् हे साध्वी,
ही माझी अक्षरे हृदयात धरून,
शोक सांडून
स्थितप्रज्ञ होऊन
अखंड ब्रह्मानंदात निमग्न रहा.

आणि हे तूं न जाणशील तर प्रत्यक्ष वैकुंठात जाऊन देखील तुझे दुःख नष्ट होणार नाही. म्हणून - लिहिलेल्या अक्षरांचा पूर्ण विचार कर. आपले ठिकाणी संतुष्ट हो. आणि पूर्वी सांगितलेला उपदेशक्रम सोडू नको. तेणेकरून सहजच जीवन्मुक्त होशील.

परंतु एवढे लक्षात ठेव की, जे कुतर्की, श्रद्धाशून्य, मूर्ख, विषयांध, दांभिक, वरवर उत्तम आणि आंत वाईट, द्वेषी अशा पुरुषांना मी केलेल्या उपदेशातील एक चकार शब्द देखील सांगू नको. (य१.३८) आणि होईल तितक्या अवकाशाने सत्समागम करीत जा. कितीही जरी दुस्तर प्रसंग आले तरी आपला मार्ग सोडू नको.

हा ज्ञानेश्वरकृपेने लिहिलेला लेख याचा विचार करून तृप्त हो!
पूर्णता!! पुन्हा प्रसाद!!! ॥ चतुर्थ पत्रकं संपूर्णम् ॥

॥ श्री ज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

०००

पत्र ५ वे : 'मी' चा लय

(सर्वपुण्यप्रदान- पत्र वाचून प्रेमाश्रु- नास्तिकवृत्ति, बुद्धि आणि अहंकाराच्या नाशाचा उपाय- समाधीचा प्रत्यय- अमृतानुभवाचे प्रमाण- आशीर्वाद)

।।श्रीमद्सद्गुरु सर्वत्र यशस्वी ज्ञानेश्वरमाउली समर्थ ।।
ॐ नमो जी ज्ञानदेवा । नित्य घडो तुमची सेवा ।
तुमचा प्रेम प्रसाद ठेवा । जन्मोजन्मी सांपडो ।।१।।
जय ज्ञानदेवा श्रीगुरुमूर्ती । अखंड अविनाश तुझी कीर्ती ।
तव कृपे मम कन्येप्रती । स्वात्मस्फूर्ति पूर्ण हो ।।२।।
अथवा जेवढे मी पुण्य केले । ताई तुज ते सर्व दिधले ।
तेणेयोगे तुज वहिले । भवदुःख सर्वदा न बाधे ।।३।।
तुझा प्रेमळ पत्रलेख । वाचूनि हरपले सर्व दुःख ।
वाटे जणूं ब्रह्मसुख । जवळी आले ।।४।।
तुझी वाक्यवृत्ति मधुरा । ऐकोनि सुटल्या विमलांबुधारा ।
सर्व प्रेमाचा निगूढ थारा । एकसाधारां ।।५।।
तूं लिहिले वाक्य एक । की मजमध्ये उठती वृत्ति नास्तिक ।
तरी त्या मिथ्या जाणोनि सम्यक । त्यागी सकळ ।।६।।
हे वाईट हे उत्तम । ऐसे सकळ बुद्धीचे धर्म ।
बुद्धिवेगळा आत्माराम । तेथे काम निष्काम दोन्ही नाही ।।७।।
मज झाले सुख दुःख । हे अहंकाराचे धर्म देख ।
आत्मा याचा जाणता निष्टंक । तेथे सुखदुःख दोन्ही नाही ।।८।।
आपुले जे कामीपण । ते समूळ सांडावे चित्तातून ।
मग जे उरेल जाणीवपण । तेचि प्रमाण रूप तुझे ।।९।।
तेथे न चले वृत्तीसि फाव । सरली अभ्यासाची हाव ।
शब्द आघवे झाले वाव । मृगजलवत् मिथ्यात्वे ।।१०।। (१.३९)

'मी'चा लय : समाधि

(गद्य) हे जननी, जोपर्यंत मीपणा असतो, तोपर्यंतच निश्चय असतो. अमुक वस्तु आहे म्हणण्यास जसा निश्चय करावा लागतो, तसा अमुक वस्तु नाही असे म्हणण्यासहि निश्चय करावा लागतो. आणि निश्चय तर बुद्धीचा धर्म आहे. पण तूं बुद्धीहून निराळी आहेस. तुला ज्या नास्तिक वृत्ति वाटतात, त्या

थोडासा निश्चयाचा अंश राहतो म्हणूनच! तर तूं आता असे कर की,

आहे किंवा नाही हा निश्चय सोडून केवळ जाणीवरूपच होऊन बैस.
घोटाळ्यात पडशील तो संशयहि सोडून दे;
एकदेशीय निश्चयहि सोडून दे, व
स्वतः तूंच होऊन रहा.

परंतु एक मात्र खबरदारी ठेव की, वाचेने अथवा देहाने मीपणा सुटला तरी, मनात मात्र त्याची ऊर्मी रहात असते. कोणतेहि काम करताना हा मीपणा जर नसेल तर शरीराला देखील चालण्याची शक्ति नाही. हा मीपणा प्रथम मनावर येतो; नंतर वाचेवर येतो म्हणून याला तूं मनातल्या मनातच दाबून टाक.

परंतु 'मी याला दाबते' अशा प्रकारचा एक मीपणा उठवून दुसरा मीपणा दाबून घेऊ नको. तर -

जेव्हा सर्व वृत्तींचा लय होईल तेव्हा तूं आपल्या मीपणाचा लय करून, स्वतःला विसरून जा. याला समाधी म्हणतात.

सर्व आनंदाचे स्थान हेच!
हे प्राप्त झाले म्हणजे अभ्यास संपला.
मग वृत्ति उठेना बापडीं !
धुळीने का कधी आकाश मळत असते !

परंतु याचा विचार मनातच कर. ईश्वरकृपेने ते तुला मिळालेच आहे; व त्याची वृद्धिहि होईल. साऱ्या शास्त्रांचे रहस्य ते हेच ! या विषयी अमृतानुभवाच्या आठव्या अध्यायात ज्ञानेश्वर म्हणतात -

ओवी

''परी आम्हा आम्ही आहो । तें कैसे पाहो जावो ।
तंव काय कीजे ठावो । लाजिजे ऐसा ।।''अमृ.

ही गोष्ट वाचेने कधी सांगता येत नाही; तर ती आपली आपणच जाणली पाहिजे. याविषयी त्याच अध्यायात पुन्हा म्हणतात -

'किंबहुना श्रीनिवृत्ति । ठेविलो असो जया स्थिती ।
ते काय देवो हाती । वाचेचिया ।।'अमृ.

याहून परते वेदान्त शास्त्रात ईश्वराजवळ किंवा गुरूचे हृदयात दुसरे काही नाही. याविषयी भगवान् ज्ञानेश्वर म्हणतात -

'यया परौते कांही । सच्चिद् रहस्य नाही । (१.४०)
आणि हे तया आधीही । असतचि असे ।।अमृ.

जे जे बोलिले ते ते नव्हे । होय ते तंव न बोलवे ।
साउलीपरी न मववे । मविते जैसे ॥'अमृ.

हे देवी, तूं परमगुह्य जाणून श्री सद्‌गुरु ज्ञानेश्वरप्रसादी तद्रूप हो.

आता भय सांडूनि सकळ । तूं ब्रह्मचि होय केवळ ।
या अनुभवाचे उत्तर । तत्काळ लिहूनि पाठवी ॥११॥
तुझी प्रेमाक्षर मधुर वाणी । सुखद वाटे वो मायबहिणी ।
तरी आळस न करोनी । पत्रोत्तर पाठविजे ॥१२॥
श्रीज्ञानेश्वरगुरु समर्थ । तुझे पुरवो मनोरथ ।
आशीर्वादहि अनंत । तुज पावोत मम कन्ये ॥१३॥
॥हरिः ॐ तत्सत् इति पंचमपत्रकं संपूर्णम् ॥
मणिकर्णिका, रामचंद्रभाऊ व नामदेवभाऊ यांचे अनेक आशीर्वाद.
॥ श्रीसद्‌गुरुज्ञानेश्वरार्पणमस्तु ॥

०००

पत्र ६ वे : समाधीतील विघ्ननिवारण

(श्रीगुरु व अवतारादि ब्रह्मसमुद्रातील तरंग- जीवत्व व त्याचा त्याग- त्यातील विघ्ननिवारण- समाधि- तीन कल्पना- जड चेतन विवेक- ईश्वराचे स्वरूप- पुनःपुनः अभ्यास- मुमुक्षूच्या कल्याणाची हमी)

॥ श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

ॐ नमो जी भक्तवत्सला । सच्चिदानंदा पूर्णा निष्कला ।
श्रीज्ञानेश्वर प्रभु सद्‌गुरु दयाला । विश्वपाला सुखार्णवा ॥१॥

सद्‌गुणखाणी कन्या 'मनी तथा भागीरथी' हीस अनेक आशीर्वाद.

अभिनंदनादि विनंति विशेष.

तुझे पत्र मामीचे हस्ते येऊन पोचले. ते वाचून परमानंद जाहला. तूं लिहिले की, मी सर्वदा एकच गोष्ट लिहीन तर श्रीगुरूस दुःख होईल, पण ही तुझी गोष्ट असंबद्ध आहे. कारण तूं कितीहि जरी कडक लिहिले, तरी भरतास रामवचनाप्रमाणे मला तुझी वाक्ये प्रेमळच वाटतात. पण तुझे दुःख जात नाही, एवढेच मात्र मला दुःख वाटते. एरवी, तुझ्या लिहिण्याचे दुःख वाटत नाही. (१.४१)

हे आई, मी जसा इतरावर कृपादृष्टीने ज्ञानामृतवर्षाव करितो, तसा तुजवरहि करीत आहे.

परंतु त्यामध्ये एवढे मात्र विशेष आहे की, तुझा निस्सीम प्रेमा पाहून

धेनुवत्सन्यायें, माझे सार्द्रान्तःकरण, चित्त, मन व बुद्धि ही सर्व तुजकडेसच धांव घेत आहेत. जशी तूं मला माता, पिता व गुरु मानीत आहेस, तद्वत मीहि तुला कन्या, जननी व बहिण मानीत आहे. तुझे चित्तात शुद्ध भाव, निस्सीम प्रेम, ज्ञान, वैराग्य व अकृत्रिम भक्ति या पंचारविंदांचे ठायी, साक्षात् स्वानंदघन, वैकुंठनिवासी, उरूक्रम भगवान, परमात्मा तो देखील आपले कृपास्पद करील. मग आम्हा क्षुद्र प्रेमळांची कथा काय?

तुला मुळीच उपवास करावे लागत नाहीत व तूं उपवासी होत नाहीस. आता तुला ज्या परमेश्वराचा आश्रय पाहिजे, तो परमेश्वर तुजहून भिन्न नाही. विचारून पहा.सूर्य कोठे बोचक्यात सांपडला आहे काय? अग्नि कोठे तृणात लपला आहे काय? याचप्रमाणे परमेश्वर मायेच्या आवरणात केव्हाहि लपत नाही.

ब्रह्मसमुद्रावरील तरंग

समुद्रात जशा हंसाच्या उदकपानार्थ गोड जल-लहरी उठतात, त्याचप्रमाणे-

अखंडैकरस ब्रह्मानंदसमुद्रातून भक्तांच्या प्रेमादानार्थ किंवा जिज्ञासूंच्या ज्ञानदानार्थ रामकृष्णादि अवतार आणि जगदुपदेशक सद्‌गुरु, हे तरंगामृता-प्रमाणे जगात येऊन त्यांची कार्ये झाली म्हणजे पुनः ते आपल्या ब्रह्मसमुद्रात एकदम लीन होतात.

सारांश, हे सारे क्षणिक आहे. ब्रह्मा, विष्णु, महेश्वर किंवा रामकृष्णादि अवतार यासारखेच अनंत जीव, त्या आत्मसमुद्रात कोणीकडे तुषाराप्रमाणे पडले असतील, याचा थांग लावण्यास श्रुतीही समर्थ झाली नाही. असे जरी आहे तरी, आपण त्यातून तृषेपुरते उदक घेतलेच पाहिजे.

हे साध्वी, आपण सर्व एका त्या परमात्म्याचे अंशभूतच आहोत. परंतु दोरीवर जसा सर्पाचा भास होतो, तशा भ्रमरूप मायेने किंवा खरोखर पाणी नसताहि सूर्याचे ठायी वास्तविक उष्णताच- पण दृष्टीला मात्र पाण्यासारखे भासणारे जे भ्रमरूप मृगजल; तशीच ब्रह्मतेजरूप सूर्याचे ठायी भासणारी ही मृगजलवत् माया आहे. तिच्या योगाने आपण मुळींचे ब्रह्म असताहि आपणास जीवत्व प्राप्त झाले. ''ते जीवत्व म्हणजेच देहाभिमान होय'' देहच मी आहे अशी जी बुद्धि; तिच्याच योगाने आपणास चांगली वाईट कर्मे घडतात. (य१.४३) आणि त्या कर्मांच्या योगाने प्रवृत्त झालेली जी वासना, तिच्या योगे जन्ममरण भोगावे लागते. म्हणून तूं 'मी देह आहे' अशा बुद्धीचा त्याग करून, 'मी ब्रह्म आहे' अशी दृढ बुद्धि धारण कर.

परंतु येथें सूक्ष्म विचार केला पाहिजे. नाही तर मी देह नव्हे असा मनात जप करीत करीत, स्वप्नासारखा एक कल्पनेचा देह तयार करून, जर आत्मानुभव घेण्याला जाशील, तर मात्र, अनंत देह फिरूनहि तो तुला मिळणार नाही.

समाधि

ब्रह्मज्ञान अगदी सोपे आहे. ते सर्वत्र व्यापकच आहे, परंतु तूं जशी 'मी देह आहे' अशी बुद्धि सोडून देतेस, तसा तो मीपणाहि विरवून आनंदमय होत्साती स्तब्ध रहा. यासच समाधि म्हणतात. येथे नामाची गरज नाही व रूपाचीहि गरज नाही. वर सांगितलेले ब्रह्मांडरूप ब्रह्म; तेच तुझे खरे स्वरूप आहे. मी स्त्री आहे, मी ब्राह्मण आहे व हे घरदार, सासुसासरे, हे माझे आहेत, असे मानणे, 'देहच मी आहे' या अहंकाराचे आहे. तूं या अहंकाराहून भिन्न आहेस. आत्म्याचे ठायी 'तूं-मी' हे शब्द नाहीत. पण ते तुला बोध होण्यासाठी पत्रात लिहिले आहेत.

तुला ज्या अनंत कल्पना येत असतील, त्या कोणत्या रीतीने येतात? ज्ञानावर विश्वास बसत नाही अशा येतात? किंवा तुझ्या अभ्यासात व्यत्यय आणणाऱ्या संसारासंबंधी येतात? अथवा भलत्याच काहीतरी येतात?

(१) भलत्याच येत असतील तर त्या मिथ्या आहेत, असे म्हणून सोडून दे.

(२) जर संसारसंबंधी अभ्यासात व्यत्यय आणणाऱ्या कल्पना येत असतील, तर मनात वैराग्य धरून, थोडी थोडी सत्ता मिळवून, धैर्याने व्यत्ययरूप कल्पना सोडून दे.

(३) आणि आत्मज्ञानावर विश्वास न ठेवण्याविषयी कल्पना येत असतील, तर जड-चैतन्याच्या विवेकाने, त्यांचा नाश कर. तो विवेक येथे सांगतो-

जड व चेतन : व्याख्या

सृष्टीत दोनच पदार्थ आहेत. ते कोणते म्हणशील तर जड आणि चैतन्य. आता यांच्या व्याख्या सांगतो.

(१) आपणालाही जाणते व दुसऱ्यालाही जाणते त्याला चैतन्य म्हणतात.

(२) स्वतःलाही जाणत नाही व दुसऱ्यालाही जाणत नाही ते जड.

आता विचार करून पहा की, तूं जड आहेस की चैतन्य आहेस?

तुझा देह आपणालाही जाणत नाही व दुसऱ्यालाही जाणत नाही. (य१.४३) म्हणूनच तो जड आहे.

तूं तर देहालाहि जाणतेस व त्या जाणिवेलाही जाणतेस, म्हणून तूं चैतन्य आहेस.

या जडचैतन्याचे विवेकाने स्थिरबुद्धि होऊन जे जे जड असेल त्याचा बुद्धीने त्याग कर आणि 'निश्चय, संशय व मीपणा' यासहित चैतन्यात लीन हो. मग, हे ताई, तूं आणि ईश्वर यात दुजेपणा कसा राहिला हे तूंच सांग.

हे बहिणी, या ज्ञानासच अद्वैत ज्ञान किंवा ब्रह्मज्ञान म्हणतात.

(१) या ज्ञानरूप आत्म्याहून तुझा कृपाळू ईश्वर, तुझ्या मते जर कोणी निराळा असेल, तर आम्ही त्याचे तोंडहि पाहू इच्छीत नाही. कारण त्याला आम्ही स्पष्ट जड म्हणतो. चैतन्याहून निराळे ते सारेच जड. मग त्याला कृपाळु म्हणावे तरी कसे?

(२) बरे, चैतन्यालाच जर ईश्वर मानीत असशील, तर तुझ्या हृदयातील चैतन्य व ईश्वर हे सहजच एक झाले.

सारांश ईश्वर, तूं व मी हे सर्व एकच आहो. देहबुद्धि मात्र सुटली पाहिजे! धुळीने जसे आकाश मळत नाही; तशी अनंत कल्पनांनीहि तुझी हानी होत नाही. देहबुद्धि नष्ट झाली म्हणजे सर्व कल्पना आपोआपच नष्ट होतात. पुष्कळ जन्माची देहबुद्धि एकदम नष्ट कशी होईल? ती ज्ञान झाले तरी, पुनःपुनः उठत असतेच. याला तोच अभ्यास पुनः पुनः केला पाहिजे, दुसरा उपाय नाही. (याविषयी तिसऱ्या अध्यायातील ३३ व्या श्लोकावरील ज्ञानेश्वरी पहावी.)

हे जननी, या ज्ञानाने आता तुला नवा जन्म घ्यावा लागणार नाही. आणि तुला भीतीच असेल तर -

''त्याही जन्मी पुत्ररूपाने येऊन मी तुझा उद्धार करीन,
आणि तुजबरोबर अनेक मुमुक्षूंचेहि कल्याण करीन.
तूं सर्वथा भिऊ नको.''

या ज्ञानाचा विचार जर तुला आताच झाला, तर तुला पुन्हा जन्म खचित प्राप्त होणार नाही.

सर्व हृद्‌गुह्य मी या पत्रात लिहिले आहे. म्हणून तूं याचा नीट विचार कर. एकाएकी हे भलत्याच्या हाती जाऊ देऊ नको. तुझ्या ज्या काही कल्पना सांगण्यासारख्या असतील, त्या लिहून पाठीव. त्यापासून मला दुःख होत नाही. उत्तराविषयी आळस करू नको. तुझी प्रेमळ वचने अति मधुर वाटतात म्हणून त्यांची प्रतीक्षा करीत आहे. तुला जे दुःख आहे, ते मामीच्या मुखाने कळले. त्याचे निवारण होईल. सध्या धीर धर. त्यामुळे जर तुला कल्पना येत असतील तर ज्ञानाने (१.४४) व नामाने, त्यांचे शांतवन करून सध्या स्थिर हो. तुला ज्ञानेश्वरांचा प्रसाद आहे ! ते भगवान् सद्‌गुरुच, तुझे मनोरथ पूर्ण करोत! पत्र

वाचून उत्तर लवकर पाठीव.

सर्वत्र यशस्वी सद्गुरू । जो बाप माउली ज्ञानेश्वरू ।
जो सच्चिदानंद निर्विकारू । तत्कृपे उद्धार तुझा कन्ये ॥
॥हरि ॐ तत्सत् इति षष्ठपत्रकं संपूर्णम् ॥
॥ श्रीज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

०००

पत्र ७ वे

कर्म भक्ति ज्ञान वैराग्य प्रेम व आत्मानुभव

(सर्व कल्पना असत्य मान- नरकातूनहि उद्धरीन- कर्म, भक्ति, ज्ञान, वैराग्य, प्रेम, आत्मानुभव- ज्ञानदृष्टीने स्वर्गनरक नाहीत- आशीर्वचन)

*

॥ श्रीमत्सद्गुरु सर्वत्र यशस्वी ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

आर्या

यदुकुळिं जन्मुनि ज्याने गोपींचा भाव गोकुळीं हरिला ॥
दिधलें निजपद संतां नमितो त्या विश्वव्यापका हरिला ॥

ओवी

कन्या मनी भागीरथी । तुज प्रसन्न असो श्रीपती ।
सकळहि तुझ्या अनुभवाप्रती । अर्पी भगवंतीं महाभागे ॥१॥
ज्या ज्या कल्पना उठती मनी । त्या त्या त्यागी असत्य मानुनी ।
दुसरे पत्री निर्वाणी । उपपत्ति सोपी सांगेन ॥२॥
तूं लिहिलेस पत्र । की अहिल्याबाईने मारिला पुत्र ।
तैसेचि मज करावे परत्र । तरि हे असंबद्ध की ॥३॥
तूं जरी गेलीस नरकात । तरी मी होऊनि तव सुत ।
उद्धार करीन निश्चित । मग भय व्यर्थ कां जननी ?॥४॥
तुज जरी प्राप्त झाला नरक । तरी मी सोडोनि मोक्ष सुख ।
अवतरेन तेथे निःशंक । भय सर्वथा धरू नको ॥५॥
ब्रह्म स्वयं सर्वव्यापक । तेथे नाही स्वर्गनरक ।
व्यर्थ मानूनि काल्पनिक । करिशी शोक कासया ॥६॥
आहे तुझा प्रवेश निर्गुणी । नरकभय मानिसी मनी ।
कल्पवृक्षाखाली बैसोनि । दारिद्र्य कल्पिसी किमर्थ ॥७॥

कर्मे करावी चित्तशुद्धि । (१.४५) भक्तीने करावी स्थिर बुद्धि ।
ज्ञाने साधावी मोक्षसिद्धि । याच देही स्वतंत्र ॥८॥
अंगीं असावे वैराग्यबळ । चित्ती प्रेमा असावा सोज्वळ ।
आत्मानुभव परम निर्मळ । असावा केवळ स्वानंदे ॥९॥
स्वर्ग नरक हे वासनाबद्ध । त्या नाही ज्ञानासी संबंध ।
हे जाणूनि तूं प्रसिद्ध । सांडी भेदकल्पना ॥१०॥
तुझे वाचूनिया पत्र । परमानंद झाला थोर ।
पुढे पाठवी उत्तर । प्रेमळ मधुर जननिये ॥११॥
जो सत्य ज्ञान अनंत । परब्रह्ममूर्ति भगवंत ।
श्री ज्ञानेश्वर कृपावंत । पुरवील मनोरथ तुझे तो ॥१२॥
(टीप :- यात काही गुप्त लिहिले आहे; म्हणून भलत्यांचे हाती न द्यावे)
॥ हरिः ॐ तत्सत् इति सप्तमपत्रकं संपूर्णम् ॥ श्रीज्ञानेश्वरार्पणमस्तु ॥

०००

पत्र ८ वे

॥ अथ प्रथमो भागः ॥

मलदोष निवारण

(श्रीगुरुनमन- बुद्धीचे तीन दोष- दुष्ट विषयांचे आचरण पुढील जन्मास कारण- कर्माचा नियम अबाधित- सत्कर्माने मलदोष निवृत्ति- गुणभेदाने मनुष्याचे सहा प्रकार- प्रयत्नपूर्वक उन्नति करावी- प्रारब्धावर विसंबून राहू नये.)

*

॥ श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

ओवी

ॐ नमो जी कृपावंता । श्रीज्ञानेश्वर सद्गुरुनाथा ।
अभय हस्त माझिया माथां । ठेवूनि वाक्यार्था चालवावे ॥१॥

श्लोक

ज्याला ब्रह्म असेचि बोलति सदा वेदांत वेत्ते मुनी ।
ज्या सांख्य प्रकृती पुमान्हि म्हणती, कर्माख्य ते जैमिनी ॥
नैयायीक जयास ईश वदती विश्वत्रया कारण ।
अस्मद्विघ्नविनाशकारक प्रभू तत्पादुकी वंदन ॥

ओवी

कन्या मनी भागीरथी । तुज मिळो कैवल्यसंपत्ती ।

अखंड ब्रह्मानंद स्थिती । निजात्मगती निश्चये ॥२॥
आता भय सांडूनि सर्व । अंतरी धरी शुद्ध भाव ।
मग ब्रह्मैक्यानुभव । सहजचि लाहे ॥३॥ (१.४६)

(गद्य) हे जननी, जीवाची सुटका होण्याकरिता पुत्रवात्सल्यानी श्रुतिमातेने कर्म, उपासना व ज्ञान असा त्रिविध मार्ग निर्देश केला आहे. बुद्धीचे ठायी तीन दोष असतात. ते मल, विक्षेप आणि आवरण या नावाने प्रसिद्ध आहेत.

(१) मल हे पापाचे नांव आहे. जन्मांतरी केलेल्या दुष्कृतीमुळे, सदोष संस्कारदूषित बुद्धीची, दुष्ट विषयाचे ठायी प्रवृत्ति होते, आणि त्याप्रमाणे पुनः दुष्ट विषयाचे आचरण केल्यावर, तेच संस्कार दृढ होऊन, उत्तरजन्मास कारण होतात.

हे जननी, अशा अनंत जन्माच्या दुर्निवार्य संस्कारग्रंथी, अंतःकरणांत कशा रुजून बसल्या आहेत आणि त्यांचा अविरत प्रवाह जन्ममरणरूप बंधनास कारणीभूत कसा झाला आहे, तो पहा. आई, कर्माचा नियम अबाधित आहे. याची उदाहरणे पुराणात आहेतच त्यातील एक उदाहरण सांगतो.

बळिराजा

इंद्रपद घेण्याकरिता बळिराजाने शंभर यज्ञ करून, भगवान् वामनरूप परमात्मा जवळ आले असताहि, त्याला ज्ञान झाले नाही. इतकेच नव्हे, तर प्रत्यक्ष देवाने त्याच्या मस्तकावर पाय ठेवून, पाताळीचे राज्य दिल्यावर देव द्वारपाळ झाले. परंतु हा परमात्मा आहे, असे बळीने स्वप्नात देखील जाणले नाही. हे कशाचे फळ? तर कुकर्माचे !

ताई, तूं आपल्याकडेच पहा. तुझा जन्म उत्तम जातीत, ब्राह्मण कुळात, सद्‌गुण खाणीत झाला असून तुला पति आणि चांगले ठिकाण मिळावे हे पुण्याचे फळ! पण त्यातल्या त्यातच पहा. एवढ्या वयात आणि तारुण्य दशेत, हा बालवैधव्याचा प्रसंगरूप प्रचंड पर्वत तुजवर काय म्हणून कोसळला? याला कारण जन्मांतरीचे दुष्कर्मच ना? होय, दुसरे काय म्हणावे !

जननी, एवढ्याहि प्रसंगी, सुदैव वशात् तुला आत्मप्राप्ति झाली आहे, हे कशाचे फळ? पाप आणि पुण्याची समान सांखळी आहे. कर्माचा नेम तर अगदी कांटेतोल चालला आहे. त्यात राईएवढासुद्धा बदल पडत नाही. तेच कर्म असत् असले म्हणजे मलरूप होते.

मलदोषनिवृत्तीसाठी कर्ममार्ग

जननी, तुझ्या अनुग्रहाला थोडे दिवस झाले असूनहि तूं आत्मप्राप्तीसाठी

अगदी विरक्त झाली आहेस. आणि तुझे बंधु वर्षानुवर्ष जवळ असताहि आळसाने फुकट काळ (य१.४७) घालवीत आहेत. याला कारण अंतःकरणातील मळच होय. या मलदोषनिवृत्तीसाठी, श्रुतिमातेने कर्ममार्ग निर्देश केला आहे. सत्कर्मे करून मलदोष निवृत्त करावा.

ती कर्मे द्विविध आहेत. सकाम व निष्काम.

सकाम कर्मांनी मनुष्य बद्धच होतो, परंतु कर्म न करण्यापेक्षा ते बरे.

जी सकाम कर्मे तीच निष्काम होतात पण ईश्वरार्पण बुद्धीने केली पाहिजेत.

सकाम कर्म करणारे नित्य कर्माच्या घोर जालातच गुंतून राहतात. आणि निष्काम कर्म करणारे मात्र, भगवत्प्रेमाने मोकळे होतात.

प्रत्येक जीव कर्म प्रवाहात फिरत आहे. हे त्याच्या मनो वृत्तीवरून ओळखता येते.

मनुष्यांच्या ७ पायऱ्या

(१) पशुतुल्य जीवन

ज्या मनुष्याला व्यवहारात पशुतुल्य वागावेसे वाटते; केवळ आहार, निद्रा, भय, मैथुन याशिवाय दुसरे कळत नाही, ते मनुष्य पूर्वजन्मीचें पशु किंवा तामसच होत. त्यांचे जन्मास येणे आणि न येणे सारखेच असते.

(२) कपटरूप जीवन

त्याहून ज्ञातर कक्षेचे लोक, रजतममिश्र होत. त्यांचा व्यवहार केवळ कपटरूप असतो. ईश्वरावर पुरेसा विश्वास नसतो.

अशांपासून, कोणाला केव्हाहि सुखप्राप्ति होत नाही. आणि किंचित् संगतीने सुख झालेच, तर त्याचा परिणाम अंती दुःखदच होतो.

(३) रजोगुणी जीवन

याहून ज्ञा कोटीचे लोक शुद्ध रजोगुणी असतात. त्यांच्या अंगात स्वार्थ भिनून जातो.

त्यांचा ईश्वरावर विश्वास असतो, पण आज हा देव, तर उद्या तो देव, अशी त्यांची कामनेसाठी धांदल उडून जाते. त्यांना थोडेसे दुःख झाले, तर ते दहा पंधरा देवांचे नवस, एकदम करून सोडतात.

त्यांच्यापासून कोणास दुःख व कोणाला सुख होत असते.

(४) देशभक्त

याहून श्रेष्ठ लोक सत्त्वतममिश्र होत. यांचा ईश्वरावर पूर्ण भरंवसा असतो आणि व्यवहारातहि हे चतुर असतात. देशाभिमान, स्वराज्यप्रीति व थोडासा कपटभाव हे सर्वत्र त्यांचे हातून होतात.

त्यांच्या हातून जितक्यास सुख होते. तितक्यासच दुःखहि होते.

(५) साऱ्या विश्वाचे भांडार

त्याहून उच्च लोक, सत्त्वरजमिश्र होत त्यांना व्यवहारात चोख वागावेसे वाटते. असत्याचा थारा देखील त्यांना आवडत नाही, इतकेच नव्हे, तर ते असत्यास तिरस्कार बुद्धीने पाहतात.

त्यांच्यापासून बहुशः सर्वांस सुखच मिळण्याचा संभव असतो. त्यांना विद्येची अभिरुचि असते. बहुशः मान आवडत नाही. आत्मस्तुति आणि परनिंदा यांचा त्यांना (य१-४८) मनापासून तिटकारा असतो.

पण दुसरी मजा ही की, त्यांचे मन आत्मप्राप्तीसाठी झुरत असते, पण संसार सोडवत नाही.

केव्हां केव्हां वैराग्य उत्पन्न होते, पण अंतरी संसाराच्या चिंतेमुळे, त्यांची वैराग्यदशा टिकत नाही.

त्यांना वैराग्य मोठे तीव्र होते, आणि ते संसारात लवकरच पडतात.

कोणी आत्मबोध शिकवू लागल्यास, त्यांची बुद्धी तिकडे लागते, परंतु मन मात्र निद्रेत, आळसात किंवा भलतीकडे भ्रमत असते.

हे पुरुष परमार्थदृष्ट्या जरी गौण असले, तरी व्यवहार दृष्टीनें ते उत्तम आणि साऱ्या विश्वाचे भांडार होत.

ताई, तुझे वडील बंधु रामचंद्र याच कक्षेचे आहेत.

(६)

याहून वरिष्ठ पुरुष शुद्ध सात्त्विक होत. त्यांची लक्षणे पुढे केव्हांहि सांगेन.

हे जननि, प्रत्येक पुरुषाने आपल्याकडे पाहून, ज्या गुणांचे आणि कर्मांचे आपण असूं त्याहून अधिक गुणांची व शुद्धकर्माची आपल्यात भर घालीत गेले पाहिजे.

(७) पशुहून नीच

कोणी म्हणतील की भर कशाला? आपल्या प्रारब्धात असेल तसे होईल. तर हे मनुष्य पशुहून नीच म्हणून समजावे. मनुष्य जन्मात येऊनहि आपली उन्नति करून न घेता जे केवळ प्रारब्धावरच हवाला देतात, ते जगात येऊन आईला शीण व भूमीला भार दिल्याशिवाय दुसरे काही साधीत नाहीत.

ताई, प्रयत्नावाचून प्रारब्ध पंगु आहे. म्हणून प्रत्येकाने आपल्या स्थितीकडे पाहून, असेल तेवढ्या आयुष्यात उन्नति करण्याचा यत्न करावा.

या विवेचनावरून कोण मनुष्य कसा आहे, हे तुला लवकर कळून येईल. तुझा अधिकार या सर्वांहून उंच आहे, म्हणून तूं या कर्ममार्गाची अधिकारी नाहीस. हे ताई, तूं भय सोडून दे. आम्ही लहान बालके तुझ्या पोटी आहो तर तुला भय कशाचे ?

॥हरिः ॐ तत्सत् इति अष्टमपत्रे प्रथमभागः संपूर्णः॥

०००

॥अथ द्वितीयभागप्रारंभः॥

विक्षेपदोष निवारणार्थ उपासना

(उपासनेचा अधिकारी- विक्षेपाचे स्पष्टीकरण- त्याची उपासनेने निवृत्ति-
ईश्वर उपासनेचे १३ प्रकार- गुरूपासनेचे १२ प्रकार-
आपला अधिकार आपणच ठरवावा.)

पूर्व भागात सांगितलेल्या निष्काम कर्मांनी, ज्याचे चित्त शुद्ध झाले आहे, त्याला भगवान् स्वानुग्रहाने भक्तिपंथास लावतो. तोच पुरुष उपासनेचा अधिकारी होय.

कर्मांनी ''मलदोष'' नष्ट झाल्यावर, (य१-४९) राहिलेला विक्षेपदोष उपासनेने निवृत्त होतो.

विक्षेप नाम चंचलतेचे आहे, म्हणजे ''एकाच ध्यानावर मन स्थिर न बसणे. - काय करावे? माझे कल्याण कसे होईल? मी यज्ञ करूं की दान करूं? तप करू की तीर्थे करूं? याग करूं की योग करूं? किंवा स्वस्थच राहूं?'' अशाप्रकारचे जे अनंत विचार त्यासच विक्षेप म्हणतात. हा विक्षेप भगवद्भक्तीने नष्ट होतो.

ही भक्ति कोणत्याहि जाति/कुलाची अपेक्षा करीत नाही. भक्तिकाली

सर्व कर्मे सुटतात. मग कर्मकालातील जाति/कुल कसे राहील? ही भगवद्भक्ती अनेक प्रकारची आहे. शिव, विष्णु, आदिमायाभगवती, गणेश व सूर्य या पंचायतन देवता किंवा षड्गुणैश्वर्यसंपन्न परब्रह्मरूप उरुक्रम भगवल्लीलाविग्रही सत्परिपालक रामकृष्णादि अवतार, यातून कोणाचीहि भक्ति केल्यास फलद्रूप होते. भक्तीचे अनेक प्रकार आहेत. त्यातील चौदा प्रकार सांगतो.

भक्तीचे १४ प्रकार

१. श्रवण = भगवद्गुणानुवाद ऐकणे;

२. कीर्तन = भगवद्गुणानुवाद गाणे;

३. स्मरण = रामकृष्ण, गोविंद, हरि, शिव, दुर्गा, गजानन, भास्कर, वासुदेव, यातून ज्या देवतेची प्रीति असेल, तिच्या नामाचा आसनी, शयनी, भोजनी, अविरल जप करणे;

४. पादसेवन = संत हे भगवान् आहेत असे समजून त्यांची, तशीच श्रीगुरूची किंवा आपल्या आवडत्या मूर्तीची, प्रक्षालनादि उपचारांनी पादपूजा करणे;

५. अर्चन = षोडशोपचारांनी सर्वांगपूजा करणे;

६. वंदन = नमणे;

७. दास्य = मी देवाचा सेवक आहे, अशी भावना धरणे;

८. सख्य = देव माझा मित्र आहे असा भाव धरणे;

९. आत्मनिवेदन = सर्व तुझेच आहे व मीहि तुझाच आहे, म्हणून आता भीति नाही, असा भाव धरणे;

१०. मातृभक्ति = देवाला आई मानणे;

११. पितृभक्ति = देवाला पिता मानणे;

१२. वात्सल्यभक्ति = देवाला पुत्र मानणे;

१३. माधुर्यभक्ति = गोकुळीच्या गोपिकांसारखी पतिपत्नीभक्ति; याप्रमाणे, तेरा प्रकार ईश्वरसगुण भक्तीचे;

१४ गुरुभक्ति = आणि चौदावा श्रीगुरुभक्तीचा.

ही श्रीगुरुभक्ति मागे सांगितलेल्या प्रकारांपैकी पहिल्या बारा प्रकारांनी किंवा ज्ञानेश्वरीच्या तेराव्या अध्यायात ३६९ ते ४६० ओव्यामध्ये सांगितलेल्या गुरुसेवेने ही श्रीगुरुभक्ति घडते.

ईश्वरभक्ति करणे असल्यास, त्याचे चतुर्भुज किंवा दशभुज, शिव-राम-कृष्णादि अवतारांचे किंवा कोणत्याहि आवडत्या देवतेचे, (य१-५०) 'सांगितलेले

असेल तसे,' मनाने ध्यान करावे.

सद्गुरुभक्ति करणे असल्यास, गुरु जवळ असेल, तर प्रत्यक्ष शुद्धभावानें अवलोकन करून, प्रेमपुरस्सर पूजा करावी आणि श्रीगुरु दूर असेल, तर जसे त्यांचे स्वरूप असेल तसे ध्यान करून मानस पूजा करावी. तिचे प्रकार मागे सांगितलेच आहेत.

हे साध्वी, या विवेचनावरून ''आपण कोण्या भक्तीचे अधिकारी आहो, आपणास कोणता प्रकार पाहिजे, असे प्रत्येक मनुष्याने आपले आपणच जाणून'' भक्तीची उन्नति करू लागले म्हणजे चित्तातील विक्षेप दोष जाऊन स्थितप्रज्ञ झाल्यावर शीघ्र कल्याण होते.

हे ताई, कोण, कसा, कोणत्या मार्गाचा अधिकारी आहे, हे तूं आपल्यासुद्धां पहात जा व त्याप्रमाणे पुढे चाल करीत जा व करवीत जा.

॥हरिःॐतत्सत् इति अष्टमपत्रे द्वितीयभागः संपूर्णः ॥

०००

अथ तृतीय भाग प्रारंभः

आवरण दोष निवारण

(ईश्वरानुग्रहानेच गुरुप्राप्ति- देवापेक्षा गुरु श्रेष्ठ- निर्गुण उपासना- आवरण ज्ञानानेच नष्ट होते- सर्व कल्पना गुर्वार्पण कराव्या- तुझ्या उदरी जन्म घेईन- चमत्कारनिषेध- महावाक्यार्थ)

०

ईश्वरानुग्रहानेच सद्गुरुप्राप्ति

ॐ अथातो ब्रह्मजिज्ञासा ॥

(वेदांतशास्त्र :- अध्याय १ पाद १ अधिकरण सूत्र १)

पूर्वभागी सांगितलेल्या साधनानंतर, भगवदनुग्रहाने पुरुषाला ब्रह्मजिज्ञासा उत्पन्न होते. दत्तात्रय अवधूतगीतेत असेच म्हणतात. मनुष्याला अद्वैतवासना, ईश्वरानुग्रहानेच उत्पन्न होते.

योगवासिष्ठात भगवान् वसिष्ठ म्हणतात-

''रामा, जोपर्यंत साक्षात् परमेश्वरानुग्रह झाला नाही,
तोपर्यंत सदगुरु किंवा सच्छास्त्र यातून कशाचीच प्राप्ति होत नाही.''

यावरून ईश्वरानुग्रहानेच सद्गुरुप्राप्ति होते. हे सद्गुरु देवापेक्षाहि श्रेष्ठ होत. कारण देवाला जसे भजावे तसे फळ तो देतो आणि सद्गुरु प्रसन्न झाले

की सत्यज्ञानानंतानंदाची पेटीच उघडून देतात. अशा कालात उपासनेची गरज नसते. सर्व काय ते सद्‌गुरुच होऊन राहतात.

निर्गुण उपासना

सद्‌गुरुमुखानें 'सर्व ब्रह्म आहे' असे वाक्य श्रवण करून, मनात ब्रह्मभावना धरून, त्यांनी दिलेला ॐ कारसंयुक्त मंत्र सोहंमध्ये मिळवून, त्याचा अविरल जप करणे, त्यास निर्गुण उपासना म्हणतात.

मामीचा अधिकार इतका झालेला आहे. तिला उपदेशच करावयाचे बाकी राहिले आहे.

ताई, ही निर्गुण उपासना, परिवक्व झाली म्हणजे, परोक्ष ज्ञान होते. व तेव्हांच (य१-५१) बुद्धीचे आवरण नष्ट होते. मूळचा ब्रह्म असताहि, भ्रांतीने मी देह आहे या अज्ञानवासनेने कर्मे करून, जीव हा जन्ममरणावतरी होतो, यासच आवरण म्हणतात.

साऱ्या बंधनाचे मूळ हेच. हे ज्ञानाने नष्ट होते. मग थोडेसे कर्म राहिले तर, ते देहापुरतेच असते, पुढे जन्म देत नाही.

(प्रक्रिया) :- ''आपल्या मनात ज्या कल्पना येतात, त्या श्रीगुरुनाथार्पण कराव्या आणि आपल्या ज्ञानात निमग्न असावे. 'मी देह आहे' अशी बुद्धि सुटून 'मी ब्रह्म आहे' अशी बुद्धि दृढ होईपर्यंत अभ्यासच करावा.''

वत्से, तूं माझे तान्हे बाळ आहेस. म्हणून मी वेदाचे सार, कर्म, भक्ति व ज्ञान हे तीन्ही मार्ग तुझ्या हाती दिले. आता भीती सोड. भीतिविषयी मागे लिहिलेच आहे. मला पुनर्जन्माची भीति नाही. त्यात तुझ्यासारख्या निर्मल रत्नाच्या उदरी जर माझा जन्म असला, तर मी खराच भाग्यवान् !

हे माते, तूं विचार करून पत्र पाठीव. तुझी प्रेमामृतवचने संजीवक वाटतात. जननि, मजकडून काय अपराध झाला म्हणून त्वां उत्तर पाठविले नाही. आता तरी कृपा करून पत्र पाठीव .

चमत्कार : मान मिळविण्यासाठीच

चमत्काराच्या भरीस पडू नको. मान मिळविण्यासाठीच चमत्कार आहेत. सर्वच जर ब्रह्म आहे तर अपमान कोणाला? व कशाचा? मग चमत्कार कशाला पाहिजे? कोणी चांगले म्हणतील, कोणी वाईट म्हणतील, तर म्हणोत बापडे ! त्याचा हर्षही मानू नये व खेदहि मानू नये. आपले चित्त शुद्ध असले म्हणजे झाले.

वत्से, मामीचा अधिकार पाहून त्यांच्या उन्नतीचा यत्न कर ! हे माते,

या पत्राचा विचार करून ब्रह्मानंदी हो ! श्रीज्ञानेश्वर तुला तद्रूप करोत !

ओवी

सद्‌गुरु ज्ञानेश्वरकृपाप्रसादे । आर्ष पत्र लिहिले नुसधे ।
ते वाचूनि प्रेमानंदे । पत्रोत्तर पाठवी ॥१॥
सर्वत्र यशस्वी सद्‌गुरु । समर्थ माउली ज्ञानेश्वरू ।
तो तुज प्रसन्न सर्वेश्वरू । असो साचारू सर्वदा ॥२॥
तूंचि कन्या तूंचि माता । तूंचि बहिण तत्त्वतां ।
म्हणूनि महावाक्यार्था । लिहूनिया पाठविले ॥३॥
श्रवण केलेचि करावे । ध्यान धरिलेचि धरावे ।
येणे अभ्यासे स्वभावे । विकल्प जळती ॥४॥
ऐशी तूं जालिया स्वये । मग देहशत्रू करितील काय ।
या लागी आठवी (य१-५२) पाय । ज्ञानेश्वर माउलीचे ॥५॥
हरिः ॐ तत्सत् इति श्रीज्ञानेश्वरकृपाप्रसादे, वेदांतसारे
कर्मोपासनाज्ञानकांडपूर्वकमष्टमपत्रकं संपूर्णम् ॥
॥श्रीसद्‌गुरुज्ञानेश्वरार्पणमस्तु ॥

पत्र ९ वे : ब्रह्म-प्रयत्न

(कर्माने अनुभवाचा रोध होत नाही- प्रारब्धवाद टाकून ब्रह्मप्रयत्न करावा- लयविघ्न- महावाक्यसंवृति- खरा साधु- गोरक्षनाथांचे पद)

॥ श्रीज्ञानेश्वरमाउलीसमर्थ ॥

माता कन्या आणि बहिणी । व्यक्ति एकवटले तिन्ही ।
ऐशिया भागीरथी मनी । आशीर्वादत्वे वंदन ॥१॥
तूं लिहिलेस पत्र । परमप्रेमबद्ध पवित्र ।
आणि ऐसेही दिधले उत्तर । की दुःख वाटूं न द्यावे ॥२॥
तरी तुझ्या वचने माय । माते कधी दुःख न होय ।
म्हणूनि ऐसा लिहित जाय । अनुभव आपुला ॥३॥
तूं बोललीस एक । की कर्म भोगू नेदी सुख ।
हे वचन अरोचक । मूर्खत्वसूचक असे की ॥४॥
वस्तू चिद्‌घन अविकृत । कर्म अतिजड प्राकृत ।
अनुभवरोध करावया समर्थ । कर्म बापुडे नव्हे की ॥५॥
म्हणूनि प्रारब्धवाद सांडावा ।
अंतरी ब्रह्मप्रयत्न मांडावा ।

देहाहंकारभाव दंडावा ।
खंडावा क्रोधू ॥६॥
मनाविरुद्ध जे उठती शब्द । ते लय विघ्न जाण प्रसिद्ध ।
तयाचा नाश करावया प्रबुद्ध । विवेकचि कीजे ॥७॥
श्रीरंगनाथ प्रसाद शक्ति । जिचे नाम महावाक्यसंवृति ।
ते मी सांगेन तुजप्रती । विघ्ने नाशती सर्व तेणे ॥८॥
तो ग्रंथ बहुत थोर । संख्या साडेपांच सहस्त्र ।
म्हणोनि मागे ठेविला साचार । सांगावयाचा ॥९॥
ताई, तूं कर्माची न धरावी भीती । मी सुत असता तुजप्रती ।
पायांतळी चारी मुक्त । लोळतील तुझिया ॥१०॥

हे जननि, तूं मला तिसऱ्या अध्यायाचे उदाहरण दिले, तो (य१-५३) अध्याय कर्माचे अधिकाऱ्यासाठी आहे, तुझ्या करिता नाही. तूं आपल्यासाठी ''सर्वधर्मान् परित्यज्य'' हा अठराव्या अध्यायातील ६६ वा श्लोक पहावा.

ताई, धनाची आशा व खेचरी मुद्रेचे बंड अशाने साधुपणा येत नाही. याची परिक्षा रा. रा. हरि गणपत केवले, रा. रा. जगजीवनराव शिरपूरकर, रामराव मनोहर मुनशी, वाशिमकर यांनी व मी मिळून केली. परंतु कावळ्याच्या दृष्टीने क्षतेच दिसतात, त्याप्रमाणे माझ्या गाढवबुद्धीस भासले तसे लिहिले. पुढे कांही म्हण, याविषयी गोरक्षनाथांचे पद आहे.

गुरुका ब्रा

वो नर क्रा बे ब्रा बे । नही गुरुका ब्रा ॥धृ०॥
गुप्त होकर प्रकट न जावे, गोकुल मथुरा काशी ॥
प्राण निकारे शीघ्र चढावे, सत्यलोकका बासी ॥१॥
दुनिया त्यजकर खाक लगावे, जाकर बैठा बनमो ॥
खेचरिमुद्रा वज्रासनपर, ध्यान धरत है मनमो ॥२॥
कुंडलिनीकूं खूब चढावे, ब्रह्मरंध्र में जावे ॥
चलता है पानीके उप्पर, जो बोले सो होवे ॥३॥
पुराण में तो कछु ना पाया, झूटा ग्यान कमाया ॥
बेद बिधीके मारग चलता, तनका लकडा किया ॥४॥
हुकुम गुरु गोरक्ष कहते, करनी करके रहना ॥
सद्गुरुकीं कृपा भई तो, आप आपकू चीन्हा ॥५॥
वो नर स्रा बे स्रा बे, वही गुरूका ब्रा ।

या पदावरून जो आपले स्वरूप जाणेल तोच सत्य गुरुपुत्र, इतर साधन करणारे नव्हेत. हे ताई, पत्र वाचून उत्तर लवकर पाठीव.(य१-५४)

॥ हरिः ॐ तत्सत् इति नवमपत्रं संपूर्णम् ॥
॥ श्रीज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

०००

पत्र १० वे

ब्रह्मरूप होण्याचा सोपान

(ब्रह्मनिष्ठ होण्याचा उपदेश- १ विवेक- २ वैराग्य- ३ शमादिषट्क- ४ मुमुक्षा- श्रीगुरूंना शरण जाणे- महावाक्यबोध- व्यतिरेक व अन्वयाचा अनुभव- सर्व वृत्ती ब्रह्मरूप- भक्ति, योग, ज्ञानादिकांचे विश्रांति स्थान- वृत्तिसाक्ष होऊन ब्रह्मस्थ हो- जन्मोजन्मी तुझा सुत होईन- जीवन्मुक्तांचे जन्म लीलामात्र- पत्रप्रतीक्षा)

॥श्रीमत्सद्गुरु सर्वत्र यशस्वी ज्ञानेश्वर माउली समर्थ॥

अभंग १- आशीर्वाद

वंदुनिया भावे गुरु रंगनाथ । वेदांत लिखित आरंभिले ॥१॥
कन्या मातृ दोन्ही मानुनिया भाव । वंदन सावेव आशीर्वादे ॥२॥
साधन ते चारी करूनिया अंगी । मग हो प्रसंगी ब्रह्मनिष्ठा ॥३॥
ज्ञानेश्वरप्रभु कृपे तुजप्रति । अद्वैत प्रतींती सुखे येवो ॥४॥

२- साधनचतुष्टय निरूपण - *विवेक

कोणते साधन कैसा विनियोग । तोचि सांगोपांग ऐक आता ॥१॥
वेद, शास्त्रे आणि पुराणे सकळ । बोलती प्रबळ हेचि आधी ॥२॥
विवेक, विराग, शमादी षडंग । मोक्ष इच्छा चांग चवथे ते ॥३॥
उपक्रम ऐसा चारी साधनांचा । ज्ञानेश्वरे साचा सांगितला ॥४॥
यथाक्रमे ऐक तयांची लक्षणे । श्रुत्यादि पुराणे साक्ष देती ॥५॥
ऋग्वेदादि चारी उपनिषदा थोरी । होय अधिकारी साधक तो ॥६॥
जग मिथ्या सारे ब्रह्म सत्य एक । बोलती विवेक मुनी याते ॥७॥
आधी हा विवेक सुदृढचि व्हावा । ज्ञानेश्वर सेवा करूनिया ॥८॥

३- *वैराग्य

सुत, धन, दारा, मित्र, गोत, देह । भूलोकाचे गेह नाशिवंत ॥१॥
इंद्र, चंद्र, सूर्य, ब्रह्मा, विष्णु, शिव । नाशिवंत ठाव सकळहि ॥२॥
केलिया कर्माचे देती सिद्ध फळ । संपता तात्काळ खाले पडे ॥३॥

ऐसे जाणुनी जो करू इच्छी त्याग । नावडती भोग, किंचित् ही ॥४॥
पृथ्वी, स्वर्ग, सत्य, वैकुंठ, कैलास । याचा होतो नाश प्रलयांती ॥५॥
जितुके गाठी पुण्य तितुके देती फळ । म्हणुनि सकळ त्यागयुक्त ॥६॥
ऐसे हे साधन झालिया संपूर्ण । वैराग्य निर्वाण मुनीमुखे ॥७॥
ज्ञानेश्वरप्रभु माते ययालागी । बोलिला सुरंगी ब्रह्मवेत्ता ॥८॥(य१-५५)

४ - *शमादि षट्क व मुमुक्षा

तिसरे साधन सहा प्रकाराचे । लक्षणांनी त्यांचे रूप करू ॥१॥
शम, दम आणि ऐक उपरम । तितिक्षा, संभ्रम, श्रद्धा, तोष ॥२॥
ऐसी त्रयरूपे साधनाची अंगे । मुमुक्षुत्व लागे चतुर्थक ॥३॥
जन्म मृत्यु जरा यातूनि उद्धार । ऐसी इच्छा फार जीवी लाहे ॥४॥
तेचि पै मुमुक्षा बोलताती मुनी । ज्ञानेश्वरवाणी ऐसीच की ॥४॥

५- श्रीगुरु-शरण्यता

ऐसीं हीं साधनें झालियाहि चारी । होय अधिकारी मोक्षाचा तो ॥१॥
ऐसियाने गुरु पहावा श्रोत्रिय । ब्रह्मवेत्ता स्वये महाराज ॥२॥
तयाते पुसावे जोडूनिया कर । स्वामी हा संसार पार करा ॥३॥
सेवा आणि स्तुति करूनिया तपा । साधावी पै कृपा त्यांची आधी ॥४॥
ज्ञानेश्वर प्रभु सुखाचा सागर । सद्गुरु दातार तोचि आम्हा ॥५॥

६- महावाक्यबोध

असो आतां माते सोडूनिया भय । धरी दृढ पाय श्रीहरीचे ॥१॥
महावाक्य-बोध मानुनिया शुद्ध । इतर अशुद्ध कर्मे त्यागी ॥२॥
भागीरथी नामे देह दृढबुद्धी । सांडोनि त्रिशुद्धि पंचकोशा ॥३॥
'तत्त्वमसि' ऐसा उपदेशठेवा । पावूनि स्वजीवा ब्रह्म करी ॥४॥
त्वंपद तो जीव, तत्पद ईश्वर । दोघांचा विचार एकपणे ॥५॥
ज्ञानेश्वरप्रभुकृपे मार्ग सोपा । करूनि आरोपा वारी कन्ये ॥६॥

७- व्यतिरेक आणि अन्वयाचा अनुभव

रज्जुचिया ठायी सर्परूप दृष्टी । तैसी जाण सृष्टि भ्रांतिमय ॥१॥
शिंपेवरी रुपे उगाची आभास । मृगजली पाश तैशापरी ॥२॥
वास्तविक ब्रह्म मिथ्या मायारोप । वारूनि स्वरूप शुद्ध पाहे ॥३॥
तूंचि देव भक्त होऊनिया दोन्ही । महावाक्यवाणी अकृतत्वे ॥४॥
ज्ञाने ब्रह्मरूप पाही तीन्ही लोक । सांडी सर्व शोक महाभागे ॥५॥
जे जे दिसे सृष्टी ते ते नारायण । बोध हा प्रमाण श्रुतिसिद्ध ॥६॥

सर्वाभूती प्रभु पाही ज्ञानेश्वर । आपण ईश्वर होउनीया ॥७॥ (य१-५६)

८- ब्रह्माची वृत्तिरूपता

उठलिया जरी नानारूप वृत्ती । तरी दुःख देती ऐसे नाही ॥१॥
आकाशी पवन सागरी तरंग । तैशा ब्रह्मरंग वृत्ति साऱ्या ॥२॥
तुज वाटे (त्या) सकळहि जाव्या । जडाचिये ठेव्या कां घेतेस ॥३॥
चेतन ही वस्तु विश्वमय स्फूर्ती । तेचि नानावृत्तिरूप होय ॥४॥
ब्रह्मीचे तरंग तैसे जाण जग । जाणुनिया रंग आत्मरंगी ॥५॥
कठीण ही गोष्टी पाहू जाता वेध । सोपी तुज सैंघ होईल ते ॥६॥
मृत्तिकेचा घट तंतूमाजी पट । तैसे जग दृष्ट ब्रह्माधारीं ॥७॥
घटामाजी माती पटामाजी तंतू । तैसे जीवजंतु ब्रह्मरूप ॥८॥
ज्ञानेश्वरकृपे करूनि विचार । एथे चित्त स्थिर ठेवी सदा ॥९॥

९- वेद-पुराण-भक्ति-योग-ज्ञानाचे विश्रांतिस्थान

वेदांचे रहस्य शास्त्रांचे माहेर । पुराणांचे सार हेचि एक ॥१॥
भक्तीचा शेवट योगाचे शिखर । ज्ञानाचा आधार हेचि एक ॥२॥
कर्माचे सत्यत्व वेदाचा सिद्धांत । येथे होय अंत वासनेचा ॥३॥
जेथे जेथें मन जाऊनिया पाहे । तेथे तेथे आहे ज्ञानेश्वर ॥४॥

१०- साक्षीचे स्वरूप

पाण्याचा तरंग पाण्यातचि उठे । पाण्यातचि दाटे हरपे तेथे ॥१॥
तरंगासी कांही पाण्यावीण नाही । किंबहुना तेचि पाणीच की ॥२॥
तैशा तुझ्या ठायी जाण सर्व वृत्ति । उठती पावती विलयाते ॥३॥
परी तूं निश्चळ जैशी तैशी राहे । साक्षी होऊनि पाहे नानावृत्ती ॥४॥
वाईट उत्तम प्रकृतीचा खेळ । जाणुनी निश्चळ शुद्ध होई ॥५॥
जे जे वृत्ति ते ते माझी न म्हणावी । ब्रह्मस्थ करावी स्थिर बुद्धी ॥६॥
ऐसी ज्ञानेश्वरब्रह्मबोधमाळा । घालुनिया गळां सुखी होई ॥७॥

११- जन्मोजन्मी तुझा सुत होईन

जंव गृहकष्ट नाही तुझे उणे । तंव माझे येणे नव्हे तेथ ॥१॥
जन्मोजन्मी सुत होईन मी तुझा । ऐसा भाव माझा जाण कन्ये ॥२॥
ज्ञानेश्वरकृपे जीवन्मुक्तिठेवा । पावोनि स्वभावा ब्रह्म करी ॥३॥(य१-५७)

जीवन्मुक्ताचे जन्म लीलामात्र

हे जननि, जीवन्मुक्ताला पुनर्जन्म नाही, असे सर्व श्रुति सांगातात, आणि तुम्ही पुनर्जन्म इच्छिता हे कसे? अशी तुला शंका येईल, ती इष्ट नाही,

कारण भगवान् गीतेच्या दुसऱ्या अध्यायातील तेराव्या श्लोकाने असेच सांगतात.

''देहिनोऽस्मिन् यथा देहे कौमारं यौवनं जरा ।
तथा देहान्तरप्राप्तिर्धीरस्तत्र न मुह्यति ।।'' (गीता)

अर्थ - ज्याप्रमाणे जीवाला देहाचे ठिकाणी बालपण, तारुण्य व वृद्धपण प्राप्त झाले असताहि, जसा खेद होत नाही, त्याप्रमाणे धैर्यवान् जीवन्मुक्तही स्वेच्छेने पुनर्जन्म झाला असताना देखील अविद्याबद्ध जीवाप्रमाणे मोह पावत नाही.

हे साध्वी, या श्लोकावरून सिद्ध होते की, जीवन्मुक्ताला पुनर्जन्माची भीति नाही, आणि तूं म्हणशील की, ''भीति नाही तरी पण जीवन्मुक्तानें जन्मबंधन कां अडकवून घ्यावे?'' तर सांगतो ऐक. ब्रह्मसूत्रांत भगवान् वेदव्यास श्रीबादरायणाचार्य म्हणतात की -

'लोकवत्तु लीलाकैवल्यम्' (अध्याय २ पाद १ सूत्र ३३)

ज्याप्रमाणे ईश्वराची कांही इच्छा नसतांही तो लीलेनेंच जगदुत्पत्ति करतो त्याप्रमाणेच जीवन्मुक्ताची इच्छा नसतांही आपल्या लीलेनेच पुनर्जन्म घेतो. हे ताई, व्यासवचनावरून सिद्ध आहे की जीवन्मुक्ताचा जन्म लीलामात्रच असतो.

वस्तुतः मला तर सहजच असा प्रसंग प्राप्त झाला आहे. आईही जीवन्मुक्तच आणि पुत्रही जीवन्मुक्तच! अशा समयी जन्माचे सुख किती म्हणून वर्णावे ! हे साध्वी, हे पत्र वाचून उत्तर लवकर पाठीव.

१२- पत्रप्रतीक्षा

वाचोनिया पत्र पाठवी उत्तर । अक्षरे मधुर प्रेमबद्ध ।।१।।
पहातसो बहु वचनप्रतीक्षा । माता सुत-ईक्षा तयापरी ।।२।।
ज्ञानेश्वरप्रभुकृपा तुजवरी । राहो निरधारी सर्वकाळ ।।३।।
ॐ तत्सदिती हरिपदसुख । घेवोनिया लेख संपविला ।।४।।
(य१-५८)

।।हरिः ॐ तत्सत् इति दशमपत्रं संपूर्णम् ।।
।। श्रीसद्गुरुज्ञानेश्वरार्पणमस्तु ।।
०००

पत्र ११ वे : स्वानुभव घे

(श्रीगुरुवर्णन- योगानंदाची खेचरी मुद्रा- तिने मिथ्या शरीराचे रक्षण व्यर्थ- योगाने वृत्तीला तटस्थ करण्याची अनावश्यकता- श्रीज्ञानदेवचरणी स्वानुभव घे)

।। श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ ।।
ॐ नमो वो गुरुमाये । नित्य वंदिता तुझे पाये ।
अज्ञानतम निरसोनि जाये । उदय पावे कूटस्थ ।।१।।
सखे तुझिया कृपानीरे । निगमवल्ली फळे भरे ।
तियेचा रस पाझरे । मुक्तहंसा ।।२।।
नाना शास्त्रांच्या उभारणी । नाना योगांच्या कडसणी ।
करिता होऊनि अभिमानी । तुझिये स्थानी न येती ।।३।।
माये तुझिये दृष्टीपुढे । उभे ठाकले ब्रह्म रोकडे ।
मोक्ष तोहि पाया पडे । त्वद्दासाच्या ।।४।।
ऐसा महत्कृपेसी आदरू । संपूर्ण प्रेमासी सादरू ।
तेचि तूं श्रीज्ञानेश्वरू । मातृपितृत्वे ।।५।।
गोत्र, पिता आणि आई । व्यक्ति प्रेमळा एके ठायी ।
तरी मग न्यून ते कांही । सर्वथा न पडे ।।६।।
एवं वंदूनि सद्गुरुनाथ । पुढे आरंभिले लिखित ।
बोबडी भाषा अनर्थ बहुत । ते अंगीकारी जननिये ।।७।।
कन्या भागीरथी मनी । तुज प्रसन्न होवो चक्रपाणी ।
दिवसें दिवस प्रेमखाणी । अधिकाधिक दुणावो ।।८।।
दिवस झालेती बहुत । तरी त्वां धाडिले नाही लिखित ।
तरी आमुचा अन्याय तिथ । कोणता दावी ।।९।।
येथे योगानंदसरस्वती । खेचरी मुद्रा लोकां सांगती ।
शरीर अमर करावे म्हणती । भूलोकी विचरावे ।।१०।।
त्यानी तुज करविले दर्शन । मजहि तैसेच दाविले जाण ।
परी मी मंदमति अज्ञान । म्हणोनि तें गुह्य कळेना ।।११।।
ब्रह्मा विष्णु परमेश्वर । जे संपूर्ण योग आचरणार ।
तयालागीही साचार । मरण असे प्रलयान्ती ।।१२।।
शरीर मळबद्ध अविद्यायुक्त । पंचभौतिक मिथ्याभूत । (य१-५९)
त्याते रक्षूनि पुरुषार्थ । काय साधिला सांग पां ।।१३।।
आत्मा मुळीचाचि अमर । तो नव्हे मन ना शरीर ।

अखंड व्यापक निर्विकार । योगा थार नसे तेथे ॥१४॥
जे अखंड व्यापक सर्वांभूती । असा अनुभव आलिया चित्ती ।
मग योग साधुनी तटस्थवृत्ति । वृक्षासारखी कासया ॥१५॥
महाप्रलयी ब्रह्मांड बुडे । तेथे योगी ते काय बापुडे ।
एक ब्रह्म तेचि सत्य फुडें । येर विश्व मिथ्या ॥१६॥
असो मी तों मंदमति अज्ञानी । स्वामी महायोगी ब्रह्मज्ञानी ।
तेथे माझी बोबडी वाणी । ऐकेल कोण? ॥१७॥
स्वामी मजला ऐसे म्हणती । ''तूं करी माझी संगती ।
मग मी सांगेन तुजप्रती । खेचरी मुद्रा'' ॥१८॥
परी एक ऐकें ताई । तुझिया चरणाहुनि कांही ।
मज सर्वथा श्रेष्ठ नाही । आण लवलाही तुझीच ॥१९॥
पुढिलिये पत्रामाझारी । लिहीन महावाक्य उजरी ।
परी आधी पत्रोत्तरी । आश्वासिजे ॥२०॥
मी तंव तुझें तान्हे बाळ । बोबडी वचने लिहिलीं सकळ ।
ती अंगीकारूनी सोज्वळ । पत्रोत्तर पाठवी कृपे ॥२१॥
सच्चिदानंद श्रीगुरुदेव । तो भक्तभूषण ज्ञानदेव ।
त्यांचे चरणीं ठेवूनि भाव । स्वानुभव घेई माते ॥२२॥ (य१-६०)
॥हरिः ॐ तत्सदिति एकादशपत्रं संपूर्णम् ॥
॥श्रीज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥
पत्रे समाप्त
०००

५. श्रीमद्भगवद्गीतासंगति

(संगति = सहवास)

॥ श्रीमत्सद्गुरु सर्वत्र यशस्वी ज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

ॐ नमः श्री करुणाघना । आळंदीपते कल्याणनिधाना ।
निर्विकारा निस्त्रिगुणा । भवेभ-भंजना भवहृदया ॥१॥
जयामलमतिगतिप्रचोदा । जयाविद्यवेद्यविभेदा ।
सुविद्यवेद्यसुप्रदा । सद्गुरुराया ॥२॥
जय हृत्सकल समापदा । जय विमल कमल षट्पदा ।
जय सामान्य चैतन्य सत्पदा । स्वानंद संपदा सम्मुने ॥३॥
जय कारुण्य-पवन-पाखरा । जय अनाहत संगीत सुधाकरा ।
जय कोमलोल्लसितसौकरा । श्रीज्ञानेश्वरा सुखाब्धे ॥४॥
जयांग क्षमा सुकुंभिनी । जय प्रियप्रेम संजीवनी ।
जय कर्माकर्म दहन-वन्ही । स्वानंद-दानी शीतपवना ॥५॥
जयानंत ब्रह्माण्ड गगना । जय सर्वज्ञ समभिज्ञ मना ।
जयानंद संदोह जीवना । सुखैक-घना ब्रह्मरूपा ॥६॥
ऐसिया प्रणमोनि विशेषा । सच्चिदानंद निःशेषा ।
धरूनि मधुरालापाभिलाषा । ऐकिजे स्तवना ॥७॥
उच्छिष्ट सेवूनि वडिलांचे । बाळ जेंवि निर्भर नाचे ।
तेंविंचि चाटूनि मी येथिचें । घेतसो सुख ॥८॥
जे परंपरेची गोडी । निगमान्तरस लवडसवडी ।
भगवत्पादवाणी प्रौढी । परवडी जें ॥९॥
तदर्थ प्रयत्नें करून । उपलभ्य तेवढा सेवून ।
गूढार्थपुष्टिप्रदर्शन । सुखें होकां ॥१०॥
तिया पुष्टीचेनि बळें । गती करू अंतराळें ।
कामादि अरींची पाळेंमुळें । खणोनिया कीं ॥११॥
सकल अरींचें अधिष्ठान । तो संसार हा एक जाण ।
आणि संसारासी कारण । अविद्या ती ॥ १२॥
तियेची सकार्यनिवृत्ति । जे विवेकी भूप इच्छिती ।
वेदान्तशास्त्रीं प्रवृत्ति । याचिसाठीं ॥१३॥ (य१-६१)
(पूर्वपक्ष) अहो या जगीं सकळ । विषय इच्छिती केवळ ।

विवेकि भूप प्रबळ । कोणीचि नसे ॥१४॥
म्हणोनि गीतासंगती । येथे कवणाची नव्हे प्रवृत्ति ।
(सिद्धांत) परी या निष्फळ उक्ती । श्री गुरुकृपें ॥१५॥
जन इच्छिती सुख । हें निर्विवाद देख ।
परी न जाणोनि ब्रह्मसुख । आरोपिती विषयीं ॥१६॥
वासनाबळें बाहेर मन । विषयाकार घे धांवोन ।
तेथ इदमाकारें एकाग्र होवोन । स्वानंद प्रतिबिंबवी ॥१७॥
एकाग्र होतांचि मन । आत्मानंदाचें होय भान ।
तोचि विषयावरी आरोपण । करून ग्रहण करी स्वयें ॥१८॥
मन एकाग्र विषयावरी । तैं भोग्योंपहित चिदानंद उजरी ।
होवोनि भोक्त्रानंद परी । एकत्र पावे ॥१९॥
इहंताप्रत्ययीं एकाग्रवृत्ती । भोग्योपहित चित्सुखाप्रति ।
घे, तेंवि अहंताप्रत्ययीं वृत्ती । भोक्तृपहित चित्सुखाप्रति घे ॥२०॥
सुख म्हणोनि सुखा । धरी इदंतेसह अविवेका ।
सुखी म्हणोनि अविवेका । अहंतेसह धरी ॥२१॥
मग या सकळांचा अविवेक । करोनि विषयीं मानी सुख ।
ऐसेनि विषय इच्छी देख । अविवेकी जन ॥२२॥
सुख आणि सुखी । यौगुल्य एकीं ।
परी हें सुख मी सुखी । आणी या द्वंद्वा ॥२३॥
सुखें सुखावे तोखे । आणि सुखित्वें तोखे पोखे ।
पूर्वस्थानीं ये अविवेके । उत्तरस्थानीं विवेके माजे ॥२४॥
अयोग्य विवेक तें भेदज्ञान । सुख सुखित्वा वेगळेपण ।
विवेक तें ब्रह्मज्ञान । जेथ जड चिद्धन निवडती ॥२५॥
म्हणोनि योग्यविवेका । केलिया इच्छिणें घडें सुखा ।
सुखा आणि सच्चित्सुखा । भेदू न घडे ॥२६॥
ऐसे अखंड सुख इच्छिती । परी 'न कळे' म्हणून विषय घेती ।
एवं मुमुक्षुतापत्ति । सकळ जनां ॥२७॥
तथापि ऐसे जैं कळे । तैं उपजति मोक्ष डोहळे ।
चित्त सुखार्थ डहुळे । विषय ओंगळे वाळोनी ॥२८॥
एवं अधिकारसंपत्ति । शीस मोट जिया व्यक्ती ।
तो मोक्षश्रीमंदिराआतौती । यावया पात्र ॥२९॥

(शंका) आतां प्रधानपोशिंदे । म्हणती हें जाहले संबोधे ।
परी सुख इच्छिती हे विरोधे । आणलें केवीं ॥३०॥
त्रिविध दुःखाचें निरसन । अपेक्षिती भूपजन ।
आणि सुखवृत्ती सत्त्वगुण । तेहि दुःख म्हणोनि निरसावे ॥३१॥
(समाधान) तरी याही शब्दा । आतां आणी स्तब्धा ।
कीं विवेकवृत्ती प्रबोधा । अंशू ऐसा ॥३२॥
प्रकृतित्यागें दुःखत्याग । हे अनात्मांश त्याज्यत्वें चांग ।
विवेकाचे प्रथमांशांग । ऐसा उमग पडे ॥३३॥ (य१-६२)
परी आत्माकार जी वृत्ती । तैं होताचि समाधान स्थिती ।
हे विवेक द्वितीयांशांग प्रतीती । सुखत्वाची ॥३४॥
निदिध्यासनावरी जो योग्य विवेक । अहंब्रह्म झालिया तो मोक्ष सम्यक ।
एवं दुःखाभावप्राप्त सुख । श्रौत कैवल्य ॥३५॥
इतर दृष्टोपायादिकीं । कोणी नाहीं अत्यंत सुखी ।
म्हणोनि वैद्यादि अविवेकी । व्युदसिले ॥ ३६॥
प्राप्त मोडिलें चौंढाळ । अनिगम तोंडाळ पुंडाळ ।
मग निजयोग्य भांडाळ । निगमवेत्ते ॥ ३७॥
तिहीं निर्धारिलें साचें । श्रौत कैवल्य हे वाचे ।
प्रयोजन वेदान्ताचें । मुख्यत्वें आहे ॥ ३८॥
यमधिकृत्य प्रवर्तन । पुरुषाचें ते प्रयोजन ।
स्वयं इच्छाविषय ते मुख्य जाण । गौण अन्येच्छाधीनेच्छाविषय ॥३९॥
श्रवणीं योग्य विवेक उत्पन्न । मननीं तया अंगधरण ।
निदिध्यासनीं होय तरुण । साक्षात्कारी मोक्षत्वें परिणमें ॥४०॥
मग तया साक्षात्कारांतूनी । साक्षात्कारी निमित्तक वाणी ।
निघे ते अधिकारसंपन्न श्रवणी । स्वफलदानी प्रवर्ते ॥४१॥
तोचि तया ग्रंथ । वैराग्य निस्कंथ पंथ ।
मिळवोनि संभ्रात संथ । कराया उपयोगी ॥४२॥
श्रवण करोनि ग्रंथ रचणें । तेथ संगृहीत उसनी वचने ।
ग्रंथ बहु न वाचतां वांचणें । तें एक बरें ॥४३॥
मनन करोनि ग्रंथरचना । तेथ बहुधा युक्ति सूचना ।
श्रवण झालियावरी मनना । उपयोगार्थ वाचिते तो ॥४४॥
निदिध्यासक रचित ग्रंथ । परम प्रक्रिया भरित पंथ ।
कुतर्के करूनि जे जाहले संथ । तिहीं सेविजे तो ॥४५॥

परी निदिध्यासका । जो प्रक्रिया आवांका ।
तोचि साटोप निका । तिये ग्रंथीं ॥४६॥
म्हणोनि कष्टें आत्मकळा । तेथूनि कळूं शके सकळा ।
कहीं कहीं विकळा । नाकळता होय॥४७॥
ब्रह्मनिष्ठ- साक्षात्कृत । तद्रचित जे ग्रंथ ।
ते नानाप्रक्रियासमन्वित । शिष्यबाधोर्थ प्रकटती ॥४८॥
जैसी ठिणगी पेटे तृणावर । विझोनि जाय पडतां नीर ।
तैसें श्रवणें ज्ञान उपजे साचार । परि मायाजळ लागतां मावळे ॥४९॥
मेघांत विघुल्लता अग्नि जैसा । पाणी पडतांही न विझे अपैसा ।
परी क्षणें उत्पन्न, क्षणें नाशा । प्राप्त होय ॥५०॥
तैसें मननज्ञान । क्षणैक युक्तिबळे समाधान ।
क्षणैक संसारें मावळे जाण । क्षणैक विपरीतपण कुतर्कें ॥५१॥
क्षणैक आंगीं वैराग्य चढे । क्षणैक व्यवहार-चातुर्य उघडे ।
क्षणैक वाद गळां पडे । क्षण एक मोडे विषयवृत्ति ॥५२ ॥ (य१-६३)
क्षणैक बिहे संसारभया । क्षणैक तनुज तनुकामिनीदया ।
क्षणैक मनी फाविजे लया । क्षणैक यामिनीलया पावे ॥५३॥
समुद्रांत वडवानळ । निजबळें भक्षी तुंबळ जळ ।
न विझे परी सबळ । प्रकाशही देवों न शके ॥५४॥
तैसे निदिध्यासज्ञान । ब्रह्माकारवृत्तिसंपन्न ।
कदापि संसारमोहेंकरून । न मावळे ते ॥५५॥
म्हणजे ब्रह्माकारवृत्ति । तियेसी विरुद्धवृत्ति मोडो न शकती ।
परी साक्षीची सहज स्थिती । वृत्तित्वामुळें प्रकटेना ॥५६॥
जैसा सहज प्रकाशे रवी । आणि न मावळे कदा केवीं ।
तेंवि ब्रह्मसाक्षात्कृत कवी । सहज झळके ॥५७॥
कदा न मावळे तद्ब्रह्मस्थिती । कदा न भोगी जन्ममृती ।
साक्षीची सहज स्थिती । जें तेंचि कीं तो ॥ ५८॥
शब्दें ब्रह्मप्रत्यभिज्ञाश्रवण । युक्त्या ब्रह्मानुमान मनन ।
ब्रह्मप्रत्यभिज्ञा चिंतन निदिध्यासन । प्र¯ ब्रह्मरूपभवन समाधी ॥५९॥
वा ब्रह्मापरोक्षकर महावाक्यश्रवण । असंभावनाद्वय निवर्तक मनन ।
विपरीत-भावना-नाशन निदिध्यासन । स्वानंदरूपभवन साक्षात्कृती ॥६०॥
अवांतर-वाक्याचें श्रवण । करीं ब्रह्म-परोक्षज्ञान ।
तैं ब्रह्म आहे ऐसें मन । श्रद्धा धरी ॥६१॥

मी ब्रह्म आहे ही अपरोक्ष वृत्ति । ज्ञाने करूनि दे महावाक्यश्रुती ।
तेथ समुल्लिसे चिद्व्यक्ती । सुविचारबळे ॥ ६२॥
वेद ब्रह्मप्रतिपादक । किंवा कर्माचें बोधक ।
ही प्रमाण असंभावना देख । वेदसाधक मनने गळे ॥६३॥
सत्य भेद कीं अभेद । ही प्रमेय असंभावना प्रसिद्ध ।
स्वमत-ग्रहण परमतत्यागरूप शुद्ध । मनन करितां हारपे ॥६४॥
विप्रतिपत्तिजन्य संशय । विचारावया उपयोगी होय ।
म्हणोनि त्यागावया विपाय । आश्रयिजे मननीं ॥६५॥
मग तयाचा त्याग झालियावरी । असंभावनानिवृत्ति सारी ।
एवं तर्कें करूनि निर्धारी । निवटे भेद ॥६६॥
मननज्ञान दृढ होय जेव्हां । तर्कें संसार बाध्य कळे तेव्हां ।
तर्कें करोनि पुढती मग केव्हां । संसार सत्य न वाटे ॥६७॥
परी अनंत जन्माची श्रद्धा । ते आणी संसारसत्यत्व-बोधा ।
निदिध्यासन करूनि बाधा । तेही पावे ॥६८॥
विपरीत भावना जे मनिजे । तीही निदिध्यासनें अपनीजे ।
साक्षात्कारें राहिजे । ब्रह्मचि होवूनी ॥ ६९॥
जेथ जग झालेंचि नाहीं । तेथ साक्षात्काराची नवाई ।
पावलिया मग कांही । उरेना प्राप्य ॥७०॥
श्रद्धा आणि तर्कें करून । जगत् सत्य मानी मन ।
ब्रह्माचें अस्तित्वही ग्रहण । न करी कधीं ॥७१॥ (य१-६४)
या नांव बद्धस्थिती । जेथ असे विक्षेप आणि द्विविध आवृती ।
पूर्ण अविद्याप्रतीती । याचि नांव ॥ ७२॥
शास्त्रविहित कर्म न करितां । ऐहिक भोगीं आसक्तता ।
ते वेळीं ही पामरता । नांव पावे ॥७३॥
नाशवंत इहलोकस्थिती । म्हणोनि व्हावी स्वर्गप्राप्ती ।
तदर्थ करी काम्यर्म रीती । तेही बद्धस्थिती विषयिता म्हणिजे ॥७४॥
या लोकींचे आणि परलोकींचे । भोग दुःखमय जाणोनि साचे ।
कर्मकृती निष्कामतेचें । स्वरूप पावे ॥ ७५॥
तेणें निष्काम कर्मे चित्ती । सहज शुद्धता ये निरुती ।
तदा आली साधक स्थिती । म्हणावी कीं ॥७६॥
मग पुराणेतिहास भगवच्चरित्रें । श्रवण कीर्तनादि साधने विचित्रें ।
तैं भेटतां सुगुण सत्पात्रें । भगवत्सगुण चित्रें चित्तीं येती ॥७७॥

त्यांतूनि प्रिय आणि कोमळ । सुरेख आणि विमळ ।
सुबाहू आणि सुनीळ । जे स्निग्ध सोज्वळ आलिंगनी ॥७८॥
नयन कटाक्षी सुसाळ । जे चुंबनापेक्षी रसाळ ।
तारकत्वें विशाळ । चैतन्यभरित ॥७९॥
ऐसें एक घेवोनि त्रिशुद्धी । प्रेमें तारक ब्रह्मबुद्धी ।
उपासिजे तैं एकाग्रसिद्धी । सहज फावे ॥८०॥
मग अवांतरवाक्य श्रवण करितां । श्रद्धाजन्य ब्रह्मपरोक्षता ।
उपजे तैं असत्त्वापादक तत्त्वतां । आवृती नाशे ॥८१॥
उपासनेंत जे एकदेशी सगुण । तेचि व्यापक वाटे, होता परोक्षज्ञान ।
तैं ध्यानावरी मन । अधिक चढे ॥८२॥
जंव जंव ध्यानें व्यापकदृढता । तंव तंव भेद वाटे वृथा ।
मग ये विवेकयोग्यता । बुद्धीसी स्वयें ॥८३॥
योग्यविवेकें विषयप्रमा । सरोनि विवेकानुयोगी आत्मा ।
कळे तैं निःशेष भोगसंभ्रमा । सांडी चित्त ॥८४॥
या नांव विवेकानुसार विरक्ति । हीस बाणूं न दे विषयाभ्यासवृत्ति ।
तैं मग निग्रहसंपत्ति । प्राप्त करणे ॥८५॥
तदंश मनोनिग्रह तो शम । इंद्रिय निग्रह तो दम ।
विषय मन नेघे हा उपरम । तितिक्षा संभ्रम सहिष्णुता ॥८६॥
साधतां साधनसंपत्ती । नाना सुखदुःख येती ।
ते साहविल्या न जाती । तितिक्षेवीण ॥८७॥
चोर हरोनि नेती धन । तैं साहावे लागे दरिद्रपण ।
उदार होऊन करितां दान । मिळे मान तैं उदासीन राहणें ॥८८॥
चूर्णिका :-
निंदा अत्यंत करिती पिशुन । तैं अपमान दुःख सहावे लागे जाण ।
साधू म्हणोनि देती मान । तें सुख साहून उदासीन रहावे ॥८९॥
भिक्षा न मिळे वेळेवरी । सहणें लागे क्षुधा भारी । (य१-६५)
सहणें लागे वनान्तरीं । तृषाही कदा ॥९०॥
न मिळे रहावया घर । यालागीं शीतोष्ण जलधार ।
घेणें लागे शिरावर । साहोनिया ॥९१॥
न पाहुनि जीवन मरण । देहाचें नांव ठेवूनि पाषाण ।
धैर्ययुक्त राहे मन । या नांव तितिक्षा ॥९२॥
एवं सुख दुःख करितां सहन । संसारीं न धांवे मन ।

तंव पूर्वील विवेकदाढर्येकरून । श्रुतिगुरुवचन श्रद्धा घे ॥९३॥
मग फळ जरी न मिळे कांही । श्रद्धाबळे अभ्यासे तरीही ।
समाधान तें पाही । याचि नांव ॥९४॥
इतरेच्छांची झाली निवृत्ति । म्हणोनि ब्रह्मसुखेच्छा बळावली चित्तीं ।
जे सामान्य होऊनि राहिली होती । इतरेच्छातळी ॥९५ ॥
ती विशेष तीव्र आतां जाहली । म्हणोनि म्हणावी मुमुक्षा लाधली ।
ही कोण्याही वर्णा फावली । यत्नें वा दैवें ॥९६॥
तैं मग्नचेतन कनवाळू । भव-वणवा-जीवन नवाळू ।
तो भेटे सद्‌गरु अळुमाळू । पाजोनि वाक् रसाळू आश्वासी ॥९७ ॥
ते अभयदानें उठाउठी । न सांवरतां उल्हास उठी ।
तैं मन घे श्रवण संपुटी । माहवाक्यामृत ॥९८॥
तिये महावाक्यश्रवणें । अपरोक्ष ज्ञान हातां येणें ।
तैं द्विविध जे जगत्सत्य वाटणें । त्यातील श्रद्धांश जाय ॥९९॥
मननें करून पाहतां । यौक्तिक जगद्‌बाध होय तत्वतां ।
परी दृश्याभ्यासश्रद्धा । जगत्सत्ता भासवी पुन्हा ॥१००॥
ही विपरीत भावना निदिध्यासें । नाशिलीच होय सहज नाशे ।
मग वृत्तिपक्वता समाधिदशे । सहजचि ये ॥१॥
करें तरुशाखा लववून धरणें । तेंवि निदिध्यासीं ब्रह्माकारवृत्ति करणें ।
शाखा सहज लीन राहणें । तैसी वृत्ती लीन सहज ते समाधी ॥२॥
व्यतिरेकसमाधी जोंवरी । तींत ताटस्थ्य राहे तोंवरी ।
अन्वय होतां निर्धारी व्युत्थानींही समाधीचि ॥३॥
ते वेळीं जे निगे वाणी । ते वेदसम ग्रंथखाणी ।
शिष्यबोधार्थ मंदाकिनी । प्रगटली राहे ॥४॥
श्रवण करूनि रची जो ग्रंथ । तयाचें कार्य जिव्हेनें होत ।
मनन करूनि रची जो ग्रंथ । तयाचें कार्य होत अंतःकरणें ॥५॥
निदिध्यासन करितां ग्रंथ । रची तैं देवता स्फूर्ती देत ।
आणि जो कां ब्रह्मसाक्षात्कृत । समाधिस्थ मुनी ॥६॥
तो ब्रह्मनिष्ठ श्रोत्रिय साचारी । तयाची जे प्रकटे वैखरी ।
ते ब्रह्मतनयाचि ग्रंथाकारी । निगमप्रणवरूपिणी ॥७॥
इंद्रियज्ञान जयांसी । दृढ देहाभिमान तयासी । (य१-६६)
खानपान जलान्नाशीं । पशुसमान जडतसे ॥८॥
जयासी अंतःकरणज्ञान । तयासी कांहींसे विचारीपण ।

सत्य स्वधर्म कर्माधीन । राहत सदा ॥९॥
शारीरिक स्वधर्म कर्म । उपासना मानस कर्म ।
ऐसे दोन्हींही शुभकर्म । करितां होय ॥१०॥
परी उपासना प्रधान । भगवद्भक्ती संपूर्ण ।
आवडे अंतःकरण ज्ञान । जया राहे ॥११॥
आत्म्याचें ज्ञान जयासी । जो सदा व्यतिरेकवासी ।
वेदान्तसिद्धान्त तयांसी । कळला म्हणावा ॥१२॥
परमात्मैक्य अपरोक्षानुभव । तोचि ज्ञानी स्वयमेव ।
भ्रमरहित ब्रह्मभाव । पावला म्हणिजे ॥१३॥

चूर्णिका

श्रवण करूनि रचित ग्रंथ । तेथ शब्दज्ञान होत ।
मनने करूनि रचित ग्रंथ । तेथ अनुमाने कळती सिद्धांत ।
आणि पूर्वपक्षच्छेदक बहुत । युक्ती असती ॥१४॥
निदिध्यासकरचित ग्रंथ । तेथ प्रक्रियासहित असती सिद्धांत ।
परी निदिध्यासक जी प्रक्रिया करित । तीचि प्रधान राहे ॥१५॥
ब्रह्मसंपन्नरचित ग्रंथ । तेथ अवर्णनीय अनुभूत सिद्धांत ।
नानाप्रक्रियासंभरित । सर्व काहीं मिळत निःसंशय ॥१६॥
प्रथम ग्रंथात शब्द प्रमाण । परी युक्ती न दिसती जाण ।
द्वितीय ग्रंथात शब्दप्रमाण । आणि युक्ती ॥ १७॥
तृतीयग्रंथांमाजीं निश्चिती । शब्द प्रमाण आणि युक्ती ।
प्रक्रियासहित अनुभूती । तीही सांपडे ॥१८॥
चतुर्थ ग्रंथांमाझारी । न्यूनता नाहीं कवणेपरी ।
श्रुती युक्ती अनुभव निर्धारी । प्रक्रियाही परी बहुत असती ॥१९॥
यास्तव साक्षात्कृतरचित ग्रंथ । टीका अथवा मूळ परी ते समस्त ।
ब्रह्मबोध करावया समर्थ । अधिकारियाप्रत सहज होती ॥१२०॥
ब्रह्मवेत्ता ब्रह्मरूप आहे । तयाची वाणी वेद होय ।
मग अखंड ब्रह्म जें लवलाहे । श्रीकृष्णमूर्ती ॥१२१॥
आत्माराम जरी होती । तरी रक्षावया जीवन्मुक्ती ।
सुखाची होवावी प्रारब्ध स्थिती । म्हणूनि ज्या भजती अकृत्रिम ॥२२॥
तो ज्ञानीभक्त, भज्य गोविंद । जो बोलिला श्रौत अनुष्टुप्छंद ।
ती गीता माउली जनासी दुग्ध । सर्वदा पाजी ॥२३॥
म्हणूनि तद्दुग्धपुष्टी । संगतीरूपें गोमटी ।

श्रुत्यर्थपारिपाटी । विस्तरिली ॥२४॥
प्रत्यक्ष बोलिली देवें । म्हणूनि श्रीगुरु ज्ञानदेवे ।
गीता ही श्रुती स्वभावें । बोलिले आहे ॥२५॥
आणि भगवत्पाद भाष्यार्थ । तैसा मधुसूदनकृत उपोद्घात । आणि जे बोलिले
ज्ञानेश्वरतात । एतदाश्रवूनी गीतासंगतिग्रंथ रचित हा ॥२६॥
(य१-६७) कीं रसना शब्द उच्चारिजे । तेणें अर्थही रसनाचि जाणिजे ।
तैसा गीतावचनें ओळखिजे । गीताश्रय कृष्ण ॥२७॥
न्याय परमाणू नित्य म्हणती । वैशेषिक काल नित्य साधिती ।
मीमांसककर्म नित्य म्हणती । सांख्य साधिती प्रकृतिनित्यता ॥२८॥
ऐसी चिद्भिन्न जडासी । जे नित्यता निश्चयेसी ।
ते जयाची सत्ता विशेषी । बोलिली आहे ॥ २९॥
जीवासी चेतनपण । तें जयाचें चेतन ।
जो परमानंदघन । राधिकाप्रिय ॥३०॥
असो ही ऐसी त्रिविधता । जडासी जडपणता ।
चेतनावीण तत्वतां । कळों न शके ॥३१॥
आणि सत्ता चेतनासी । तीचि आहे जडासी ।
तें चित् सोडोनि निश्चयेसी । जाईल केवीं ॥३२॥
जग दृश्य, विभू आणि परिच्छिन्न । परि निर्धाराचें व्यापकपण ।
निर्धारावांचूनी जडपण । घेतां नये कीं ॥ ३३॥
अनिर्धारित अज्ञातसत्ता । जडाची मानिलिया तत्वतां ।
तरी अज्ञातत्व ग्रहणीं जडता । वा चेतनता आहे? ॥ ३४॥
अज्ञातत्व म्हणिजे जड । तरी ते ज्ञातसत्ताचि सुगड ।
निर्धारावांचूनी उघड । न दिसे कांही ॥३५॥
पूर्व आहे म्हणूनि कळलें । हें बोलणेंचि व्यर्थ गेले ।
कळलें म्हणोनि पूर्वत्वा आलें । तें पूर्वत्व झालें ज्ञातसत्ता ॥३६॥
पूर्वत्व कळलें मात्र । तरी कळलियावीण स्वतंत्र ।
सांगतां ये काय अतंत्र । पूर्वत्व तें ॥३७॥
न सांगोनि भासे । तरी काय अनिर्वचनीय असे ।
मनासि जरी भासे । तरी तें न पूर्वत्व ॥३८॥
मनासी कळे तरी पूर्वी आहे । तरी कळतें मन काय पूर्वी नोहें ।
आहे म्हणाल तरी तेव्हांही आहे । निर्धार असणें ॥३९॥
दोन म्हणतां जरी । ज्ञेयासी व्याप्यता तरी ।

व्यापकता निर्धारी । ज्ञानासी कीं ॥ १४०॥
अग्रसंयोग म्हणतां । तरी अग्राकारवृत्ति होआवी तत्वतां ।
सर्वघटाकारवृत्ति सर्वथा । होवूंचि नये ॥ ४१॥
म्हणवूनि पूर्वत्व देशे काळे । किंवा वस्तुत्वें वस्तुपाळे ।
जडत्व हें प्रबळें । चेतने नेलें ॥ ४२॥
जडाचिया पाठींपोटीं । निर्धारकांस गोमटी ।
निर्धाराच्या पाठींपोटीं । चित्परिपाटी स्वतंत्र ॥४३॥
उक्त निर्धारता वेगळी करूनी । जड दावावे कोठें कोणी ।
आत्मचित्ता वेगळी करूनी । निर्धारू दावावा ॥४४॥
स्थूल दृष्टि-परंपरा । येरव्हीं चेतन विश्वपसारा ।
चेतनभिन्नपणें निर्धारा । जडत्वचि ॥४५॥
म्हणोनि वृत्युपहित चेतन । तेंचि विषयोपहित जाण । (य१-६८)
ते चैतन्य वेगळेंकरून । दाखवावें जड ॥४६॥
एवं अन्वय-व्यतिरेकें । जड नाहीं ऐसें देखे ।
आतां चेतनचि निःशेखे । उतरलें दिठी ॥४७॥
आणि अज्ञानांतुनी ज्ञान । विरोधें नोहे उत्पन्न ।
अभावापासुनी भावपण । कदा नोहे ॥४८॥
केवल प्रागभावापासाव । उत्पन्न नाहीं घटभाव ।
मृत्तिकाभावतेपासाव । घटभाव आहे ॥४९॥
अभावापासूनि उत्पन्न । तरी अभाव सर्वत्र सुलभ जाण ।
तरी सर्वत्र सर्वोत्पन्न । सुखें व्हावें ॥१५०॥
पूर्वी कांही येत कल्पना । ते कल्पना तरी आहे म्हणा ।
अभावापासूनि भावोत्पन्ना । कांहीं न चाले ॥ ५१॥
म्हणवूनि अज्ञानांतुनी ज्ञान । कदापि नोहे उत्पन्न ।
पूर्वी घेतां तरी चेतन । घेयावे कीं ॥ ५२॥
विरोधींत विरोधी लीन । ऐसे नाहींच देखणं ।
म्हणवूनि म्हणावें चेतन । यासीचि कीं ॥५३॥
यासी जडचि म्हणतो आतां । तरी वादासि नाममात्रता ।
काहींच बुद्धिमत्ता । नलगे येथ ॥५४॥
असो ऐसे जरी कांहीं । तरी सुखता चेतनावीण नाहीं ।
आणि जगीं तंव सुख नाहीं । म्हणूनि प्रवृत्ति इकडे ॥५५॥
वृत्तिस्थ सुख पूर्वी व(ा)ळिलें । म्हणूनि वृत्त्याश्रय सुख पाहिजे वहिले ।

तें अनुभवा नाहीं आलें । चेतनाविण ॥१५६॥
तें नाहीं म्हणतां दुःख न सुटे । दुःखनिवृत्ति इच्छाही प्रकटे ।
शशशृंगादि इच्छा कोणा न घटे । म्हणोनि आहे चित्सौख्य ॥५७॥
हें चित्सौख्य परम निधान । तेंचि शुद्धवृत्तित्वें श्रीकृष्णपण ।
अशुद्धवृत्तित्वें जगपण । जाहलें कीं ॥१५८॥
नाहींच अज्ञातसत्ता । मग वृत्तीची जी अव्यक्तता ।
ती कारण तत्वतां । स्थायी अविद्या ॥५९॥
परी ती अनादि ज्ञाने नाशे । म्हणवोनि सकार्य अविद्यानिवृत्ती असे ।
प्रयोजन ऐसें । गीताशास्त्राचें ॥१६०॥
अविद्याकाळीं अविद्या न सांपडे । आणि निवृत्ति झालिया न घडे ।
यालागीं अनादि सुरवाडे । ज्ञाननाश्य हे ॥६१॥
ज्ञानकाळ जो भासे । तो बाधितवृत्तीमुळें दिसे ।
बाधितानुवृत्त्या जगचि भासे । विदेहकैवल्यवरी ॥६२॥
हें प्रश्नासि मात्र उत्तर । येरव्हीं जीवन्मुक्ती आणि विदेहमुक्ती सार ।
दोन्ही ही साचार । ब्रह्मचि एक ॥६३॥
असो जैसा होय तैसा । बोधूचि घ्यावा आपैसा ।
बोधक बोध्य खाऊनी ठसा । बोधाचाचि ॥६४॥
''एवं वस्तूसि जाणू जातां । जाणणेंचि वस्तू तत्वता''
म्हणोनि प्रमाणादि वृथा । या तातसिद्धांतां आश्रयिलें ॥६५॥ (य१-६९)
तोचि सिद्धांत कळावया । अविद्या तोंवरी उपाया ।
ईश्वरवाणी सांगे तया । बोलिजे वेद ॥६६॥
ईश्वरवाणी निर्भ्रमज्ञान । आणि तेणें नाशे अज्ञान ।
ब्रह्मही संपूर्ण । अपरोक्ष कळे ॥६७ ॥
ऐसी सांगे आप्तपरंपरा । आणि विद्युत्वत् प्रकाश आपणासही होय खरा ।
वैराग्य नाहीं म्हणूनि थारा । ब्रह्माचा न होय ॥६८॥
''वैराग्यावांचूनि कहीं । ज्ञानासि तगणेंचि नाही''
येणेंचि अभिप्राये आई । बोलिली हे ॥६९॥
म्हणवुनि वेद प्रमाण । तयाचेचि श्रवण ।
दृढ व्हावया मनन । उपपत्ती कीजे ॥१७०॥
मनन झालिया ध्याईजे । मग साक्षात्कारें कृतकार्य होईजे ।
श्रवण मनन ध्यान हें जाणिजे । दर्शनहेतुत्रय ॥७१॥
फळ झाडावरील पाहिल्याविण । यत्ने आणितां न ये तोडोन ।

तेवि परोक्ष आत्मयाचें करूनि दर्शन । श्रवणादि यत्नें अपरोक्ष कीजे ॥७२॥
विद्युत्वत्ता सूर्यवत्ता । येणें रीती पाहतां ।
अपरोक्षांश परोक्षता । परोक्षपूर्णता अपरोक्ष ॥७३॥
श्रद्धेमुळें परोक्षत्व आलें । तें तदाश्रयें जरी घेतले ।
तरी अपरोक्षचि वहिले । परोक्ष नाहीं ॥७४॥
विद्युत्वत् सूर्यवत्वें । दोहों रूपें अपरोक्षत्वें ।
भासे परी परोक्षत्वें । स्थिरतार्थ घेइजे ॥७५॥
थोडे दिसे म्हणूनि आहे । ऐसें मेघीं विद्युत्चें असणें राहे ।
विद्युत् न दिसे तरी आहे । ज्ञान हें स्थिर ॥७६॥
तेंवि संध्यादि स्थानीं । भासे विजेवानी ।
तेंचि नासले ऐसें कल्पनीं । येईल झणी ॥७७॥
म्हणूनि श्रुती सांगे ते असे । कल्पनेमुळे न भासे ।
भासलें होते जे आपैसे । तें जाईल कोठें ॥७८॥
विद्युत्वत् जें भासलें । पुन्हा वृत्तीखालतें लोपलें ।
तरी आहेपण जाये रक्षिलें । श्रद्धेनें जिया ॥७९॥
हें श्रद्धाजन्य ज्ञान । तयाची सत्ता तरी स्थिर व्हावी म्हणून ।
निकें परोक्षज्ञान । स्थापी श्रुती ॥१८०॥
मग ते महावाक्यें अपरोक्ष होय । तेंचि मननी उपपाद्य आहे ।
भेदे वारूनी लवलाहें । अभेद साधणें ॥८१॥
अभेद साधावया आधीं । कीजेल भेदमिथ्यासिद्धी ।
वाद जल्प वितंड प्रसिद्धी । घेवूनिया ॥८२॥
वाद जल्प वितंड यांतून । कोणीही एक कथा घेवून ।
भेद मिथ्या उपपादन । करावें कीं ॥८३॥
निश्चय असतो पक्षतेचा । म्हणोनि अनुमित्यनुपयोग संशयाचा ।
तरी त्यागावयासाठीं तयाचा । उपयोगू आहे ॥८४॥
पूर्ववत् मिथ्या साधितां भेद । तो अभेद सत्तेनेंचि सिद्ध ।
म्हणोनि एक अभेद । तोचि सत्य ॥८५॥ (य१-७०)
येणें मिथ्यामिथ्यात्व । तरी मग एकचि सत्त्व ।
जे अभेदतत्त्व । श्रीकृष्णरूप ॥८६॥
मनन झालिया ऐसें । जें फावे निदिध्यासें ।
साक्षात्कारदशे । पावे जे ॥८७॥
तें पावावया पूर्ण । प्राप्तीची प्राप्ती करणियाकारण ।

कंठचामीकरवत् निरूपण । करी हा वेदू ॥८८॥
पूर्वी बोलिलें अनुमान जें । तेंही वेदानुकूलचि पाहिजे ।
अन्यथा न लाहिजे । कल्पांतीही ॥८९॥
परी तें वेद त्रिवर्णी । राहती न सर्वस्थानीं ।
यास्तव स्वामी कळवळूनी । बोलिलें पुन्हा ॥१९०॥
जें सर्व वर्णा सुहित । कोणत्याही आश्रमी होत ।
युद्धनिरूपण मिषें निश्चित । हेंचि दाविलें ॥९१॥
अर्जुन क्षत्रिय गृहस्थ । संन्यासाधिकारविवर्जित ।
गोत्रहत्या करावया स्थित । जाहला वरी ॥९२॥
पुन्हा मोहें कवळिला । परी देव सखा केला ।
यास्तव उपदेशिला । वेदान्त हरीनें ॥९३॥
एवं सखा असतां श्रीपती । कोणा कैशाही परिस्थिती ।
साधनसहित परमात्मप्राप्ती । निश्चयें फावें ॥९४॥
ऐसी बोधक एक गीता । अष्टादशाध्यायघटिता ।
हरिवाणीत्वात् वेदरूपता । कांडत्रयता यास्तव ॥९५॥
कोण्याही एकदेशी होतां रज्जुज्ञान । तरी सर्वदेशीय सर्प निवृत्त जाण ।
तेंवि कोण्याही कांडीं ब्रह्मज्ञान । होवों सुखें ॥९६॥
'तत्त्वमसि'ची नूतन प्रक्रिया
निष्काम कर्म करावें । तेणें समज्ञे यावे ।
म्हणजे 'त्वंपद' फावे । सहजचि ॥९७॥
देहासी सुखदुःखता । मी देहावेगळा तत्वतां ।
हें त्वंपद विवेकयोग्यता । समत्व अंगी येतां मिळे ॥ ९८॥
उपासना करितां जाण । निज उपास्य व्यापक पूर्ण ।
येणें 'तत्पद' विवेक आपण । सहज होय ॥९९॥
कर्म उपासना करितां । यावी ऐसी विवेकयोग्यता ।
म्हणजे तत्त्वंपद ऐक्यता । ज्ञानकांडीं सहजचि ॥२००॥
ही नूतन प्रक्रिया । प्रभूनें प्रकट केली कृपया ।
जन आश्रयें ईचिया । तरेल सकळ ॥१॥
ती प्रक्रियाचि गीता । आद्य षडध्यायी तत्वतां ।
त्वंपद विवेकसहिता । कर्मकाण्डात्मिका ॥२॥
आणि द्वितीय षडध्यायी । तत्पदविवेकसह पाही ।
उपासनाकांडात्मिका तीही । देवताकांड ही संज्ञा ईची ॥३॥

तृतीय षडध्यायी ज्ञानकांड । ऐसें हें जगत्कल्याण तुंड ।
गीताशास्त्र प्रचंड । उभे आहे ॥४॥
उपासना ज्ञान दोन्ही । उपनिषदी एकपणीं ।
गीतेंत कांड तीन्हीं । एकत्वा आले ॥५॥
अथवा सहाव्या वरी कर्मकांड । बाराव्या वरी देवताकांड । (य१-७१)
पंधराव्या पर्यंत ज्ञानकांड । पुढें उपसंहार अध्यायत्रय ॥६॥
हे ज्ञानेश्वरप्रभूचें सामान्यमत । आणि त्यांचेचि विशेष मत ।
ऐसें कीं जें गीता सातशत । ते अध्यायांत नवविया एका ॥७॥
सहावा गीतावल्लीचें ठाण । अठरावा एकाध्यायी गीता जाण ।
गीतेंत सर्वत्र प्रतिपादन । तेंचि तें ब्रह्म ॥८॥
या विशेष मतांहून । निष्कर्ष काढितां जाण ।
तरी सर्वाध्यायीं सर्व संपूर्ण । गीता ही असे ॥९॥
''परी हर म्हणे नेणिजे । देवी जैसें कां रूप तुझें ।
तैसे नित्य नूतन जाणिजे । गीतातत्त्व''॥२१०॥
येणेंही बोले । स्वामीनींच प्रकट केलें ।
जे कीं सर्वी सर्वत्र भरलें । गीतातत्त्व हें ॥११॥
गीताचि एक माता । काव्याची सद्गुरुगीता ।
हेही बोलणें ताता- । मुखेहूनिचे ॥१२॥
आणीक तातचरण । जे बोलिले तेचि प्रमाण ।
यत्सेवा परमार्था जन्मस्थान । म्हणवूनि कीरू ॥१३॥
आणि तद्विरुद्ध नाहीं । यास्तव प्रमाण दुसरे ही ।
येथ मधुसूदनस्वामी कांही । बोलिले बरवे ॥१४॥
कर्म आणि ज्ञान । यांचा समुच्चय नाही म्हणून ।
भगवंते उपासन । घातलें मध्य ॥१५॥
कुशल आणि धनवंत । मी द्विज ऐसा बुद्धिमंत ।
विद्वान कर्तृतारोपभरित । अधिकारी कर्मा ॥१६॥
सर्व त्यागी संन्यासी । विरक्त अधिकारी ज्ञानासी ।
यास्तव समुच्चय दोहीसी । सर्वथा नाहीं ॥१७ ॥
अग्नि आणि शीतल जीवन । दोहोंच्या युगपत् पानें करून ।
तृषाशांति निष्पन्न । नाहीं जेंवि ॥ १८॥
तेंवि कर्मी आत्मयासी कर्तेपण । आत्मा अकर्ता या नांव ज्ञान ।
अतः समुच्चय जाण । न घडे कदा ॥१९॥

काम्यकर्माचा न्यास । या नांव पैं संन्यास ।
आणि संन्यासी अधिकारी ज्ञानास । सिद्धचि आहे ॥२२०॥
(शंका) काम्यकर्म ज्ञानाचा । समुच्चय नसो साचा ।
परी निष्काम कर्म आणि ज्ञानाचा । समुच्चयो आहे ॥२१॥
(उत्तर) तरी तैसेंही नाही । फलत्यागे करूनि लवलाही ।
कर्तृताबुद्धि पाही । त्यागविली ॥२२॥
आणि विविदिषा- संन्यासासाठीं । निष्काम कर्मांची आटाआटी ।
सिद्ध तंव अनाग्रहें शेवटीं । करिती कर्मे ॥२३॥
किंवा लोकसंग्रहार्थ करण । तेही न होय आपणा साधन ।
आणि निष्काम कर्मही भगवदर्पण । बोलिले देवें ॥२४॥
भगवदर्पण जहीं जाहलें । तेव्हांचि कर्म्मपण गेलें ।
भगवद्रूप चैतन्य वहिलें । या लागीं उरले ज्ञान ॥२५॥
भेदपणें उपास्य नाहीं । यालागीं उपासना-ज्ञानाही ।
समुच्चय भाव कांहीं । न दिसे कीरू ॥२६॥ (य१-७२)
ज्ञानी भक्ताची भक्ती । ते तंव अखंड सकळाप्रती ।
अपेक्षित, परी एकचि, समुच्चिती । म्हणूनी नाहीं ॥२२७॥
तथापि जिज्ञासु-दृष्टी । कदाचित् ज्ञान-कर्म एकवटी ।
यास्तव उपासना पोटीं । घातली दोहींच्या ॥२८॥
आणि ही भगवद्भक्ती । मध्य सांगावयाप्रती ।
दुसरेही निश्चिती । कारण एक ॥२९॥
नित्यासही पितृलोकीं फळ । ऐसी श्रुती सांगे केवळ ।
हे एक कर्ममागीं प्रबळ । विघ्न आहे ॥२३०॥
ज्ञानाचा अभिमान । हें एक ज्ञानमार्गी विघ्न ।
या दोहोंस निवर्तक भक्ती म्हणोन । घातली मध्यें ॥३१॥
कर्म करितां कृष्णार्पण । तत्काल निवटे प्रथम विघ्न ।
गुरुभक्तीने फेडितां वाचाऋण । ज्ञानाभिमान विघ्न तुटे ॥३२॥
'यथा देवे तथा गुरौ' या श्रुती । समान श्रीगुरु परमात्मभक्ती ।
यास्तव मध्यस्थिती । बोलिली देवें ॥३३॥
अथवा भगवद्भक्तांचें मतीं । एवंविध गीतासंगती ।
भगवद्भक्तिनिष्ठास्थिती । त्रिविध आहे ॥३४॥
कर्ममिश्रा भगवद्भक्ती । प्रथमषट्का आतौती ।
जे समस्त विघ्नाप्रती । निवर्ती क्षणें ॥३५॥

कर्म करून भगवदर्पण । करीत जावे क्षणक्षण ।
येणें देहाभिमान । सहज जाय ॥ ३६॥
मग भगवंताचेनि प्रेमें । होवूं न शकती कर्मे ।
तेव्हां ध्यानचि मनोधर्मे । शुद्ध राहे ॥ ३७॥
ती नुसुधी भक्तिनिष्ठा । मध्यमषट्के बोलिली स्पष्टा ।
तृतीयषट्की वरिष्ठा । ज्ञानमिश्रा ॥ ३८॥
किंचिद् भेदे करितां ध्यान । कितीही प्रेम असतां जाण ।
तरी तो आत्मप्रीतीहून । अधिक न घडे ॥३९॥
हे प्रेमळां न दिसे योग्य । यालागीं निगमकथितांग्य ।
ज्ञान घेवोनि श्लाघ्य । होतीं स्वयें ॥२४०॥
मग ज्ञानीं जी आत्मप्रीती । तीचि प्रेमीं भगवद्भक्ती ।
सच्चिदानंद सहजस्थिती । गीतासंगती बोलिजे ॥४१॥
अथवा कर्म आणि तत्त्यागेंकरून । त्वंपदविवेकनिरूपण ।
प्रथमषट्की संपूर्ण । बोलिले देवे ॥४२॥
द्वितीयषट्कीं भगवद्भक्ती । भगवत्परमानंदस्थिती ।
सांगोनि तत्पदविविक्ती । अवधारिली ॥४३॥
तृतीयषट्की दोहींचे ऐक्य । सांगूनि स्पष्ट केले महावाक्य ।
एथ भाष्यकारमतप्रमाधिक्य । उपेगा आले ॥४४॥
असो हें गीतातत्त्व । जें कैवल्यसाधनपर्व ।
दाखवूनि शास्त्रार्थत्व । बोलिजे आतां ॥४५॥
काम्य निषिद्ध त्यागोन । निष्काम कर्मानुष्ठान ।
हा वैदिकधर्म जाण । परी भगवद् भजन याहून श्रेष्ठ ॥४६॥
निष्काम कर्म हा धर्म । (य१-७३) आणि भगवद्भजन परम धर्म ।
जपस्तोत्रादिकीं पुरुषोत्तम । आळवी प्रेमें ॥४७॥
तिया परमात्मप्रीती । आणि नामस्मरणसंपत्ती ।
चित्तशुद्धी एकाग्रताप्राप्ती । सहज होय ॥४८॥
अनंत जन्माची पापें संचित । ते सकळचि असती अज्ञात ।
त्या सर्वांचे प्रायश्चित्त । घेणे अशक्य ॥ ४९॥
म्हणोनि करावें गंगास्नान । तेणें पापें जळती संपूर्ण ।
ते गंगा चरणांगुष्टीहून । निघाली ज्याच्या ॥ २५०॥
भक्तध्यानीं प्रकटे जेव्हां । गंगा पदनखीं दिसे तेव्हां ।
प्रेमळ भक्तांचिया अनुभवा । मिथ्या न म्हणावे ॥५१॥

त्या प्रभूच्या सर्वांगी नाम व्यापक । तत्स्मरणें कोणते उरेल पातक ।
नामशस्त्रचि संघातक । अनादिकर्मा ॥५२॥
हरिनामीं शक्ती केवढीं । असो परी पापें नाशक जेवढीं ।
पापिया पापकृती करणें तेवढी । ईशसृष्टींत अशक्य ॥५३॥
(शंका) प्रत्यक्ष गंगा-चरण संबंध । आणि नामरूपाचा कल्पित अभेद ।
म्हणोनि गंगे ऐसें प्रसिद्ध । नाम न घडे ॥५४॥
(उत्तर) परी हें बोलणेंचि वायां । गंगेचा व्यक्त संबंध पाया ।
आणि नामाचा अव्यक्तसंबंध रूपा या । अव्यक्तापासुनी ॥५५॥
रूप तें तरी व्यक्त । नाम व्यापक अव्यक्त ।
यास्तव संबंध अखंडित । नामरूपाचा ॥५६॥
नामें तारिली अयोध्या एक । नामें तारिले तिन्ही लोक ।
यास्तव हरीहून अधिक । हरिनाम तें ॥५७॥
(शंका) अहो अग्निशब्द उच्चारितां । जरी असती अग्निऐक्यता ।
तरी मुखाचा दाह होता । उच्चारमात्रें ॥ ५८॥
तैसें शब्दरूप जें नाम । हरिरूप तदैक्य परम ।
मानणें हा भ्रम । स्पष्ट दिसे ॥५९॥
(उत्तर) परी ऐसेंही न म्हणावे । भौतिक सृष्टींत हें ओळखावे ।
अलौकिक सृष्टींत जाणावे । दोन्ही एक ॥ २६०॥
ज्या चिद्वृत्ति रूप सगुण । त्याचि चिद्वृत्ति नाम आपण ।
म्हणोनि ऐक्य सुघटमान । नामरूपाचें ॥६१॥
ऐसी जी मुख्य नामें असती । ती स्मरतां भलत्या रीती ।
भाव असो वा नसो चित्तीं । परी जळती पातकें ॥ ६२॥
आणीक एक समाधान । गंगाहरिसंबंध शास्त्रवचन ।
आणि नाम व्यापक म्हणोन । शास्त्रचि सांगे ॥६३॥
दोन्ही स्थळीं शास्त्रप्रमाणस्थित । परी व्यापकबोधकशास्त्र बळवंत ।
आणि ऐसेचि सांगत आले संत । येणें गुरुवाक्यप्रमाणार्थही फावला ॥६४॥
यास्तव हा दृढ निश्चय । अनंतजन्मपापक्षय ।
नामें झाला मग राहिले होय । सुकृत जे कां ॥६५॥
तें सुकृत करिता भगवदर्पण । (य१-७४) तेणेंचि शुद्ध होय मन ।
या जन्मीं सुकृत न करतांही जाण । नामधारका चित्तशुद्धी ॥६६॥
एकवेळ करितां नामस्मरण । अनादि पापें गेलीं जळोन ।
मग अनादि पुण्य जे राहिलें जाण । तें करितां कृष्णार्पण, चित्तशुद्धी ॥६७॥

(शंका-१) अहो अनादि पुण्य संचित । तें तंव असे अज्ञात ।
भगवदर्पण निश्चित । होईल केवीं ॥६८॥
(शंका-२) आणि तें जरी होते अर्पण । तरी प्रारब्धही करितां येईल समर्पण ।
मग भक्तशरीरपतन । अर्पणक्षणीं होवावे ॥६९॥
(शंका-३) नानाजन्मीं नानाव्यक्ती । कर्म करणार झाल्या असती ।
तितुक्या जन्मीची कर्मसंपत्ती । एक व्यक्ती अर्पे केवीं ॥२७०॥

समाधान - १

हेंही बोलणें वृथा । एकवेळ नाम स्मरतां ।
अज्ञात पातकें जळती तत्वतां । अनंत जन्मीची ॥७१॥
तरी मग प्रेमें अर्पिलें सुकृत । ते जरी असेल अज्ञात ।
तरी अर्पण नोहे एवमुक्त । संघटे के? ॥७२॥
आत्मप्रीतीने पाहतां । नामा एवढाचि प्रेम तत्वतां ।
किंबहुना शास्त्रीं प्रेम ऐक्यता । आत्मभगवंता बोलिली ॥७३॥
म्हणूनि प्रेम सर्वव्यापक । तो वृत्तिरूपें होता देख ।
परी प्रेमवृत्तिज्ञाता जगन्नायक । प्रेमरूप सर्व जाणे ॥७४॥
''यः सर्वज्ञ स सर्वविद् इति । यस्य ज्ञानमयं तपः'' ही श्रुती ।
प्रमाण म्हणुनी परेशाप्रती । अशक्य काय ॥७५॥
प्रेमवृत्तिज्ञ म्हणोनि त्यासी । प्रेमे जें जें अर्पणासी ।
आणिलें तें तें प्रेमेसीं । अर्पिल्या घेतो ॥७६॥
फुलें अर्पितां मुखीं घाली । एवढीं प्रेमळ कौतुकी माउली ।
तरी नानाभवपुण्यसंपत्ति अर्पिलीं । प्रेमें ती कां न घेईल ॥७७॥

समाधान २ -

परी कर्मचि होय भगवदर्पण । फळ तें लागे भोगणं ।
म्हणोनि पुण्य प्रारब्धभिन्न । संचित अर्पण भगवंतीं ॥७८॥
फलोन्मुख झाले नाही तोंवरी । समर्पावे हरिपदा वरी ।
फलोन्मुखी तें निर्धारी । भोगणें पडे ॥७९॥
फलोन्मुख सोडोनि सुकृत । जेवढे असेल संचित ।
तेवढेचि अर्पण निश्चित । अर्पिल्या होय ॥२८०॥
परी किंचित् कर्मही कृष्णार्पण । केलिया होय कोटिगुण ।
तरी अनंत जन्मीचें केलिया अर्पण । चित्तशुद्धी नव्हे कैसी ॥८१॥
परी ऐसें नाम घेतां । चित्तशुद्धी सकळांचे हातां ।

परी दुर्वासना तत्वतां । नाणावी पुन्हा ॥८२॥
नामाचे अपराध दहा । ते न करूनि पहा ।
नाम घेत रहा । जैसे तैसे ॥ ८३॥
[१]नामविश्वासें निंदणें संता ।
[२] दुर्जना नामवैभवकथा ।
[३] रमाकांता आणि उमाकांता । भेदबुद्धी पाहणे ॥८४॥ (य१-७५)
[४] श्रुती स्मृती सद्गुरुवचन । येथ न विश्वासे मन ।
आणि [५] नामें पातकें जळती संपूर्ण । हें स्तावक म्हणणे भ्रांतीस्तव ॥८५॥
[६] नाम आहे आम्हांपाशीं । म्हणोनि निषिद्ध आचरणासी ।
प्रवृत्ति लागली विशेषी । जयाची होय ॥८६॥
[७] जवळी नामस्मरण चांग । मानुनी करी विहित त्याग ।
[८] अन्यदेवता आणि श्रीरंग । यांची नामे समचि म्हणे ॥८७॥
एवं हरिहरमंत्र जपतां । हे अपराधदशक सर्वथा ।
येवों न द्यावे माथां । प्राण गेलियाही ॥८८॥
अपराध चुकवूनि करणें स्मरण । तरीच नामें उजळे मन ।
पातकेंही जळती संपूर्ण । फळ श्रीकृष्ण सांपडे ॥८९॥
मग नाम घेतां घेतां । चिंतित असावे भगवंता ।
अनंत जन्मींचिया सुकृतां । अर्पावे पायीं ॥२९०॥
नानाजन्मी कर्म करतां । एकचि लिंगशरीरी तत्वतां ।
स्थूलशरीरभिन्नता । जन्मजन्म ये ॥९१॥

समाधान ३ -

नानाजन्मीं नानाकर्तृता । तरी कर्मफलयोग होईल वृथा ।
अन्यकर्मभोग अन्याच्या माथां । न घडें कहीं ॥९२॥
देवदत्तें करितां भोजन । विष्णुदत्त तृप्तिसंपन्न ।
हें जगीं कवण । देखिलें नाही ॥९३॥
म्हणोनि जो कर्मकर्ता । तोचि तत्फलभोक्ता ।
यास्तव नानाजन्मी कर्ता । एकचि की ॥९४॥
कर्मकर्त्याचा नाश होत । पुन्हा भोगावया उपजत ।
तरी तो नाश नव्हे निश्चित । लीनावस्था ॥९५॥
पुनरुत्पत्ति जयासी । न्याय प्रेत्यभाव म्हणे तयासी ।
म्हणोनि येथ नाश ऐसी । उक्ती न साहे ॥९६॥
स्थूलशरीरावांचून । लिंग व्यक्त नव्हे जाण ।

कां जे स्थूलशरीरी आपण । लिंग नेणते म्हणोनिया ॥९७॥
नाश होवूनि पुनरुत्पत्ति । मानणें हे गौरवस्थिती ।
अव्यक्त हें लिंगशरीरसंपत्ति । लाघवें सयुक्ती मानणें ॥ ९८॥
आणि आत्मा नाहींसा होत । हा अस्तित्वकाली बांधला सिद्धान्त ।
आत्मभावकालीं तत्प्रतीत । होतसे केवीं ॥२९९॥
(शंका)म्हणाल कीं अस्तित्वकाली आहेपणाचा । तुम्ही सिद्धान्त बांधला साचा ।
जीवंतपणीं म्हणोनि त्याचा । मेलियावरी प्रत्ययो के ॥३००॥
(समाधान) तरी जीवंतपणीं शरीराहून । ममत्वगुणें आत्मा भिन्न ।
षष्टीव्यपदेशें करून । कळे साच ॥१॥
जागृतींत ममत्व या देहीं । स्वप्नीं ममत्व दुसऱ्या ठायीं ।
ते आभास असो परी । ममत्व लवलाही भिन्न हो शके ॥२॥
ममत्वभिन्न अहंता । एवं जीवंतपणीं तत्वतां ।
शरीराहूनि आत्मभिन्नता । सिद्धचि आहे ॥३॥
तोचि प्रत्यय मेलियावरी । राहे ही अनुमिती खरी । (य१-७६)
ममत्वसंबंध होता शरीरी । तो मात्र सुटे ॥४॥
ते ममत्व होवूनि वासना । अहंतारूपें जीव जाणा ।
ऐसी लिंगशरीरघटना । न मोडे कदा ॥५॥
ज्ञाने जरी लिंगशरीर मोडत । तरी वासनाचि एक नाशत ।
अहं ब्रह्म ऐक्य होत । सहजचि जीव ॥६॥
(जीव) अनादि आरोपे वासनेसहित । अविवेक होता मानित ।
तो विवेकें वासना निवृत्त । करोनि स्वस्थ ब्रह्म होय ॥७॥
परी हो कां ज्ञानी अज्ञानी । आत्मनाश नये प्रमाणीं ।
लिंगशरीरासह अज्ञानी । ज्ञानी तद्रहित ॥८॥
ज्ञानी लिंगशरीरभिन्न । हे तंव अनुभवाची खूण ।
परी मेलिया जीव असतो आपण । येथ अनुमान प्रवर्ते ॥९॥
मेलिया असतो हे साच होय । परी आपण तेथ करतो काय ।
इत्यादि विषयीं प्रमाण होय । श्रुतीचि मात्र ॥३१०॥
आणि जे अनुमान । ते भावपदार्थाविषयीं प्रमाण ।
अभाव तंव प्रत्यक्ष जाण । असावा लागतो ॥११॥
भविष्यद्अभावकल्पना । तेही सर्वथा नव्हे जाणा ।
रूपान्तर्गत परमाणुपणा । भावना आणी ॥ १२॥

अथवा अभावांश घेऊन । किंवा नाशक पदार्थ पाहून ।
भविष्यद्अभावकल्पना मन । उपाधीस्तव करी ॥१३॥
तेंवि येथ आत्मनाशक । पदार्थ न दिसे कोणी एक ।
जो पदार्थ शरीरनाशक । तो आत्मनाशक घडेना ॥१४॥
जीवंतपणीं आत्मा भिन्न । हें सिद्धचि सिद्ध जालें म्हणून ।
भविष्यत् आत्माभावकल्पन । न करवे कीरू ॥१५॥
आणि उपाधीवांचून अभावे । प्रत्यक्ष लागेल होवावे ।
कारण विशेषणता-ज्ञाने संभवे । अभावज्ञान यास्तव ॥१६॥
एवं आत्माभावासी अनुमान । काहीं न मिळे म्हणून ।
अस्तित्वकालीं नास्तिक्य कल्पोन । ते अघटमान नास्तित्वकाळीं ॥१७॥
म्हणोनि मेलियावरी आत्माभाव । हे सिद्ध करणेंचि झाले वाव ।
आणि अभावांतुनी आला सावेव । तरी पुन्हा नये येथ प्रमाण कीं ॥१८॥
संयोगाचें फळ म्हणतां । संयोग असे परार्थ ।
संयोगघटकावयवी संयोगभोक्तृत्व । असंभूत ॥१९॥
संयोग भोग्य संयोग भोक्ता । तरी एक झाली भोक्तृभोग्यता ।
तांबूल आणि तांबूलभक्षिता । एक न दिसे ॥३२०॥
वेदांती जरी चैतन्यैक्यता । उपाधींमुळें भोक्तृभोग्यव्यवस्था ।
यास्तव संशय वृथा । आणिता गेला ॥२१॥
आणि संयोगाचे फळ मानिले । तरी संयोग द्रव्यांत पाहिजे पाहिले ।
न तरी सर्वांपासूनि जाहले । पाहिजे सर्व ॥२२॥ (य१-७७)
कार्यघटन संयोगयोग्यता । तेचि संयोगें कार्य तत्वतां ।
आणि संयोग द्रव्यांत मानितां । प्रश्न उठे ॥२३॥
दोन द्रव्यांत एक आत्मा । राहे याची न घडे प्रमा ।
संभूति अथवा अनुमा । कांहींचि नव्हे ॥२४॥
अर्धा आत्मा शोणितांत । अर्धा आत्मा आश्रयी रेत ।
तरी अर्ध अर्ध अहं प्रतीत । न दिसे कांही ॥२५॥
दोन अहंता मिळोन । उपजे एक अहंपण ।
एथ कोणतेंही प्रमाण । प्रवर्तेना ॥२६॥
मायबापाचे अहं मिळून । होय पुत्राचे अहंपण ।
तरी मायबापांतील अहं न्यून । कां न दिसे ॥२७॥
प्रमाणसिद्ध नाहीं । आणि कल्पिजे जरी काहीं ।
'कल्पितानामवस्तुत्वात्' या भाष्यें तेही । निवारिले ॥२८॥(शां.भा.२अ२सू१२-१३)

''प्रमाणाचिया मापा । न सांपडेचि जे बापा ।
तया आणि खपुष्पा । विशेषू कायी'' ॥२९॥ अमृ.
ऐसेंचि श्रीतातवचन । आणि युक्तीनें हेंचि सांगे मन ।
यास्तव झालें अप्रमाण । नास्तिक्य ॥३३०॥
वीर्यरक्तादिस्थ जंतूंचे । अहंपण मिळोनि साचे ।
अहंपण होय पुरुषाचे । तरी हा प्रश्न ॥३१॥
(प्र.१)जंतूंच्या शरीरीं राहून । एक होय अहंपण ।
किंवा (२)जंतु शरीरभिन्न होवून । अहंपण एक होय ॥३२॥
किंवा (३)जंतूंची अहंता । थोडी थोडी तुटोनि तत्वतां ।
होय एक पुरुषाची अहंता । पक्षत्रय हे ॥३३॥
यांतील आद्य स्वीकारितां । तरी जंतुशरीरीं न्यून दिसावी अहंता ।
परी येथ प्रमाणता । नसे कांहीं ॥३४॥
द्वितीयपक्षस्वीकार । केला तंव अहं जैं सोडी शरीर ।
त्या क्षणीं शरीरभिन्न साचार । अहं कैंचा ॥३५॥
क्षण एक शरीरभिन्न अहंता । जरी येत स्वीकारितां ।
तरी मेलियावरी राहे अहंता । हे स्वीकारितां कां नये ॥३६॥
आणि स्वीकारितां तृतीयासी । तरी माझ्यातुनी थोडा अहं गेला ऐसी ।
प्रतीती होय काय जंतूसी । हे तरी सांगा ॥३७॥
हें न कळे जरी । स्वीकारावी कैसी तरी ।
अज्ञेयस्वीकार करणे जरी । अनुमान ज्ञेय तरी कां न घ्यावे ॥३८॥
जंतूसी कळे ही कल्पना । येईल कोण्या प्रमाणा ।
आपणा तंव कळेना । हें सिद्धचि आहे ॥३९॥
एवं पक्षत्रय गेले । पुन्हा संयोगें जरी चैतन्य झाले ।
परी संयोग तोंवरी देखिले । तदीय गुणा ॥३४०॥
येथही संयोगघटित शरीर । तयाचा गुण चैतन्य जर ।
तरी नष्ट न होता शरीर । चैतन्य गुण कां जाय ॥४१॥ (य१-७८)
आणि किंचित राहे गुण । तरी जो जाय निघोन ।
तो द्रव्यपरमाणुवांचून । राहे कोठें ॥४२॥
आणि द्रव्यपरमाणुसहित । जातो हें केलें स्वीकृत ।
तरी परमाणूचे विभाग होती निश्चित । नाश कल्पितां नये ॥४३॥
येणेही आत्मनाश असंभव । प्रत्येक परमाणुगत चिद्भाव ।
तरी जंतुता येईल स्वयमेव । तयांना कीं ॥४४॥

थोडे थोडे अहंपण । हें स्वीकारणें अप्रमाण ।
प्रत्येकाशी पूर्ण अहंपण । तरी मग समष्टि अहंपण कोठें जाय ॥४५॥
काहीं अहं मिळोन । जरी एक होय अहंपण ।
तरी ते परिणाम म्हणोन । एक एक निघोन जावूं न शके ॥४६॥
आणि एक एक निघोनि जातां । तरी प्रत्येकासी भिन्न अहंता ।
येणेंही एका अहंचा तत्वतां । शोध न लगे ॥४७॥
परिणाम तरी स्थूळ झाले । ते जातेवेळी पाहिजे दिसले ।
अदृश्य स्थूळ जरी घेतले । तरी नाश तो कैसा ॥४८॥
आणि द्रव्य सोडोनि गुण देशांतरीं जाये । हे पुष्पावरोनि स्थूल कल्पना ये ।
परी द्रव्य असतां गुणनाश होय । हे कल्पिताही नये कल्पांती ॥४९॥
तैसें शरीद्रव्यापासून । आत्मा जाऊं शकेल निघोन ।
परी नाश पावेल हें बोलण । मानलियाही संयोगगुण न संभवे ॥३५०॥
आणि अहंता भिन्न जोंवरी । पूर्ण संयोग न घडे तोंवरी ।
जैसा पक्षिसमुदाय निर्धारी । तरी प्रत्येक भिन्न होवूं शके ॥५१॥
जंतूंचाही समुदाय । तैसाचि अर्धसम होय ।
स्त्रीपुरुषाचा संयोग होय । अर्धसमचि ॥५२॥
अहंतावत् संयोगिता । तैं प्रत्येक अहंते इच्छाभिन्नता ।
ते पाहिजे तेव्हां तत्वतां । मोकळी होईल ॥५३॥
तैसाहि न दिसे शरीरी । कल्पावें कीं अहं परतंत्रीं ।
वर्तती होवूनि एकाकारी । तैं सत्ता चालविणारी कोण शक्ती ॥५४॥
ते अहंहून जड अज्ञानी असणें । हे सर्वथा न घडे घेणें ।
आणि अहंहून ज्ञानी मानणें । तरी तें ज्ञान स्वतंत्र कैसे ॥५५॥
त्या ज्ञानासीही संयोगजन्यता । तरी दोष पावला अनवस्था ।
एवं आत्मनाश तत्वतां । वदावा केवीं ॥५६॥
अभावांश घेऊन । कीजेल भविष्यद् भावकल्पन ।
तरी अभावांश प्रत्यक्षपण । दिसावे जिता ॥५७॥
थोडा थोडा मी मेलों । म्हणजे नाहींसा थोडा थोडा झालों ।
आतां काहींसा राहिलो । ऐसें कोणा न वाटे ॥ ५८॥
केवळ न दिसे म्हणोन । जरी नाश येईल बोलण ।
तरी बाहेर गेला तो न दिसे म्हणून । मेला कां न म्हणावा ॥५९॥
(य१-७९) दृष्टिसृष्टिवादें तत्वतां । बाहेर गेलिया संभवे मरणता ।
तयाचा अभिप्राय अज्ञात सत्ता । नाहीं ऐसा ॥३६०॥

आपुली आपणा सर्वथा । न सांपडे अज्ञात सत्ता ।
येणेंही आत्मनाशरूपता । कल्पितां नये ॥६१॥
सुषुप्तीतूंनी उठवितां । उठे, सुषुप्तीच इच्छी पुढतां ।
सुखावांचोनि इच्छा तत्वतां । न दिसे कोठें ॥६२॥
आपल्या अभावी सुखभोग । ऐसा नाहीं अनुभव प्रसंग ।
अनुमानाचाही योग । दावावा कोणी ॥६३॥
म्हणून सुषुप्तींत अज्ञातसत्ता । न घडे न घडे सर्वथा ।
येणेंही आत्माभाव कल्पितां । नये आम्हा ॥६४॥
अहो जो बाहेर गेला त्यातें । मी आहे ऐसें कळतें ।
परी तो मेला दुजियाते । दृष्टिसृष्टिवाद ॥६५॥
तरी हाही दृष्टांत । सहजचि असंभूत ।
आत्माभाव कल्पितां निश्चित । आपला अभाव कल्पणें लागे ॥६६॥
कोणीं पुसतां ऐसें । मेल्यावरी तुम्ही रहाल कैसे ।
तरी मी नाहींसा होईल ऐसें । हें अपैसे पडेल सांगणें ॥६७॥
आपुला अभाव साधून । दृष्टिसृष्टिवादें हें अघटमान ।
अन्य वादाचें निराकरण । झालेंचि आहे ॥६८॥
आपुली जे कां उणखुण । तेथ अन्याची क्रिया काय प्रमाण ।
जैसा विष्णुदत्त करितां भोजन । तेणें माझी तृप्ती नव्हें ॥६९॥
एवं प्रमाणसिद्ध आत्मसद्भाव । आणि खपुष्पसमही कल्पितां नये अभाव ।
तरी मग वायफळ सर्व । नास्तिक्यबोल ॥७०॥
शास्त्रीय अनुमानही यासी । न घेतां आत्मनित्यतेसी ।
अकृताभ्यागम कृतप्रणाशासी । प्रसंग येतो ॥७१॥
मग भोजन न करितां । तृप्ती । होवावी तत्वतां ।
कीं मैथुन न करितां । होवावा सुत ॥७२॥
प्यालियाही जीवन । न भागावी तहान ।
केलियाही मैथुन । सुख न व्हावे ॥७३॥
जगांतील सुखदुःखाचा । ठावो न पडे साचा ।
पूर्वोक्त दोषद्वयाचा । स्वीकार केलिया ॥७४॥
कारण तंव मानणें । परी काहीं म्हणणें ।
शास्त्रीय आणि प्रमाणसिद्ध टाकणें । दूरी कां मग?॥७५॥
आणि आग्रहचि पुन्हा । तरी शुद्ध मूर्खपणा ।
मरणीं तरी वायफळपणा । सुटेल हा ॥७६॥

असो नानातर्कता । सुयोगें सिद्ध झालें आतां ।
नानाजन्मीं कर्मकर्ता । एक लिंगशरीरी ॥ ७७॥
(पूर्वपक्ष) अहो कर्मकर्ता एक स्थित । परी पुण्यकर्म जे संचित ।
तें अदृष्टत्वें देवतास्मृतिगत । नाहीं तंत्रांत कर्त्याच्या ॥७८॥
ते केवीं करितां येईल अर्पण । (उ.पक्ष) हाही न घडे परिप्रश्न ।
देवतां संचिताची ठेविती आठवण । परी तदहंपण कर्त्यासीचि ॥७९॥
(य१-८०) आणि सकलदेवतांचा ईश । स्वामी एक परेश ।
तोचि जाणे निःशेष । कर्मसमुदाय ॥३८०॥
म्हणोनि कर्ता अर्पी हरीसी । तो स्वीकारी तयासी ।
तेथें मग देवतांसी । ना न म्हणवे ॥८१॥
एवं भगवन्नाम घेतां । पापें नाशिती सर्वथा ।
आणि सर्वजन्मपुण्य समर्पिता । चित्तशुद्धी होय ॥८२॥
काहीं रहस्यास्तव जाण । केलें ऐसें निरूपण ।
एरव्हीं पाहतां क्रियमाण । भगवत्समर्पण सर्व करिती ॥८३॥
येणेंचि होय चित्तशुद्धी । ध्याने चित्तैकाग्रतासिद्धी ।
नामें पापनाश प्रसिद्धी । सहज होय ॥ ८४॥
परी पश्चात्तापें करावे स्मरण । ऐसेंचि वदे विष्णुपुराण ।
नाम घेतलियावरी जाण । प्रवर्तो नये पापार्थ ॥८५॥
पापें करीतही नाम घेतां । तया पद्मपत्रासम अलिप्तता ।
हे नामस्मरणीं देहविस्मृता । इतरां नव्हे ॥८६॥
(सदुक्तिजोड - चूर्णिकाभेद)
''नाम स्मरतां म्हणुनी आचराल दोष ।
तरी श्रवण मनन भक्ती पडली ओस ॥'' अभंग- एकनाथगाथा
एकनाथवाक्य हें प्रमाण मानिले । ज्ञानेश्वरकरुणे हितार्था आणिलें ॥८७॥
(ओवी) नाममाहात्म्य स्तवितां जाण । नाहीं स्तविले विषयी जन ।
असो एवं भगवद्भजन । करितां मन शुद्ध आणि एकाग्र होय ॥८८॥
वृद्धी पावे जैं एकाग्रता । तैं विषयांवांचोनि आनंद तत्वतां ।
वाटे तेणें विवेकयोग्यता । पावे चित्त ॥८९॥
विषयीं सुख नाहीं । विषय नसतांही आनंद राही ।
सुषुप्तौ विषय नसतांही । आनंद आहे ॥३९०॥
जागृत्प्रपंच नाहीं स्वप्नांत । जागरी स्वप्नप्रपंच नसत ।
दोन्ही प्रपंच सुषुप्तींत । नसती कीरू ॥९१॥

म्हणावा कीं होतां लीन । तरी नवा नवा होय उत्पन्न ।
आत्मैकत्वे एकपण । भ्रांतीने याचे ॥९२॥
आणि अवस्थात्रयीं पाहतां । सद्रूपादिनंद आत्मनित्यता ।
अभिन्न म्हणोनि मेलिया जिता । आत्माचि नित्य ॥९३॥
तो आत्मा परब्रह्म अखंड । इतर प्रपंच अनित्य धोंड ।
ऐसा नित्यानित्यविवेक प्रचंड । उपजे जेव्हां ॥९४॥
मग अनित्य विषयांच्या ठायीं । दोष पाहतां पाहतां पाही ।
दोषसाक्षात्कारबळें होई । रागाभाव जो ॥९५॥
मग 'विषय हा भोगिजे' । ऐसा राग नुपजे ।
कीं 'हा सर्वथा त्यागिजे' । द्वेषही नुपजे हा ॥९६॥
ऐसी ही असतां स्थिती । (य१-८१) परी विषयावीण आनंदवृत्ती ।
या नांव म्हणती । वशीकार वैराग्य ॥९७॥
रक्षणचिंतादि दुःखेकरून । व्याप्त आहे सदा धन ।
कामादि विकारें करून । कामिनी जैसी ॥९८॥
बाल्य चिंतादि दुःखयोगें । दुःखमयत्व पुत्रांगे ।
एवं ऐहिक विषयीं चांग । दोषदर्शन ॥९९॥
यज्ञांत राहूनि ब्रह्मचारी । स्वर्गी रंभादि वेश्या नारी ।
भोगणें घडे, हें फळ निर्धारी । ब्रह्मचर्यपुण्याचें नव्हे ॥४००॥
पंचभूतत्वें पहातां । ब्रह्मलोकींही समानता ।
संयोग-वियोग प्रियाप्रियता । कलहादि साम्यता तैसीच ॥१॥
कोणत्याही लोकींचें स्थूळशरीर । न घेऊनिया साचार ।
लिंगशरीरें तन्मात्र । भोग जो होय ॥२॥
या नांव *वैदेहप्राप्ती । निरावरण होऊनि निश्चिती ।
तेथ जे लिंगशरीरें भोग भोगिती । *प्रकृतिलय म्हणती या नांव ॥३॥
एथ आवरण शब्देंकरून । पौराणिक सप्तावरणग्रहण ।
अविद्यावरणनिरूपण । नाहीं केलें ॥४॥
या आवरणसप्तकापर । प्रकृतिलयगत नर ।
प्रकृतिलयशब्दार्थसार । प्रलय न म्हणावा ॥५॥
सावरण ब्रह्मांडात । लिंगशरीरें भोग भोगित ।
परी ते मलिन विषयप्राप्त । *विदेह म्हणावे ॥६॥
आवरण भेदूनि सप्त । निरावरण स्थित ।
लिंगशरीरें समस्त । भोगिती भोग ॥७॥

तेथ स्वसंकल्पानुसारें विशेषें । निर्मिले कारणोपहितें परेशें ।
ते शुद्धभोग निःशेषें । भोगिती जे ॥८॥
ईश्वरकोटी म्हणिजे तया । ऐसियाही प्रकृतिलया ।
जन्म घडे जावोनि प्रलया । कालान्तरीं ॥९॥
तरी मग विदेहादिकें । ग्रासिली असती दुःखें ।
हें म्हणावया विशेखें । कायसें आलें ॥४१०॥
म्हणोनि दृष्ट येथिचे । स्वर्गादिप्रकृतिलयान्त साचे ।
आनुश्रविक या दोहों विषयांचें । दोषदर्शनें वैराग्य ॥११॥
विषय दोषदर्शनीं यतन । ही वैराग्यभूमी यतमान ।
इतुकीं इंद्रियें जिंकिली जाण । जिंकणें आहे इतुकीं ॥१२॥
या नांव वैराग्य व्यतिरेक । बाह्येंन्द्रियें जिंकिलीं देख ।
यातें एकेंद्रिय संज्ञक । वैराग्य म्हणिजे ॥१३॥
झालिया दोषसाक्षात्कृति । हेयोपादेयशून्या वृत्ति ।
या नांव वशीकार विरक्ती । दृष्टानुश्रविकविषयवितृष्णा ॥१४॥
हेयोपादेयशून्या वृत्ति । रक्षावी म्हणोनि शमादिसंपत्ति ।
संन्यासनिष्ठा यथास्थिती । श्रुती सांगे ॥१५॥
ऐसा सर्वत्यागी होता । साधे मोक्षेच्छादृढता ।
जन्ममृत्युजरादि दुःखता । निपटेल कधीं यापरी ॥१६॥
नंतर सद्गुरुसमीप गमन । (य१-८२) सप्रेमें सेवितां तच्चरण ।
सद्भावें वारंवार नमन । करित मन तन्मय होय ॥१७॥
मग सद्गुरु संतुष्ट जेव्हां । माग म्हणती तेव्हां ।
परिप्रश्न करावा । अतितर विनयें ॥१८॥
तदा महावाक्योपदेश । सद्गुरु करिती सावकाश ।
तोचि दृढ व्हावयास । वेदान्तश्रवणादि कीजे ॥१९॥
तेथ श्रुतिसमन्वयरूप श्रवण । शारीरक प्रथमाध्यायें करून ।
साधक बाधक युक्त्या मनन । द्वितीयाध्याये संभवे ॥४२०॥
ब्रह्माकारवृत्तिकरण । हे तृतीयाध्यायें निदिध्यासन ।
साक्षात्कार निरूपण । चतुर्थाध्यायें ॥२१॥
हें सांप्रदायिक मत । दुसरें ही एक दिसत ।
अध्यायचतुष्टय वेदान्त । श्रवणार्थ घेईजे ॥२२॥
प्रकृतिसत्यता पुरुषबहुता । हे सांख्यांतील सांडोनि तत्वतां ।
अवशिष्ट सांख्य तत्वतां । उपयोग मननीं ॥२३॥

न्यायांतील पदार्थ वेगळे करूनी । अनुकूलयुक्ती घेईजे मननीं ।
श्रुतिविरुद्ध भाग सांडुनी । निदिध्यासनीं योग घ्यावा ॥२४॥
जगत्सत्यता आत्मभिन्नता । आणि विश्वाहूनि ईश्वरान्यता ।
हे त्रय सांख्ययोगीं सोडितां । वेदान्तैक्यता पावती ॥२५॥
श्रुत्यनुकूल युक्त्या मनन । श्रुत्यनुकूल योगें निदिध्यासन ।
तदा चित्तदोष क्षीण । सकळ होती ॥२६॥
मग मी ब्रह्म आहे ऐसी । भूमी उपजे आपैसी ।
समाधिप्रज्ञा म्हणती जियेसी । ती महावाक्येंकरूनि उपजे ॥२७॥
ऐसा ब्रह्मसाक्षात्कार । शब्देंचि उपजे साचार ।
असंभावनादि निवृत्तिकर । बोधदार्ढ्या मात्र मननादि ॥२८॥
द्वैताचें अग्रहण । सुषुप्ती-समाधींत समान ।
परी निद्रेंत बीज अज्ञान । ते समाधींत संपूर्ण क्षीण होय ॥२९॥
गुणाविषयीं वृत्तीं । हेयोपादेयशून्यस्थिती ।
या नांव बोलिजे परविरक्ती । परपुरुषख्याती हेतुगत ॥४३०॥
येणें समाधि संपूर्ण । उदय पावे तत्त्वज्ञान ।
अविद्यानिवृत्ती ही जाण । तेव्हांचि होय ॥३१॥
इचे नांव ब्राह्मी स्थिति । येथ अविस्मरण अविद्यानिवृत्ति ।
द्वैताग्रहण समाधिसंपत्ति । तत्त्वसंविति 'ब्रह्माहमस्मि' ॥३२॥
तेव्हांचि आवरणनिवृत्ति । आणि जगत्सत्यत्वभ्रमनिवृत्ति ।
मोक्षविषयक संशयस्थिती । तेव्हांचि नाशे ॥३३॥
फलोन्मुख नाहीं झालें । ऐसे संचित ज्ञानें नाशिलें ।
अकर्तृत्वपणें निवटिलें । क्रियमाण तें ॥३४॥
प्रारब्ध आहे तोंवरी भोग । बाधितानुवृत्त्या भासे जग ।
(१)योगी म्हणती हा प्रारब्ध भोग । एक्याचि जन्में सांग भोगितां ये ॥३५॥
(य१-८३) (२)प्रारब्ध बहुजन्मसमुच्चित । ऐसें जयांचें मत ।
त्यासीचि हा अपेक्षित । कायव्यूह ॥३६॥
(३)दुसरें योगी म्हणती । एकाचि जन्मापुरती ।
प्रारब्धता सांगे श्रुती । चरमजन्मीं प्राप्ति ज्ञानाची ॥३७॥
(४)यास्तव प्रारब्धे दुःख येती । ते साहणें अचलस्थिती ।
हेंचि योगकार्य निश्चिती । शिवसंहितोक्ती एवं असे ॥३८॥
(५)वैराग्य उपरतीवीण । केवळ जया ज्ञान ।
तया मोक्ष निश्चयें करून । परी दृष्टदुःख न नासे ॥३९॥

(६)जया ज्ञानावीण विरक्त्युपरती । तया पुण्यलोकगती ।
नाहीं नाहीं मोक्षप्राप्ती । कल्पांती ज्ञानावांचूनी ॥४४०॥
(७)यासाठीं विरक्ती उपरती ज्ञान । हे जवळी असावे तीन ।
जीवन्मुक्तिसुख संपूर्ण । तेव्हांचि मिळे ॥४१॥
(८)मनोनाश वासनाक्षय । आणि तत्त्वज्ञानमिति त्रय ।
एकत्र अभ्यासितां होय । जीवन्मुक्ती हें वसिष्ठमत ॥४२॥
(९)ज्ञान जाहलिया वरी निश्चिती । प्रेमें करितां भगवद्भक्ती ।
दृष्टदुःखसहनशक्ती । सुखार्पण भगवंतीं तेंही घडे ॥४३॥
अथवा मुमुक्षुदशाभ्यासें । प्राप्त सद्गुण संस्कारवशें ।
निर्दंभादि जैसे । ज्ञानिया आंगी ॥४४॥
तैसी भक्ति ही नांदे । परी कृत्रिमता न बाधे ।
हें बोलिलें विनोदें । मम हृद्रमणें ॥४४५॥
(१०)आणि शुकाचार्यमत प्रमाण । एवंविध हरीचे गुण ।
जे जीवन्मुक्तांचेंही कर्षिती मन । यास्तव अहैतुक जाण भक्ती घडे ॥४६॥
(११)'भक्ती हा पंचम पुरुषार्थ' । एवं वामनसिद्धांत ।
(१२)भक्तितरूचें फळ भक्तीचि होत । ब्रह्मतनयमत एवंविध ॥४७॥
(१३)'संयोगीं वियोगोपलालन । भक्ती' हें शाण्डिल्यमत जाण ।
येणेंही प्रेमाचें लक्षण । होतसे कीरू ॥४८॥
(१४)द्रवीभूतचिताची । तैलवदविच्छिन्न साची ।
भगवंती भगवद्धर्मप्रेमाची । धारावाहिकता ॥४९॥
या नांव भगवद्भक्ती । श्रीमधुसूदन म्हणती ।
(१५)भेद गेलियाही 'नाथ तवाऽहं' वृत्ती । शांकरमतीं भक्ति ऐसी ॥४५०॥

भक्ति निष्ठा

जीवन्मुक्त जाहलिया जाण । भगवद्भक्तिनिष्ठा उत्पन्न ।
ते मृदु-मध्य-तीव्रतेंकरून । त्रैविध्य पावे ॥५१॥
(१)'तस्यैवाऽहं'' ही मृदु अवस्था । (२)'ममैवाऽसौ' ही मध्य अवस्था ।
(३)'स एवाऽहं' ही तीव्रावस्था । गोपिका प्राप्ता जिये भूमी ॥५२॥
जीवन्मुक्त ज्ञानी भक्त । ममात्मा म्हणे भगवंत ।
प्रेमळा गोपिका ऐसें मत । ज्ञानेश्वर प्रभूचेंही ॥५३॥
(१६)अद्वैतीं अनिर्वाच्य भक्ती । ऐसी श्रीतात-चरणोक्ती ।
जीवन्मुक्ता जेंवि आत्मप्रीती । तेंवि सहज भगवत्प्रीति भक्तिसंज्ञा ॥५४॥
प्रारब्धकर्म विक्षिप्त वासना । (य१-८४) सर्वथा बलवती जाणा ।

संयमें ये नाशपणा । अनुत्थाना शनैः शनैः ॥५५॥
धारणा ध्यान समाधी तीन्ही । अभ्यासितां एकस्थानी ।
संयम सिद्धि पावती मुनी । यमादिपंचकांनी युक्त जे ॥५६॥
भक्ति हा पर्याय
किंवा ईश्वरप्रणिधानबळें । अतितर त्वरित समाधी मिळे ।
एथ भक्तिपर्यायत्वामुळें । बोलिलें ईश्वरप्रणिधान ॥५७॥
येणें प्रणिधाने मनोनाश होय । आणि फावे वासनाक्षय ।
जीवन्मुक्ति दृढ होय । तत्त्वज्ञाने द्वयासह ॥ ५८॥
हेचि व्हावया प्राप्ती । विद्वत्संन्यास सांगे श्रुती ।
जें पूर्वी प्राप्त तद्दृढार्थी । प्रयत्न कीजे ॥ ५९॥
एवं सहजचित्तनिरोधी । साधे सविकल्पसमाधी ।
पुढें असंप्रज्ञातसमाधी । त्रिभूमिक साधे ॥ ४६०॥
स्वतः समाधींतून । प्रथमेंत पावे व्यत्थान ।
द्वितीयेत दुसऱ्याकडोन । व्युत्थान पावे ॥ ६१॥
तृतीयभूमी व्युत्थानरहित । तथापि शिखिध्वजराजवत ।
नियत्या कदाचित् व्युत्थान होत । तरी न मोडत समाधी ॥ ६२॥
आधिकारिक जे कोणी । कल्पारंभ व्युत्थानीं ।
परी ते जीवन्मुक्तपणीं । सुखसमाधिस्थ ॥६३॥
येथ समाधि शब्दार्थ । ध्यातृध्येयैक्यपरमार्थ ।
कीं जीवेश्वरभेद समाप्त । व्युत्थानीही जयाचा ॥ ६४॥
ऐसे आधिकारिक । ज्ञानी भगवदुपासक ।
भक्तीवांचूनि दृष्टदुःख । ज्ञानीही भोगिती ॥६५॥
असो एवढा समाधी प्रचंड । भगवद्भक्तीने लाभे अखंड ।
एवं वदले घेरंड । योगाचार्य मुनी ॥६६॥
ऐसिया पुरुषा श्रुती । भगवद्भक्त म्हणती ।
अतिवर्णाश्रमी ख्याती । याचिया नांवें ॥ ६७॥
हाचि एक ब्रह्मनिष्ठ । हाचि ब्रह्मविद्वरिष्ठ ।
जीवन्मुक्तही हाचि वसिष्ठ । बोलिले कीरू ॥ ६८॥
हा कृतकृत्य म्हणोन । शास्त्राचें नाहीं या प्रयोजन ।
पूर्वोक्तसाधनेकरून । सिद्ध जो झाला ॥६९॥
श्लोक अथवा श्लोकार्धाने । जया ब्रह्मज्ञान होणे ।
तो तृप्त शास्त्रप्रयोजने । मोक्षधर्मवचन यापरी ॥४७०॥

ऐसा क्षीणशास्त्रप्रयोजन । जरी जाहला संपन्न ।
तरी भगवद्भक्ती प्रमाण । आहेचि तया ॥७१॥
जीवन्मुक्तासी भेदभक्ती । नाहीं ही अद्वैतसिद्धयुक्ती ।
एरव्हीं अभेदभगवद्भक्ती । मुक्तांगीं राहे ॥७२॥
''यस्य देवे परा भक्तिर्यथा देवे तथा गुरौ ।
तस्यैते कथिताह्यर्थाः प्रकाश्यन्ते महात्मनः॥'' (य१-८५)
(श्वेताश्वतर उपनिषद्)
या श्रुतिवाक्येंकरून । सर्वावस्थांत भगवद्भजन ।
अखंड असावे उपपन्न । सिद्धान्तभूत ॥ ७३॥
पूर्व पूर्व भूमिगत भक्ती । आणावी उत्तरोत्तर भूमीवरुती ।
अन्यथा दुर्लभ जीवन्मुक्ती । बहुविघ्नप्राप्ती दृष्टदुःखें ॥७४॥
एवं काया वाचा मने । भगवत्प्रियपात्र होणें ।
पूर्वाभ्यासें पावणें । भक्तीचि फळ ॥७५॥
मातें भजतां प्रेमें करून । मी बुद्धियोग दे त्यांकारण ।
जेणें ते मज पावोन । मातेंचि भजती ॥७६॥
अनेकजन्मसंसिद्ध । यत्न न करितां प्रसिद्ध ।
पूर्वाभ्यासें हरिभक्ति शुद्ध । पावे हे विशद प्रभु वदले ॥७७॥
जरी पूर्वजन्मसंस्कारें । अथवा कोणी अचिंत्यप्रकारें ।
स्वयें जो सिद्धत्व पावला बारे । तदर्थ शास्त्रारंभ नाहीं ॥७८॥
आकाशांतोनि फळ पडे । ते जेंवि करीं सांपडे ।
तैसी जया सिद्धता घडे । अचिंत्यहेतु ॥७९॥
तयाही परम सम्यक । भक्ति करणें अहैतुक ।
जो प्रभू गुरुत्वें ज्ञानदायक । चित्ताकर्षक कृष्णत्वें ॥४८०॥
साधने करितां भक्तीविण । भगवत्कृपा अतिकठिण ।
यास्तव मुमुक्षू आपण । भक्तीचि करिती ॥८१॥
पूर्वभूमी सिद्धभक्ती । व्हावया उत्तरभूमिप्राप्ती ।
अखंड साधावी भगवद्भक्ती । अन्यथा स्थिती न बाणे ॥८२॥
न साधेचि भगवत्कृपा । न होय भूमिभाव सोपा ।
जंव भगवत्प्रणय अमूपा । पावले नाहीं ॥ ८३॥
जीवन्मुक्ताप्रति जाणा । भक्तिफळाची नसे कल्पना ।
स्वभावसिद्ध समाधाना । संप्राप्तचि तो ॥८४॥
अद्वेष्टृवादि जैसे । सद्गुण असती आपैसे ।

भगवद्भक्ती ही असे । मुक्ताआंगीं तेंवि ॥८५॥
हे सातवी भूमी तुर्यगा । ब्रह्मविद्वरिष्ठ ब्रह्मरंगा ।
मुकोनि संयोगवियोगा । संप्राप्त जेथ ॥८६॥
आत्माराम जे मुनी । हरिगुणप्रेमेंकरूनी ।
अहैतुक प्रेमपणीं । डुल्लती सदा ॥८७॥
तो ज्ञानी तो जीवन्मुक्त । तो अंतर्निष्ठ तो भक्त ।
तो माझा आत्मा प्रेमभक्त । एवं भगवंत बोलिलें ॥८८॥
ऐसी अकृत्रिम भक्ती । नानास्थळीं यथामती ।
बोधिली शिष्टसंमती । तुष्टावे श्रीपती यास्तव ॥८९॥
राधिका भगवती श्रीकृष्ण कांत । गोपिका सत्संगहृदयैकांत ।
तेथ भक्तितत्त्व अनंत । ज्ञानेश्वरकृपें वसो ॥४९०॥
''कोणी एक अकृत्रिम । भक्तीचें हे वर्म ।
योगज्ञानादिविश्राम । भूमिका हे ॥ ९१।
जाला देवचि भक्तू । ठावचि झाला पंथू ।
होऊनि ठेला एकांतू । विश्वचि हे ॥९२॥
ऐशाही स्वामिभृत्यसंबंधा । लागी उठती श्रद्धा । (य१-८६)
तरी देवोचि नुसुधा । कामवीजे ॥ ९३॥
देव देऊळ परिवारू । कीजे कोरूनि डोंगरू ।
तसा भक्तीचा व्यवहारू । कां न व्हावा ''॥ ९४॥
इत्यादि अनुभवामृत -। वचने सिद्धांतभूत ।
श्रीगुरु ज्ञानेश्वरतात । स्वानंदगत बोलिले ॥९५॥
''पैं जे वानी श्यातुका । तेचि वेगळिये वाला एका ।
तैसा एकदेशिया व्यापका । सरिसा पाडू ॥९६॥
अमृताचिया सागरी । जे लाभे सामर्थ्याची थोरी ।
तेचि दे अमृतलहरी । चुळी घेतलिया''॥ ९७॥
एवं गीताशास्त्रीचें कोड । प्रेमज्ञानरहस्यामृत सुगड ।
श्रीज्ञानेश्वरमाऊली उघड । करूनि पाजी ॥ ९८॥
ती प्रेमामृतोच्छिष्ट पुष्टी । होतां आत्म-ब्रह्मीं सम तुष्टी ।
गुरुभक्तीवांचूनि गोष्टी । दुजी नाहीं ॥९९॥
''नातरी माध्यान्हकाळीं । छाया न दिसे वेगळी ।
असे पायातळीं । रिगोनिया ॥५००॥

तैसें ग्रासूनि दुसरें । स्वरूपीं स्वरूपाकारें ।
आपुलियेपणें उरे । बोधू जो कां ॥१॥
ते ऋणशेष वाचा इया । न फेडवेचि मरूनिया ।.
ते पायां पडूनि मियां । सोडविले''॥२॥
एवं तातोक्ती किती तरी । भक्तिसुखपंकजपरागसुंदरी ।
कृष्णरस रसत्वीं सुकरी । सुधा करी ज्या ॥३॥
श्रीएकनाथगोठी । आत्मसिद्धी देवोनि भेटी ।
तिये आत्मसिद्धीवरी उठी । सद्गुरुभजन ॥५०४॥
''सत् तेंचि चिद् । चित् तेंचि आनंद ।
वस्तु नोहे त्रिविध । एकपद निजांगें'' ॥५०५॥
''मज मध्यें रंगली चित्तवृत्ती । यालागीं विसरला गृहासक्ती ।
त्यासी गृहस्थाश्रमींच माझी प्राप्ती । निश्चयें जाण उद्धवा''॥६॥
''पावावया भक्तिसुख । परब्रह्मीं प्रस्थान'' देख ।
ऐसें अभंगीं सम्यक । तुकाराम बोलिले ॥७॥
एवं श्रुती संताभिप्राय । हें गीतागत तत्त्व होय ।
परी लाभे श्रीज्ञानेश्वरगुरुमाय । स्मरतां प्रेमें ॥८॥
शोकमोहादि असुर । जे दुःखदाते अतिक्रूर ।
ज्ञानभक्तीकरुनि समग्र । निवटिजे ते ॥९॥
येणें दुःखात्यंतनिवृत्ति । आणि अखंडानंदप्राप्ती ।
भक्तीसह जीवन्मुक्ती । उपदेशिली ॥५१०॥
तीही माउली गीता । प्रेमपान्हा पाजी स्वसुता ।
ज्ञानेश्वरकृपात्वें आतां । मातेही फळली ॥११॥
''जय जय वो शुद्धे । उदारे प्रसिद्धे ।
अनवरत आनंदें । वर्षतिये'' ॥१२॥
ही गीतासंगती फुलें । प्रेमसूत्रीं गुंफिले ।
पादुका करुनी वाहिले । ज्ञानेश्वरचरणीं ॥१३॥
आतां विशेष प्रत्यध्यायीं । जे जे असेल कांहीं ।
ते निरूपिजेल सर्वही । 'गीतापदावतरण'ग्रंथीं ॥५१४॥ (य१-८७)
सखे ज्ञानेश्वरमायमाउली । प्रेमें वंदिते पाउलीं ।
करूनि करुणासाउली । जन्मजन्म निजपाउलीं ठेवी ॥५१५॥ (य१-८८)
हरिःॐ तत्सत् श्रीसद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादेन ओवीछंदबद्धा यथाबुद्ध्या

यथाज्ञानेन सन्निर्मितेयं गोपीप्रिय-भगवद्गीतासंगतिः
श्रीमत्सद्गुरुआदिनाथादिमुक्तांतसत्समन्वयरूपश्रीमन्मातृपितृ-
श्रीगुरुदेवश्रीज्ञानेश्वरमाउलीचरणयोस्समर्पणमस्तु ।
॥ श्रीज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥
॥ समाप्तेयं श्रीमद्भगवद्गीतासंगतिः॥
०००

॥ अनेक योगप्रक्रिया असलेला ग्रंथ ॥

६. निदिध्यासनप्रकाशः

॥ पूर्वार्ध ॥

समास १ ला : हरिनाम प्रक्रिया

॥ श्रीमत्सद्गुरु सर्वत्र यशस्वी ज्ञानेश्वरमाउलीसमर्थ ॥
दोहा
श्रीज्ञानेश्वरगुरुसुपद नमु संसारकुठार ।
जें ध्यातां सप्रेम मनिं षडरिसमूहकुठार ॥१॥
चौपाइ
तो परमार्थपटा अधिकारी । इहपरयुवतिवित्तिं अधिकारी ।
जो हरिभक्त विरक्तोपरत । फिरला संकल्पाहुनि परत ॥२॥
शमदमसमाधानभूतदय । श्रद्दधान गुरुविज्ञानोदय ।
ऐसा प्रेमपूर्णशशि शिष्य । यद्हृदयीं करिती हरि लास्य ॥३॥
त्यातें बोधिति सद्गुरुवाणी । ठेवुनि शिरिं करुणामय पाणी ।
झाले जरि भुवनत्रयिं मोठे । तरि सद्गुरुकरुणेविण खोटे ॥४॥
दोहा
समन्वयें श्रवण करि मनन युक्तिअनुकूल ।
निदिध्यासनहेतु गुरु वदति निरोधनमूल ॥५॥ (य१-८९)
चौपाइ

जे निगमकथित अज अविनाशी । यद्ज्ञाने जग कळत विनाशी ।
ते गुरुनाथ हात सुतमाथां । धरुनि वदति जें अमृत अनाथा ॥६॥
दोहा
तदर्थ नानाप्रक्रिया सांगति श्रीगुरुराव ।
ज्यांचें चिंतन सुघटवी शिष्यमनीं चिद्भाव ॥७॥
चौपाइ
श्वेताश्वतरोपनिषद्वाणी । नाडिभेद करुनी जो प्राणी ।
जाय ऊर्ध्व अर्चिरादिमार्गी । तो दृढब्रह्मविलोकविभागी ॥८॥
सकलसुजनमनशांति कराया । एक पुरे मांडुक्यचि राया ।
पादचतुष्टयब्रह्मकथन तें । निवटित दुःख त्रिविध व्यथन तें ॥९॥
वाचक प्रणव वाच्य परमात्मा । जाणुनि तेंचि होय कर्मात्मा ।
वाचकभावभावना चित्ता । वाच्य ब्रह्मसुख मिळत अवित्ता ॥१०॥
एक सौख्य चिन्मयपर आधी । व्यष्टिसमष्टिविभाग उपाधी ।
तीहि अनादि भ्रांति अविनाशी । परि श्रुतिगत बोधकृत विनाशी ॥११॥
दोहा
अज्ञजनांप्रति भोग जशी ज्ञानिजना अपवर्ग ।
मायारूप उपाधि ही जडचेतनसंवर्ग ॥१२॥
चौपाइ
जीवन जेंवि अतरणा बुडवी । तरणा तीरपार परि उडवी ।
तेंवि उपाधिहि अकद अबोधा । देत मुक्ति अक्षय सुविबोधा ॥१३॥
दोहा
अज्ञ उपाधिमध्यगत राहति गुंतुनि फार ।
करुनि ब्रह्मव्यतिरेक बुध जाणुनि तरति सुसार ॥१४॥
चौपाइ
तरि परतीरपार जरि कीजे । तरि-उदरासि जलाश्रय दीजे ।
तेंवि करण यदि ब्रह्मसमाधी । आश्रयिजे तरि प्रथम उपाधी ॥१५॥
नामरूप मायाकृत जाणें । घेउनि ब्रह्म उपासक होणें ।
नाम वाच्य तें ब्रह्म म्हणावे । वाचक नांव प्रणव गुणिं गावें ॥१६॥ (य१-९०)
दोहा
शुद्ध ब्रह्म उपाधिवशें व्यष्टिसमष्टी भेद ।
पावुनि येत उपास्यपणा यापरि बोलत वेद ॥१७॥

प्रथम 'इदंता'भावबळें ब्रह्म-उपासन होय ।
पुढें 'अहं'ग्रह ब्रह्म असे ज्ञानपूर्ण सुखसोय ॥१८॥

ओवी

छांदोग्यगत सगुणोपासना । तेथ इदंता ममोपासना ।
तेचि अहंग्रहरूप वासना । निर्गुणोपासनामय ॥१९॥
यास्तव वाच्यवाचकसहित । चैतन्य चिंतणें उपाधिगत ।
मग उपाधित्यागे गुणरहित । स्थूलारुंधतीदृष्टांत येविषयीं ॥२०॥

चोपाइ

जे महावाक्यलक्ष्यपद पावति । ज्यांच्या हृदिं हरि निर्गुण मावति ।
त्यां नलगे किमपीहि उपासन । जेंवि ज्ञानबळें निर्वासन ॥२१॥
परि जे ऐकुनिही महावाक्य । जाणुं न शकती जीवपर ऐक्य ।
सोडुं न शकति अनात्म उपाधी । त्यांस उपास्तिमुळेंचि समाधि ॥२२॥
यापरि वदति श्रुति मुनि नाना । अगुणोपासन हित सुजनानां ।
ब्राह्मण तें प्रणवानें करिती । अन्य सुजन हरिनामें वरिती ॥२३॥

दोहा

रामकृष्णगोविंद हरिनाम आणि ॐ कार ।
एकरूप मुनि पाहुनि पावति सोहंकार ॥२४॥
व्यष्टिसमष्टिवाचक शब्दमूल ॐकार ।
त्यांत पदें ही तीन परी अकार उकार मकार ॥२५॥

चौपाइ

स्थूलरूप धरितां जें व्यष्टी । चित्तरूप गुणिं तेंचि समष्टी ।
अथवा व्यक्तिजातिदृष्टांतीं । जाणुनि पाव परात्परशांती ॥२६॥

अभंग

घनवस्तुचिया अंतरीं आकाश । मन आकाशास अंतर्बाह्य ॥१॥
देहासी आकाश समष्टिस्वभाव । आकाशा सावेव चित्त तैसें ॥२॥
चित्तासी चैतन्य पाठींपोटीं आहे । प्रक्रिया ही पाहे उत्तम कीं ॥३॥
ज्ञानेश्वर मायबाप कृपावंत । होतां भगवंत निजरूपें ॥२७॥ (य१-९१)

ओवी

नामरूप वाच्यपक्ष । नामें घेऊनि शब्दलक्ष्य ।
रूपीं पाहोनि अर्थलक्ष्य । वाच्यपक्ष सांडावा ॥२८॥
ऐसें करितां नामस्मरण । स्मारका फावे ब्रह्मपण ।

आतां प्रक्रिया नवीन । दुसरी बोलेन ते ऐकें ॥२९॥

चौपाइ

रामकृष्ण हरि सद्गद वाणी । आधिं वदें जोडुनि द्वयपाणी ।
रामकृष्ण गोविंद जिभेसी । जडतां ऐक्य सुचित्तविभेसी ॥३०॥

दोहा

रामकृष्ण गोविंद हरि वैखरिं आधीं होय ।
श्रवण सतत सु-धारणे तैलधारसम सोय ॥३१॥

चौपाइ

वैखरि श्रवण स्नेहसमधारा । पवनमध्यगत वाह सुधारा ।
वैखरि नाम अखंडित चाले । नाम वदत पवनहि मग हाले ॥३२॥
पवननाम सोहं जधिं बोले । श्रवण मनचि तैं होउनि डोले ।
पुढति नाम मन घेउनि राही । मनचि दृष्टिसाक्षिमत पाहीं ॥३३॥
पुनर्नाम केवळ निजसत्ता । तेचि मिळवि परब्रह्मिं अवित्ता ।
नाम स्पष्ट वैखरि मनिं आणा । पवननाम मध्यमा सुजाणा ॥३४॥
नाम मनोमय ते पश्यंती । शेष परा दायक निजशांती ।
एवं वाणिचतुष्कें नाम । जपतां मिळतो आत्माराम ॥३५॥

दोहा

नाम वाच्यगत सांडुनी सत्तालक्ष्य सुजाण ।
ब्रह्मरूप साधक सदा सोडुनि तनुअभिमान ॥३६॥

चौपाइ

यापरि नाम सकळ अधिकारी । परि व्हावा संसृतिअधिकारी ।
पाहुनि एवंविध व्यतिरेका । अन्वय चिंतन सगुण हरी कां ॥३७॥
कनक त्यजुनि कटकाप्रति कोणी । बोलु न शकति कदापिहि वाणी ।
तेंविचि जाणुनि सुख चैतन्य । अन्वय पाहुनि विश्व अनन्य ॥३८॥
सगुणरूप अति प्रीति भजावें । अन्वय चिदानंद उमजावें ।
यावरही जरि कोणि सशंक । तो मजहुनि अतिजडमति रंक ॥३९॥
(य१-९२)

दोहा

एवंविध हरिनामगत ब्रह्मभाव सुखसार ।
सांगुनि श्रुतिगत सांगु पुढें ब्रह्मरूप ॐ कार ॥४०॥
ज्ञानेश्वर गुरु माउली चरणप्रेम अविनाश ।
ज्ञानेश्वर-जप-वन्हिबळें सहज जळे भवपाश ॥४१॥

हरिःॐ 'तत्सदिति' श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे निदिध्यासनप्रकाशे
नानाछंदबद्धे हरिनामप्रक्रिययैव ब्रह्मभावनिरूपणं प्रथमः समासः॥
॥ श्रीज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥
०००

समास २ रा : ॐकार प्रक्रिया

॥ श्रीज्ञानेश्वरमाउलीसमर्थ ॥

दोहा

श्रीज्ञानेश्वर सद्गुरु चिदानंद निजरूप ।
जें अन्वय-व्यतिरेकतया पाहति श्रुतिविद भूप ॥१॥

चौपाइ

तें निजहृदयिं आठवुनि आतां । पुढत पुढति ठेवुनि पदिं माथा ।
पूर्वाध्यायांतर्य विवेका । जाणुनि ब्रह्म पावले जे कां ॥२॥
ते अतिधन्य विधिजनक भक्त । आत्मप्रीतिमय हरि अनुरक्त ।
अन्य तथाविध प्रणवोपासक । लक्ष्यपक्षिं सच्चित्सुखवासक ॥३॥
प्रणवाक्षर संमति व्यतिरेका । करिति तीहि वदुं रीति सुरेखा ।
शब्द अर्थ संबंधि सदाचे । भिन्न अभिन्न भासतिही साचे ॥४॥
विषय, वृत्ति भासति परि भिन्न । परचिंतन करितां चिदभिन्न ।
परि तो भेद उपाधिक जाणे । दृष्टिसृष्टिनें वदति शहाणे ॥५॥

अभंग

वन्हिशब्द आणि वन्हीचा अभेद । व्यर्थ ऐसा वाद बोलणें कीं ॥१॥(य१-९३)
शब्द उच्चारितां जळावें तें तोंड । एवंविध भांड बोलताती ॥२॥
परि ज्ञान-वृत्तीं दिसतो अभेद । दोहोंचाही बोध चिद्रूपत्वें ॥३॥
वन्हीचेंही ज्ञान वन्हिशब्दज्ञान । ज्ञान-ज्ञेयपण शब्दअर्थां ॥४॥
विशेष पाहिजे समाधान चित्तीं । श्रीगीतासंगति पहा तरी ॥५॥
अनुभवें जरी पाहिजेल तृप्ती । ज्ञानेश्वर चित्तीं आठवा हो ॥६॥

चौपाइ

यास्तव चिंतनिं वाच्यवाचकां । एक करूनि करि परव्यतिरेका ।
ज्ञेयरूप जड त्यजुनि उपाधी । अनुच्चार्य अर्थीं सुसमाधी ॥७॥
शब्दअर्थजोडी अनुवृत्ती । या तिहिंची परमार्थि निवृत्ती ।
घेउनि कवणविधी समुपाधी । केंवि चिंतिजे निजअनुपाधी ॥८॥

उत्तर श्रवण करीं तनुजा तें । बोलति मांसमयी तनु जातें ।
तें अर्पुनि जडजीत कलेवर । यदपेक्षें युवतीपतिदेवर ॥९॥
भौतिक सुकृत-विकृतजनि रेतज । योनिज निजभ्रमरूप अरे त्यज ।
स्थूलशरीर जाण हें व्यष्टी । तन्मय श्रेष्ठ विराट समष्टी ॥१०॥
शिर कर नयन सहस्त्र जयाचे । सहस्त्र पद सांगति श्रुति ज्याचे ।
स्थूल विश्व अभिमानि यथा कीं । वैश्वानर वैराज तथा कीं ॥११॥
ऐक्य करुनियां व्यष्टिसमष्टी । वृत्ति 'अ'कार मातृका पुष्टी ।
ध्यान धरुनि चैतन्य तयाचे । सोडि सर्व भवभाव भयाचे ॥१२॥
पुढति 'उ'कार मातृका बरवी । ध्यानें स्थूल तींत हें मुरवी ।
विश्व व्यष्टि अभिमान प्रतापी । तोहि शीघ्र तैजसी प्रविलापी ॥१३॥

ओवी

स्थूलभुक्‌विश्व वैश्वानर । अकारें दोन्हीं अहंकार ।
सृष्टिसहित चिदाकार । करुनि तैजसी प्रविलापी ।१४॥

दोहा

लिंगशरीर व्यष्टि मन कांचनगर्भ समष्टी ।
भोक्ता तैजस भोगही सुप्रविविक्त वितुष्टी ॥१५॥
वर्ण उकार मातृका चिंतुनि सहित अभेद ।
होय मकारीं विलापने सहज लिंगतनुभेद ॥१६॥

चौपाइ

व्यष्टिदेह कारण अभिमानी । प्राज्ञ समष्टि ईश अभिमानी । (१-९४)
भोक्ता प्राज्ञ भोग आनंद । परि व्यष्टि अज्ञान प्रमंद ॥१७॥
जगद्योनि सर्वान्तर्यामी । हा चिन्मय सर्वज्ञहि स्वामी ।
ईश्वर तृप्त सर्वसुखघन कीं । व्याप्तिस्तव संसृतिसंघन कीं ॥१८॥
यास्तव ईश प्राज्ञ या दोहीं । एक करुनि परमामृत दोहीं ।
तूर्यपाद अक्षय ब्रह्माचा । तेथ प्रलाप करि सकलांचा ॥१९॥
होउनि साक्षिस्वरूप रहावें । अन्वय मग ॐकारिं पहावें ।
सांडुनि वाच्यपक्ष मग शेखीं । एकचि चिद्घन पाहिं अनेकीं ॥२०॥
व्यतिरेकें त्यजिलें जें कांही । ज्ञान पुढति ब्रह्मीं तें नाहीं ॥
व्यतिरेकें कारण निर्धारीं । तेंचि कार्यरूपहि अविकारी ॥२१॥
याविधि अन्वयिं ब्रह्मनित्यता । जाणुनि वारिं विभोगचैत्यता ॥
द्वैताद्वैतभाव मग सोडीं । मांडूक्योपनिषद्गत गोडी ॥२२॥

एवंविध जाणुनि सन्नंदन । करि मायामयभाव निकंदन ॥
तो अनुभव एवंविध आहे । स्थूल देह मनमय लवलाहे ॥२३॥
कांचनगर्भस्वरूप विराटू । एवंविध श्रुतिसम्मति पाटु ।
परि तो समष्टि म्हणुनि उपास्य । मुनि वाणी एवं करि लास्य ॥२४॥

दोहा

शून्यरूप मन पाहुनी शून्यज्ञानस्वरूप ।
जाणुनि जीव ईश करि एकभाव चिद्रूप ॥२५॥
स्थूल न्यून अतिव्यष्टि असे तदीय समष्टि विराज ।
दोन्हिहि व्यापी व्यष्टि मन ध्येय ध्यानगुणि साज ॥२६॥

ओवी

कांचनगर्भ चित्तसमष्टी । या दोहींस व्यापी प्राज्ञ व्यष्टी ।
परी उपास्योपासक पुष्टी । वृत्ती तोंवरी विलसतु ॥२७॥
एकचि आनंद सकळां । येथ उत्थानानुमिति सुषुप्तिकळा ।
ज्ञान तरी ती लीळा । परेशाची ॥२८॥
येथ उपास्यता ह्मणोनि सत्त्वगुण । शून्य नोहे हिरण्यगर्भ आपण ।
उपासकतागुण भिन्न । यालागीं शून्य मन हों शके ॥२९॥
स्थूलदेह मनोमय । तो कवणिया गुणें होय ।
विराटदेहही मनोमय । परि उपास्यतया होय सत्त्वस्थिती ॥ ३०॥
मन लिंगतनु शून्यमय । परि शून्य जडतमरूप होय ।
कनकगर्भीं नाहीं तम सोय । यालागीं सत्त्वोदय शांतिरूप ॥३१॥
शून्य नाहीं जडशून्य । शून्यासि व्यापिले चैतन्य ।
(य१-९५) येणे अखंड धन्य । परमेश्वरू ॥३२॥
जीवाची सांपडली लक्ष्यता । वृत्त्या ईश वाच्यपक्षता ।
गेली, यास्तव साक्षिदक्षता । अपरोक्षता संचिली ॥३३॥
हें मांडूक्योपनिषद्ज्ञान । श्रीगौडपादाचार्य आपण ।
कारिकागणीं विस्तरण । बोलिले स्वयें ॥३४॥
त्यांतील निदिध्यासोपयोगी । जियेचा आश्रय करिती योगी ।
तीच प्रक्रिया बोधप्रसंगी । ध्यानालागीं बोलिली ॥३५॥
'इदंता' सहज उपेक्ष्य । 'अहं'वृत्तीचा वाच्यपक्ष ।
त्यागोनि जाणिजे चिल्लक्ष्य । येणेंहि अपरोक्ष फावे ॥३६॥

दोहा

हीहि प्रक्रिया पुढति करूं निरूपण निजकृति साज ।
द्याया अति अवधान, असो सावध श्रोतृसमाज ॥३७॥
ज्ञानेश्वरगुरुपाउलें पावन परम अखंड ।
जन्मजन्म ते हृदयिं धरूं मोडुनि षड्रिपुभंड ॥३८॥

'हरिःॐतत्सत्' इति श्रीनिदिध्यासनप्रकाशे, श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे,
नानाछंदबद्धे, प्रणवोपासनाप्रक्रियाभेद-निरूपणं नाम द्वितीयः समासः॥
॥ श्री सद्गुरुज्ञानेश्वरार्पणमस्तु ॥

समास ३ रा

दृष्टिसृष्टिवाद : अनुभव व भक्ती

॥ श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

दोहा

श्रीज्ञानेश्वरचरणरजीं प्रेमसदव्यभिचार ।
तेणें निवटत सहज मग मायाकृत अभिचार ॥१॥

चौपाइ

ते अधुना कथनार्ह समाजीं । यन्मय सुरमुनिमन महिमा जी ।
अधिगतनिगमरहस्यविचारी ।साधनकृत संप्राप्तहि चारी ॥२॥(य१-९६)
तद्विवेक संसृतिभयहंता । आधि उपेक्षुनि भास्य इदंता ॥
वारुनि मग विपरीत अहंता । ऐक्य करी निजगत भगवंता ॥३॥
जो श्रुतिकथितोत्तम अधिकारी । व्यतिरेकान्वयब्रह्मविचारी ॥
त्याप्रति न लगति फार उपाधी । उण जितुके तितुक्यांत समाधी ॥४॥
प्रथम रज्जुफणिपुच्छनिराकृति । नंतर जाइल सकलहि आकृति ॥
एवंविधविधि न भ्रमनाशा । रज्जुबोध कारण फणिनाशा ॥५॥
यापरि न बहु उपाधिअपेक्षा । एक पुरे परसंवितिशिक्षा ॥
अधिष्ठानचैतन्यनिरीक्षण । गुरुहरिभक्ति करूनि करि रक्षण ॥६॥

दोहा

ब्रह्म सत्य परमार्थतः जग सद्व्यवहृतिभास ॥
स्वप्न रज्जुफणि शुक्तिरजत मृगजल हा प्रतिभास ॥६॥

चौपाइ

जे इतिविध सत्तात्रयवादी । ते स्वीकारिति बहुत उपाधी ॥
ब्रह्मज्ञाननाश्य व्यवहारू । ज्ञानविना प्रतिभापरिहारू ॥७॥

दोहा

व्यावहारिकनिवृत्तये चितिवैशेष्यज्ञान ॥
प्रतिभास निवृत्त करि सामान्याधिष्ठान ॥८॥

चौपाइ

ब्रह्मनाश कालत्रयिं नाही । एवं तत्र अभेदचि पाही ॥
परि जें दृष्टिसृष्टि सिद्धांती । तें उत्तम परमार्थप्रांती ॥९॥
तन्मयसत्ता दोन अनादि । ब्रह्म नित्य, प्रतिभास उपाधी ॥
ज्या बहुविध वादिकृत शंका । स्वप्न दृश्य हरि तदियकलंका ॥१०॥

ओवी

अज्ञात(न) सत्ता जगाची । कल्पांतीं न घडे साची ।
अनुमित सत्ता चेतनाची । निद्रेंतही ज्ञात कीं ॥११॥
जाग्रत्स्वप्न परस्पर । प्रहारेंचि हानिकर ।
नूतन प्रपंच निर्धार । नित्य उपजे ॥१२॥

अभंग

काल ती गर्भिणी आज स्त्रिये बाळ । पाहतो तत्काळ उठोनिया ॥१॥
बालत्वीं तारुण्यीं वृद्धपणीं तनू । भिन्न भिन्न भानू पावे सदा ॥२॥
निद्रेंत हा खेळ तैसाचि मरणीं । बोलले तरणी कृष्णदेव ॥३॥(य१-९७)
ज्ञानेश्वरकृपें कळला तदर्थ । पूर्ण परमार्थ कान्तवाक्य ॥१३॥

श्लोक

देहिनोऽस्मिन् यथा देहे कौमारं यौवनं जरा ॥
तथा देहान्तरप्राप्तिर्धीरस्तत्र न मुह्यति ॥१४॥

अभंग

स्थूल तो दृष्टांत लिंग तो सिद्धांत । दृष्टिसृष्टीं कांत बोलिलेती ॥१॥
कौमार यौवन जरा याचि देहीं । दिसताती पाही जयापरी ॥२॥
तैसे लिंगदेहा देहान्तर प्राप्ती । मोह न पावती ज्ञानी येथें ॥३॥
अथवा स्थूळींच देहांतर भाव । होतसे संभव भूमिभेदें ॥४॥
बीजजागृतादि अज्ञानभूमिका । बोलिल्या सुरेखा वासिष्ठांत ॥५॥
त्यांतीलचि भेद पुनर्जन्म आहे । विरुद्ध ते नोहे स्थूळतया ॥६॥
परि ज्ञानियाही चित्ताचीच सृष्टी । मोक्षधर्मी गोष्टी ऐसी केली ॥७॥
ज्ञानेश्वरतात अमृतानुभवीं । सांगती बरवी हेचि गोठी ॥१५॥

ओवी

कां दाटला डोळा डोळिया । डोळाचि तारा होवूनिया ।

स्फुरे चोख ह्मणोनिया । विस्मो नाहीं ॥१६॥
तैसा जाणणियाचा व्यवहारू । जेथें माखला सुमरू ।
तेथें आणिजे पुरु । अज्ञानाचा ॥ १७॥
यया नांव अज्ञान ऐसें । तरी ज्ञान होवावें तें कैसें ।
एवं अमृतानुभवमिषें । बोलिले तात ॥१८॥

दोहा

परी दृष्टिशब्दार्थ असे वृत्त्युपहित संवित् ।
दृष्टिसृष्टिव्यतिरिक्त स्वयें निगमगम्य परचित् ॥१९॥

ओवी

आणि अविद्येचे आडवे । भुंजीत जीवपणाचे भवे ।
तया चैतन्याच्या या पदें स्वभावे । तातोक्ति जाणावे याच परी ॥२०॥

दोहा

जीव ईश शुचिचेतन जीवेश्वरगतभेद ।
अविद्या चितियोग हे षट्क अनादि सुवेद ॥२१॥

चौपाइ

यापरि बोलति मुनि शुचिबुद्धी । दृष्टिसृष्टिवचनास विरोधी ॥(१-९८)
येईल या परि न करी संशय । स्थायिरूप हा कारणसंचय ॥२२॥
कार्यसृष्टि पळपळ नूतन कीं । चितिसत्ते स्थायी कारण कीं ।
ह्मणुनि बौद्धमतसाम्य न कांहीं । क्षणिक विश्व परि ब्रह्म सदाही ॥२३॥

दोहा

बौद्धमतीं जग क्षणिकभ्रम आणिक शून्यस्वभाव ।
अधिष्ठानविन श्रौतमतीं नाहिं तथाविध भाव ॥२४॥

ओवी

अन्वय या शब्देंकरून । श्रीकृष्ण स्थायी सांगती कारण ।
अश्वत्थ या शब्देंकरून । कार्य सृष्टीपण अनित्यता ॥२५॥
''ध्रुवा द्यौ''रित्यादि श्रुती । जगद्बुद्धी बोधकृति ।
स्वप्नकालवरी स्वप्नप्राप्ती । जगदवाप्ती तैसीच ॥२६॥
भोक्तृभोग्यादि भेद । गुरुशिष्यादि प्रसिद्ध ।
स्वप्नवत् उपपत्ति शुद्ध । सापडे कीरू ॥२७॥
परी वेदवाक्यमीमांसा । ते समस्वप्नवाक्यमीमांसा ।
या शंकेचा वळसा । न घडे कदा ॥२८॥
स्वप्नवाक्यें स्वप्नप्राप्ती । तेणें कदा नोहे जागृती ।

वेदवाक्यें ब्रह्मप्राप्ती । यास्तव दोषापत्ती नसे ॥२९॥
स्वप्नामाजी ओसणतां । जागृतीतूनि हांक मारितां ।
जागा होय तेंवि तत्वतां । श्रुतिवाक्यता ब्रह्म बोधी ॥३०॥
अथवा स्वप्नवाक्येंकरून । वृत्तींत उमटे जागृतज्ञान ।
मी स्वप्नांत आहे कीं या संशयेंकरून । जागा होय तंव जागृती ॥३१॥
तेंवि महावाक्यश्रुती । तेणें उमटे चिद्वृत्ति ।
मिथ्या मानितां अहंकृती । ब्रह्मजागृती स्वयें प्राप्त ॥३२॥
स्वप्नीं राव आराधितां । स्वप्नीचि फळ मिळे तत्वतां ।
तेवि कल्पित ईशता । फलदात्री तत्वतां स्वप्नसम ॥३३॥
स्थायी जरी कां कारण । तरी केंवि निवृत्त करील ज्ञान ।
परी कालत्रयाबाध्य कारण । ऐसा स्थायित्वार्थ नोहे ॥३४॥
ज्ञान नसतां, अनादि अनंत । अनादि परी ज्ञानें नाशे समस्त ।
ह्मणूनि स्थायित्वशब्दार्थ । यावत्कालता ॥३५॥
कारणसहित संसारतरु । असंगशस्त्रें तोडिजे कीरु ।
या परी करुणाकरू । बोलिले पार्था ॥३६॥ (य१-९९)

श्लोक

न रूपमस्येह तथोपलभ्यते नान्तो न चादिर्नच संप्रतिष्ठा ।
अश्वत्थमेनं सुविरूढमूलमसंगशस्त्रेण दृढेन छित्वा ॥३७॥

ओवी

मृत्तिका वेगळी करितां । घटासी रूप नाहीं सर्वथा ।
वाचारंभण-विकारता । मात्र उगी ॥३८॥
तेंवि अज्ञानिया अनादि अनंत । ज्ञानिया न आदि न अंत ।
आणि न हा संप्रतिष्ठित । संसारतरू ॥३९॥
अश्वत्थ म्हणजे कार्यतया अनित्य । सुविरूढमूल म्हणजे यावत्काल नित्य ।
यासी साच मानिती व्रात्य । परि हा सत्यप्रतिभासू ॥४०॥
असंगपुरुषाचें ज्ञान । तें म्हणावे असंगज्ञान ।
''असंगोऽह्यम्'' बृहदारण्य । वचनही ऐसे ॥४१॥
एवं असंगज्ञानशस्त्रेकरुनी । समूल संसारतरू छेदुनी ।
पुनरावृत्तिरहित स्थानीं । मिळिजे पार्था ॥४२॥
अथवा असंगशस्त्र म्हणजे विरक्ती । ऐसाही कोणी अर्थ करिती ।
लक्षुनी पुढील श्लोकोक्ती । परी श्रीपत्यभिप्राय हा नोहे ॥४३॥

कारणसहित तरू छेदावा । ऐसें बोलणें लागले देवा ।
आणि विरक्ती तंव उरवी सत्त्वा । यास्तव कारणभावा ती निवटिना ॥४४॥
म्हणवूनि -असंगज्ञान । येणें कारणसहित तरुच्छेदन ।
पुढील श्लोकांचें एवं प्रयोजन । तेही संपूर्ण ऐकावें ॥४५॥
प्रथम मोक्षांश दुःखनिवृत्ती । ती निरूपण प्रस्तुत श्लोकोक्ती ।
आणि अखंडपरमानंदप्राप्ती । मोक्षद्वितीयांशस्थिती पुढील श्लोकीं ॥४६॥

श्लोक

ततः पदं तत्परिमार्गितव्यं यस्मिन् गता न निर्वतन्ति भूयः।
तमेव चाद्यं पुरुषं प्रपद्ये यतः प्रवृत्तिः प्रसृता पुराणी ॥४७॥

ओवी

ऐसा असंगशस्त्रें छेदिलिया तरू । पुढें धरावा तत्पदाधारू ।
जेथ पावलिया संसारू । न मिळे पुन्हा । ४८॥
जयाचिया सत्ता । ही प्रवृत्ति अनादि प्रसृता ।
प्रवृत्तीतें प्रकृती म्हणतां । तरी आदिपुरुष तत्वतां हाचि कीं ॥४९॥
ऐसी आदिपुरुष प्राप्ती । झालीया नाहीं पुनरावृत्ती ।
तयाचें ज्ञान तें निश्चिती । होय केंवी ॥५०॥
तरी ममैवांश इत्यादि श्लोकें करून । मन इंद्रिय सहकरीं शरीर-ग्रहण ।
त्यातें ज्ञानी पाहती आपण । न पाहो शकती कृतात्मे ॥५१॥
ममैवांश येथुनी निर्धारी । पश्यन्ति ज्ञानचक्षुषा येथवरी ।
त्वंपदविवेक साचारी । बोलिला यत्नकारी योगिया ॥५२॥ (य१-१००)

श्लोक

सर्वस्य चाहं हृदि संनिविष्टो । मत्तः स्मृतिर्ज्ञानमपोहनं च ।
वेदैश्च सर्वैरहमेव वेद्यो । वेदान्तकृद्वेदविदेव चाहम् ॥५३॥

ओवी

ज्ञान म्हणजे जागृती । स्मृती म्हणजे स्वप्न स्थिती ।
जी भावित-स्मर्तव्या योगी म्हणती । आणि अपोहन सुषुप्ती बोलिजे ॥५४॥
ऐसे अवस्थात्रय । मी साक्षी म्हणूनी होय ।
अथवा अन्य अर्थ सोय । आश्रयिजे ॥५५॥
अपोहन म्हणजे तमोगुण । स्मृती म्हणजे रजोगुण ।
ज्ञान म्हणजे सत्त्वगुण । या त्रिगुणा चालन पैं माझे ॥५६॥
किंवा अपोहन म्हणजे अज्ञान । स्मृती म्हणजे जगद्भान ।
ज्ञान म्हणजे ब्रह्मज्ञान । या सर्वां अधिष्ठान मी एक ॥५७॥

अविद्याकाळीं सामान्य चिती । ज्ञानीं विशेषा अधिष्ठानप्रतीती ।
ऐसा मी श्रीपती । सर्वचित्तीं तिष्ठतु ॥५८॥
'सर्वस्य चाहं हृदि संनिवष्टः' येणें । रहस्यें केले बोलणें ।
कीं तत्पदविवेक करणें । निजहृदयींच ॥५९॥
त्वंपदविवेक अपरोक्ष । तत्पदविवेक परोक्ष ।
ऐसें बोलणें वाटे विपक्ष । भगवंतातें ॥६०॥
म्हणवुनी त्वंपदविवेक हृदयी कीजे । मी देह इत्यादि जीव-वाच्य त्यजिजे ।
तैसा तत्पदविवेक अपरोक्ष कीजे । हृदयीं आपुल्या ॥६१॥
सुषुप्तीं संधींत जे प्रेरण । सर्वांचिया हृदयीं म्हणून ।
ईश्वर चैतन्य जाण । सांपडे करी ॥ ६२॥
इदंतावच्छिन्न जगत । जीवाभूता प्रकृती प्रसूत ।
येणें जगत् जीवकल्पित । दृष्टिसृष्टिसिद्धान्त बोलिला ॥६३॥

श्लोक

स्वप्न संभ्रम संकल्प स्वानुभूतिपरंपरा ।
प्रमाणान्यत्र मुख्यानि संबोधाय प्रदीपवत् ॥६४॥

ओवी

स्मृति भ्रान्ति संकल्प स्वप्न । आणि स्वानुभवधारा संपूर्ण ।
राहती अहंवृत्तीधरून । ही मुख्यप्रमाणें म्हणून दृष्टिसृष्टिवादीं ॥६५॥
दीपासारखे प्रकाशक । ज्ञानासी येथूनी आगळीक ।
एवं वसिष्ठमुनी सम्यक । बृहद्वासिष्ठी बोलिले ॥६६॥
अतो जगत् जीवकल्पित । तयाचाचि हाचि अर्थ ।
सर्वाहंता जीवगत । आणि ईश्वरगत प्रेरकता ॥६७॥
अहंतापेक्षेकरून । सामीप्यसंबंधी त्वंपण ।
उद्देशरहितबोध की जाण । इदंपण स्वभावें ॥६८॥ (य१-१०१)
तरी ती उपेक्षुनी इदंता । निरसिजे देहादि अहंता ।
हा त्वंपदविवेक तत्वतां । सिद्धांतगत ॥६९॥
आणि वृत्तिसंध्यादि स्थानीं । उमटे जे प्रेरकपणीं ।
तेथील प्रेरकत्वादि-वाच्य सांडुनी । साक्षिब्रह्म मिळणी तत्पदविवेकू ॥७०॥
ऐसा त्वंपद तत्पद विवेक । पूर्ण जाहलिया देख ।
असिपदार्थ दोन्ही एक । 'क्षेत्रज्ञं चापि मां विद्धि' हा श्लोक येविषयीं ॥७१॥
चैतन्यासी वाच्यलक्ष्यता । दावूनि सांडिजे वाच्यपक्षता ।
लक्ष्य ग्रहण कीजे यथार्थता । तोही श्लोक आतां उपपादूं ॥७२॥

श्लोक

उपद्रष्टानुमन्ता च भर्ता भोक्ता महेश्वरः ।
परमात्मेति चाप्युक्तो देहेऽस्मिन् पुरुषः परः ॥७३॥ गीता

ओवी

तरी ऐके गा पार्था । या देहींच तत्वतां ।
जीव ईश आणि शुद्धता । मिळेल तूतें ॥७४॥
घटाकाश महाकाश जलाकाश । घटींच मिळती सावकाश ।
तेंवि देहींच ब्रह्मादि तिहींस । पाहणें कीरू ॥७५॥
समीपत्वें वृत्तिद्रष्टा । हे ब्रह्मसंविति स्पष्टा ।
साक्षित्वें सुभटा । जाणिजे कीं ॥७६॥
आणि धरूनि अहंता । जैसा यत्न कीजे पंडुसुता ।
तैसा संध्यादिस्थ प्रेरक फलदाता । यालागी अनुमंता बोलिजे ॥७७॥
भोक्ता म्हणिजे जीव । भर्ता म्हणिजे देव ।
अथवा दुसराही भाव । जाणिजे येथ ॥७८॥
उपद्रष्टा अनुमंता । भर्ता आणि भोक्ता ।
इत्यादि धर्म तत्वतां । जीवरूपता ब्रह्मासी ॥७९॥
आणि अपि शब्देंकरून । परमात्माही यासीच बोंलणें ।
अस्मिन् शब्दें जाण । याचि देहीं ॥८०॥
कोणत्याही रज्जुखंडज्ञानें । समग्र सर्पाची निवृत्ति होणें ।
तेंवि स्थूलादितूनी जाणणें । कोणत्याही देहीं अधिष्ठान ॥८१॥
नलगे दूरदेशस्थिती । ही अस्मिन् शब्दार्थानुभूति ।
किंचित् विशद संविति । दाविजेल ॥८२॥
उपद्रष्टृत्वें ब्रह्म । भोक्ता जीव परम ।
भर्ता अनुमंता पुरुषोत्तम । महेश्वर परमात्मा ॥८३॥
तोचि पुरुष पर । म्हणजे वाच्यधर्म सांडुनी साचार ।
लक्ष्यरूपें ब्रह्मजीवेश्वर । सामानाधिकरण्यें ॥८४॥
निर्गुण म्हणजे ब्रह्मस्थिती । गुणभोक्तृ म्हणजे जीवेशसंपत्ती । वाच्य
गुणभोक्तृता सांडुनि लक्ष्यस्थिती । ज्ञेय निश्चिती मुख्यतया ॥८५॥(य१-
१०२)

श्लोक

ज्ञेयं यत्तत्प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वाऽमृतमश्नुते ।

अनादिमत्परं ब्रह्म न सत्तन्नासदुच्यते ॥ गीता. ॥८६॥
जें कार्यरूप नोहे अनित्य । नोहे कारण यावत्कालनित्य ।
अनादिमत् म्हणिजे कालत्रयाबाध्य सत्य । परब्रह्मशब्दार्थे ओळखी ॥८७॥
ब्रह्म जे बोलिले वेदांती । तदन्वय अनादिमत्शब्दार्थी ।
म्हणूनि यथार्थ परमार्थी । अर्थ ऐसा ॥ ८८॥
ऐसें जाणूनि हृदयगत । सहज होइजे अमृत ।
पुनरावृत्तिरहित । आनंदरूप ॥८९॥
एवं तत्त्वमसि वाक्यार्थ । नानाश्लोकीं गीते आंत ।
अर्जुनातें बोलिले कांत । तो ज्ञानेश्वरतातकृपें उघडिला ॥९०॥
तत्त्वमसि ऐसें वचन । आणि अहंब्रह्मास्मि मिळोन ।
पुराणादिकांत सोहं-वचन । सर्ववर्णाकारण बोलिले ॥९१॥
म्हणोनि 'सोहं'शब्दार्थ । गीताश्लोकीं अखंडित ।
सेवावया उचित । सर्व वर्णा ॥९२॥
एवं अधिष्ठानज्ञानेंकरून । प्रपंचनिवृत्ति संपूर्ण ।
मग ब्रह्मभूत जाहलिया आपण । भजिजे भगवान् अन्वयें ॥९३॥

श्लोक -

ब्रह्मभूतः प्रसन्नात्मा न शोचति न कांक्षति ।
समः सर्वेषु भूतेषु मद्भक्तिं लभते पराम् ॥९४॥ गीता.

ओवी -

ब्रह्मभूत प्रसन्न- । या पदें बोलिले आत्मज्ञान ।
'न शोचति न कांक्षति' या पदेंकरून । जगाचें नाहींपण व्यतिरेकी ॥९५॥
'समः सर्वेषु भूतेषु' पदीं इहीं । अन्वय सर्वत्र बोलिला पाही ।
आणि 'मद्भक्तिं लभते परां' शब्दी इहीं । हरिभजनग्वाही बोलिली ॥९६॥
ईश्वरा जरी जीवकल्पितता । तरी अपेक्षेकरूनि तत्वतां ।
म्हणूनि लक्ष्यसमाधींतूनि वृत्ति उठतां । भजनें तत्वता ती दृढ कीजे ॥९७॥
एवं दृष्टिसृष्टिवाद भगवद्भक्ती । समाधि परमानुभूती ।
या अध्यायीं निरूपणरीती । बोलिली आहे ॥९८॥

दोहा

सिद्धसाधकां करणें संधिसमाधि यथार्थ ।
पुढिल समासीं प्रक्रिया भावपूर्ण परमार्थ ॥९९॥
ज्ञानेश्वरकरुणार्णव तत्पदिं प्रेम अगाध । (य१-१०४)
ठेवुनि सुंदर ज्ञानबळें करूं सुस्मृतिभयबाध ॥१००॥

॥ हरिःॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे नानाछंदबद्धे
निदिध्यासनप्रकाशे गीतावासिष्ठादिप्रमाणे दृष्टिसृष्टिवादपूर्वक
शुद्धानुभवरहस्य परमप्रेमलक्षणाभक्तैक्यवर्णनं नाम तृतीयः समासः ॥
॥ श्री ज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥
०००

समास ४ था

भक्तिपूर्वक संधिसमाधि

॥ श्रीज्ञानेश्वरमाउलीसमर्थ ॥

दोहा

ज्ञानेश्वरपदसलिलरुहद्वंद्व अमोद अपार ।
सेवुनि मनोद्विरेफ तूं हो मायातरिपार ॥१॥

चौपाइ

शृणु सुनु वचन मदीय प्रेमें । मुनिगणवृत्ति यथापरि रेमे ।
सांडुनि जगगत विकल प्रमादि । करिं परिवृत्ति प्रयोगसमाधी ॥२॥
'मेयाधीन मान वेदांती । मानीं मेय अन्यमतप्रांतीं' ।
सर्वज्ञात्माचार्य वचन हें । स्वतःप्रमापर युक्तिरचन हें ॥३॥
उपजे प्रमा मान अधि नाही । मानभिन्न अनुभव कहिं नाहीं ।
परि कवण विभु मान प्रकाशी । मानचि किंवा सकल विकाशी ॥४॥
स्वतःप्रकाश मान जरि वदतां । तरि सिद्धांतीं अधिक कुमदता ।
मानभिन्नता स्वयं प्रकाश । तरि विच्छेदक केंवि विकाश ॥५॥
दृष्टाधीना अनुमिति राहे । तेथ केंवि स्वविकाशन आहे ।
प्रत्यक्षहि नानाविध भ्रांती । साक्षिप्रमातृविना बहु भ्रांती ॥६॥
जोंवरि ज्ञानबाधक न कांहीं । तों प्रत्यक्ष सत्यविध पाहीं ।
चित्संविति मायाकृति बाधी । तदा दृष्ट घे जीत समाधीं ॥७॥
दृष्ट विकाशीविधेय विभेदा । चित्संविति निवटित भवभेदा ।
दृष्टें सदृशता जहिं सिद्ध । तैं उमटे उपमान प्रसिद्ध ॥८॥ (य१-१०४)
आप्तदृष्टश्रुत लौकिकवाणी । येत प्रमाणपणास निदानी ।
जीव आप्तसंभव भ्रमिं होणें । मिथ्या म्हणुनि जगद्गत माने ॥९॥
वैदिक शब्द तथाविध नाहीं । ईश्वर आप्त भ्रांत कहिं नाहीं ।
लौकिकशब्द ईशमतिकारी । अनुमानी तो नास्तिक मारी ॥१०।

दुर्मतिनास्तिकमूढअपेक्षा । उत्तम धार्मिकाप्तकृत शिक्षा ।
त्यांचिहि परि श्रुत्यनुकूल दीक्षा । अस्ति न वा करिजे परीक्षा ॥११॥
निगमासहि करि ईश प्रकाश । म्हणुनि मान परकीयप्रकाश ।
हे जगतीं परकीय न कोणी । यास्तव चितिसंविति मनिं मानी ॥१२॥
ती चितिसंविति मेय म्हणावी । मानसिद्धि मेय तों गणावी ।
मानसिद्धि आवश्यक नाहीं । अन्वय कारणकृत परि काहीं ॥१३॥
मेयशब्द मानज परिचयकर । तूं तव त्यजुनि मान चितिचय कर ।
विषय त्यजुनि मन ठेविं समाधी । पाहिं जगति चितिमय नरमाधी ॥१४॥

दोहा

चिति मुनिजनअनुभूतही असे ज्ञात अज्ञात ।
परि तिजविण न सिद्ध कदा जगतिं सजातविजात ॥१५॥
विद्युत्वदनुभूति चिति यदा तदा अज्ञात ।
तीचि जेधवां रविसम कविसंज्ञित विज्ञात ॥१६॥

अभंग

अनुभवावीण जगीं नाहीं कोणी । ब्रह्मरूप आणि विश्व सारे ॥१॥
दार्ढ्यादार्ढ्यभेदमात्र सिद्ध्यासिद्धी । करीं समबुद्धी शिष्यनाथा ॥२॥
विद्युल्लतेसम अज्ञा अनुभूती । जाण ही जागृती आवश्यक ॥३॥
जागृति तें स्वप्न स्वप्न तें जागृती । दृष्टिसृष्टिस्थिती जाणतोसि ॥४॥
सुषुप्तींत ब्रह्म सदंशानुभव । राहे जडभाव म्हणूनियां ॥५॥
सद्रानंद तो संधींत प्रकाशे । समाधींत भासे स्वयंसिद्ध ॥६॥
ज्ञानेश्वरप्रभुकरुणा अगाध । कारण हा बोध सिद्धासिद्धां ॥७॥१७॥

ओवी

साधकेंही करणें समाधी । मी तरेन इया बुद्धी । (य१-१०५)
सिद्धानेंही करणें समाधी । परी क्रीडा प्रारब्धी नको म्हणुनी ॥१८॥
येथे दोहोत संधीचा । उपयोग तसा शुद्ध धीचा ।
तोही ऐकें साधूंचा । प्रकार ताता ॥१९॥
साधक झालिया शुद्धबुद्धी । ध्यानी आणावा परमसंधी ।
वृत्तित्याग होऊनि बोधीं । लागावा समाधी म्हणोनियां ॥२०॥
सिद्धाचें समाधींत चित्त । परी भोजनादिकालीं विक्षिप्त ।
यालागीं अनुसंधान संधिगत । ठेवोनि समाधींत त्वरित जाणे ॥२१॥
यालागी तिहीं करणे ध्यान । आणि भोजनादिसमयीं जाण ।
जरी असलें संध्यनुसंधान । तरी भोजनादि वृत्ति कृष्णार्पण कराव्या ॥२२॥

एवं संधिना समाधिरक्षण । वृत्ती प्रेमें कृष्णार्पण ।
एवं व्युत्थानीं भगवद्भजन । समाधींत निजभजन सुजन करिती ॥२३॥
मग तो संधि वृत्तिगत । अथवा श्वासादिस्थानीं कल्पित ।
वृत्ति भगवद्भक्ति रक्षित । तरी वाक्यलक्षित वृद्धि पावे ॥२४॥
वृत्ति वाचेश्वरीं ठेवितां । संधी लक्ष्य सांपडे तत्वतां ।
एवं न घेता परोक्षता । तत्त्वमपरोक्षता पिंडिं फावे ॥२५॥
आणि वृत्तिवाच्यांश परोक्ष । नसोनि वृत्ति साक्षिपरोक्ष ।
आणि साक्षी तो स्वयमपरोक्ष । म्हणोनि अपरोक्ष भक्ति आणि ज्ञान ॥२६॥
एवं सद्गुरुकृपाप्रसादी । संधिसमाधिप्रक्रिया साधी ।
विशद युक्ति सोपानसिद्धी । अवलोकितां कळतील ॥२७॥

दोहा

ज्ञानेश्वरचरणांबुरुहद्वंद्वसुगंधघ्राण ।
सेवितांचि मग होति सहज प्रियप्रेममय प्राण ॥२८॥ (य१-१०६)

'हरिःॐ तत्सदिति' श्रीनिदिध्यासनप्रकाशे, श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे, नानाछंदबद्धे, भगवद्भक्तिपूर्वकगूढाभिसंधिसमाधियोगो नाम चतुर्थः समासः॥

॥ श्रीसद्गुरुज्ञानेश्वरार्पणमस्तु ॥

०००

समास ५ वा

ज्ञान उपरति विरक्ति भक्ति

॥ श्री ज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

दोहा

श्रीज्ञानेश्वरपादुका मस्तकिं धरुनि अगाध ।
करितां नमन अभेदपणें मायाप्रतिभाबाध ॥१॥

चौपाइ

कर्तृकर्मफलभेद न कांहीं । वासनाचि सकलही पाहीं ।
अहंवृत्ति ती कर्तृपणा ये । गतिवृत्ति ती कर्मपणा ये ॥२॥
फलरूपा परि वृत्ति झगटितां । ज्ञानिजनां चैतन्य सुघटता ।
अज्ञदृष्टिवासना म्हणावी । ज्ञानिदृष्टि ती चितिच गणावी ॥३॥

ओवी

यथा भोजनेच्छा आधीं । ते वासनारूपेंचि पाकसिद्धी ।

वासनारूपेंचि भोजनसिद्धी । पुढती तृप्तिप्रसिद्धी वासनेची ॥४॥
एवं कर्ता, कर्म आणि फळ । येथ वासनाचि केवळ ।
वासनाप्रवाह प्रबळ । लोकत्रयही ॥५॥
आसक्तीमुळे अज्ञानियासी । वासना जाहली निश्चयेसी ।
अनासक्तीमुळें ज्ञानियासी । चैतन्यविशेषीं ऐक्य ॥६॥
परी वासनेचिया भेदे । कर्ता कर्म फळें अशुद्धें ।
मानिताती अबोधें । भ्रांतियोगें ॥७॥
म्हणोनि आसक्त्या भेदवृत्ती । अनासक्त्या अभेदचिती ।
हीही प्रक्रिया धरोनि चित्तीं । निजप्राप्ती । करूनि घे ॥८॥

अभंग

ज्या ज्या प्रक्रियेनें जीवा ब्रह्मज्ञान । होय तीच जाण उत्तम कीं ॥१॥
तीहि नानाविध बोलताति श्रुती । गुरुमुखश्रुतिपरंपरा ॥२॥
उपाधि जो दृढ शिष्याचिया मनीं । जरी सत्त्वगुणी असेल तो ॥३॥
तरि तेथूनीच सद्‌गुरु प्रक्रिया । सांगति उपाया घेऊनीया ॥४॥
म्हणुनिया गुरु शास्त्राहुनी श्रेष्ठ । अनुभवा स्पष्ट आलें ऐसें ॥५॥
ज्ञानेश्वरमायबाप गुरुराणा । वाहिला चरणा जीवभाव ॥९॥ (१-१०७)

ओवी

तैत्तिरीय ब्रह्मानंद भृगुवल्ली । तींत जे प्रक्रिया बोधिली ।
ते पंचकोशविवेकें आली । समन्वया ॥१०॥

अभंग

तीच कीजे निरूपण । श्रोतां व्हावें सावधान ॥१॥
ब्रह्म हृदि गुह्यें आंत । कोशविवेकें कळत ॥२॥
हीच ब्रह्मानंदवल्ली हींत । व्यष्टि ती बोलिली ॥३॥
भृगुवल्लींत समष्टी । परि दोहींची ती पुष्टी ॥४॥
ज्ञानेश्वरकृपाबळें । श्रुतिसमन्वय कळे ॥११॥

ओवी

पितृभुक्तान्नज वीर्य । त्यापासूनि उत्पन्न होय ।
अन्नेचि वाढला जाय । ऐसा अन्नमय देह व्यष्टी ॥१२॥
पृथ्वी म्हणिजे अन्न । तेथून भूतें उत्पन्न ।
पृथ्वीगत अन्नेंचि पालन । पृथ्वींत लय स्थूलाचा ॥१३॥
यास्तव देह अन्नमय व्यष्टी । पृथ्वी त्याची समष्टी ।
त्या समष्टींत लय करूनि व्यष्टी । स्पष्टीकरण करावें ॥१४॥

मग देहाचिया आंत प्राण । जो बळ देवूनि देह करी पूर्ण ।
इंद्रियांचा प्रवर्तक आपण । जडचि परी ॥१५॥
अन्नमयासि आधारू । हा प्राणमय निर्धारू ।
यालागीं अन्नमय साचारू । नव्हें आत्मा ॥१६॥
जन्मापूर्वी न होता । पुढेंही न राहे सर्वथा ।
यालागीं अन्नमय तत्वतां । आत्मा नोहे ॥१७॥
अन्नमय मानितां आत्मा । तरी कृतप्रणाशा अकृताभ्यागमा ।
मानोनि दोषप्रतिमा । होवावें लागेल ॥१८॥
आणि पृथ्वी जो अन्नमय । तियेचाही विकार होय ।
अन्नज विकार म्हणोनि देह । अन्नमय की ॥१९॥
देह अन्नाचा विकार । म्हणोनी अन्नमय साचार ।
आणि अन्न जियेचा विकार । म्हणूनि अन्नमय भूमी ॥२०॥
अवयवांचें परिवर्तन । यालागीं निकें विकारीपण ।
आणि विकारी म्हणतां चेतन । तरी अन्यावस्था नोहें ॥२१।
चैतन्याहूनि भिन्न । तें अवघें जड जाण ।
म्हणोनि अवस्थान्तरें चेतन । विकारी न होय ॥२२॥
भेदद्वंद्वविरोधिता । तरी परस्परानुपयोगिता ।
यालागीं स्वस्वावस्था नित्यता । सोडितां नये ॥२३॥ (य१-१०८)
आणि जडांत जडाचा विकारू । तो ज्ञेयताभेदें गोचरू ।
परी चेतनांत चेतनविकारू । अगोचर ज्ञेयाभावास्तव ॥२४॥
ज्ञेय चेतन अन्वयें होय । तें ज्ञेयता नसोनि ज्ञानचि होय ।
म्हणोनि व्यतिरेकीं ज्ञान पाहें । ज्ञेयाभाव करोनी ॥२५॥
यास्तव विकारी नाहीं आत्मा । आणि अन्नमय व्यष्टिसमष्टि विकारी प्रमा ।
म्हणोनि अन्नमय आत्मा । न म्हणें कदा ॥२६॥
पूर्वोक्त जो व्यष्टिप्राण । तैसा समष्टि वायु आपण ।
व्यष्टीचा समष्टींत लय पाववून । मग जडप्राण संपूर्ण आत्मा न म्हणें ॥२७॥
मन हालवी जेव्हां । शरीरांतील वायु हाले तेव्हां ।
कर व्यजन हालवी जेव्हां । बाह्य वायु तेव्हां हाले ॥२८॥
जडतरू वायूतें हालविति । ऐसी आशंका न घडे निश्चिती ।
जें वायूचि हालवी जडतरूप्रती । म्हणूनिया ॥२९॥
लघूचे गुरुत्वाविरुद्ध गमन । यालागीं वायूचें प्रतिभान ।
तरीं हें न घडे कर हालवी जैं व्यजन ।

किंवा श्वासोश्वास हालवी मन, तेथही अव्याप्ती ॥३०॥
एवं वायूचें स्पंदन । तेथ पाहिजे मनाचें स्फुरण ।
जैसा दुःखियांचा श्वास दिसे आपणा कारण । परी मन न दिसे ॥३१॥
तेंवि बाह्य वायु हालत । तेथही न दिसे चित्त ।
परी दुःखियांचें दुःख जेंवि मनांत । तें हालवीत श्वासाते ॥३२॥
तेंवि येथें समष्टिचित्त । समष्टिवायु हालवीत ।
अन्नमयापेक्षां हेतुभूत । जरी कां भूतां ॥३३॥
तथापि प्राणासि मन । हेतुभूत म्हणोन ।
जड म्हणावा प्राण । की आत्मा ॥३४॥
प्राणाचिया आंत मन । तें संकल्प विकल्प करी गहन ।
विरोधिवृत्तिधारण । क्षणोक्षणीं ॥३५॥
क्षणैक इच्छा क्षणैक तृप्ती । क्षणैक क्रोध क्षणैक शांती ।
एवं म्हणिजे समूळ भ्रांती । विरोधिप्रतित्यारूढ अहंतागुणें ॥३६॥
म्हणोनि आत्मा नव्हे तोही । विरोधिप्रतित्यारूढ अहंताही ।
इदंतारूप पृथङ्निश्चयें बुद्धिही । कर्ता पाही अहंत्वांशें ॥३७॥
कर्ता बुद्धि अंतर्निष्ठ । करण मन तें बहिर्निष्ठ ।
परी म्हणती हृदयनिष्ठ । बहुशः मुनी ॥३८॥

पदार्थ निर्माण

बाह्येंद्रियद्वारा वृत्ती । निघूनी पदार्थाकार स्थिती ।
यास्तव बुद्धिही करण प्रतीती । जरी जाहली ॥३९॥
तरी आधी संकल्पचालन मन । दे तदा बुद्धीचें निर्गमन ।
भंग करी पदार्थावरण । चिदाभासें स्फुरण वस्तूचें ॥४०॥
बुद्धि आवरणभंग करी चितीचा । परी चिदाभासन्यूनत्वें ठावो ये आकृतीचा ।
अहंतागुणें दार्ढ्यभावही तियेचा । परी वस्तुज्ञानभाव साचा साक्षीमुळें॥४१॥
(य१-१०९) एवं संपूर्ण चैतन्य न्यूनत्वानें । आकृतिरूपता घेणें ।
वाचारंभत्वें व्यवहार आणणें । चिदाभासाहंतेने तयासी ॥४२॥
ऐसा हा व्यवहारू । परी साक्षिभास्य प्रतिभाविकारू ।
येथ बाह्यावरणभंगी निश्चयाकारू । बुद्धित्वरूप ॥४३॥
तथापि या मनबुद्धी । अहंकार होवावा आधीं ।
यालागिं हें मनबुद्धी । आत्मा नोहे ॥४४॥
मनोमय आत्मा नाहीं । तैसी बुद्धिही नव्हें काहीं ।

अहंता आणि निश्चयें एकताही । ती अहंताहि सुप्तींत न भासे ॥४५॥
यालागीं अहंताही नोहे आत्मा । एवं व्यर्थ विज्ञानगरिमा ।
आतां आनंदमय महिमा । तोही ऐके ॥४६॥
विषयभासे अथवा वासनारसें । किंचित् स्थिर चित्त बैसे ।
तैं रज जावोनि सत्त्व उमसे । आनंद उल्हसें त्या ठायां ॥४७॥
आनंदवृत्तीही किंचित्काल राहे । पुण्यभोगें शांत होये ।
तरी निद्रारूप लय । सहजें होय सुषुप्तीं ॥४८॥
यास्तव अंतर्मुख वृत्ति । होतां आनंदप्रतीति ।
तो आनंदमय ही आत्मस्थिती । न ह्मणावे कीरू ॥४९॥
परि अंतर्मुखी वृत्ति होतां । तैं तीत आनंदभान होय तत्वतां ।
परी तीसही देवोनि अहंता । राहे अहंता भोक्तृरूपें ॥५०॥
तो भोक्तृभाव उपेक्षून । अंतर्मुख इदंतेचें जाय भोग्यपण ।
मग बिंबभूत आनंद आपण । फावे तो आत्मा ॥५१॥
तो सर्वकाळ तिष्ठत । तया आनंदाचा जो अनुभवो होत ।
तेंचिं चैतन्य अखंडित । आनंदास्तित्व तें नित्यसत्य ॥५२॥
एवं आनंदरूप आनंद । नित्यत्वें सत्य अनुभवें चिद् ।
परी स्वयमनुभवरूप अभेद । यास्तव अनुभव्यरूप नोव्हे ॥५३॥
भाव आनंदमय मिथ्या कळला । वृत्ति जाणिवेनें अभाव कल्पिला ।
त्याही वृत्तीचा साक्षी घेतला । तरी भावाभाव गेला आनंदे ॥५४॥
मानुषानंदापासोनि हिरण्यगर्भावरी । भृगुवल्ली आनंद सांगे अधिकोत्तरीं ।
तथापि ब्रह्मानंदलेशमात्रीं । आनंद ते ॥५५॥
आनंदमयकोश वृत्ती । मानुषानंदादिपरीस निश्चितीं ।
हिरण्यगर्भाची बहुकालस्थिती । राहों शके ॥५६॥
परि व्यष्टि आनंदमय । जेंवि निद्रारूपें पावे लय । तेंवि हिरण्यगर्भ
आनंदवृत्तीस प्रलय । परी ब्रह्मज्ञानें मुक्त होय हिरण्यगर्भ ॥५७॥
आनंदमय कोशही भोगितां । मन ग्रहण करी व्यष्टिदेहा अहंता ।
यालागीं आनंदही भोगितां । न्यूनता राहे ॥५८॥
ह्मणोनि जातां निद्रे आंत । न होय ब्रह्म अनुभूत । (य१-११०)
आपुलिया पूर्णतेवीण निश्चित । परिच्छिन्नता भासे ॥५९॥
हिरण्यगर्भ भोगितां आनंदमयवृत्ति । मीचि आहें सर्वांभूतीं ।
समष्टित्वे पूर्णता चित्तीं । दृढ ऐसी ॥६०॥

यालागी प्रलय होतां । सुटे आनंदमय अवस्था । जाय निघोनी निजवाच्यता ।
परि 'मी पूर्ण' या ज्ञानामुळे लक्ष्यता चैतन्य फावे ॥६१॥
ऐसिये वेळी तोही मुक्त । स्वप्नध्यानें मनही पूर्ण होत ।
आणि लक्ष्यांश घेऊनि मुक्त । व्यष्टित्व असोनिही मन होय ॥६२॥
एवं व्यष्टिसमष्टिकोश । एक पाहोनि निःशेष ।
व्यष्टिउपाधित्यागें शेष । समष्टिउपाधि त्यागूंहि घडे ॥६३॥
एवं 'त्वं'पदें तत्पदविवेक फावे । परी जें अधिष्ठान ब्रह्म स्वभावें ।
ते समानची आघवें । व्यष्टि समष्टितें ॥६४॥
कार्यामुळे व्यष्टिसमष्टि । कारणीं दोन्हीं एके ताटीं ।
संधींत ईश्वर कारणापाठी । यालागी हृदयींच शेवटी विवेक दोन्ही ॥६५॥
ऐसें विवेकीं ब्रह्म फावे । ते जगज्जन्मादिमत्वें तटस्थ स्वभावें ।
आणि स्वरूपता संभवे । सत्यज्ञानानंततया ॥६६॥
तटस्थ लक्षणे जगद्व्यतिरेक । स्वरूप लक्षणे ब्रह्मान्वय देख ।
ते अनुभवरूप भाक । बोलिली आहे ॥६७॥
परि उपाधिसि लावोनि तटस्थलक्षण । उपाधी त्यागोनि घ्यावे उपहितचेतन ।
हें भृगुवल्लीं तील कोशनिरूपण । यतो वा इमानि भूतानि, इत्यादि वाक्यें
॥६८॥
उपाधिसि तटस्थलक्षण न लावितां । उपाधी त्यागोनि घ्यावी चित्ता ।
ही ब्रह्मानंदवल्लिगत ज्ञानशुद्धता । ''तस्माद्वा एतस्मात्'' इत्यादि श्रुत्या
बोलिली ॥६९॥
परि भृगुवल्लीत भूतोत्पत्तिलयें करून । बोलिले आहे तटस्थ लक्षण । आणि
ब्रह्मानंदवल्लीं आकाशाद्युत्पत्ति क्रमेंकरून । तटस्थ लक्षण बोलिले ॥७०॥
आनंदरूपे स्वरूपलक्षण । दोही वल्लींत समसमान । जगज्जन्मादि सोपाधिक
आनंदांतून । निरूपाधिक आनंद जाण अखण्डैकरस ॥७१॥
तैसा दोन्ही वल्लींत देख । बोलिला आहे कोशविवेक । परि ब्रह्मानंदवल्लींत
त्वंपदीय देख । आणि तत्पदीयसम्यक भृगुवल्लींत ॥७२॥
उपाधित्यागें परमार्थप्राप्ती । जेथ न बद्ध न मुमुक्षु न मुक्ती । होऊनि
उपाधीची कल्पितनिवृत्ति । भूषणप्राप्तीची प्राप्ति तेंवि प्राप्त ॥७३॥
यास्तव सोडूनि सकळ उपाधी । जे आत्मानंदप्रसिद्धी ।
तेथचि कीजें समाधी । व्युत्थानीं संधिबुद्धीत यास्तव ॥७४॥
किंवा ती आनंदांतून । प्रथम आनंदमय वृत्ति उठे आपण ।
ती वृत्तीचि होईल जरी श्रीकृष्ण सगुण ।

तरी कुंठितत्वामुळे आनंदघन भक्त होय ॥७५॥ (य१-१११)
एवं ही कोशविविक्ती । करितांहि पाहिजे भगवद्भक्ती ।
मग ज्ञानोपरतिविरक्ती । सहज फावे ॥७६॥
साधनचतुष्टयेकरून । जो सिद्ध जाहला आपण ।
तेणें पावुनियां ज्ञान । पूर्वाभ्यास विरक्ति उपरती रक्षाव्या ॥७७॥
आणि न करितां चारी साधन । अवचितां होय ज्ञान ।
तरी भगवद्भक्तीने अथवा मनोनाश-वासनाक्षये करून ।
विरक्ती उपरति आणिजें अंगी ॥७८॥
ऐसी ज्ञान उपरति विरक्ति । मिळवूनि पावावी जीवन्मुक्ती ।
प्रारब्ध सुखाचे जावे म्हणोनि भक्ती । करावीच कीं ॥७९॥

दोहा

श्री ज्ञानेश्वरचरणकृपें कथिला कोशविवेक ॥
एवमुपाधि निषेध करी चिन्मय जाणुनि एक ॥८०॥ (य१-११२)

'हरिःॐतत्सत्' इति श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे, श्रीनिदिध्यासनप्रकाशे
नानाछंदबद्धे पंचकोश-विवेकद्वारा ज्ञानोपरतिविरक्ति भगवद्भक्त्यादिनिरूपणं
नाम पंचमः समासः॥

॥ श्री ज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु.॥

॥ इति पूर्वार्ध समाप्तः ॥

०००

॥ उत्तरार्ध ॥

समास ६ वा : सत् चित् आनंद

॥ श्रीज्ञानेश्वरमाउलीसमर्थ ॥

पद. करुणास्यवृत्त

अलकावतीपति पाऊलें मनी आठवी मनुजा सदा ।
मग वारितो प्रभू सर्वही भवभाव ज्या परमापदा ॥
गुरुपादुका मुनि सेवुनि बहु पावले अपवर्गही ।
गुरुसेवका न कदाऽकदा जग मोहिनी लय सर्ग ही ॥१॥

चौपाइ

श्रृणु सुनु देशिक उत्तम वाणी । धरूनि अर्थ काया मन वाणी ।
गुरुवचनें भव सकळ गळे हा । षड्रिपुगण तत्काळ पळे हा ॥१॥

दोहा

सद्‌गुरु शब्द यथारिती तथा अर्थ तूं जाण ।
ज्या स्थळिं कुंठे शब्द तिथें अर्थरूप मनि आण ॥२॥
ब्रह्म सच्चिदानंदघन स्वरूपलक्षण एक ।
माया ईश्वर जीव जग भास सर्व अविवेक ॥३॥

चौपाइ

देशाहुनी देशांतरी वृत्ती । जातां देश भाव ये चित्ती ।
चिति शब्द परी चित्तसाक्षि तो । सद्‌गुरुवचनबळेंचि लक्षितो ॥४॥
दृश्य-संधि द्रष्टाचि विकासे । शुद्धधिया तो सकल प्रकाशे ।
वृत्ती अग्रिं चिती दृश्य ह्मणावी । वृत्ती ज्यांत द्रष्टृ ती गणावी ॥५॥

दोहा

चिती तथापी वृत्ती दिसे मायाऽनादी योग ।
मायावशेचि कल्पना तरी त्रिविध अकभोग ॥६॥

चौपाइ

माया पाहिन हे मनी चिंति । तंव माया दर्शनचि भ्रांति ।(य१-११३)
मायाशब्द भेद चिति दावी । माया ज्ञान अभेदचि लावी ॥७॥
वृत्तिसहित जे दृष्यजात की । दृष्टा एक सचेत त्यांत की ।
वृत्तिस जैं वृत्ती न विकाशी । तैं ती वृत्ती जड सुविनाशी ॥८॥
वृत्तिद्रष्टृता भेद न कांहीं । सकलद्रष्टृता एकचि पाही ।
जडचैतन्यभाग मनि कल्पी । अधिष्ठान धरिती मति अल्पी ॥९॥
अधिष्ठान द्रष्टा परमात्मा । चेतनि द्रष्टृरूपचि महात्मा ।
अधिष्ठानभेद कै जडाचा । काय भ्रांतिभावहि अजडाचा ॥१०॥
अधिष्ठान जरि कल्पि जडाला । तरि मग चेतन हेतु उडाला ।
चिदधिष्ठान भिन्न जरि दुसरे । चेतन अधिष्ठान तरि विसरे ॥११॥
अधिष्ठान सेविति भ्रमनाशा । चेतन येई न मग सुविकाशा ।
अधिष्ठान दृष्टा जरि जाणे । अधिष्ठान तरि दृश्य प्रमाणे ॥१२॥
अधिष्ठान दृश्य आणि द्रष्टा । तरिहि संविती भिदाचि स्पष्टा ।
यास्तव अधिष्ठानद्वय त्यागी । चिदधिष्ठान सर्व गुरुमार्गीं ॥१३॥
देशगमन करि वृत्ति जेधवां । वृत्तिभाव करी बाध तेधवां ।
देशमध्य संविती विकाशू । तोचि करी वृत्तीहि प्रकाशू ॥१४॥
ज्ञानपूर्वभानी ती सत्ता । ज्ञान झालिया मग ती चित्ता ।
अविद्याऽनिर्वचन उपाधी । न दिसे आधि न दिसे समाधी ॥१५॥

उपाधींत असतां भ्रम न कळे । भ्रमज्ञान तरि भ्रांतिचि वगळे ।
यास्तव ज्ञानपूर्वप्रतिभानें । सत्ताशब्द तयांप्रति जाणे ॥१६॥
सत्ता जग अखिलहि निर्मी । ज्या स्थानिं नव्हती कांहिच उर्मी ।
जगापूर्वी कारण एकचि ती । परंतु होतीच मिळुनी चिती ॥१७॥

ओवी

वृत्त्याश्रय अपरोक्षता । तथापि प्रमाणें परोक्षता ।
आधी जाणोनि सत्ता । मग ज्ञानें चित्ता ओळखिजे ॥१८॥

अभंग

हेचि सत्ता गूढ निजपुत्र मनी । आदेश ह्मणुनी मुनी सांगे ॥१॥
उद्यालकनामा श्वेतकेतुलागी । सुंदर छांदोग्यीं कथन हें ॥२॥
मृत्तिकेच्या पिण्डें मृण्मयकार्याचें । ज्ञान होय साचें जया परी ॥३॥
कारणाच्या ज्ञानें कार्याचेही ज्ञान । साच तें कारण जगापूर्वी ॥४॥
(य१-११४) कार्य तें सदसद्‌विलक्षण आहे । ज्ञानेश्वर लाहे विचारितां ॥५॥

ओवी

कार्य उपादानाऽभिन्न । घट जेवीं मृदभिन्न ।
तेंवीं जगत् सदभिन्न । जाहलें निके ॥१९॥

गद्य

शंका :- ननु या स्थळीं प्रथम सत् सिद्ध करावयाचें असल्यामुळें पदार्थाच्या ज्ञानाहून सत्ताज्ञान, सत्तेचें कारणत्वबोधन करण्याकरतां, पृथक्‌त्वें करून निर्दिष्ट केलें पाहिजे. ''कारणं व्यतिरेकेण पुमानादौ विलोकयेत् '' इत्यादि वचनेंकरून यद्यपि कार्यव्यतिरिक्त कारणज्ञान कारणपदार्थत्वें करून न घेतलें तर ज्ञातृअनुस्यूतता त्याचे ठिकाणीं प्राप्त होईल, म्हणून ज्ञातृसिद्धीनेंच ज्ञेयाची सिद्धि होऊं पाहील. ही चिदभिन्न-सत्ता, ज्ञानेंकरून सिद्ध असल्यामुळे प्रश्न संभवत नाही; तथापि, प्रथम सत् परिस्थापनीय असल्यामुळे आदौ कार्यव्यतिरेक केला पाहिजे; आणि कार्यव्यतिरेक करतांना सत्‌ज्ञान सिद्ध होतें असें दिसत नाही; कारण - कार्याहून बुद्धी पृथक झाली म्हणजे ज्ञात्यासी न मिळूं देतां पाहिलें तर, सा शून्याऽरोहिणी होतें. ह्याचें आकाश उदाहरण आहे.

समाधान :- ही शंका घडत नाहीं; कारण कार्याचा त्याग केला असतां बुद्धीत आकाशाचें आरोहण तूं बोलिलास, आणि तें शून्यमय बोलिलास; तर आम्ही असें विचारितो कीं, आकाशाचें जे आरोहण बुद्धीचे ठायीं होते तें शब्दगुणानुमेयरूपें करून होतें? किंवा अवकाशमात्ररूपें करून होते?

आद्ये सति, आकाशाला इंद्रियगोचरत्व प्राप्त होईल; आणि द्रव्य गुणांचा

समवाय संबंध असल्यामुळें गुणाची व्याप्ती द्रव्याचें ठिकाणीं उदाहरण पक्षावयवीय संभवणार नाहीं. म्हणून आकाशाला इंद्रियगोचरत्व प्राप्त झालें असतां कार्यत्वेंकरून आकाशाचें निराकरण करणें अवश्य लागेल; आणि तें न केले तर कार्यत्यागाची शंका घडणार नाहीं.

आणि द्वितीयपक्ष स्वीकार करशील तर, अवकाशाचें ज्ञान कार्यसापेक्षें-करून होते? किंवा स्वयं होते? पहिल्या पक्षी कार्याच्या अभावाने अपेक्षा मानितोस किंवा कार्याच्या भेदानें अपेक्षा मानितोस? (य१-११५)

प्रथम पक्ष मानिला तर, कोणत्या कार्याऽभावानें आकाशारोहणसिद्धी मानितोस? ध्वंसाभावानें सिद्धी मानणें अशक्य आहे; कारण ध्वंस झाला असतांना, ध्वंसाभावासहित जें बुद्धीत आकाशाचे आरोहण होतें, त्यांत आकाशाचें ध्वंसाभाव पार्थक्यें करून ज्ञान झालें पाहिजे; आणि तसें मानिलें तर आकाशाचे दुसरे अभावाहून स्वयंज्ञान मानिले पाहिजे. हा दोष येऊं नये म्हणून ध्वंसाभावस्वरूप आकाशारोहण मानलें तर, प्रतियोगी ज्ञानावांचून ध्वंसज्ञान होणे अशक्य आहे.

यद्यपि वेदांतामध्यें 'अनुपलब्धि'प्रमाणेंकरून अभावाचें ज्ञान मानिलें आहे. न्यायाचे ठायी 'अनुपलब्धि'प्रमाणाचा अंगीकार नाहीं; तथापि अभावाचें ज्ञान अनुपलब्धि-प्रमाणनिष्ठ आहे; परंतु अमुक पदार्थाचा ध्वंस इत्यादि ज्ञानाचे ठायीं, अमुक पदार्थाची सत्ता ह्या ठिकाणीं प्रचलित आहे किंवा नाही, ह्या संशयाची जेव्हां अभावज्ञानें करून निवृत्ती होते, तदा तत्पदार्थक-विशेषसत्तेचें निराकरण प्रतियोगिज्ञानानें होऊन, मनोमय त्याचें अस्तित्व असते; परंतु स्थानाद्यपेक्षी योग्यानुपलंभतेमुळे अनुपलब्धिप्रमाणजन्य अभावज्ञान मानिलें असल्यामुळें, न्यायाचा आणि वेदांताचा विरोध नाही;

येणेकरूनच हें एक सिद्ध झालें की मनोमय पदार्थाचा व ध्वंसाभावाचा विरोध नाही; म्हणजे प्रकाशाकार वृत्ती जशी तमाच्या वेळी प्रकाशाकार न राहून तमाकार होते, किंवा शांतीचेवेळीं क्रोधाकार वृत्ती न राहून शांत्याकार होते, तद्वत् या स्थली विरोधी वृत्तिभवन होत नाही; किंतु मनोमय प्रतियोगिज्ञान आणि अनुपलब्धिप्रमाणजन्य ध्वंसज्ञान या युग्माकार वृत्तीची एकसमयावच्छेदें करून प्रतीती होते; म्हणून ध्वंसाभावस्वरूपी आकाशारोहण मानिलें तर तत्सहकारी मनोमय कार्य प्रतियोगी ज्ञान अवश्य मानावें लागेल. आणि मग भाव व अभाव एकेकालींच असण्याचा प्रसंग येईल. आणि तदा भेदपरिचायक सत्ता ध्वंसरूप आकाशाहून आणि भावरूपप्रतियोग्याकारतावृत्तीहून प्रत्यय-बलेंकरून पृथक् मानावी लागेल. आणि मनोमयत्वें करून कार्यप्रत्यय असल्यामुळे कार्याचा त्याग म्हणूनही घडणार नाही. प्रागभावें करून जर आकाशाचें आरोहण

मानिलें तर, कार्योत्पत्तीच्या पूर्वीच ते (य१-११६) मानावें लागत असल्यामुळें, कार्योत्पत्ति त्या नंतर प्रतीत जी प्रागभावानुमेयता, तिला प्रतियोगिज्ञानाची आवश्यकता असल्यामुळे गोचरत्वें करून कार्याचें ज्ञान झाल्यावांचून अभावज्ञानकालीं प्रतियोगिज्ञानसहकारितेविषयीं प्रत्यय नसल्यामुळें, प्रागभावाची सिद्धीच होणें आधी कठीण आहे; आणि उत्पत्त्यनंतर अनुमित प्रागभावाचा व्यतिरेककरणकालीं कांही उपयोग होणार नाहीं. कारण उत्पन्न-कार्याचा विनाश होतांना प्रागभावांचें ज्ञान नसून ध्वंसाभावाचेंच ज्ञान होते. ध्वंसाभावाचें निराकरण पूर्वी केलें असल्यामुळे शंकेचें पुनरुत्थान घटत नाहीं.

आतां कार्यापूर्वीं कार्यव्यतिरेक मानणें अशक्य आहे; कारण कार्यापूर्वी कार्यव्यतिरेक मानला तर अग्री अभावापासूनच कार्योत्पत्ति मानण्याचा प्रसंग येईल आणि अभाव सर्वत्र सुलभ असल्यामुळें सर्वत्र सर्वसंभवापत्ती होईल.

अत्यंताभावाची सर्वत्र सुलभता असल्यामुळें सर्वत्र सर्वसंभवापत्ती प्रागभावाचें ठायीं येत नाहीं; – असें कोणी म्हणेल तर तें असंबद्ध आहे. कारण प्रतियोगीच्या भेदावांचून अभावाचा भेद मानता येत नाही; आणि प्रतियोगीचा भेद मानण्याकरितां प्रतियोगीचें ज्ञान अवश्य पाहिजे. प्रतियोगीचे ज्ञान कार्योत्पत्तीनंतरच होऊ शकते. कार्योत्पत्ती नंतरच्या ज्ञानावरून प्रागभावाच्या उपयोगाचें पूर्वी खंडन केलें असल्यामुळे, प्रतियोगिज्ञानाची या स्थलीं उपयोगिता होत नाहीं, म्हणून विनाप्रतियोगिज्ञान कार्यापूर्वी प्रागभाव आणि अत्यंताभावाची एकताच प्रतीत होत असल्यामुळें अत्यंताभावसौलभ्यवत् प्रागभावही सुलभ मानणें भाग पडते.

कार्योत्पत्तीवाचूनच कार्याच्या पूर्वी योग बलानें भविष्यदुत्पन्नकार्याचें प्रतियोगिज्ञान मानून प्रागभावाचा भेद मानिला असतां सत्कार्यवादाचा प्रसंग येईल. अभावापासून कार्योत्पत्ति मानता यावयाची नाहीं.

आणि योगियाची वृत्ती अभावकार्यगोचर असतें, असें म्हटले तर मग निद्रेंतही योगियाला कार्य दिसले पाहिजे. कारण,

'अभावप्रत्ययाऽवलंबना वृत्तिर्निद्रा'

असा योग शास्त्राचा सिद्धांत आहे. आणि निद्रेत कार्य दिसेल तर निद्रा संभवणार नाही. किंबहुना ज्या ज्या ठिकाणी अभाव त्या त्या ठिकाणीं योगियाला कार्य दिसण्याचा संभव होईल आणि तसें झालें (य१-११७) म्हणजे मोक्षाचे ठिकाणीं योगियाला दिसणारा जो बंधाभाव, त्या ठिकाणीं बंधच अवश्य दिसेल. आणि तसें झाले म्हणजे योगाचें मोक्षरूप प्रयोजन संभवणार नाही. मग प्रयोजनाभावी योगाकडे कोणाची प्रवृत्ति न झाल्यामुळें, पुरुषाचे ठिकाणीं योगवृत्तीच

उत्पन्न होणें शक्य होणार नाहीं; म्हणून योगवृत्तीनें भविष्यदुत्पन्नकार्यरूप प्रतियोगिज्ञानेंकरून 'कार्योपत्तेः प्राक्, प्रागभाव अत्यंताभावाचा भेद' सिद्ध होत नाहीं. अतः अत्यंताभाववत् प्रागभावाची सुलभता सिद्ध होते.

शिवाय प्रतियोगिज्ञान प्रागभावकालीं मानिलें असतां, मनोमय तदाकारता राहिल्यामुळें, भविष्यत्कालाचा व वर्तमानकाळाचा मनोमयत्वें करून तरी ऐककालिक प्रसंग येईल. हें अंगीकारिलें तर, पूर्वोक्त सर्व दोष येतात.

आतां अत्यंताभावस्वरूपानें आकाशाचें आरोहण मानशील तर, शशशृंगादिकांचें जसें कोणत्याच रूपानें ज्ञान होत नाहीं, किंवा विकल्पपक्षीं संबंधवस्तुत्वज्ञान होत नाही, तद्वत् आकाशाचें ज्ञानच न झालें पाहिजे.

''सर्वथा अज्ञात वस्तु ग्रहण करून शंका होत नाहीं, किंतु किंचित् ज्ञान ग्रहण करून, संपूर्ण ज्ञान होण्यासाठीं, उतावेळ वृत्तीनें शंका होत असते''- म्हणून आकाशारोहण शंकाच तुझी संभवत नाही. अन्योन्याभाव स्वरूप आकाशाचे आरोहण मानशील तर, कार्याचा भेद अवश्य चित्तांत राहिल्यामुळें, कार्यविशेषेकरून, किंवा कार्यज्ञानेंकरून कार्यव्यतिरेकच संभवणार नाहीं.

शिवाय 'अन्योन्याभाव' परस्परनिष्ठ असतो म्हणून, संधिस्थानी केलेली जी आकाशाची कल्पना, तिला अभावरूप म्हटलें तरी, जातिज्ञानें करून ती मिश्र राहील, म्हणजे,

(आकाश) '''विशेषाभावाऽवच्छिन्नं भावसामान्यं सद्वृत्तिगोचरमाकाशम्''

असें लक्षण होईल. आणि तसें झालें म्हणजे आकाशाला कार्यत्वच येते. कारण, आकाशाची आनंतरिक कल्पना ठरते म्हणून. किंवा कार्यव्यतिरेकेण कारण तरी निदान पाहतां येत नाही.

अतः, प्रथम पक्षांतर्गत द्वितीय पक्ष खंडित आहे. म्हणून कार्यसापेक्षी आकाशारोहण बुद्धींत होते, हा प्रथम पक्ष बरोबर नाहीं.

द्वितीय पक्ष स्वीकारला तर, आकाशारोहणाचें स्वयं ज्ञान असद्रूपानें होते? किंवा सद्रूपानें होते?

प्रथम पक्ष स्वीकारला तर, कार्य-असद्रूपानें होते? किंवा स्व-असद्रूपानें होते? 'स्व' शब्द येथें आकाशनिष्ठ आहे. (य१-११८) आद्ये, कार्याऽसत्तेचें पूर्वी निराकरण केलें आहे.

द्वितीये, स्वाऽसत्ता, प्रतियोगी ज्ञानावांचून संभवत नसल्यामुळे, आकाशाचें प्रतियोगी ज्ञान अवश्य मानावें लागेल आणि आकाशाचा अत्यंताभावच मानला तर, पूर्वी अत्यंताभावखंडनप्रसंगी सांगितलेले दोष पुनः सर्व येतात; म्हणून प्रथम पक्ष असंबद्ध आहे.

द्वितीय पक्षाचा स्वीकार केला तर, आमचा सिद्धांत गळी आला. कारण, कार्याचा व्यतिरेक केला असतांना, सताचें बुद्धींत आरोहण होतें, असेंच आमचें म्हणणें आहे. तुझ्या बुद्धींत कार्यसापेक्ष आकाशाचें जसें आरोहण होते, किंवा, शून्य नसूनही, शून्यवत्तेचें आरोहण होते, तसें आकाशाचें निराकरण करून सताचें कां आरोहण होत नाहीं? असें स्वामी विद्यारण्याचार्यानीही 'भूतविवेक' ग्रंथांत म्हटलें आहे. म्हणून कार्यव्यतिरेके करून पृथिव्यादिभूतांपासून सत्ता निराळी काढली असतां, तीं सर्व निस्तत्त्वरूप मिथ्या राहतात. शून्य हे ज्ञानरूप नसलें पाहिजे.

शून्याचें ज्ञान होतें, असें मानिलें तर, शरीराद्यपेक्षेंकरून जरी ज्ञान-ज्ञेयाचा भेद दिसतो, तथापि, ज्ञानमय ज्ञाततत्त्वालाच ज्ञेययोग्यता असल्यामुळे, शून्य ज्ञेय होत नाही; म्हणून शून्यज्ञान केव्हांच होत नाहीं.

अतो, बुद्धींत सताचेंच आरोहण होते. तीव्रभावनाज्ञानानें, योग्यवृत्तीनें, स्वप्नदृष्टान्तादिकानें, अध्यासवादानें, आणि कार्यारोपित धर्मज्ञानानें, सताचें ठायीं कारणता सिद्ध होते.

हें कार्य सताहून भिन्न किंवा अभिन्न आहे? किंवा उभयात्मक आहे? हें तीन्हीं पक्ष संभवत नाहींत. कारण,

* भिन्न मानिलें तर, सद्रूप आहे किंवा असद्रूप आहे?

* असद्रूप मानिलें तर, कारणसत्तेनें त्याला सत्ता आहे किंवा कार्यसत्तेनें सत्ता आहे?

* कारणसत्तेनें सत्ता मानली तर सत्तारूपानें भेद संभवणार नाही. आणि

* कार्यसत्ता पृथक् मानली तर, दोन्ही सत्तेचा भेद सिद्ध करणारी तिसरी सत्ता मानावी लागेल; म्हणजे आत्माश्रयादि दोष येतात.

* असद्रूप मानलें तर वंध्यापुत्रादिवत् कार्याची प्रतीती न झाली पाहिजे.

* उभयात्मक मानलें तर, सत् व असत् हें दोन्ही विरोधी आहेत. म्हणून हें संभवत नाहीं.

* अतः कार्य अनिर्वचनीय मानावें लागते.

* हें कारणसत् आपल्याहून भिन्न मानलें तर जड होईल. आणि जड हें अज्ञानरूप असल्यामुळें (य१.११९) प्रत्यभिज्ञायोग्यता त्याच्या ठिकाणी येत नाही म्हणून ते कारण सत् तुझ्याहून भिन्न नाही; आणि कार्य आरोपमात्र आहे.

म्हणून हे श्वेतकेतो! स्वप्नाच्या व्यवहारासारिखे, वस्तुतः कारणरूप, परंतु वाचारंभणमात्र हे घटादिविकार नामरूपमय आरोपित आहेत.

यास्तव हे श्वेतकेतो! सत् तुजहून भिन्न नसल्यामुळें तेंच तूं आहेस- तत्त्वमसि.

'तत्' म्हणजे सः,

'त्वं' ह्याचेच मूळरूप अहं आहे.

'आहेस' ह्याचा मी आहे ह्या पदांत अंतर्भाव करून 'सोहं' असें पुराणांत सांगितलें आहे.

याप्रमाणें सत्ताज्ञान सांगून आतां चित्ज्ञान सांगतो. 'प्रज्ञानं ब्रह्म' या वाक्यानें 'तत्त्वमसि' महावाक्यनिष्ठसत्ताज्ञानासी चित्ज्ञानाचा अभेद कळतो. म्हणून चित्ज्ञान या महावाक्याचा विषय आहे.

'प्रज्ञानं ब्रह्म' : महावाक्यप्रक्रिया

ओवी

सूर्य ज्योतीनें व्यवहार । जगाचा चाले समग्र ।
चंद्रज्योतीनें व्यवहार । सूर्य अस्त झालिया चाले ॥१॥
सूर्य चंद्र अस्तंगत । झालिया अग्निज्योतीनें चालत ।
सूर्य चंद्राग्नि अस्तंगत । तदा वाग्ज्योतीनें चालत व्यवहारू ॥२॥
परी सूर्यादि ज्योति चारी । नसती स्वप्नाभीतरी ।
तेथ आत्मज्योतीचि निर्धारी । वर्तवी व्यवहारी सकलातें ॥३॥
तेथ जें 'प्रज्ञान' । तेंचि जागृतींत जाण ।
आणि 'एक जागृती-स्वप्न' । हेंही निरूपण पूर्वसमासी ॥४॥
प्रज्ञान जाणे व्यक्ति । परी जाणतां नाहीं त्याप्रती ।
म्हणोनि प्रज्ञानाचि व्यक्ति । करितां नये ॥५॥
ज्ञेयत्वावीण व्यक्तिज्ञान । नाहीं म्हणूनि व्यक्तिरहित प्रज्ञान ।
व्यक्तिज्ञानावीण जाति ज्ञान । असंभूत ॥६॥
जाती पासूनि व्यक्ति । जाहालिया जरी असती ।
तरी तेथही संमती । ज्ञेयत्वाची ॥७॥
आणि सर्वांभूती प्रज्ञान । चैतन्यरूपें स्फुरण ।
सुषुप्तीचेंही ज्ञान । अनुमान जें आणी ॥८॥
तें स्वगोचर प्रज्ञान । सर्वभूती व्यापक पूर्ण ।
'ब्रह्म'ही म्हणून । शब्द यातें ॥९॥
देहत्रय निराकरण 'त्वंपद'विवेकी । लोक निराकरण 'तत्पद'विवेकी ।
'असि'पदीं एकी । अधिष्ठान जें ॥१०॥

स्थूलांत सूक्ष्मदेह ओतप्रोत । विरांटात हिरण्यगर्भ ओतप्रोत ।
सूक्ष्म-स्थूलांत प्राज्ञ ओतप्रोत । विराटहिरण्यगर्भी ओतप्रोत ईश्वरू ॥११॥
(य१.१२०) जो अंतर्यामी जगद्योनि । परमात्मा मोक्षदानी ।
पूर्णत्वामुळें तमत्वपणीं । न ये कदा ॥१२॥
त्यासहित हें विवर्त । परी तो अनध्यस्त विवर्त ।
हेमालंकार दृष्टांत । ये विषयीं ॥१३॥
हें सकळ ओतप्रोत अधिष्ठानी । आणि अधिष्ठान स्वयंप्रभा म्हणोनि ।
पूर्व सत् चैतन्याहुनी । भिन्न नाहीं ॥१४॥
सुलभ व्हावया बोध । प्रक्रिया कल्पिल्या नानाविध ।
अधिकाऽल्प उपाधी भेद । वर्णिला तेथ ॥१५॥
कांही कांही ग्रंथीं देह तीन । कपिलगीतादि ग्रंथी देहचतुष्टयनिरूपण ।
अमृतरायकृत अविनाश संदेहहरण । निरूपण दशदेह ॥१६॥
तैसे वेदीं बह्मलोकापर्यंत लोक । पुराणी लोक ते अधिक ।
परी एका ब्रह्मींच सकळिक । ओतप्रोत हे ॥१७॥
एवं उपाधी कल्पिल्या नाना । परी मज योग्य वाटे अल्प उपाधी कल्पना ।
दृष्टिसृष्टिवादीं निदाना । एकचि उपाधी ॥१८॥
असो, ऐसे हे 'चित्'ता ज्ञान । परी तेथही अविषय भान ।
जें आनंदावीण । उपयोगी नोहे ॥१९॥
सुखेच्छा सकला प्रती । आणि सुख नाहीं त्रिजगती ।
विषयीं कवणाप्रती । नुपजे सुख ॥२०॥
विषयीं उपजे सुख । तरी एकी अथवा बहुती देख ।
प्रथम पक्षीं अन्य विषयेच्छा देख । न होवावी कधीं ॥२१॥
द्वितीयपक्षीं पाहतां । एकसमयीं अनेक विषय भोगितां ।
न येती न येती, सर्वथा । कवणासही ॥२२॥
भोजन आणि मलविसर्जन । भाषण आणि मैथुन ।
गमन आणि ग्रहण । श्रवण स्पर्शन दर्शनादि ॥२३॥
एकेकाळी करितां । न येतीच सर्वथा ।
म्हणोनि सर्व विषयीं सुखप्राप्तता । न घडे कीरू ॥२४॥
आणि तेवढिया पुरते सुख । होय विषयींच देख ।
तरी विषयाचा गुण सुख । मार्तण्डौष्ण्यवत् जाहला ॥२५॥
तरी जंव जंव विषय भोगावे । तंव तंव अधिक सुख होवावे ।
अधिक भोजनें न घडावें । अजीर्ण कदा ॥२६॥

करितां बहुत स्त्रीसंभोग । कदापि न लागावा क्षयरोग ।
योगियाचा योग । करितां विषयसंग, न भ्रष्टावा ॥२७॥
श्रमाची न पडतां मुद्रा । कदापि न यावी निद्रा ।
विषयचि सुखसमुद्रा । धारक जरी ॥२८॥
म्हणोनि विषय दुःखमय । सुख तें वृत्त्यैकाग्रतेनें होय ।
एकाग्रवृत्तींत बिंबताहें । आत्मा म्हणोनि ॥२९॥
सकल सुख इच्छिती । म्हणोनि सुख तेथ प्रीति । आपुलिया सारिखी प्रीति ।
नाहीं, येथ अनुभव आणि श्रुति प्रमाण ॥३०॥ (१.१२१)
पति, स्त्री, लोक, देवादि सकळ । पत्यादिसाठी प्रिय न होती केवळ ।
आपणासाठींच प्रबळ । प्रिय होती ॥३१॥
म्हणोनि आपुली प्रीति । आपणा आहे अत्यंत स्थिती ।
मानासाठीं देह त्यागिती । ते मानीं सुखप्राप्ती म्हणोनियां ॥३२॥
मानें दुःख म्हणोनि धनिक । मान नेच्छिति देख ।
परी सुखेच्छा तंव निष्कलंक । न सुटेची ॥३३॥
म्हणौनि सुखेच्छा सकळांसी । आणि तद्विषयता भिन्न कैसी ।
यालागी विषयांहूनि विशेषीं । आपण प्रिय आपणा ॥३४॥
वैरियादि निमित्त । मानी जरी दुःख प्राप्त ।
तरी प्राण न त्यागितां विरुद्ध जात । मानेच्छूही ॥३५॥
अथवा देह, प्राण, मनादि जन्य सुख । सुषुप्तींत नसे देख ।
तरी सुषुप्ती असम्यक । नेच्छावी कोणी ॥३६॥
परंतु तैसें नाहीं । यालागीं आत्माचि प्रिय पाही ।
सुषुप्ति-दृष्टांतेंकरूनि लवलाही । अज्ञान त्यागितां सिद्धांत मिळे ॥३७॥
चित्ज्ञानें सुषुप्तींतील अज्ञान । आत्मप्रीतित्वें विषय उपेक्षून ।
एवं अवस्थात्रय सोडून । निजानंदें तूर्यसंपन्न होआवें ॥३८॥

(आनंद-सत्-चित्)

होतां अज्ञाननिवृत्ती । चिदादिकांची प्रतीती ।
परि आनंदाची प्रतीती । अखंड राहे ॥३९॥
आनंदाची प्रतीती अखंड । म्हणोनिच मुक्ता जन्म नोहे प्रचंड ।
जे कां वासनेचें कुबंड । सुखप्राप्तीमुळें नुठे ॥४०॥
तेव्हा अनुभव येत । आणि आनंद राहात ।
हेंचि चैतन्य सत । ओळखावें ॥४१॥
सत् आपणासी अभिन्न । आपणा आपण नोहे अज्ञान ।

म्हणोनि चित् ही अभिन्न । आनंद अभिन्न आत्मप्रियत्वें ॥४२॥

(अभिन्न सच्चिदानंदांची युक्तीने सिद्धी)

एवं अभिन्न सच्चिदानंद । आत्मरूपीं प्रसिद्ध ।
निकें विशद । युक्त्याही होय ॥४३॥
*सत्तेहूनि वेगळे चिदानंद । तरी तें असत्यत्वें सिद्ध ।
असत्याचीं प्रसिद्ध । प्रतीती नाहीं ॥४४॥
*चैतन्यावेगळे सदानंद । तरी तें होतील अचिद ।
अज्ञान म्हणोनि प्रत्यय शुद्ध । न होआवा त्यांचा ॥४५॥
*सच्चित् भिन्न आनंदाहुनी । तरी तें दुःखाची खाणी ।
यालागीं सच्चिदानंद तिन्ही । एकरूप ॥४६॥
ऐसा सच्चिदानंद आत्मा । याची घेऊनी श्रौती प्रमा ।
श्रवण मनन निदिध्यासन परमा । साधावें कीं ॥४७॥
सत्तामात्र तें श्रवण । चिन्मात्र तें मनन । आनंदमात्र निदिध्यासन ।
वा श्रवण मनन निदिध्यासन सच्चिदानंदी ॥४८॥
परि अनुभव आणि श्रुतिबळें । वृत्तीने बंधत्व घेतलें सबळें ।
तरी वृत्तीनेची मोकळें । होणे पडे ॥४९॥ (य१.१२२)
या लागीं सच्चिदानंद । वृत्तीत गोचर प्रसिद्ध ।
पृथकत्वें शुद्ध । करणें पडती ॥५०॥
सूर्याची उष्णता सूर्यकांती । घेतां होय पृथक् प्रतीती ।
तेवी सच्चिदानंद ब्रह्मीं अपृथक् असती ।
परी ''पृथक्वत् भासती वृत्त्येति'' स्मृति असे ॥५१॥
''आनंदो विषयानुभवो नित्यत्वं चेति सन्ति धर्माः।
ब्रह्मणोऽपृथक्त्वेऽपि पृथगिवावभासन्त इति ॥''

विषय म्हणजे वेदांत विषयक ब्रह्म. तदनुभव म्हणजे चित्. इतर अर्थ स्पष्ट आहे.

ओवी

काल्पनिक भेदाभ्युपगमें । सच्चिदानंद भासती पृथग्धर्मे ।
तेथ बंधाभाव विशिष्टवृत्त्यागमे । सत्यता ब्रह्मीं ॥५२॥
तदाकारवृत्त्यवच्छिन्न । ब्रह्म प्रगटे चेतन ।
प्रीत्यादिवृत्त्यवच्छिन्न । आनंद जाण प्रगट तो ॥५३॥
किंवा व्यंजक वृत्त्यवछिन्न ज्ञान । आनंद अनुकूलवृत्त्यवच्छिन्न ।
अथवा आणीकही अवभासन । होत असे ॥५४॥

परोक्षज्ञानें प्रगटे सत्ता । अपरोक्षज्ञानें कळे चित्ता ।
प्रेमभक्तीनें आनंदवत्ता । अंगी बाणे ॥५५॥
आत्माकार मानावी वृत्ती । आणि आनंदावच्छेदक कां न म्हणावी भक्ती ।
यालागी अद्वैतीं अनिर्वाच्य भक्ती । ब्रह्मनिष्ठांची ॥५६॥
'तैसी क्रिया कीर न साहे । परी अद्वैती भक्ती आहे ।
हें अनुभवाचि जोगे, नोहे । बोलण्या जोगे ॥५७॥ ज्ञाने.
परी हा पृथगिव आनंदभास । न म्हणावा आनंदमय कोश ।
तेथ परतंत्रता आणि विषयानंदता विशेष ।
येथ ब्रह्मानंद ज्ञानास उपयोगिता ॥५८॥
तेथ आत्मया बंधन । येथ होय मोचन ।
ही प्रक्रिया अद्वैतकौस्तुभांतून । घेतली कांहीं ॥५९॥
व्यवस्था आणि भक्ति । ज्ञानेश्वरकृपा संमती ।
कृष्णपत्न्या यथामती । निरूपिली ॥६०॥
एवं उत्तमाधिकारा । हा सच्चिदानंदभाव खरा ।
परी मध्यमाधिकारी दहरा । उपासिती ॥६१॥
हृदयाकाशोपहित । चैतन्य दहर बोलत ।
छांदोग्यकैवल्याद्युपनिषदीं यथार्थ । उपासना याची ॥६२॥
परी सकल जाणतां । मनादीक तत्वतां ।
जो एकचि अखंडता । तलवकार म्हणे ॥६३॥
तया आत्म्याचें ज्ञान । उत्तम सच्चिदानंदत्वें पूर्ण ।
चारही महावाक्य याचि कारण । उपदेशिती ॥६४॥

दोहा

श्रुति स्मृति पुराणगत सम्यक्सारोद्धार ।
करुनी या स्थळीं बोलिला, महावाक्य विचार ॥६५॥
श्री ज्ञानेश्वर चरण कृपें, ब्रह्मज्ञान निधान ।
नयनीं पहाया अग्रीं मिळो, श्रोतृवृंद अवधान ॥६६॥
सियावर रामचंद्रकी जय । उमापती महादेवकी जय ॥ (१-१२३)
॥ हरिःॐ तत्सत् श्रीज्ञानेश्वरकृपाप्रसादे गद्यपद्यान्विते नाना छंदबद्धे
निदिध्यासनप्रकाशे छांदोग्य, बृहदाहरण्यक, कैवल्य, तलवकारादि श्रुति तथा
स्मृति पुराण स्वानुभवादि प्रमाणैः ज्ञानकर्तृतंत्रवस्तुतंत्रतया
सच्चिदानंदपदत्रयविवरणंनाम षष्ठः समासः॥
॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥ शुभं भवतु ॥

समास ७ वा

सांख्य-योग-वेदान्तसमन्वयरूप योगप्रक्रिया

॥ श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

चौपाई

आळंदीपतिपदकमल वारी । कंटककंठपदकमलवारी ।
चरण चारु नव-कवन विकाशी । जें पद कधिंहि न कवण विकाशी ॥

दोहा

सांख्य योग वेदान्तगत ब्रह्मचिंतनोपाय ।
वदू समुच्चित नमुनि मनीं उमामहेश्वरपाय ॥

ओवी

बद्धदशेमाजीं तत्वतां । विषयस्फुरणीं चित्सत्ता ।
विषयसुख तें तत्वतां । आनंद द्योती ॥१॥
जिज्ञासुदशे आंत येतां । तरी श्रद्धा उमटे सत्ता ।
भावनावृत्ती चित्ता । समाधान तत्वतां आनंद द्योती ॥२॥
आणि मुक्तदशे आंतू । मिथ्याधार सामान्यसत्ता सिद्धांतु ।
अनुभव चैतन्य सुखैकांतू । परमानंदप्राप्ती ॥३॥
एवं सच्चिदानंद । व्याख्यान बहुविध ।
तथापि जिज्ञासुदशासिद्ध । निदिध्यासग्राह्य ॥४॥
तेथ श्रद्धा सत्ता आश्रवूनी । विषयभाव दूर स्त्रवूनी ।
प्रक्रिया श्रेय पावूनी । साक्षात्कारी कृतकृत्यता ॥५॥
तेथ सांख्यशास्त्रें आत्मनिश्चय । योगें व्यतिरेकानुभव होय ।
'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या' सोय । वेदान्त सांगे ॥६॥

सांख्याचे पुरुषबहुता-खंडन

तथापि सांख्यशास्त्र आश्रयितां । तेथ निरूपिली पुरुषबहुता ।
ते देशपरिच्छेद तत्त्वतां । आत्मया आणी ॥७॥
आणि देशपरिच्छेद जया । अल्पता येत असे तया ।
गमनागमन उपाया । कालपरिच्छेदू ॥८॥
स्थिरचि जरी म्हणिजे । तरी आकाश व्याप्य जाणिजे ॥(१.१२५)
आकाशाविण बहुता सहजे । बुद्धी न घेई ॥९॥
आणि चैतन्यास व्यापणें नभा । तरी जडें व्यापिली चिद्भा ।

व्यापकाहोनी सामर्थ्य स्वयंभा । व्याप्या नव्हे ॥१०॥
म्हणोनि देशपरिच्छेद घेतां देख । तरी न घडे जडचिद्विवेक ।
अविवेकें बंधनदुःख । प्राप्त आहे ॥११॥
अथवा आकाशरहित स्थिती । तरी पुरुषास जडता प्राप्ती ।
कांही घेतली स्फूर्ती । तरी काल मानावा लागेल ॥१२॥
देशपरिच्छेद कालपरिच्छेद । तरी सहजे आला वस्तुच्छेद ।
जेथ परिच्छेद आहे त्रिविध । तें अल्प म्हणावे ॥१३॥
जें अल्प तें विनाशी । छांदोग्यश्रुत्युक्ती ऐशी ।
सनत्कुमार नारदासी । अनुवादले ॥१४॥
''यो वै भूमा तदमृतम् । यदल्पं तन्मर्त्यम् ''
छांदोग्य अध्याय ९ वा.
जें पूर्ण तें नित्य । जें अल्प तें अनित्य ।
देशपरिच्छेदे अनित्य । परमाणु सम जरी घेतां ॥१५॥
तरी न्यूनाधिक्य नसावें । सकल समसमान असावें ।
हेंही जरी स्वीकारावें । तरी समानता कैसी ॥१६॥
समानता बुद्धीनें घेतां । तदा येईल सजातीयता ।
सजातीयाकार बुद्धी होता । तरी अवयविता पावेल ॥१७॥
अवयवी होतां, होतील विभाग । विभाग होतां, न्यूनाधिक्य चांग ।
न्यूनाधिकत्वें बलनिर्बल प्रसंग । बलाबले अभिभवे कालावच्छेदू ॥१८॥
एवं पुरुषासी ये अनित्यता । जन्ममृतानुमानें घेतां ।
तरी स्वप्नीहीं जन्ममरणावस्था । एकीं पुरुषीं घडो शके ॥१९॥
एवं सांख्यशास्त्र अप्रमाण । तथापि पुरुषबहुता वेगळी करून ।
विवेचावया जड, चिद्घन । सांख्यशास्त्र प्रमाण तें ॥२०॥
बद्ध चाळो न शके प्रकृती । मुक्तांची होय निष्कल स्थिती ।
स्वतंत्र मानतां जड प्रकृती । तरी चेतनावश्यकता नसे ॥२१॥
ज्ञानमात्रचि घ्यावें चेतन । क्रियामात्र म्हणावे प्रधान ।
तरी क्रियेसी नियमी कवण । सत्त्वज्ञान तरी कैसे ॥२२॥
पुरुषसंगें सत्त्वज्ञान । किंवा प्रकृतींत सत्त्वज्ञानपण ।
पुरुषसंगें म्हणतां तत्त्वज्ञान । तरी पुरुषांश बिंबन अवश्य लागे ॥२३॥
बिम्बे तो बद्धांश की मुक्तांश । बद्धचि असमर्थ, तंव समर्थ केवीं बद्धांश ।
बिम्बे म्हणावा मुक्तांश । तरी प्रधान-सन्निधता ॥२४॥
प्रधान असतां सन्निध । तरी मुक्तही होऊ शकेल बद्ध ।

प्रधान न बांधी तरी सुबुद्ध । प्रधान कैसें ॥२५॥
माया मिथ्या म्हणोनी बिम्बता । शुद्धसत्त्वीं वदणें वेदान्ता ।
परी अंगीकारोनि प्रकृतिसत्यता । सांख्याशास्त्रीं बिम्बता केंवी घडे ॥२६॥
(१.१२६) यालागीं पाहिजे ईश्वर । म्हणोनी योगाचार्यी केला अंगीकार ।
परी पुरुषबहुत्वादि प्रक्रिया समग्र । सांख्यसम ॥२७॥
म्हणोनी सांख्यांत जी खंडनीय । ती योगांतही त्याज्य होय ।
परी सांख्यांत जी ग्रहणीय । तेथ योगाचा ईश्वर केंवी घटे ॥२८॥
ईश्वर जड कीं चेतन । जड तंव नाही म्हणोन ।
जड चेतनावीण । तिसरा नोहे ॥२९॥
चेतन म्हणावा पुरुषविशेष । तरी प्रकृती लागली इतर पुरुषास ।
आणि तोचि राहिला पुरुष । वेगळा कैसा ॥३०॥
सामर्थ्य म्हणावे पूर्ण । तरी इतर चेतनीं कां सामर्थ्य उण ।
या लागीं पुरुषबहुता आणि ईश्वर भिन्न । हे सांख्य-योगांतून त्यागावे ॥३१॥
तैसी त्यागावी प्रकृतिसत्यता । कारण, दोन पदार्थ सत्य होतां ।
तरी पदार्थासी व्यापकसत्ता । कीं पदार्थता कल्पितसत्ता घडे ॥३२॥
पदार्थावरुनी सत्तानुमान । कीं सत्ताज्ञानें पदार्थज्ञान ।
कीं सत्ता पदार्थ अभिन्न । भिन्न अथवा ॥३३॥
प्रथम पक्ष स्वीकारितां । तरी दोहोंहूनि तिसरी होईल सत्ता ।
आणि सत्ता भिन्न प्रकृती पुरुषां तत्त्वतां । असत्यता प्राप्त ॥३४॥
द्वितीयपक्ष स्वीकार । करितां, तरी सत्ताचि मुख्य निर्धार ।
पदार्थाऽभिन्न सत्ता म्हणतां साचार । तरी दोनपणा केवीं घडे ॥३५॥
अर्ध अर्ध वाटितां सत्ता । तरी दोहोंमध्यें सत्ता की असत्ता ।
दोहोंमध्ये म्हणतां सत्ता । तरी तीन सत्ता जाहल्या ॥३६॥
दोहोंमध्ये असत्ता म्हणतां । तरी जाहल्या दोन सत्ता ।
दोहोंची निश्चायक सत्ता । तिसरी एक ॥३७॥
तिहींची निश्चायक चौथी । एवं प्रसंगें अनवस्थिती ।
दोनपण न मानतां पुरुष प्रकृती । होतील एक ॥३८॥
एक जाहलिया पुरुषप्रधान । न संभवे विवेचन ।
विवेक न होतां बंधन । न सुटे कदा ॥३९॥
एवं तृतीय पक्ष गेला । चतुर्थ पक्ष स्वीकारिला ।
तरी द्वितीय खंडनोक्त आला । दोषसमुदाय ॥४०॥
म्हणोनी प्रकृतिसत्यता पुरुषबहुता । आणि ईश्वराची भिन्नता ।

हे सांख्य-योगांतूनी वेगळी काढिता । तरी वेदांती ऐक्य पावती ॥४१॥
सांख्य-योगांश करितां खंडण । द्वैताचें झालें निराकरण ।
अल्पज्ञ सर्वज्ञ चेतन । राहों न शके म्हणोनी ॥४२॥
विद्यारण्य मुनीश्वर । एवंविध वदले निर्धार ।
''चित्रदीपक'' ग्रंथीं सुंदर । प्रमाण तें सांगों ॥४३॥ (य१-१२६)
आत्मभेदो जगत्सत्यं ईशोऽन्य इति चेत् त्रयम् ।
त्याज्यते तैस्तदा सांख्ययोगवेदान्तसंमतिः ॥ पंचदशी.
पूर्वीच बोलिला अर्थ । अथवा प्रक्रिया यथार्थ ।
ऐसेंही एक परमार्थ । देवो शके ॥४४॥
वेदांतीं पुरुषबहुता द्यावी जीवासी । ईशान्नता द्यावी मायाचालकासी ।
औपाधिककल्पन या अपेक्षेसी । अल्पज्ञता जीवासी सहजची ॥४५॥
जोवरी झालें नाहीं ज्ञान । तोंवरी प्रकृतीचें सत्यपण ।
एवं सांख्ययोगार्थ आकर्षोन । वेदांती आणोन मेळवावे ॥४६॥
'वैय्यासिकन्यायमालेंत'। इतिविधची सिद्धांत ।
जीवेश्वरता व्यवस्थित । किंवा संकर? ॥४७॥
यावरी उत्तरश्लोक । तो ऐकोत पुण्यश्लोक ।
जो 'भारतीतीर्थ' मुखीचा सम्यक । संशयच्छेत्ता ॥४८॥

श्लोक

अंशोऽवच्छेद आभास इत्यौपाधिककल्पनैः।
जीवेशयोर्व्यवस्था स्यात् जीवानां च परस्परम् ॥

ओवी

एवं जीवेशव्यवस्था । सांख्य योग वेदांता ।
संमतिकारक तत्वता । जाहाली आहे ॥४९॥
असो आतां समन्वय । हा श्रवणाचा विषय ।
येथ निदिध्यासनोपाय । बोलिजे मात्र ॥५०॥
चेतनाचें सामान्य ज्ञान । हें जड, हें चेतन ।
सांख्यशास्त्रें निर्धारोन । घेयावें पैं ॥५१॥
जडावरूनी काढावें मन । चेतनावरी ठेवावें नेऊन ।
ही प्रक्रिया योगांतून । आश्रयावी ॥५२॥
मिथ्या कांही नाहीं । चेतन सर्वत्र सर्वाठायीं ।
एवं भेद टाकूनि लवलाही । निर्भय सुखी वेदांतें व्हावें ॥५३॥

अथवा ग्राह्यांश सांख्यें आत्मज्ञान । जडाहूनी आत्मा भिन्न ।
ग्राह्यांश योगें वैराग्य पूर्ण । जडाहुनी मन काढणें ॥५४॥
जड नाहीं म्हणोनी पुन्हा । विषयावरी जावों न द्यावे मना ।
या उपरमाच्या खुणा । वेदान्तें कळती ॥५५॥
परी ही प्रक्रिया मध्यम । वेदांतदृष्टीनें पाहतां परम ।
मन बुद्ध्यादि संभ्रम । जडचि होती ॥५६॥
मग जडाहूनि जड काय काढावें । ऐसें कोणीही न म्हणावें ।
अन्वयें पाहातां स्वभावें । चेतनही सकळ ॥५७॥
परंतु हे कासया वाद । जेणें निदिध्यासन होईल शुद्ध ।
आत्माकारवृत्ति सिद्ध । राहील ती प्रक्रिया घेयावी ॥५८॥ (य१-१२७)
नानाविध प्रक्रिया । परी उपयोगी पडेल जी जया ।
ती ती उत्तम तया । आत्मज्ञानीं ॥५९॥

श्लोक

यया यया भवेत्पुंसां व्युत्पत्तिः प्रत्यगात्मनि ।
सा सैव प्रक्रियेह स्यात् साध्वी सा चानवस्थितिः॥

एवं सुरेश्वराचार्य मत । परी कांहीं स्वारस्य आहे यांत ।
आत्मज्ञाना प्रक्रिया असती बहुत । ऐसाचि अर्थ केवळ नव्हें ॥६०॥
जिनें जिनें होईल आत्मज्ञान । ती ती प्रक्रिया समजोन ।
आम्हीं वेदांतीं करितों ग्रहण ।
'सा सैव प्रक्रियेह स्यात्' वचन या अर्थी ॥६१॥
'एव' या शब्दें करोनि पाहातां । स्वमत दुराग्रह न धरितां ।
आत्मज्ञान प्रयोजनमात्रता । स्वारस्य आहे ॥६२॥
स्पष्ट इतर शब्दार्थ । म्हणोनी हा परमार्थ ।
जाहाला जो सिद्धार्थ । सांख्य योग वेदांतीं ॥६३॥
सद्गुरुवचनीं ठेवोनि विश्वास । एवं सत्ता जाणावी विशेष ।
एकाग्रचित्तें अनुभवास । चैतन्य आणावें ॥६४॥
जड नाहीं तें मिळवावें कांहीं । आहे ब्रह्म तें मिळविलें सर्वही ।
येणें परमानंदाची ग्वाही । प्राप्त होय ॥६५॥
एवं ही सांख्य योग वेदान्त । होय प्रक्रिया ऐक्यभरित ।
कैसाही मुमुक्षु ब्रह्मस्थित । होवावा, मग कार्य झालें ॥६६॥

श्लोक

आत्मानं विन्दते यस्तु सर्वभूतगुहाशयम् ।

श्लोकेन यदि वार्धेन क्षीणं तस्य प्रयोजनम् ॥

ओवी

प्रमेय एक बलवंत । तें जाणावया प्रमाण स्थित ।
बहु प्रमाणापेक्षा नियमित । नव्हे येथ ॥६७॥
श्लोक अथवा अर्धश्लोकें । जो आत्मया जाणें निकें ।
सर्व भूतांचिया देखे । अन्तर्यामी ॥६८॥
सर्व भूतांचें अंतर । आधेय होय जयावर ।
आणि सर्वां धरता आधार । तोचि एक ॥६९॥
आश्रयाश्रित भिन्न प्रतीति । तयातें आधाराधेय म्हणती ।
समिथ्याश्रिताश्रया भिन्नप्रतीति । अधिष्ठान म्हणती तया ॥७०॥(श्रुता/-श्रिता?)
या लागीं आधाराधेयकल्पना । तरी अभेदू ये द्वैतांगणा ।
म्हणोनी सर्वभूतगुहाधिष्ठाना । आणिजे वस्तू ॥७१॥ (य१-१२८)
आधारज्ञानें आधेय पृथकता । अधिष्ठानज्ञानें भ्रमनिवृत्तता ।
म्हणोनी अधिष्ठान संमत वेदांता । अनुभवेंही कष्टन्यूनता दावी ॥७२॥
आधारबोधक वचन । बोधावया अर्भकमन ।
वस्तुतः अधिष्ठान । ब्रह्म आहे ॥७३॥
आतांवरी आधारधेय । द्वैतानुसार निरूपिलें होय ।
म्हणोनी तें उपेंक्षिलें जाय । परी अद्वैतीं ठाय भिन्नार्थीं ॥७४॥
आत्मयाची समान्यसत्ता । भ्रांतिकालींही स्फुरे तत्वतां ।
यालागीं ते आधार समस्ता । प्रपंचासी ॥७५॥
आणि शुद्ध बुद्ध नित्य मुक्त । ऐसें ब्रह्म जाणता यथार्थ ।
समूळ प्रपंच होय निवृत्त । यालागीं विशेषब्रह्म अधिष्ठान ॥७६॥
एवं संक्षेपशारीरकांत । आधाराधिष्ठानभेद किंचित ।
बोलिलें स्वामी समर्थ । सर्वज्ञात्माचार्य ॥७७॥
आणि गुहाप्रविष्टतासूत्रीं । बोलिली, ते अधिकारी चित्तपात्रीं ।
येरव्हीं अधिष्ठानप्रतीति नेत्रीं । श्रोत्रियांचिया ॥७८॥
म्हणूनि इतुकेंचि एक शास्त्र । पाठ असावें स्वतंत्र ।
तरीच ब्रह्मज्ञानप्रकार । कळों शके, हा नियमू नोहे ॥७९॥
आपुलें मीपण बोधावया । किती शब्द येती उपाया ।
परी उपाधी मात्र बोधावया । शब्दजाल ॥८०॥
तेवीं संशय शिष्यचित्तीं । म्हणोनी शास्त्रांच्या वाढती युक्ती ।

एरव्हीं श्लोक श्लोकार्धें निश्चिती । कळों शके ॥८१॥
एवं श्लोक अथवा श्लोकार्ध । पाहोनी जयातें जाहला बोध ।
तयाचें शास्त्रप्रयोजन प्रसिद्ध । जाहले क्षीण ॥८२॥
ऐसें महाभारतीं । समर्थ व्यासांची उक्ती ।
निदिध्यासकधी । यावत् ख्याती दर्शविली ॥८३॥
क्षीण बोलिलें प्रयोजन । तें म्हणावें गौण ।
मुख्य प्रयोजन क्षीण । कदापि नोहे ॥८४॥
श्लोकार्ध :- एतस्य कृतकृत्यत्वाच्छास्त्रमस्यान्निवर्तते ।
ऐसें गूढार्थदीपिकोपोद्घातीं । बोलिले मधुसूदनसरस्वती ।
आणि श्रीमदाचार्योक्ति । एवंविध ॥८५॥

श्लोक

श्लोकार्धेन प्रवक्ष्यामि यदुक्तं ग्रंथकोटिभिः ।
ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव नापरः ॥
त्रिकालाबाधित ब्रह्म निर्मळ । जगन्मिथ्या मृगजळ ।
अन्य अर्थ केवळ । स्पष्ट आहे ॥८६॥
परी श्रवण मनन जयाचे । दृढत्वा आले साचे ।
तयासचि या वचनत्रयाचे । उपयोगीपण ॥८७॥ (य१-१२९)
आणि श्रवणापासोनी जया । करणें आहे उपाया ।
तेणें श्रुतियुक्तिसमन्वया । आश्रयिजे ॥८८॥
आतां योगशास्त्रांतील । प्रक्रियाभाव बोलिजेल ।
परी जो उपयोगी पडेल । निदिध्यासनीं येथ ॥८९॥
'अविद्यादि क्लेश पांच' । शुक्लाऽशुक्लादि कर्म जाच ।
विपाक शरीरादि माच । सुखदुःखादि आशय ॥९०॥
याहून वेगळा ईश्वर । आधीं भावावा प्रेमभर ।
आणि माझें ठायीं क्लेशादिक समग्र । काय म्हणोनी ॥९१॥
तरी ईश्वरासी नाहीं विषयसंग । आणि मज लागला विषय लाग ।
तो दुःखदायक हें समजोनी विराग । धरावा विषयीं ॥९२॥
अल्पज्ञता होय प्राप्ती । म्हणोनी अलंबुद्ध्या रोधावी प्रमाणवृत्ती ।
अनुपयोगिता धरोनी चित्तीं । विपर्ययवृत्ती रोधावी ॥९३॥
जे पातंजलीं अविद्या होय । तीच वृत्ति विपर्यय ।
यथार्थज्ञानें करूनि होय । नाश तियेचा ॥९४॥
ते सांख्यातील विवेकज्ञान । घेऊनि विपर्यय मोडावा पूर्ण ।

अविपर्ययाचें रक्षण । विपर्ययानुपयोगें कीजे ॥९५॥
उपेक्षा रोधावी विकल्पवृत्ति । भावाऽभावपण त्यागोनि निश्चिती ।
ब्रह्मैकतानत्वीं 'निद्रा' वृत्ति । रोधूनि टाकावी ॥९६॥
विपर्ययें दुःखप्राप्ती । म्हणोनी रोधावी ती ।
कल्पितपणीं संस्कार उरविती । विकल्पवृत्ती रोधावी ॥९७॥
अज्ञानस्थित अभावप्रत्यय । तदा न राहे अभ्यासविषय ।
मन हें आत्मीय । होवो न शके ॥९८॥
धरितां निद्राभाव । तरी जागृतीं ये हा अनुभव ।
बळें दृढ करावा निद्राभाव । तरी जागृतीवीण नोहे ॥९९॥
जागृती सुटतां । तरी निद्रेंत परतंत्रता ।
म्हणोनी स्वयं समाधी तत्वतां । अभ्यासणें जागृतींतुनी ॥१००॥
यालागीं निद्रा ही रोधावी । अखंड एक समाधी बोधावी ।
एकरसज्ञानें निरोधावी । 'स्मृति' वृत्ति ॥१०१॥
कालपरिच्छेद येईल । खिन्नाऽखिन्नता होईल ।
म्हणोनी स्मृती ही सबल । रोधिली पाहिजे ॥१०२॥
तरी तदाकारवृत्ति । जी गुणाची राहे निश्चिती ।
पावोनी सर्वचेतनख्याती । 'गुणस्थिती'ही सोडिजे ॥१०३॥
मग क्लेशादि रहित ईश्वर । तोचि आपण साचार ।
स्मृति गेलियामुळें निर्धार । काल परिच्छेदही गेला ॥१०४॥
'इदानीम् घट' या प्रतीतीनें । कालासही इंद्रियग्राही होणें ।
लागे, हें केलें बोलणें । वेदान्तपरिभाषाकारें ॥१०५॥
यालागीं काल निवर्ततां । आपुली कालत्रयीं परमानंदता ।
जीवेश्वर ऐक्यता । योगेही होय ॥१०६॥ (य१.१३०)
ऐसें ईश्वरप्रणिधान । 'ईश्वरप्रणिधानाद् वा' या सूत्रेकरून ।
बोलिलें पैं संपूर्ण । पतंजली स्वामी ॥१०७॥
स्वप्न तैसें जग । हें स्वप्नज्ञान अवलंबोनि चांग ।
निद्रेचें संधिज्ञान हें अव्यंग । निद्राज्ञान ॥१०८॥
स्वप्न-जगत्ज्ञाने तुटे जगत्सत्यबुद्धि । निद्रा-संधिज्ञाने न पडे अज्ञानावधि ।
सांपडे तूर्य ब्रह्मसमाधि । आपणपें सहज ॥१०९॥
'स्वप्ननिद्राज्ञानावलंबनं वा' । हें सूत्रही आले गौरवा ।
प्रभू श्रीगुरुकृपाठेवा । काय न करी ॥११०॥

अथवा जे नामरूप मनीं येत । त्यांतील अस्ति-भाति-प्रिय घेउनी यथार्थ ।
ऐक्य पावावे समाधिगत । संधिगत वा ॥१११॥
बाध-अभाव-विशिष्ट । ते 'अस्तित्व'' बोलिजे स्पष्ट ।
ज्ञानवृत्तिविशिष्ट । 'भातिपण' ते ॥११२॥
आणि प्रीतिवृत्त्यवच्छिन्न । 'आनंदा'चें भान ।
वृत्तिसंधींत तीन । न स्फुरतां एक ॥११३॥
वृत्त्यभाव चित्प्रकाश ''समाधी''।
वृत्तिमध्य चित्प्रकाश ''संधी''।
ब्रह्मसुखाची सिद्धी । दोन्ही ठायीं ॥११४॥
वृत्ति नामरूपीं येतां । तदा ध्यावें सगुण भगवंता ।
विषयावरी सर्वथा । येवों न द्यावी वृत्ति ॥११५॥
भोजनादि समयीं जाण । ऐसें आचरण राहणें कठिण ।
परी विषय करितां भगवदर्पण । भक्तीनें तेंही साधे ॥११६॥
एवं 'समाधिपाद' गूढ । रहस्य निरूपिलें उघड ।
हा समाधी व्हावया दृढ । यमाद्यष्टांग 'साधनपादीं'॥११७॥
एवंविध भगवंत । षष्ठ प्रसंगी वदत ।
तो श्लोक प्रमाणार्थ । उपेगा ये ॥११८॥

श्लोक

आरुरुक्षोर्मुनेर्योगं कर्म्म कारणमुच्यते ।
योगारूढस्य तस्यैव शमः कारणमुच्यते ॥ गीता ६

योग : अष्टांग

ओवी :-

योग साधनेच्छा जया । यमाद्यष्टांगें कारण तया ।
आणि योगारूढ जाहालिया । समाधिपादोक्त कारण शम ॥११९॥
'यम' ते मानस धर्म ।
'नियम' ते वर्णाश्रमकर्म ।
'आसने' होय इंद्रियदम ।
'प्राणायामें' शम मन पावे ॥१२०॥
'प्रत्याहार-धारणा-ध्यान' । या तिन्हींनें एकाग्र पावे मन ।
एक होतां ध्याता ध्यान । 'समाधी' मिळे ॥१२१॥

परी यमापासूनी प्रत्याहारावरी । कर्माची जाणावी कुसरी ।
कर्म कारण म्हणोनी मुरारी । बोलिले जे ॥१२२॥
धारणेहूनि समाधीपर्यंत । बोलिजे शम शब्दार्थ ।
योगारूढासि उपेगा येत । तोचि एक ॥१२३॥ (य१-१३१)
अथवा एक ईश्वरभक्ती । येणेंही पावे योगस्थिती ।
श्रीएकनाथोक्तीं । भागवती ऐसी ॥१२४॥
''योगी इंद्रियें कोंडिती । ते कोंडितांचि कष्टी होती ।
भक्त भगवंतीं अर्पिती । तेणें ते होती नित्यमुक्त''॥१२५॥
श्रीहरीचें कृपेंकरून । समाधी अनायासें साधें पूर्ण ।
येऱ्हवी नाना जन्म करितां साधन । कष्ट मात्र फुकाचे ॥१२६॥
शिवस्मरणें वैराग्यप्राप्ती ।
विष्णुस्मरणें आत्मप्रीति ।
किंवा शिवस्मरणें दुःखनिवृत्ति ।
अखंड तृप्ती हरिस्मरणें ॥१२७॥
श्रीहरीवांचून शिवस्मरण । करितां रसास्वाद विघ्न ।
आणि शिवावांचून विष्णुस्मरण । करितां तमोगुण विघ्न करी ॥१२८॥
यालागीं रमापती आणि उमापती । सप्रेमें ऐक्यत्वें भजावे चित्ती ।
सहज ब्रह्माकारवृत्ती । होवो लागती तेधवां ॥१२९॥
एवंविध साधनपाद । परी गोरक्ष-शतकीं भेद ।
दुसराही एक प्रसिद्ध । बोलिला आहे ॥१३०॥
श्लोक
''आसनेन रुजो हन्ति प्राणायामेन पातकम् ।
विकारं मानसं योगी प्रत्याहारेण मुंचति ॥
धारणाभिर्मनोधैर्यम् ध्यान्नौतन्यमद्भुतम् ।
समाधौ मोक्षमाप्नोति त्यक्त्वा कर्म शुभाऽशुभम् ॥''
सरळ आणि स्थिर । ऐसें होतां शरीर ।
तदा स्वच्छ वाहे रुधिर । नाडियांतुनी ॥१३१॥
वीर्यही ठायींच्या ठायीं राहे । येणें रोगांचे बीज मोडोनि जाये ।
मग जे जे इंद्रियें केली लवलाहे । कर्मे कांहीं ॥१३२॥
प्राणायाम करितां । तरी नाडीसी येत शुद्धता ।
आणि शरीरासीही तत्वतां । होती कष्ट ॥१३३॥
शरीरासी कष्टप्राप्ती । आणि भगवत्प्राप्तीची इच्छा चित्ती ।

म्हणोनी दुष्कर्मे जळती । प्राणायामें ॥१३४॥
भगवदिच्छेवीण । करितां प्राणसंयमन ।
तरी ते जलगामियासमान । व्यर्थ होय ॥१३५॥
शुद्ध आणि अशुद्ध । ऐसें मन द्विविध ।
अमृतबिंदूपनिषद । एवं सांगे ॥१३६॥
नानाकामसंकल्प मन । तें अशुद्ध म्हणावें मन ।
प्रत्याहारें करून । नाश होय तयाचा ॥१३७॥
शुद्ध मनाची दुर्बलता । धारणेने नाशे तत्त्वतां ।
जेवीं निद्रेंतूनि पुरुष उठतां । तेवीं दुर्बलता शुद्धमना ॥१३८॥ (य१-१३२)
अशुद्ध मनाचिया हातीं । बहु दिवस शुद्धमनोवृत्ती होती ।
अशुद्धमन मेलियावरी, ती । निमिषमात्र पावे दुर्बलता ॥१३९॥
ती दुर्बलता जावयासाठीं । धारणेची पाहिजे पुष्टी ।
सर्वांभूतीं चैतन्य परिपाटी । ध्यानें शेवटीं हे मिळे ॥१४०॥
निर्गुण ध्यान करितां । तरी चैतन्य कळे तत्त्वतां ।
आणि सगुण ध्यान करितां । चैतन्य आनंद दोन्हीं कळती ॥१४१॥
भक्तीनें मीपण होय क्षीण । अहंकार होय लीन ।
आणि सुषुप्ती सारिखें अज्ञान । तेंही न राहे ॥१४२॥
तेथ ध्याता आणि ध्येय । या दोहींची ऐक्यता होय ।
समाधी सुखाची सोय । योगीही म्हणती ॥१४३॥
म्हणोनी जो योगारुरुक्षू । तो यमादि करावया पाहिजे दक्षू ।
आणि योगारूढ झालिया मुमुक्षू । ब्रह्मादिदक्षू शमादिकीं ॥१४४॥
ते हे साधनपाद आणि समाधिपाद । भगद्वाक्य प्रबोध ।
घेउनी तात्पर्य विशद । बोलिले कीरू ॥१४५॥
समाधिपाद आधीं, मग साधनपाद । हा योगशास्त्र क्रम सिद्ध ।
आधीं साधन निरूपण मग समाधी बोध । हा क्रम गीता श्लोकीचा ॥१४६॥
॥ प्रामाण्यक्रम ॥
गीता- योगसूत्रे- व्यासभाष्य- सूत्रविवरण
परी पाठक्रमाहून । अर्थक्रम बलवान ।
या लागीं गीताश्लोक प्रमाण । विशेष आहे ॥१४७॥
परी हा गीताश्लोक 'परमसूत्र' ।
याचें विवरण 'योगसूत्र' ।
'योगभाष्यादि' पवित्र ।

'सूत्रविवरण' पुन्हा ॥१४८॥
म्हणोनी अभ्यास करणें जेव्हां । गीताश्लोकवत् साधन आधीं करणें तेव्हां ।
आणि योग-शास्त्र जाणणें जेव्हां । समाधिपाद तेव्हां आधीं पाहणें ॥१४९॥
समाधिपादावरून । जो समाधी साधूं शके आपण ।
त्यासाठीं नाहीं निरूपण । साधनादींचे ॥१५०॥
'विभूति'पादांत सिद्धिप्रकार । तो वर्जावा समग्र ।
'कैवल्य'पादांतील मोक्षसार । मिळेल तदा ॥५१॥
'यमाद्यष्टांग'निरूपण रीति । ते बोलिजेल 'योगप्रभाव'ग्रंथीं ।
योगशास्त्र जितुके मिळे वेदांतीं । तितुकें येथ बोलिलें ॥५२॥
सांख्याचाही उपयोगी अंश । येथचि बोलिला निःशेष ।
सांख्य-योग-वेदान्तास । समन्वयही दाखविला ॥५३॥
डोळे दाबोनि रंगादि पाहाणें । किंवा श्वास-नादादि लक्षणें ।
इत्यादि चित्तैकाग्र्याकारणें । विभाग कल्पणें 'कांहीं तरी'॥५४॥
परी मंत्र-योग-चक्र आणि हठ-नाद-लय । हें या कांही तरींत घेवो नये ।
उपयोगी नाहींत म्हणोनी वैशेषिक-न्याय । पूर्वमीमांसादि उपाय
वाळिले॥५५॥ (य१-१३३) परी पूर्वमीमांसेतील कृती । आणि योगांतील
विरक्ती ।
दोन्ही मिळवितां एके पांती । निष्काम कर्म हातीं मिळें ॥५६॥
न्याय-वैशेषिकीं ईश्वरानुमान । तें दृढ करी उपासन ।
सांख्य–योग-वेदान्तोपयोग पूर्ण । बोलिलाची आहे ॥५७॥
दुःखध्वंस मुक्ती । ऐसें न्याय वैशेषिक म्हणती ।
दुःखात्यंताभाव मुक्ती । वेदान्त म्हणे ॥५८॥
एवं ग्राह्यांश घेवोनी । सारग्राहीदृष्टीपणीं ।
वृत्ती ब्रह्माकार करोनी । मिळवावें सुख ॥५९॥
ज्ञान, भक्ती, योग सौख्यदात्री । ज्ञानेश्वर माउली जगद्धात्री ।
मन ठेवुनी तत्कृपापात्रीं । पाय सुधी क्षेत्रीं पूजिलें ॥१६०॥
दोहा
श्रीज्ञानेश्वर कृपामय, भवभयहारक मूर्ति ।
प्रेमें नमूं साष्टांगमति, निगम गाति यत्कीर्ति ॥१६१॥

हरिः ॐ तत्सत् श्रीज्ञानेश्वरकृपाप्रसादे नानाछन्दबद्धे निदिध्यासनप्रकाशे
सांख्ययोग वेदान्तसमन्वयपूर्वक योगवेदान्तमेलनोपयोगी

बहुविधयोगप्रक्रियानिरूपणेन सांख्ययोगयोर्वेदान्तगतफल निरूपणं नाम
सप्तमः समासः॥
॥ हरिः ॐ तत्सत्श्रीज्ञानेश्वरार्पणमस्तु ॥ शुभं भवतु ॥
०००

समास ८ वा : भक्ति निष्ठा

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमाउलीसमर्थ ॥
फुल्लाब्जवृत्तम् (वंगदेशीय पायरवृत्ताधारेण)
श्रीज्ञानेश्वर पाउली मन सदा वसे ।
केव्हां मा भववारिधी न नयनीं दिसे ।
भेदाभाव समस्त होउनि परैक्यता ।
भक्त्या दृष्टसुखस्थितौ सहजमुक्तता ॥१॥
चौपाई
निगमगमनधर जाणुनि सारे । झाला जरि मुक्तहि तो बारे ।
दृष्टसुखार्थ तरी हरिभक्ती । करुनि साधिजे जीवत मुक्ती ॥२॥
(य१-१३४)
अभंग
त्रिविध ती भक्ती बोलिली संतांनीं । कर्म-मिश्र आणि शुद्धा दूजी ॥१॥
तिसरी ती भक्ती ज्ञानमिश्रा जाण । ज्ञानासह पूर्ण सत्ता तीची ॥२॥
सहजचि प्रभा तयांत लहरी । उल्हासाची परी स्वाभावीक ॥३॥
तेवीं आत्मप्रीती सहज उल्हासू । सगुण सौरसू भक्ती ते कीं ॥४॥
ज्ञानेश्वर प्रभू करुणें कळत । ज्ञानें उजळत चित्त जेव्हां ॥५॥
दोहा
दृढ अपरोक्ष ज्ञान जरी, तरि मृति मुक्ति विलास ।
यास्तव दृष्टसुखार्थही, करणें पुनरभ्यास ॥४॥
मनोनाश, वासनाक्षयो, रक्षण तत्त्वज्ञान ।
ज्ञानियास कर्तव्यता वदले मुनी सज्ञान ॥५॥
(मुनी म्हणजे विद्यारण्यस्वामी)
(गद्य)

यद्यपि ज्ञानानंतर प्रारब्धनिवृत्तीवांचून अन्य कोणतीही अपेक्षा उरत नाहीं; निमूटपणें प्रारब्धक्षयाची वाट पहात बसून कर्तव्यताशून्य रहावे, असें अद्वैतसिद्धींत मधुसूदन स्वामी बोलिले, तें सत्य आहे,

तथापि ज्ञानानंतर ममतारूपदुःखनिवृत्ति होऊन अहंतारूप दुःख भोगावें लागते, असें वामनपंडित म्हणतात, तेंही अन्यथा नाहीं.

परंतु योगवासिष्ठांत वसिष्ठ म्हणतात :-

श्लोक

तत्त्वज्ञानं मनोनाशो वासनाक्षय इत्यपि ।
एकत्र त्रितयाऽभ्यासाज्जीवन्मुक्तिर्दृढा भवेत् ॥

याप्रमाणें तत्त्वज्ञान, मनोनाश आणि वासनाक्षय यांचा एककालीं अभ्यास सांगितला आहे; त्यावांचून जीवन्मुक्ति होत नाहीं. (य१-१३५)

पुन्हां त्याच ग्रंथांत विश्वामित्रांनी वसिष्ठांना रामाविषयीं प्रशंसा करितांना म्हटलें आहेः-

स्वात्मतत्त्वाभिगमनं प्रायशो भवति नृणाम् ।
मुने विषयवैरस्यं कदर्थादुपजायते ॥

विश्वामित्र म्हणतात, हे वसिष्ठ मुने ! आत्मज्ञान एकवेळचे सहज होऊं शकेल, परंतु विषयांपासून चित्त निघणें कठीण आहे. श्रवणादिकेकरून अपरोक्षज्ञान झालें तथापि विरक्त्याद्यभ्यास ज्ञानानंतरही करावा, हा या श्लोकाचा अभिप्राय आहे.

साधनचतुष्टयसंपन्न मुमुक्षूला तर तो सहज सिद्धच असतो. परंतु साधनचतुष्टयसंपन्न न होऊन ज्याला आकाशफलपातवत् महावाक्यार्थ समजला, त्याने ज्ञानानंतर विरक्त्याद्यभ्यास स्वतंत्र करावा. हें निरूपण सोपानसिद्धीत (श्रीमहाराजकृत) स्पष्ट केलें आहे. व जीवन्मुक्तिविवेकांत स्वामी विद्यारण्यांनींही चांगलें प्रतिपादन केलें आहे; आणि विरक्ती, उपरती असल्यावांचून दृष्ट-दुःखनाश होत नाहीं, असें चित्रदीपांत प्रकारांतरानें सांगितलें आहे. म्हणून

अद्वैतसिद्धींतील वचन विदेहमुक्ति-अभिलाषपर आहे. अन्यथा अद्वैतसिद्धिकारांच्या भक्तिरसायन / गूढार्थदीपिकादि ग्रंथस्थ भक्तिप्रतिपादक वाक्यांशीं विरोध येतो.

सारांश, दृष्टदुःखनिवृत्ति, ज्ञानानंतर अपेक्षित आहे. दृष्टसुखप्राप्ती तर अपेक्षित नाहीं. कारण कीं दृष्टसुख तर विषयजन्य आहे, त्याचा ब्रह्मनिष्ठाचे ठायीं विरक्ति-अभ्यास वचनानें निषेध प्राप्त होतों, हें यद्यपि सत्य आहे. तथापि विरक्त्युपरत्याभ्यासाने दृष्टदुःखनिवृत्ति होते.

परंतु भगवद्भक्तीनें विरक्त्युपरत्याद्यभ्यास साधून दृष्टदुःखनिवृत्ति आणि दृष्टपरमानंदप्राप्ती होते.

ननु, भक्तांच्या प्रारब्धाचा भोगावांचून नाश होतो कीं काय ?

– तर 'नाहीं' असेंच आमचें उत्तर आहे. परंतु अभिभव मात्र होतो. अद्वैतकौस्तुभकारांनीही जीवन्मुक्तीच्या अभ्यासानें प्रारब्धाचा अभिभवच मानला आहे. त्या प्रारब्धाऽभिभवानें दुःख मात्र भासत नाहीं. ही केवळ ज्ञानानंतर भक्ति करणारांचीच गोष्ट झाली, परंतु जन्मीचे प्रथमपासूनच मुक्ति अवस्थेपर्यंत जे भक्त असतात, त्यांचें दुःखरूप प्रारब्धच नसतें, हें मधुसूदनस्वामींनी गूढार्थदीपिकेंत सांगितलें आहे. अस्तु.

या ठिकाणीं दृष्टपरमानंद म्हणजे विषयसुख नव्हे. कारण विषयसुखाचे ठिकाणीं जरी दृष्टता आहे, तरी व्यभिचारित्वामुळें त्यांचें ठिकाणीं परमानंदता नाहीं. आणि अनध्यस्तविवर्ताच्या नित्यत्वामुळेंच भक्त्यानंदाचें ठिकाणीं अव्यभिचारित्व आहे; (१.१३६) म्हणून तिचे ठिकाणीं दृष्टपरमानंदता आहे. अन्वयानें सगुणभक्ती आत्मप्रीतीचा उल्हास होय, हें पूर्वींच सांगितले आहे, आणि 'अव्यभिचारेण भक्तियोगेन' हें भगवंताचें वचनही याला प्रमाण आहे. भगवद्भक्तीने दृष्टपरमानंदप्राप्ती मधुसूदन स्वामींनी भक्तिरसायनांत सांगितली आहे. ते म्हणतात,

भगवान् परमानंदस्वरूपः स्वयमेव हि ।
मनोगतस्तदाकारः किमन्यदवशिष्यते ॥

येथें 'आकार' शब्दावरून सगुण परमात्माच घेतला आहे, परंतु तो मायागुणांनीं रहित असा समजावा. ''किमन्यदवशिष्यते'' या वाक्यावरून त्याला ज्ञान मिळविणेंही शेष राहत नाहीं, असा अभिप्राय निघत असल्यामुळें, ज्ञानानंतर ही सगुणभक्ती सांगितली आहे; आणि तिच्या योगानें परमानंदप्राप्ती 'भगवान् परमानंदः / मनोगत'' इत्यादि शब्दांनी दर्शविली आहे. हरीच्या गुणांविषयीं वर्णन करतांना, श्रीमद्भागवतांत ''निवृत्ततर्षैरुपगीयमानात्'' असें परीक्षितीनें म्हटलें आहे. आणि –

''आत्मारामाश्च मुनयो निर्ग्रंथाअप्युरुक्रमे ।
कुर्वन्त्यहैतुकीं भक्तिमित्थंभूतगुणो हरिः''॥

याप्रमाणें शुकाचार्यांनीही म्हटलें आहे. परीक्षिती शिष्य आणि श्रीशुकाचार्य गुरु या दोघांचाही अभिप्राय एकच पडल्यामुळें, आणि भागवत हें शास्त्र असल्यामुळें,

* भागवतांत शास्त्रप्रतीतीनें,
* शुकवाक्यावरून गुरुप्रतीतीनें, आणि
* परीक्षितीच्या आत्मप्रतीतीने, ज्ञानानंतर भक्तिदार्ढ्य सिद्ध आहे.

याला श्रुती भगवतीही संमती देते -

''यं सर्वे देवा नमन्ति मुमुक्षवो ब्रह्मवादिनश्च''

ब्रह्मवादीही नमस्कार करितात.

यावरून ज्ञानानंतरच भक्तीची सिद्धी होते.

याप्रमाणें सौषुप्तश्रुती आहे. तशी जागृतश्रुतीही आहे -

ब्रह्मभूतः प्रसन्नात्मा न शोचति न कांक्षति ।
समः सर्वेषु भुतेषु मद्भक्तिं लभते पराम् ।। गीता

योगनिद्रेंत वेद निश्वास असल्यामुळे त्याला सौषुप्त श्रुती म्हटलें आहे. आणि गीता प्रत्यक्ष सांगितल्यामुळे तिला जागृत श्रुती म्हटले आहे. आणि गीतेची प्रशंसा करितांनां ज्ञानेश्वरमहाराजांनींही असेंच म्हटलें आहे.(य१-१३७)

एवं वेदांचें मूळ सूत्र । सर्वाधिकारैक पवित्र ।
श्रीकृष्णें गीताशास्त्र । प्रकट केलें ।।१।।
येथ गीता मूळ वेदां । ऐसें केविं पां आलें बोधा ।
हें म्हणाल तरी प्रसिद्धा । उपपत्ति सांगों ।।२।।
तरी जयाच्या निःश्वासी । जन्म जालें वेदराशी ।
तो सत्यप्रतिज्ञ पैजेसि । बोलिला स्वमुखें ।।३।। ज्ञाने.

तात्पर्य, ज्ञानानंतर, भक्ती दृष्टदुःखनिवृत्ति आणि दृष्टपरमानंदप्राप्तिदात्री आहे. ही भक्ति ज्याचे ठिकाणीं जितकी असेल, तितकीच त्याचे ठिकाणीं दृष्टपरमानंदप्राप्ती आहे.

अद्वैतकौस्तुभांतही ज्ञानानंतर मनोनाशाद्यभ्यासाच्या तारतम्यामुळें, जीवन्मुक्तीच्या दृष्टसुखाविषयीं तरतमभाव बोलिला आहे. ''दृष्टसुखं तु तारतम्येन भवति'' अद्वैतकौस्तुभ व अन्यग्रंथांतही असेंच म्हटलें आहे. तत्र -

तारतम्येन सर्वेषां चतुर्णां सुखमुत्तमम् ।
तुल्या चतुर्णां मुक्तिः सा दृष्टसौख्यं विशिष्यते ।।

चतुर्णां म्हणजे ब्रह्मवित्, ब्रह्मविद्वर, ब्रह्मविद्वरीयान्. आणि ब्रह्मविद्वरिष्ठ यांचीं लक्षणें पुढें येतील.

''अद्वैतसिद्धींत जो 'मुक्तौ तारतम्यभंग' सांगितला, तो विदेहमुक्तीविषयीं जाणावा,'' या स्थानीं हें रहस्य आहे. ज्ञानानंतर मनोनाशाद्यभ्यासाचें केवळ दृष्टदुःखनिवृत्ति जसें फल आहे, तसें तें भगद्भक्तीचें फल नाही. तर दृष्टदुःखनिवृत्ति आणि दृष्टपरमानंदप्राप्ति भक्तीचें स्वरूपच आहे; म्हणून भक्तीच फलरूपिणी आहे. जसें 'स्वयं फलरूपतेति ब्रह्मकुमारः' या सूत्रानें श्रीनारदस्वामींनी प्रतिपादन केलें. आणि -

जीवन्मुक्तिदशायान्तु न भक्तेः फलकल्पना ।
अद्वेष्टृत्वादिवत्तेषां स्वभावो भजनं हरेः।।

अद्वेष्टृत्वादिगुणवत् जीवन्मुक्तांचे ठिकाणीं भक्ती रहाते, असें सांगून मधुसूदनांनीही भक्तिफलपार्थक्याचा निषेध केला.

भक्तीचे 'ज्ञानमिश्रा' हें विशेषण अद्वैतज्ञान आणि माहात्म्यज्ञान दाखविण्यासाठीं आहे.

''तत्रापि न माहात्म्यज्ञानविस्मृत्यपवादः''

ह्या सूत्रानें भक्तांना माहात्म्यज्ञानाचा स्वीकार नारदस्वामींनीं केला आहे. ज्ञानानंतर जी ही भक्ती सांगितली, ती साकारपरमेश्वराविषयीं (१.१३८) मात्र समजावी. कारण निराकारोपासनेचा अभ्यास करतांना अत्यंत क्लेश आहेत असें भगवंताचें वचन आहे म्हणून. तद्यथा-

क्लेशोऽधिकतरस्तेषामव्यक्तासक्तचेतसाम् ।
अव्यक्ताहि गतिर्दुःखं देहवद्भिरवाप्यते ।। गीता.

१. अनध्यस्त-विवर्ताचे लक्षण

आतां तो साकार परमात्मा प्रतिबिंबाकृति नसून बिंबरूप परमेश्वराचा किंवा ब्रह्माचाच कनकालंकारादिवत् अनध्यस्त-विवर्त आहे.

अभिन्ने सति,
अपर-रूपत्वे सति,
भेद-अभानपूर्वकम्,
अधिष्ठानज्ञान-अनावरकत्वे सति, च
प्रीतिमात्रत्वाद्,
अधिष्ठानज्ञान-अनिवर्त्यम्,
अनध्यस्तविवर्तलक्षणम् ।।

हें अनध्यस्तविवर्ताचे लक्षण होय. आणि -

२. अध्यस्त-विवर्ताचे लक्षण
अपररूपत्वे सति,
भेद-भानपूर्वकम्
अधिष्ठानज्ञान-आवरकत्वे सति च
अधिष्ठानज्ञान-निवर्त्यम्
अध्यस्तविवर्तत्वम् ।।

हे अध्यस्तविवर्ताचें लक्षण होय.ह्यांतून अनध्यस्तविवर्तासंबंधी निरूपण भक्तिपदतीर्थामृतादि अनेकस्थानी पहावे.

हा अनध्यस्तविवर्त ब्रह्माचा किंवा बिंबभूत परमेश्वराचाच आहे; प्रतिबिंबाचा

किंवा मायेचा नाहीं.

बिंबभूत परमेश्वराला किंवा ब्रह्मालाच 'ईश्वर' आणि अविद्योपाधिक अध्यस्ताला किंवा प्रतिबिंबाला 'जीव' दृष्टिसृष्टिवादी म्हणतात, असें मधुसुदन स्वामींनी सिद्धान्तबिंदूंत दर्शविलें आहे.

या स्थानीं आणखी हें रहस्य आहे कीं,

''बिंबभूत ईश्वर, हे साकार भगवच्छरीर मानलें तर तें ब्रह्माचा अनध्यस्तविवर्त आहे; आणि ब्रह्म व तें भिन्न नाहीं. येणेंकरून जीवपक्षही व्यावृत्त होतो. अतो सा भगवद्भक्तीच ज्ञानानंतर अपेक्षित आहे, हें सिद्ध झालें.''

या विषयीं श्रुतिसंमतीही सांपडते -

''आत्मक्रीड आत्मरतिः क्रियावानेष ब्रह्मविदां वरिष्ठः''

ह्या श्रुतीचा अर्थ अद्वैतकौस्तुभांत एवंविध केला आहे. –

१. आत्मक्रीड :- ''तत्त्वमसि'' महावाक्याच्या विचारानें ''अहंब्रह्मास्मि'' अशा प्रकारची ज्याची दृढ अपरोक्षज्ञानमय वृत्ति झाली. तो आत्मक्रीड म्हणावा. कारण तो नेहमीं आत्म्याचे ठायींच रमत असतो.

२. आत्मरति :- दृढ अपरोक्षज्ञान झाल्यावरही बाधितानुवृत्तीनें जो विजातीय प्रपंच भासतो, तत्तिरस्कारपूर्वक दृढ अपरोक्षानंदाचें रक्षण करणारा आत्मरति म्हणावा.

क्रीडा म्हणजें ब्रह्मज्ञान. ह्याच्या योगानेंच ब्रह्मात्म्यैक्यसमाधी दृढ होतो.

या श्रुतीचाच अर्थ वसिष्ठाचार्यांनी ज्ञानभूमिकासप्तक वर्णन करितांना (१.१३९) चवथ्या भूमिकेपासून सातव्या भूमिकेपर्यंत दर्शविला आहे.

प्रथम शुभेच्छादि तीन साधन भूमिका सांगून, पुढें सत्त्वापत्त्यादि चार फल भूमिका सांगितल्या आहेत.

४. ब्रह्मवित् :- सत्त्व म्हणजे ब्रह्म; त्याची ज्या भूमिकेवर आपत्ति होते, ती सत्त्वापत्ति म्हणावी. म्हणजे पूर्वपरोक्षत्वेंकरून जे ज्ञात ब्रह्म, तें या भूमिकेवर अपरोक्ष होतें. ह्यालाच ब्रह्मवित् म्हणतात. आणि -

५. ब्रह्मविद्वर :- ह्या चार भूमिकांच्या अभ्यासानें, अविद्या आणि तिचें कार्य जो संसार, त्याचे ठिकाणीं आसक्ती रहात नाहीं- म्हणजे विजातीय वृत्तींचा तिरस्कार होतो. हिलाच असंसक्ति म्हणतात. इच्यावर जो आरूढ, तो ब्रह्मविद्वर म्हटला जातो.

६. ब्रह्मविद्वरीयान् :- ब्रह्माच्या ध्यानानेंच जेव्हां इतर कोणताही पदार्थ दिसत नाहीं, तेव्हां साधक पदार्थाभाविनी नामक सहाव्या भूमिकेवर आरूढ झाला म्हणून समजावें. अत्रारूढालाच ब्रह्मविद्वरीयान् अशी संज्ञा आहे. ह्या

भूमिकेवर साधक स्वतःच्या इच्छेनें व्युत्थितचित्त होत नाही, किंतु दुसऱ्याच्या इच्छेनें होतो. आणि

७. ब्रह्मविद्वरिष्ठ :- ब्रह्मध्यानानेंच ग्रहणत्यागरहित एकरसवृत्तीनेंच स्वभावनिष्ठसमाधिमान् जेव्हां साधक होतो, तेव्हां तो पूर्ण सातव्या तूर्यगा नामक भूमिकेवर आरूढ झाला म्हणून समजावें. ह्यालाच ब्रह्मविद्वरिष्ठ ही संज्ञा आहे.

८. जीवन्मुक्त :- भगवान् वसिष्ठ म्हणतात, सातव्या भूमिकेवर जो गेला आहे, तोच जीवन्मुक्त म्हणावा. कारण त्याला सुखदुःख बाधा करीत नाहींत. तो आपल्या किंवा दुसऱ्याच्या इच्छेनें व्युत्थानही पावत नाहीं, असें अद्वैतकौस्तुभकार म्हणतात. -

परंतु सातव्या भूमिकेवर गेलेलाही पुरुष लोकीं विचरतो, असें वसिष्ठांनी म्हटलें आहे, म्हणून तेंच अधिक प्रमाण आहे.

समन्वय :- तरी, अद्वैतकौस्तुभकारांचें म्हणणें समाधि-विषयीं आणि वसिष्ठाचार्यांचें म्हणणे संधि-विषयीं लाविलें असतां विरोध येत नाही. भक्तांची दशा वसिष्ठवाक्याप्रमाणेंच असते. याप्रमाणें या श्रुतीचा अर्थ सांगितला.

सगुण ध्यान :- श्रुतीत जें ब्रह्मध्यान सांगितलें आहे, तें सगुणध्यानच असलें पाहिजे. कारण, निर्गुणध्यान करणाऱ्याला साधकदशेंतच अतिशय क्लेश सांगितले आहेत आणि सिद्धदशेंत तर त्याला निर्गुण ब्रह्माचें ज्ञान होऊन गेलें असतें. शिवाय, सिद्धदशेंत निर्गुणब्रह्मध्यानाच्या क्लेशापेक्षां प्रारब्धकर्म भोगण्याचे क्लेश कमी आहेत, हें अनुभवानेंही सिद्ध असल्यामुळे, श्रुतीनें सगुण ध्यानच सांगितलें असलें पाहिजे. ज्याप्रमाणें ब्रह्मवेत्ता झाल्यावरही असंसक्त्यादि तीन भूमिका अभ्यसनीय आहेत. त्याप्रमाणेंच ''तस्यैवाऽहं / ममैवासौ / स एवाहं'' इति त्रिधा । या वाक्यांत सांगितलेली तीन प्रकारची भक्तीही आवश्यक आहे. कारण, हें वाक्य मधुसूदनस्वामींनी ''सर्वधर्मान्परित्यज्य'' या श्लोकाच्या टीकेंत ज्ञानी भक्तांविषयींच बोलिलें आहे. आणि भक्तियोगानेंच समाधी होतो असें घेरंडाचार्यही म्हणतात.

ज्ञानानंतरही असंप्रज्ञात समाधी करावा, असें योगवार्तिककाराचें मत आहे. तो समाधी भक्तियोगानेंच साधत असल्यामुळें भगवदेकनिष्ठांना भक्तीतरापेक्षा नाहीं, तृप्तिदीप आणि विद्यानंद ग्रंथांत ज्याला विक्षेप होत असतील त्यांनीं समाधी करावा.

मी समाधी कशाला करूं? असा मुक्तवृत्त्याभिप्राय सांगितला, तो विवेक-दशेंतील निरंकुशा तृप्तीविषयीं समजावा. कारण विवेकी आणि योगी यांचा आपआपल्या दशेंत समाधीच असतो, असें आत्मानंद ग्रंथांत सांगितलें आहे.

तात्पर्य, व्युत्थान-दशा-विनिवारणार्थ जीवन्मुक्ती अभ्यास करणें आवश्यक आहे, असें तृप्तिदीपादि-ग्रंथकारांनींच स्वकृत जीवन्मुक्ति विवेकांत म्हणून ठेविलें आहे. तो जीवन्मुक्ति-अभ्यास भक्तीनें सहज साधतो; आणि स्वामी विद्यारण्यांनीं सांगितलेल्या विरक्ति-उपरती, भक्तांच्या आंगी सहजच येतात. या विषयीं विख्यात भक्त भगवद्विभूती श्रीतुकाराम महाराज म्हणतातः-

अभंग

विषयीं विसर पडता निःशेष । अंगीं ब्रह्मरस ठसावला ॥१॥
माझी मज झाली अनावर वाचा । छंद या नामाचा घेतलासे ॥२॥
लाभाचिया सोसें पुढें चाले मना । धनाचा कृपणा लोभ जैसा ॥३॥
तुका म्हणे गंगा सागरसंगमीं । अवघ्या झाल्या उर्मी एकमय ॥४॥

याप्रमाणें भक्तीनेंच व्यतिरेकरूप पांचवी सहावी भूमिका साधत असून सातवी जी अन्वयरूप भूमिका तीही भक्तीनेंच साधते, हें तुकाराम महाराजांचे वाक्यावरून सिद्ध होते.

अभंग

भक्त ऐसे जाणा जे देही उदास । गेले आशापाश निवारूनी ॥१॥
विषय तो त्यांचा झाला नारायण । नावडे धन जन माता पिता ॥२॥
निर्वाणी गोविंद असे मागेंपुढें । कांहींच सांकडे पडो नेदी ॥३॥
तुका म्हणे सत्य कर्मा व्हावे साह्य । घातलीया भय नरका जाणे ॥४॥

(य१-१४१) म्हणजे अन्वयब्रह्मरूपानेंच विश्व हें सगुण भगवंताचें स्वरूप आहे असा त्यांचा अनुभव असतो, हें पहिल्या वाक्यानें सांगून, विषय त्यांना सगुणरूपावांचून विषयरूपानें दिसत नाहींत, हें ''नावडे धन जन '' इत्यादि शब्दांनी सांगितलें आहे. अशा प्रकारची अद्वैतभक्ती क्रियारहित-अकृत्रिम श्रीज्ञानेश्वरमहाराजांनींही अमृतानुभव आणि ज्ञानेश्वरीत दर्शविली आहे.

जीवनमुक्ति व विदेहमुक्ति

कोणी एक अकृत्रिम । भक्तीचें हें वर्म ।
योगज्ञानादिविश्राम । भूमिका हे ॥ अमृ.अ.९
तैसी क्रिया कीर न साहे । परी अद्वैती भक्ती आहे ।
हे अनुभवाची जोगे, नोहे । बोलण्या जोगे ॥ ज्ञाने.अ.१८

या प्रमाणें ज्ञानेश्वरमहाराजांनींही जीवन्मुक्तींत अद्वैतभक्ती सांगून, विदेहमुक्तींतही राहते, परंतु अनुभवावांचून बोलता येत नाहीं, असें अभिप्रायानें दर्शविलें आहे. कारण ज्ञानेश्वरींतच अर्जुनाचें म्हणणें एका ओवींत असें दाखविलें

आहे कीं –

आम्हां भोग-मोक्षाचिये ठायीं । श्रीमूर्तीवांचूनि नाहीं ।
म्हणूनि तैसाचि साकार होई । हे उपसंहारी आतां ॥ ज्ञा.अ.११

यांत भोग म्हणजे जीवन्मुक्तिस्थच समजावा. सांसारिक भोग समजूं नये. कारण सांसारिक भोग सर्व जीवांनां आहेत तशी श्रीमूर्ती सर्व जीवांना सुलभ नाहीं. म्हणून -

''भोग म्हणजे जीवन्मुक्ती व मोक्ष म्हणजे विदेहमुक्ती''

- असा अर्थ करावा. पण विदेहमुक्तांचा अनुभव वाणीचा विषय नसल्यामुळे, तेथें भक्ती अनुभवायोग्यच राहते, असें श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर महाराजांचे म्हणणे यथार्थ आहे.

आतां कोणी म्हणेल कीं विदेहमुक्तींत भक्ती राहणें शक्यच नाहीं, तर त्याला आम्हीं (य१-१४२) असें विचारतो कीं असें जे तुला वाटलें तें जीवन्मुक्ति दशेंत वाटलें? कीं विदेहमुक्तींत वाटलें? की बद्धदशेत वाटलें?

१- पहिल्या पक्षीं तुला विदेहमुक्तीची कल्पना आली कशी?

सारांश, तुझ्या आंगीं आतांच भक्ती नसल्यामुळें, विदेहमुक्तींत भक्ती रहात नाहीं, असें तुला वाटलें असलें पाहिजे.

२- दुसऱ्यापक्षीं, तेथें भक्ती रहात नाहीं हें तूं सांगावयाला आलास कसा? कारण ''न स पुनरावर्तते'' अशी श्रुतीही आहे. यद्गत्वा न निवर्तेते - अशी जागृच्छ्रुतीहि आहे.

३- तिसऱ्यापक्षीं तुझे म्हणणेंच प्रमाण नाहीं. कारण तूं तर्काचे स्वाधीन होऊन समर्थांच्या वाक्याचें खंडण करूं पाहतोस !

४- ननु, ज्ञानेश्वरमहाराजांनी तरी विदेहमुक्तीचा अनुभव जीवनमुक्तींत कसा सांगितला? अशी तुला शंका येईल तर त्याचें उत्तर असें आहे कीं -

समाधिगत ब्रह्मानुभव आणि विदेहमुक्ती एकरूपच आहेत.

- कारण समाधी आणि विदेहमुक्ती हे दोन्हीही वाङ्मनोगोचर नाहींत.

भक्तांना ही विदेहमुक्ती स्वेच्छेनें होते, पण -

भक्तीवांचून ज्ञानियाला प्रारब्धभोग संपेपर्यंत वाट पहावी लागते.

या ब्रह्मज्ञानपूर्वक समाधींतूनच कधींही व्युत्थान न झालें म्हणजे विदेहमुक्ती झाली म्हणून समजावी.

शरीरपात प्रारब्धकर्माच्या संपण्यावर अवलंबून आहे,

विदेहमुक्ती सत्त्वावर अवलंबून नाहीं. म्हणून

ज्ञानेश्वर महाराजांनी घेतलेल्या समाधींत ते पूर्ण विदेहमुक्त आहेत,

असा आमचा निश्चय आहे.

यास्तवच आळंदींतील समाधिदर्शनादिकांनीही मुमुक्षू पूर्ण होतो. आणि श्रीज्ञानेश्वरमहाराज ईश्वर असल्यामुळें त्यांचे शरीर अनध्यस्तविवर्तरूप आहे. म्हणून ते सहजच अधिष्ठानज्ञानप्रतिबंधक नसल्यामुळे आणि त्यांना प्रारब्धही नसल्यामुळें तत्पातावश्यकता अपेक्षित नाहीं.

माझें मायामय शरीर ज्ञानप्रतिबंधक नसल्यामुळें ऐन्द्रजाली जसा आपल्या मायेचा उपसंहार करतो, तसा उपसंहार मी आपल्या शरीराचा करीत नाही, असें गीतेच्या टीकेत चतुर्धराचार्यांनी भगवंताचे म्हणणें स्पष्ट केलें आहे. तेंच तात श्रीज्ञानेश्वर महाराजांविषयींही समजावें, असो.

हा विदेहमुक्त्यनुभव स्वप्रतिबंधरहित जगत्कृपानिष्ठावतरणदशेंत ज्ञानेश्वर महाराजांनी सांगितलेला, म्हणून तत्प्रमाण वैदिकप्रमाणवत् अबाधित होते.

''तर मग समाधींत आम्हालाही विदेहमुक्तीचा अनुभव आहे,'' असें तूं म्हणशील तर, 'होय असला पाहिजे' असें आम्हीही म्हणतो. (य१-१४३)

परंतु सर्वांचा अनुभव ज्ञानपूर्वक समाधींत एकरूपच असला पाहिजे. तुझा अनुभव समर्थांशीं जुळत नसल्यामुळे, तूं समाधी समजून भलत्याच कोणत्या तरी दशेचा अनुभव घेतला असला पाहिजेस कारण तुझी वादाकडे प्रवृत्ति दिसतें. आणि आचार्य तर म्हणतात की –

''देहेऽहंमतिरुज्झ्यतां बुधजनैर्वादः समुत्सृज्यताम्''

आणि तूं तर समर्थांशीं स्पर्धा करायला पाहतोस ! म्हणून तुझें म्हणणें प्रमाण नाहीं. तातवाक्यावरून आमचें म्हणणें परमसिद्ध आहे.

इतकेंही करून तूं ज्ञानाचा एकवेळ अभिमान धरशील तर, ज्ञानियालाही ईश्वराच्या इच्छेनें मोह पडतो, हे प्रमाणावरून सिद्ध आहे. मार्कण्डेयपुराणांत एके ठिकाणीं असे म्हटलें आहे कीं-

श्लोक

ज्ञानिनामपि चेतांसि देवी भगवती हि या ।
बलादाकृष्य मोहाय महामाया प्रयच्छति ॥

तात्पर्य, भगवंताच्या भक्तीवांचून, ज्ञानियालाही भीति आहे, हे तुकाराम महाराजांच्या वाक्यावरूनही सिद्ध असल्यामुळे भगवद्भक्तींच ज्ञानानंतर विहित आहे, असे आम्हीं स्पष्ट म्हणतो. तें वाक्य असें -

अभंग

ज्ञानियांचे घरीं चोजवितां देव । तेथें अहंभाव पाठीं लागे ॥१॥
म्हणोनिया अवघे सांडिले उपाय । धरियेले पाय दृढ तुझे ॥२॥

वेदपरायण पंडित वाचक । न मिळती एक एकामधीं ॥३॥
पाहों गेलों भाव कैसी आत्मनिष्ठा । तेथें देखे चेष्टा विपरीत ॥४॥
आपुलिया नाहीं निवाले जें अंगे । एकी करती रागें गुरू गुरू ॥५॥
तुका म्हणें मज कोणाचा पांगिला । नको बा विठ्ठला करूं आतां ॥६॥

परंतु हीं वाक्यें विद्युद्वत् परोक्षज्ञान होऊन पुनर्विक्षेपाला चिकटणाऱ्या विषयीं आहेत. पुनर्विक्षेपाचे निरूपण, सादिभ्रम या पर्यायानें, 'पुष्प' ग्रंथांत केलें आहे, तें पहावें. खऱ्या ज्ञानियाविषयीं नाहींत; कारण, खऱ्या ज्ञानियांचा तर भक्ती हा स्वभाव असतो असे वर मधुसूदनोक्त श्लोकांत सांगितलेच. असो, आतां प्रथम निदिध्यासनदशेंतही ह्या भगवद्भक्तीचा आश्रय करून साक्षात्कारदशेंत तिची पूर्णता कशी होते, हें ओवीछंदेकरून बोलिजेल.

ओवी

तरी परमेश्वर ठेवा । जो वारी बंध गोवा ।
तेथ सर्वभावा । समर्पिजे ॥१॥
जेवीं ज्ञाना आधीं विरक्ती । तेवीं भक्तीं आधीं दीनता स्थिती ।
निःसाधन व्हावया निश्चिती । दीनता साह्य ॥२॥
सानन्य दीनता जाण । तैंचि फावें परमात्मा आपण ।
येव्हवीं दीनता दरिद्रिया कारण । सहजचि असें ॥३॥
'अन्याश्रयाणां त्यागोऽनन्यता' । हे नारदसूत्रोक्ति तत्वतां ।
स्वचित्तदोषदर्शन दीनता । येथ विरक्तता सहजचि ॥४॥
विरागें विषय तिरस्कारें सुटती । तेणें बळकावें कठोर वृत्ती ।
आणि दीनतायां विषय स्वभावें सुटती । नम्रवृत्ति बळकावें ॥५॥
भोग्यदोषदर्शन ती विरक्ती । भोक्तृदोषदर्शन दैन्य स्थिती ।
येणें निःसाधन प्रतीती । साविया घडे ॥६॥
सर्वदां चित्तीं वाहे अनुताप । हृदयीं अनन्य भगवत्संकल्प ।
पति पुत्र माय बाप । भगवंत देखे ॥७॥
सानन्य दीन पुरुषा प्रती । जवळी असतां विषय संपत्ति ।
इंद्रिये कर्षो न शकती । ऐशी प्रतीति महंताची ॥८॥
दरिद्रियाचें मन । सहजचि भयसंपन्न ।
म्हणवूनी उन्मादपण । न घडे तत्करवीं ॥९॥
अनन्यतेमुळें पाही । भक्तां भय तों सर्वथा नाहीं ।
परी दीनतेस्तव कदांही । विषयोन्माद घडेना ॥१०॥
अदीन कर्मे सांडितां । तरी निषिद्ध येवों पाहे हातां ।

आणि सानन्यदीन कर्मे सांडितां । निषिद्ध सर्वथा स्पर्शेना ॥११॥
म्हणोनी सानन्य दीन भगवंती । तोचि वास्तव बोलीजे यती ।
येर विहितकर्मत्यागस्थिती । भोजन पानी निषिद्धता ॥१२॥
ऐसी जरी दीनता वाहे । तरी हरीवीण अन्यापेक्षा नोहे ।
हें निकें बोलिलें आहे । तुकाराम स्वामीनीं ॥१३॥

अभंग

चारी दिशे आम्हां भिक्षेचा अधिकार । न मिळें भाकर भक्षावया ॥१॥
विठ्ठलाचे दास केवळ भिकारी । आम्हांलागीं हरी उपेक्षीना ॥२॥

(शिवाजी स्वतः दर्शनास आले त्या वेळीं त्यास केलेला उपदेश या मथळ्या खालील ''राया छत्रपती ऐकावे वचन'' या पहिल्या चरणाच्या अभंगांतील चरणें आहेत.) (य१-१४५)

ओवी

एवं सानन्य दीनता । जैं दृढ वाढे चित्ता ।
तैं विषयांची आस्था । निःशेष जाय ॥१४॥
एवं देहबुद्धीनें दीनता । तदा गळे देहाऽहंता ।
आणि जीवबुद्धीनें तत्वतां । 'तस्यैवाऽहंता भक्ति' साधे ॥१५॥
'ममैवासौ' हें ही जाण । मध्यसंवेग भक्ती लक्षण ।
आत्मबुद्ध्या भक्तिसंपन्न । 'स एवाऽहं' इति रीति ॥१६॥
त्यातील ही अहंता वेगळी करून । नाहींसा होऊनी आपण ।
आपणासहित सैव भगवान । पाहणें कीं ॥१७॥
ही उत्तम पराभक्ती । बोलिली आहे समर्थी ।
दासबोधीं यथार्थ रीति । श्रुती युक्ती अनुभवें ॥१८॥
आतां ती भक्ती शुद्ध । कवणें रीति प्रसिद्ध ।
ती बोलिजे सिद्ध । साधिकरण ॥१९॥
तरी तत्पदार्थ परोक्षपण । त्वं पदार्थापरोक्षज्ञान ।
हे दोन्हीं धर्म वेगळेकरून । ब्रह्मज्ञान सांपडे ॥२०॥
इयं ज्ञानकांडरीती । येथ पाहिजे लक्षणावृत्ती ॥
आणि भक्तौ महावाक्यशक्ती । आनंदप्राप्तिदात्री स्वयें ॥२१॥
महावाक्यशक्तिवृत्त्या ज्ञान । वेदांत-परिभाषाकार बोलिलें जाण ।
तरी शक्तिवृत्त्या भक्तिस्थापन । आम्हां स्वीकारितां नये कां ॥२२॥
शक्तिवृत्तीनें मानितां ज्ञान । परी पूर्वाचार्यविरोध गहन ।
शक्तिवृत्तीनें मानितां भजन । पूर्वाचार्यविरोध नोहे ॥२३॥

म्हणोनी परिभाषाकाराहुनी । युक्ति आमची श्रयिजे सज्जनीं ।
येथ मान देतां जरी शार्ङ्गपाणी । तरी सहज हें घडेल ॥२४॥
तत्त्वंपदार्थाऽअपरोक्षता । हें भक्तीचें गुह्य तत्वतां ।
निकें अवधान श्रोता । ये विषयीं असो ॥२५॥
तत्पदार्थ परोक्ष पूर्ण । मानावया हेंचि कारण ।
कीं तो ब्रह्माण्डनिष्ठ म्हणोन । त्वंपदार्थ पिंडनिष्ठ म्हणोन अपरोक्ष ॥२६॥
दूरतेस्तव परोक्षता । समीपतेस्तवाऽपरोक्षता ।
तत्पदार्थ समीप येतां । तरी अपरोक्षता सहजचि ॥२७॥
परोक्षज्ञाने करून । निवटे असत्वापादकावरण ।
आणि अपरोक्षज्ञानें करून । अभानापादकावरण निवटे ॥२८॥
समीप होता तत्पदार्थ । तदभानापादकावरण नाशत ।
म्हणोनी अपरोक्षता निश्चित । सिद्ध तत्पदार्थी ॥२९॥
अतिसमीप नेत्रांजनसम । तरी अपरोक्ष नोहे परम । (य१-१४६)
ही शंका केवळ भ्रम । वेदान्तदृष्टी ॥३०॥
अति समीपता जे होय । ते प्रत्यक्षासी प्रतिबंधक आहे ।
येरव्ही नेत्रासीही येवों पाहे । परोक्षता ॥३१॥
कीं सुखदुःखाचें ज्ञान । समीप अंजनाहून ।
मग तें काय म्हणोन । होआवें कवणा ॥३२॥
म्हणोनी प्रत्यक्ष आणि अपरोक्ष । येथ किंचित भेदपक्ष ।
इंद्रियनिष्ठ तें प्रत्यक्ष । अपरोक्ष तें साक्षिनिष्ठ ॥३३॥
आपुलें *आहेपण । किंवा आपुलें *मन ।
अथवा शुद्ध *साक्षीपण । निरसोनी अभान अपरोक्ष ॥३४॥
तेवीं तत्पदार्थही हृदयीं । समीप सांपडे आपुल्या ठायी ।
तरी अभानापदकावृति लवलाही । नाशूनि तो अपरोक्ष होय ॥३५॥
तत्पदार्थाऽपरोक्षे करून । त्वंपदार्थोपाधी निरसन ।
तैं तत्त्वंपदार्थैक्यता पूर्ण । सांपडे करीं ॥३६॥
आतां तत्पदार्थ अपरोक्ष केवीं । हें स्पष्ट केलें देवीं ।
अर्जुनाची गोवी । निरसूनिया ॥३७॥

गीताश्लोक -

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ॥
भ्रामयन् सर्वभूतानि यंत्रारूढानि मायया ॥१॥
तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत ॥

तत्प्रसादात्परां शान्तिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम् ॥२॥

ओव्या

सकलभूतांचिया हृदयीं । अर्जुना, ईश्वर गोसावी ।
वृत्ती भूत, अद्य, भावी । तेथूनि सकळ ॥३८॥
''मी उठेन प्रातःकाळीं । जै एक घटिका रश्मिमाळी'' ।
येणें संकल्पें मंचकमौळी । पहुडे सहज ॥३९॥
तैं लागे निकी निद्रा । इंद्रिय मना मौन मुद्रा ।
तमोगुणाचिया तंद्रा । हारपे बुद्धी ॥४०॥
मग योग्यकाळीं ये जागृती । जरी आपणचि उठे म्हणावी वृत्ती ।
तरी ती पावतां सुषुप्तीं । असमर्थ होय ॥४१॥
असमर्थ वस्तू कडून । योग्य काळीं कार्यधरण ।
हें विरुद्ध बोलण । कोणीही जाणे ॥४२॥
म्हणावें, उठवी जीव । तरी जागृतींतचि वळेना मनःस्वभाव ।
सुषुप्तींत अज्ञानावृत सावेव । असोनी वृत्ती कैशा आकळी ॥४३॥
आणि इतुकी घटिका पळ निश्चिती । जागृतींतचि न राहे स्मृती ।
सुषप्तींत असुनी विषय विस्मृती । योग्यकाली स्मृती येईल केवीं ॥४४॥
(य१-१४७) म्हणोनी योग्य कालीं सुचवितां । हें विशेषण साजे भगवंता ।
''मत्तःस्मृतिर्ज्ञानमपोहनं च'' या शब्दीं तत्वतां । कांतसम्मती ही ॥४५॥
एवं तमोगुणी कार्य सुचवितां । तो अनुग्रह कां न करी सत्त्वस्था ।
समाधींत वृत्ति रक्षिता । तोचि एक ॥४६॥
जीव तंव ध्याता म्हणोन । ध्येयीं जाय सहज मिळोन ।
ध्येय ईश्वरचि आपण । समाधीरक्षण त्याकडोनी ॥४७॥
परी रहस्य हें येथ । सुषुप्तींतूनि भगवंत ।
उठवी जीव कर्मानुसृत । मायावृत्या ॥४८॥
आणि समाधी करी रक्षण । हें तो भक्तानुग्रहाचें लक्षण ।
वृत्तीचा स्वभाव समाधि-धारण । हें वृत्तिजाड्यास्तव कल्पितां नये ॥४९॥
भक्तिविण समाधींतून । ज्ञानीही पावे उत्थान ।
ऐसें केलें बोलणें । मुचकुंदा देवें भागवतीं ॥५०॥

सम्मतिश्लोक-

'युंजानानां अभक्तानां प्राणायामादिभिर्मनः।
अक्षीणवासनं राजन् दृश्यते पुनरुत्थितम् ॥'

आणि भक्तीनें अपरोक्षज्ञान । हेंही गर्भस्तुत्यभिप्राय निरूपण ।

झालियाही अपरोक्षज्ञान । भक्त्यावश्यकता जागृतश्रुतौ ॥५१॥
म्हणोनी ईश्वरापरोक्षता । याची अत्यंतावश्यकता ।
तें तत्पदशक्तीनें तत्वतां । हृदयीं पाहतां सांपडे ॥५२॥
तोचि ईश्वर आपुलिया हृदयीं । अनुमान न करणें ब्रह्माण्डठायीं ।
''देहेऽस्मिन् पुरुषः परः'' या पदेंही । हेंचि कथिलें ॥५३॥

श्लोक

उपद्रष्टाऽनुमन्ताच भर्ता भोक्ता महेश्वरः॥
परमात्मेति चाप्युक्तो देहेऽस्मिन्पुरुषः परः ॥१॥

जीव संकल्प करी आपण । संकल्परूप ते मन ।
आणि सूचनाऽनुमोदने । दाता परेशु ॥ ५४॥
समीपत्वें द्रष्टृता । एवमुपद्रष्टाऽनुमंता ।
उपद्रष्टृत्वें अपरोक्षता । लाधली सहज ॥५५॥
तो परमात्मा तो परमपुरुष । याचि देहीं सांपडे निःशेष ।
जीवाच्याही अन्तर्यामी तयास । दाखवी श्रुती ॥५६॥
तो आत्मा तो अमृत । इत्याद्यर्थ श्रुतिगत ।
अपरोक्ष तो निश्चित । सहजची ॥५७॥
ब्रह्मचि आश्रय ब्रह्मचि विषय । येथ जे अज्ञानासी होय ।
ते आवृतिरूपें स्वयें । बोलिलें कीं ॥५९॥
परी अनावृत अज्ञानाधार । तो हृदयस्थ बोलिजे ईश्वर ।
'इदंत्वें'करूनि निर्धार । प्रत्यक्ष नोहे ॥६०॥
म्हणोनी सांडूनि 'आरूढाहंता' । जें चैतन्य उरे तत्वतां ।
तें व्युत्थानदशेंत 'आनंदेदंता' । सहज पावे ॥६१॥
'अर्जुनपण न घेतां । मी ऐसे जे पंडुसुता ।
उठे तें तत्वतां । तयाचें रूप' ॥६२॥ ज्ञाने.
एवंविध तातचरणोक्ती । तयाची घडावया भक्ती ।
जे व्युत्थानीं 'आनंदेदंता'स्थिती । तेचि शरीर तयाचे ॥६३॥
संक्षेपशारीरक टीकेंत । मधुसूदनवाक्य यथार्थ ।
ब्रह्मैक्यानंदही पृथगिव भासत । प्रीतिवृत्त्यवच्छिन्नतेस्तव ॥६४॥
ती पृथकता तदाकार । प्रीत्या मनःस्थित साचार ।
यालागीं मनोगतस्तदाकार । भक्तिरसायनीं बोलिले ॥६५॥
अथवा आत्मा शरीर । तेथोनि निघतां अहंकार ।
तरी तेचि साकार । होवोनि राहे ॥६६॥

परी जो पक्ष प्रथम । तोचि वाटे उत्तम ।
इदंता म्हणोनी जाड्यसंभ्रम । चेतनान्वयें येईना ॥६७॥
अहंता निःशेष जाय । प्रीतिशरीर नित्य राहे ।
हें मुक्तिगत भक्ति होय । अखंडैकरस ॥६८॥
अहंकाराधीन प्रीति । ऐसें न म्हणावें निश्चिती ।
सद्गद्त्वें वाढतां प्रीति । अहंतालयानुभूति सकळां ॥६९॥
अहंपण आपुलें राहतां । जेवी साक्षीची परोक्षता ।
तेवी बहिर्मुख वृत्त्या पाहतां । वाटे परोक्षता हृदयस्थेशाची ॥७०॥
अन्तर्मुख होतां वृत्ती । उपद्रष्टृत्वादिकीं निश्चिती ।
यदा संधावानंदभुक्ती, (किंवा) संधौ वा समाधावानंदप्राप्ती ।
तदा विद्याधार चित्तीं जी ॥७१॥
ती एकत्वें अपरोक्ष । तेचि ईश्वरत्व प्रत्यक्ष ।
समाधिरपि साक्ष । याचीच दे ॥७२॥
परी संधि समाधी मानितां । व्युत्थानाभावें व्युत्थान भेदता ।
न यावी, दावावी व्युत्थानमिथ्यता । अन्वयें साक्षात्कारता यास्तव ॥७३॥
ते संधि समाधीत आनंदघन । व्युत्थानीं चुंबनालिंगन ।
ब्रह्म संधींत सांपडतां व्युत्थान । तरी तेहि अव्युत्थान सहज ॥७४॥
दोहींकडे अपरोक्षता । तत्पदार्थी जाहली तत्वतां ।
प्रीतीमात्र पाहतां । एकी एक ॥७५॥
चूर्णिका - आत्मप्रीती तरंगबाह्य भगवदालिंगन । (य१-१४९)
आत्मप्रीती सिंधुभक्ती सहजपण ।
स्वाभिमान स्थापतां ज्ञान ।
येथ निवर्तोनि अभिमान हरिभक्ती ॥७६॥
घन विरल स्थिती । बोलिजे भक्ती ज्ञप्ती ।
घनब्रह्मता भक्ती । ज्ञप्तीतर ॥७७॥
आणि नाहीं इतरता । जरी सघनब्रह्मता ।
तरी नित्यभक्ती हातां । सांपडली ॥७८॥
एवं प्रेमावच्छिन्न निरुपाधिक । स्वतंत्र शुद्ध अपरोक्ष देख ।
चैतन्याभिव्यक्ति हृदयीं सम्यक । होय ती भक्त्यधिकरण साकृती ॥७९॥
तेथ समस्त भाव समर्पितां । सहजचि गळे अहंता ।
आणि ज्ञान प्रतिबंधकता । तेही नोहे ॥८०॥

बाह्य सानन्य दीनता । अंतरी अखंडतृप्तता ।
प्रेमें गळोनी ज्ञानाहंता । मग पूर्णता, किमवशिष्ट ॥८१॥
म्हणोनी प्रेमधारा पूर्ण । उठे ईश्वरमुळीहून ।
ती कायापेक्षे बाह्य ब्रह्मालिंगन । समुद्रत्वेंकरोनी करी ॥८२॥
बा ब्रह्माण्डमुळींहूनि प्रीतीधारा । येवोनि मिळे हृदयस्थ चित्समुद्रा ।
तेथही प्रेमानंद पूरा । उल्हासविजे ॥८३॥
पहिल्या पक्षीं चुंबनालिंगन । दुसऱ्या पक्षी तळमळ सकरुण ।
जैसा मीन जीवनावीण । तेवीं माहात्म्यज्ञान असोनि होय ॥८४॥
एवं शक्त्या अपरोक्ष तत्पदार्थ । आणि उपाधिबाधपूर्वक त्वंपदलक्ष्यार्थ ।
घेतां सहज प्रेमार्थ । ऐक्य फावे ॥८५॥
प्रेरकत्वादि धर्म बहुत । ते त्वमर्थोपाधिसंकल्प कल्पित ।
उपाधि निरसतां समस्त । निरसिती सहज ॥८६॥
परी आत्मज्ञानकालीं प्रीती । राहे म्हणोनी निश्चिती ।
अनध्यस्तविवर्त साधकस्थिती । उपाधी ती ॥८७॥
यालागीं ती न निरसतां । ईश्वर अलंकारी योजावी तत्वतां ।
अज्ञानमात्र बाधोनि ऐक्यता । पाविजे प्रेमें ॥८८॥
एवं निदिध्यासनी स्थिती । ज्ञानें ऐक्यत्व साक्षात्कृती ।
जाहलिया अकृत्रिम भक्ती । अन्वयेंचि साधे ॥८९॥
तो परम प्रेमू भला । बहुत स्थळीं निरूपिला ।
जो घनत्वीं उपेगा आला । संत चिन्हांच्या ॥९०॥
तो प्रेम ओसंडे बाहेरी । तैं विप्रलंभाची परी ।
संयोग तो अंतरीं । स्थित राहे ॥९१॥
एवं दोहींपरी सुख । न सांपडे कदा दुःख ।
परी सुख म्हणोनी सुख । तेहीं नेघे ॥९२॥
मग संयोग वियोग प्रेमैक्यता । तेणें वृत्त्यैकतानता ।
हा अनुभव मुक्तभक्तां । सहजें आहे ॥९३॥
एवं जीवन्मुक्तींत भक्ती । आणि भक्त्यधीन जीवन्मुक्ती ।
तैसी विदेहमुक्तींत भक्ती । निरूपिली ॥९४॥
स्वापरोक्षज्ञान । तें त्वंपदशोधन । (य१-१५०)
आणि महात्म्यज्ञानें अपरोक्ष भगवान । हें तत्पद शोधन हृदयस्थ ॥९५॥
प्रेमैक्यता निदिध्यास स्थिती । हे स्वभावनिष्ठते जैं ये भक्ती ।
अभिन्न निरहंकृत ज्ञप्ती । भगवत्साक्षात्कृती ते ॥९६॥

परा शांती परा भक्ती । परात्वविशेषण साम्य स्थिती ।
ज्ञानानंतर्यप्राप्तीं । दोहींस म्हणोंनी एक दोन्हीही ॥९७॥
शाश्वतस्थान विदेहमुक्ती । तत्रेशप्रसादापेक्षोक्ती ।
यालागीं अवशिष्ट भक्ती । निवर्त्य नोहे ॥९८॥
आतां कैसी काय विदेहमुक्तीं । ते न वर्णिजेल मम मती ।
मनोवागगोचर म्हणती । वसिष्ठ जियेतें ॥९९॥
मनोवागगोचर स्पष्ट । ऐसें जिये विषयीं वसिष्ठ ।
बोलती, तेथ येरीं कष्ट । कीजती कां ॥१००॥
रस शास्त्रांतील प्रलय । कवी न वर्णिती स्वयें ।
रसभंगभय । म्हणोनिया ॥१०१॥
तेवीं अव्याख्येय व्याख्यान । करितां विरे निरूपण ।
यालागीं विदेहमुक्ती व्याख्यान । वेदान्ती न करिती ॥२॥
आणि शब्दाचें प्रयोजन ब्रह्माकारवृत्ति । तेंही न साधे वर्णितां विदेह मुक्ती ।
अप्रयोजक वर्णन वेदान्तीं । नसावे ही उक्ती महंताची ॥३॥
म्हणोनी अखंडाखंडस्थिती । दृष्टपरमानंदमूर्ती ।
ज्ञानेश्वर माउली कीर्ति । कृपामय वदूं ॥४॥
हे प्रक्रियामय कावडी । हृदयस्थ परमावडी ।
सहित गुरुचरण देव्हडी । वाहिली प्रेमें ॥५॥
येथील कांहीं पुरे उणें । तें मी आपण सर्वथा नेणें ।
श्री ज्ञानेश्वर चरणीं केणें । समर्पिलें ॥६॥
श्री ज्ञानेश्वर माय बहिणी । जन्मजन्म ठेवोनि चरणीं ।
हरिसंयोग असोनि विरहिणी । यथा तथा सुखी कीजे ॥७॥
आणि श्रीज्ञानेश्वर माउली । एवं मनोवाणी बोली ।
अष्टही अंगें पाउलीं । वंदू जन्म जन्म ॥८॥
श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वराचार्य । जे हृदयस्थ परमार्य ।
वारोनि कारण कार्य । भजिले हो कां ॥९॥ (य१-१५१)
दोहा - एवंविध सुख सुरतरू, निदिध्यासनप्रकाश ।
ज्ञानेश्वर पदिं वाहिले सकलहि पुष्प-समास ॥११०॥
हरिःॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे गद्यपद्यान्विते
निदिध्यासनप्रकाशे भगवद्भक्तिनिष्ठापूर्तिनिरूपणं न्नाम अष्टमः समासः॥
हरिःॐ तत्सत् श्रीसद्गुरु ज्ञानेश्वरार्पणमस्तु ॥ ॥ शुभं भवतु ॥

०००

७. कान्तकान्तावाक्यपुष्पम्

॥ श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

॥ मंगलाचरण ॥

यत्कृपालेशमात्रेण महिषो वेदपारगः ।
ज्ञानेश्वरं तमाचार्यं वंदे बद्धांजलिर्मुदा ॥१॥
तपोभिः क्षीणपापानामिहामुत्रविरागिणाम् ।
सत्संवादमिषेणात्र भक्तिर्ज्ञानं च कथ्यते ॥२॥

विषयनिवृत्त्यनंतरमात्मज्ञानेनैव ब्रह्मणः सच्चिदांशद्वयम् विद्यानिवृत्तिपूर्वकं ज्ञातुं शक्यते ।

किंतु स्वानंदप्राप्तये भक्तिरेव गरीयसीति श्रुतिस्मृतिपुराणेतिहासानां अभिप्रायः ।

तत्र भू-बीजांकु-तरु-फलरूपा निरूपाधि(१)मायोपाधि(२)सूत्र(३)विराड्(४) विष्णव(५)श्चैते पंचेश्वरपुरुषा नीलकंठोक्ता भवन्ति ।

तत्र ब्रह्मैव भगवद्भक्तानुग्रहकरणेक्षणात् विष्णुरूपेण स्वयमाविर्भवति ।

स आविर्भावोऽपि नित्यः सुखैकानुग्रहकरणेक्षणमात्रत्वात् ।

अयमेव भक्तिसदनम् ।

तद्वाररक्षकज्ञानप्राप्तये शांकरपदार्थानुदाहरति ।

ईशो(१) माया(२) महान्(३) जीवः(४) संबंधो(५) भेद(५) एव च ।
अत्र पंचानादि सांताश्चेशो(६)ऽनादिरनंतकः ॥३॥
ईशो हि ब्रह्मशब्देन वेदान्ते समुदाहृतः ।
मायाऽज्ञान प्रधानाद्याः पर्याया मुनिसंमताः ॥४॥
मायोपाधिर्जगद्योनिः सर्वकृच्छबलो महान् ।
हेमगर्भोऽपरेशश्च पर्यायौ शबलांशकौ ॥५॥
मायां तु प्रकृतिं विद्यान्मायिनं तु महेश्वरम् ।
तस्यावयवभूतैस्तु व्याप्तं जगदिति श्रुतिः ॥६॥
मम योनिर्महद्ब्रह्म तस्मिन्गर्भं दधाम्यहम् ।
संभवः सर्वभूतानां तस्मादिति परा श्रुतिः ॥७॥

अस्येशादिपदार्थत्रयस्य लक्षणानि भक्तिपदतीर्थामृतात् बुधैरुपहर्तव्यानि ।

पदार्थषट्कलक्षणानि अपेक्षितानि चेत् शारीरकशांकरभाष्ये प्रोक्तानि

अत्र विस्तरभयान्नास्माभिर्लिख्यन्ते ।

''परापरेति भेदेन द्वे विद्ये'' मुंडकोक्तितः।

तत्रोपनिषत्पुराणेतिहासवर्जितवेदवेदांगप्रतिपाद्याऽपरा ।

उपनिषत्पुराणेतिहासप्रतिपाद्या परेति ''वेदार्थादधिकं मन्ये पुराणानि वरानने'' इति नारदोक्तितः स्पष्टमेव प्रतीयते ॥

शिष्य उवाच -

यदेकं निष्कलं ब्रह्म व्योमातीतं निरंतरम् ।
यस्मिन्नतद्व्यावृत्या चकितं वदति श्रुतिः ॥८॥
तस्मिन् शुद्धे चिदाकाशे लक्ष्यज्ञानैकगोचरे ।
अनादि जडरूपाया मायायाः किमुत प्रमा ॥९॥
ब्रह्मरूपात् पृथक् सास्ति ह्यपृथग्वाऽथ विद्यते ।
कस्य स्याद् बंधनं तस्याः कस्य नेति वेदस्व भोः ॥१०॥

श्रीगुरुरुवाच

श्रृणु वत्स, गुरुशास्त्रयोः साधनदशायां सिद्धदशायां च यत्प्रयोजनम्
तत्ते सादिभ्रमानादिभ्रमनिवृत्तिमिषेण फलरूपतयोपदिश्यते ।
प्रकृतिं पुरुषं चैव विद्ध्यनादि उभावपि ।
विकारांश्च गुणांश्चैव विद्धि प्रकृतिसंभवान् ॥११॥
ज्ञेयं यत्तत्प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वाऽमृतमश्नुते ।
अनादिमत् परं ब्रह्म न सत्तन्नासदुच्यते ॥१२॥
ब्रह्मैवानादिरूपं हि मायाऽनादिस्वरूपिणी ।
तस्मान्माया ब्रह्मरूपात्पृथक्,ापि न विद्यते ॥१३॥
सादिभ्रमोपदेशे तु मुक्तानां बंधसंभवः ।
तस्मादनादिरूपेण माया तिष्ठतु सर्वदा ॥१४॥
सादिभ्रमस्य निवृत्तेः साधनं नैव विद्यते ।
तस्मादेषा ह्यनादिः स्यान्मायाऽविद्या च मे मतिः ॥१५॥
ब्रह्मात्मैक्यप्रत्ययेऽपि विस्मृतेः प्रत्ययो वृथा ।
सोऽयं सादिभ्रमस्तस्य निवृत्तिश्चास्ति नास्ति वा ॥१६॥
गुरुवाक्येन निवृत्तिं यः पश्यति स पश्यति ।
न पश्चन्ति ज्ञानमूढा ब्रह्मालस्याभिमानिनः ॥१७॥
यस्य ब्रह्माभिमानोऽस्ति देहेऽपि ममता तथा ।
न स योगी न वा भोगी केवलं दुःखभागसौ ॥१८॥
अनादिभ्रमनिवृत्तिः शास्त्रेणैव भविष्यति ।
सादिभ्रमस्य निवृत्तिर्न गुरोर्वचनं विना ॥१९॥
यस्य देवे पराभक्तिर्यथा देवे तथा गुरौ ।
तस्यैते कथिता ह्यर्थाः प्रकाशन्ते महात्मनः ॥२०॥
चक्रवाकखगस्यात्र मृगतोयं करोति किम् ।
तथा माधवभक्तस्य ह्यविद्या किं करिष्यति ॥२१॥
दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया ।
मामेव ये प्रपद्यन्ते मायामेतां तरन्ति ते ॥२२॥
मृगांबुजन्मनिवृतिं * चक्रवाको न चेच्छति । ???
तथा माधवभक्तोऽपि मायासत्त्वमुपेक्षते ॥२३॥
चक्रवाकैरदृष्टाऽपि मृगैर्दृष्टा मरीचिका ।
अज्ञानिभिः संप्रदृष्टां भक्तोऽविद्यां न पश्यति ॥२४॥
एतत्ते कथितं गुह्यं ज्ञानेश्वरकृपालवात् ।
यो जानाति यथा वत्स सुखमत्यंतमश्नुते ॥२५॥
कान्तकान्तावाक्यपुष्पग्रथनं गद्यपद्ययोः ।
यः सेवते प्रभातेऽसौ* व्रजेद्धि परमां गतिम् ॥२६॥

॥ इति कांतकातावाक्यपुष्पं समाप्तम् ॥

०००

(*यातील दुरुस्त्या सद्गुरु श्री बाबाजीमहाराजांच्या प्रतीवरून येथे केल्या आहेत.)

०००

८. सूचना प्रकरण (१)

(प्रथम यष्टीतील)

ओवी

नमो नमो श्रीज्ञानेश्वरा । सच्चिदानंदा करुणाकरा ।
प्रेमें मज अंगीकारा । ठेवोनि पायीं ॥१॥
असो आतां सूचना । हीचि निकीं सर्वजनां ।
मी केलें लेखना । अज्ञानबुद्धी ॥२॥
मी या सकल लेखामाजीं निश्चिती । वर्णिली आहे हरिभक्ती ।
ते पसंत होवावी जनांप्रती । हा हेतू नव्हे ॥३॥ (य१-१५४)
कोठें महावाक्यार्थेंकरून । कोठें तर्क समाश्रवून ।
कोठें अन्यरीति करून । निरूपण भक्तीचें ॥४॥
परी तें योग्य आहे ऐसें । वादें सिद्धही होईल आपैसें ।
परी वादीं सामर्थ्य नसे । जयांचियां आंगीं ॥५॥
तेणे मल्लेख पाहून । घेयावे भक्तिबोधन ।
अयोग्य दिसेल तें त्यागोन । सहजची ॥६॥
वादाचा अवलंब न कीजे । ('वादो नावलंब्यः' नारदभक्तिसूत्र)
हें श्री नारदीं बोलिले सहजें ।
आणि मल्लेखामाजीं अनुरंजे । मीचि एक ॥७॥
निके जे माझे विचार । ते मज साठींच समग्र ।
दुजिया बोध करावया निर्धार । सामर्थ्य नाहीं ममांगीं ॥८॥
मी नेणें शास्त्र-व्युत्पत्ति । हें अवघेचि लोक जाणती ।
नये व्याकरण मजप्रती । पुण्यपत्तनांतीं श्रुत हें ॥९॥
आणि कौमुदी मातें । श्रीनिवासशास्त्री शिकवित होते ।
मी नेणें सांख्यवेदान्तातें । हें बर्डीवरी सिद्ध झालें ॥१०॥
आणि माझें असत्य भाषण । मंडळी सर्व जाणे आपण ।
तेवीं मम परस्त्रीगमन । कांही स्त्रियाही जाणती ॥११॥
आणीक मातृगमनादि पापें बहूत । जे वाचे वदतांचि लाज वाटत ।
तें सर्व जाणे भगवंत । कृपामूर्ती ॥१२॥
हें पातकलेखन । जरी म्यां नसते लिहिलेंसेल जाण ।
तरी असत्य भाषण । दोष मजवरी ॥१३॥
आणि सत्य लिहिलें असेल जरी । तरी ही पापें मजवरी ।
एवं पाहातां दोहींपरी । पापनिष्ठ मी ॥१४॥
आतां माझिये ठायीं । भगवद्भक्ती सर्वथा नाहीं ।
काम्य भावना धरोनी लवलाही । शिवार्चन करी ॥१५॥
स्त्रीं जैं पासूनि पावली मरण । तैं पासोनी सुटलें आळंदीगमन ।
इतिविध गुरुसेवाहीन । निका आहे ॥१६॥
ज्ञानेश्वरकन्या म्हणोनी । मी पदवी घेतली आंगीं लावोनी ।
परी ज्ञानेश्वरलग्न एवढ्या वरोनी । नानुमानिजे लोकीं ॥१७॥
रामचंद्रादि माधानांत । हरिभाऊ आदि उमरावतींत ।
त्यांहीं वाचूनियां ग्रंथ । किंचिदर्थ लिहिला म्यां ॥१८॥
ऐसिया मज सर्वस्वदीना । सामर्थ्य केंवी येईल लेखना ।
या लागीं मानोनि बोबड्या वचना । आवडेल तें घेइजे ॥१९॥
माधान माझें गांव । आणि गुल्या हें नांव ।
पुढे संतकृपें गुरुदेव । कृपा करितील तेंचि खरे ॥२०॥
श्रीज्ञानेश्वर माय माउली । प्रेमें वंदोनि तत्पाउलीं ।
ही सूचना श्रुत केली । सर्वांसीही ॥२१॥
हरिःॐ तत्सदिति दीनताव्यपाश्रयणन्नाम सूचनाप्रकरणं संपूर्णम् ॥

०००

मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबरावमहाराजविरचित

९. गायत्री : अन्वयार्थ

॥ उपोद्घात् ॥

सर्वे शाक्ताश्च च ये प्रोक्ताः न शैवा न च वैष्णवाः ॥
आदिशक्तिमुपासन्ते गायत्र्या वेदमातरा ॥१॥

॥ अन्वय ॥

ये (ब्राह्मणाः ते) सर्वे शाक्ताः प्रोक्ताः। (सन्ति इति प्रकर्षेण उक्ताः)
वैष्णवाः शैवाः न च शब्देन गाणपत्यादयोऽप्येव न स्युः इत्यनुमानात्,
तस्मात्कस्योपासनेष्टास्ते इत्यत आह-
वेदमातरा गायत्र्या आदिशक्तिं उपासन्ते ॥

॥ भावार्थ ॥

पूर्वपक्ष - ब्राह्मण म्हणून जे आहेत ते सर्व शाक्त आहेत, शैव किंवा वैष्णव नाहींत यावरून गणपती–उपासक किंवा सूर्य-उपासकादिमतांचे ब्राह्मण नसावेत असे अनुमान सहज काढता येते. तर मग त्या ब्राह्मणांना कोणाची उपासना इष्ट आहे? या प्रश्नाचे उत्तर सांगतो. - व्रतबंधाचे ठाई गायत्री उपदेश केल्यावरून आणि ती गायत्री वेदमाता असल्यामुळे त्या वेदमातारूप गायत्रीनें सर्व ब्राह्मण आदिशक्तीला उपास्य मानतात. याप्रमाणें वाममार्गी-पूर्वपक्ष केल्यावर सिद्धांती उत्तर देतो.

सिद्धांती - ''हे पूर्वपक्षी, तुझ्या मतानें सर्वच ब्राह्मण शाक्त आहेत हें म्हणणें सम्यक् नाही. कारण श्रुति, युक्ति आणि अनुभव या तिन्हीं प्रमाणांवरून शक्ती जी असते ती आपल्या आधाराचे ठाई आश्रित असते. जगांत कोणत्याहि पदार्थाची शक्ति पदार्थाहून भिन्न करिता येत नाहीं. कार्य जें होतें तें पदार्थाच्या आश्रित असलेल्या अव्यक्त शक्तीच्या योगानें होते. यावरून गायत्रीच्या योगानें जशी आदि शक्तीची उपासना करितात, त्याचप्रमाणे ॐ काराच्या योगानें शक्त्याधार जो परमेश्वर त्याचीही उपासना करणे ब्राह्मणांना इष्ट आहेच.

आतां ज्याप्रमाणे गायत्री आदिशक्तिवाचक आहे त्याचप्रमाणे ॐ कार

परमेश्वरवाचक आहे आणि श्रुतिसिद्धांत तर असा आहे कीं आश्रय सोडून आश्रितशक्ति पदार्थाहून भिन्न राहूंच शकत नाहीं आणि तसा अनुभवही आहे. जशी सूर्याची शक्ति उष्णता सूर्याहून भिन्न नाही, तशी परमेश्वराची शक्ति त्याहून भिन्न नाही म्हणून गायत्रीचे वाच्य म्हणजे प्रतिपाद्य विषय एक परमेश्वरच झाला. तोच ॐकाराचे वाच्य आहे. म्हणून हे पूर्वपक्षी, तुझ्या मताप्रमाणें ब्राह्मण केवळ शक्तीचे उपासक नाहींत; तर अखंड सच्चिदानंदघन जो परमात्मा त्याचे उपासक आहेत.

या विषयीं प्रमाणश्रुति - **''पुरुष एवेदँ सर्वं यद्भूतं यच्च भाव्यम्''** ही श्रुति ब्रह्मप्रतिपादक असून पुढे तिसऱ्या अनुवाकांत असणारी श्रुति **''एतावानस्य महिमा अतो ज्यायांश्च पुरुषः । पादोस्य विश्वा भूतानि त्रिपादस्यामृतं दिवि''** ही श्रुति त्रिपदा जी गायत्री तिच्या योगानें ब्रह्म जाणावे असे प्रतिपादन करिते आणि पुढें **''त्रिपादूर्ध्वम्''** असे एक पद आहे यावरून ब्रह्म ॐ काराचे आणि गायत्रीचे वाच्य आहे. या सर्व श्रुति पुरुषसूक्तांत आहेत. त्याचप्रमाणे-

''ओमित्येतदक्षरमिदँ सर्वं तस्योपव्याख्यानं भूतं भवद् भविष्यदिति सर्वमोङ्कार एव ॥१॥

यच्चान्यत् त्रिकालातीतं तद् ओङ्कार एव । सर्वं ह्येतद् ब्रह्म, अयमात्मा ब्रह्म, सोऽयमात्मा चतुष्पात् ॥२॥''

ही वरील अनुवाके १/२ अथर्ववेदीय माण्डूक्य उपनिषदांतील आहेत. यावरून सर्वच ब्राह्मण परमेश्वर-उपासक आहेत. मद्य मांस पिणारे देवी-उपासक नाहींत आणि ब्रह्मा, विष्णु, शंकर, देवी; तिन्ही - सूर्य, गजानन, सरस्वती व भगवल्लीलाविग्रही रामकृष्णादि अवतार, हे सर्व ॐ काराचे व गायत्रीचे वाच्य जे ब्रह्म त्याची व त्याच्या शक्तीची सगुण रूपे आहेत, म्हणून या सर्वांची उपासना करणें किंवा यातून मनास आवडेल त्याची उपासना करणे ब्राह्मणांस सर्वथा उचित आहेत. परंतु ते (ती) ॐ काराच्या व गायत्रीच्या द्वारानें केली पाहिजे. इतर मंत्राची अपेक्षा नाही.

ईश्वरप्रणीत गायत्रीमंत्र ब्राह्मणांना मिळाला असूनही पौरुषेय मंत्राची ते जर अपेक्षा करितील तर **''व्याज इच्छिणाऱ्याचे मुद्दलही जातेच''** या म्हणीप्रमाणे त्यांची स्थिति होईल.

ॐ कारातून तर सर्वच निघाले आहे. तोच मुख्य ब्रह्मवाचक आहे याविषयीं अस्मत्कृत **''अमोघनिरूपण''** ग्रंथ पाहावा.

॥ इत्युपोद्घातनामकं प्रथमप्रकरणम् ॥

०००

॥ गायत्रीव्याख्या ॥

अथातो गायत्र्यर्थं व्याख्यास्यामः॥१॥

पदच्छेद- **अथ अतः गायत्र्याः अर्थं व्याख्यास्यामः॥**

भावार्थ- 'अथ' शब्दानें गायत्रीचे मंगलत्व सूचित आहे आणि **'अतः'** शब्दानें गायत्रीच्या अर्थाचा इष्ट हेतु बोलिला आहे. **'व्याख्यास्यामः'** - आतां आम्ही त्याचें व्याख्यान करितो. किंतु आदौ गायत्रीची व्याख्या करणे उचित आहे.

पुष्कळ लोकांची समजूत अशी आहे की गायत्री ही एक धेनु आहे. तिला तीन पाय आहेत. पांच मुखे आहेत. सहा कुक्षी आहेत. इत्यादि वेडगळ समजुती गायत्री विषयींच्या झाल्या आहेत. त्या सर्व चुकीच्या आहेत.

पूर्वपक्षी - ननु गायत्री धेनु नाहीं तर **''षट्-कुक्षी पंच-शीर्षी त्रि-पदा''** इत्यादि गायत्रीध्यानवर्णन सांगितले आहे आणि म्हणूनच गायत्री धेनु आहे हे सिद्ध होते.

सिद्धान्ती – हे पूर्वपक्षी, गायत्री जर धेनु होईल तर ती पंचभूतात्मक पशुरूप शरीरवान् जड होईल आणि धेनूला चार पद बोलिले आहेत आणि तुझी गायत्री त्रिपदा आहे तर मग ती एका पायाने पंगु म्हणावयाची; आणि पशुजातीपासून वर्णाार होत नाहीं; त्याप्रमाणेच गायत्रीपासून शब्दाार न झाला पाहिजे व जसे धेनूचे गोमय-गोमूत्र पूज्य आहे व नरक भक्षण केल्यामुळे मुख अपूज्य आहे तशीच तुझी गायत्री होईल. तूं जसा ध्यानवर्णन प्रकार सांगितला तो वेदांत सर्वत्र नाहीच. तो पुराणोक्त आहे. तूं चतुर असून गायत्री धेनु आहे असे मूर्खवत् कां प्रतिपादन करितोस ?

पूर्वपक्षी - ननु गायत्री धेनु नाही तर **''त्रिपादस्यामृतं दिवि''** या श्रुतीनें 'गायत्री त्रिपदा आहे' असें सांगितले आणि शरीर असल्यावाचून पद म्हणणे शोभणार नाही म्हणून गायत्री धेनु आहे.

सिद्धांती - हे पूर्वपक्षी, श्रुतींत जे गायत्रीचे त्रिपाद सांगितले आहेत, त्याचा 'तीन पाय' असा लौकिकअर्थ होत नाही. मूळ वैदिक अर्थ असा आहे की-

''स्थानं, विभाज्यत्वं पदमक्षरं परिमाणं वसनं दर्शनमिति''

महाभाष्य-निघंटू ह्यात स्पष्ट सांगितले आहे की पद शब्दाचे अर्थ = स्थान,

विभाग, अक्षरे, वस्त्र, दर्शन, परिमाण; इत्यादि होतात म्हणून येथे पद शब्दाने स्थान घ्यावयाचे आणि स्थानापन्न 'लक्षण' होत असते यावरून त्रिपदा गायत्री म्हणजे तीन पायाची गाय नव्हे तर ती **'स्थानत्रयात्मक ईश्वरलक्षणरूप चोवीसाक्षरी वाक्सुधा'** आहे.

दुसरें असें कीं पद शब्दाचा अर्थ **अक्षर** होत असतो. वृत्त-शास्त्रामध्ये कांही विषम छंद आहेत. त्यांतीलच हा एक गायत्री छंद होय. त्याची अक्षरें २४ असल्यामुळें ८ अक्षरांचे एक पद अशी चोवीस अक्षरांची तीन पदे गणित-शास्त्राप्रमाणे सिद्ध होतात. यावरून ही गायत्री धेनु होत नाही. आणि गायत्री शब्दाची व्याख्या तर अशी आहे की -

'गायन्तं त्रायेत इति गायत्री'

जिचे गान केले असता तारण करिते ती गायत्री. गान शब्दानें जप, ध्यान, उल्हास, व इंद्रियदमन सुचविले. आतां गायत्रीची पदें कोणती व त्यांचा अर्थ काय हे पुढें प्रतिपादन करूं.

॥ इति **गायत्रीव्याख्या** नामकं द्वितीयप्रकरणम् ॥

०००

॥ अथ गायत्रीमन्त्रः ॥

.....

॥ ॐ भूर्भुवस्स्वः तत्सवितुर्वरेण्यम्
भर्गो देवस्य धीमहि
धियो यो नः प्रचोदयात् ॥

. . .

ॐ

(अ उ म)

भूर्भुवस्स्वः

(भूः भुवः स्वरिति स्वः)

तत्सवितुर्वरेण्यम्

(तत् सवितुर्वरेण्यम्)

भर्गो देवस्य धीमहि

(भर्गः देवस्य धीमहि)

धियो यो नः प्रचोदयात् ॥

(धियः यः नः प्रचोदयात्)

ॐ चा अर्थ

प्रणवार्थ - प्रणवात तीन पदें आहेत **अ,उ,म,** त्यात अ आणि उ मिळून ओ होत असतो.

॥ अ ॥

(प्रमाण - उ ओ ॥१७॥ **अवर्णे उवर्णे परे सह ओ भवति ।**)

गंगा + उदकम् = गंगोदकम्, इत्यादि.

प्रमाण :- सारस्वत-व्यंजनसंधि सूत्र -

''मः स्वरे ।

अनुस्वारस्य मकारो भवति स्वरे परे *

'म' हा 'अनुस्वार आणि अ' मिळून होत असतो.

(किं अस्ति किमस्तीत्यादि)

आर्षप्रयोगे तल्लोपः ॥''

याप्रमाणे ॐ च्या तीन पदांचा ऊ्ार सांगितला. *(*सारस्वतव्याकरणम्, ४ थी आवृत्ति निर्णयसागर प्रेस पृ.१९२६)*

आतां प्रत्येक पदाचा अर्थ सांगतो.

'अ'कारो वासुदेवस्स्यात् ॥ (एकाक्षरीकोश)

'अ' हा वासुदेवाचा वाचक आहे.

विग्रह :- **वसन्त्यस्मिन् भूतानीति वासुः ।**

- ज्याचे ठाई सर्व भूते वसती करितात तो वासु म्हणावा [१])

वासुश्चासौ देवः वासुदेवः । या कर्मधारय समासाने पूर्वी सांगितलेला

वासूच देव आहे म्हणून त्याला वासुदेव हे नांव आहे.

दीव्यति प्रकाशयतीति देवः॥

जो प्रकाशमान असून सर्वांना प्रकाशवितो तो देव म्हणावा,[२])

प्रकाश शब्दाचा अर्थ वेदात **चेतना** असा होतो. चेतना म्हणजे ज्ञान = **जाणीवशक्ति**. याप्रमाणे वासुदेव शब्दाचा अर्थ सर्वभूताधिष्ठान स्वयंप्रकाश ज्ञानमय सर्व व्यापक ब्रह्म असा आहे. वसुदेवाचा पुत्र वासुदेव हा अर्थ (येथे) संमत नाही.

॥ उ ॥

उकारः शंकरः प्रोक्तो ॥ (एकाक्षरीकोश)

उ हा शंकराचा वाचक आहे

विग्रह - **यः शमं करोतीति शंकरः॥**

जो शम करितो तो शंकर म्हणावा

विग्रह - **शमो मनो निग्रहेति वेदान्ते, साधनव्यवस्थायाम् ॥**

वेदान्तामध्ये चार साधनें सांगितली आहेत. त्यांत **शम** शब्दाचा अर्थ मनाला विषय चांचल्यापासून वळवून हृदयांत सत्त्वगुणानें शांत राखणे; असा आहे.

यावरून शंकर शब्दाने सुचविलें कीं ज्याच्या ज्ञानें मुमुक्षूला जन्ममरणरहित अखंड शांति प्राप्त होते ते ब्रह्मच **'उ'** कार आहे.

॥ म ॥

'म(च्छि)श्शिवः चन्द्र आख्यातः'' (एकाक्षरीकोश)

'म' हा शिव आणि चंद्र ह्या अर्थी आहे. त्यांतील आपणाला 'शिव' घ्यावयाचा.

विग्रह - **यः सर्वान् शिवयति, शिवं ददाति, शिवस्वरूपः शिवः॥**

- जो सर्वांना शिववितो, शिव देतो आणि शिव स्वरूपच आहे तो 'शिव' म्हणावा.

विग्रह - **शिवं भद्रं च कल्याणमित्यमरे ।**

- अमरकोशांत भद्र, कल्याण, शिव, हें शब्द एका अर्थाचे आहेत.

विग्रह - **कल्याणमानन्दे** / अनेकार्थमंजरी. कल्याण शब्दाचा अर्थ आनंद आहे.

विग्रह - **यः सर्वानानन्दयति सुखं ददाति सुखमयः सानन्दः ।**

जो सर्वांना आनंदवितो, सुख देतो व स्वतःही जो सुखच आहे तो आनंद

'म' कार वाच्य आहे.

याप्रमाणे सर्वाभूताधिष्ठान जें सत् तेच सर्व ज्ञानमय चित् आनंदरूपी सच्चिदानंदघन जे ब्रह्म तेंच 'अ उ म' मिळून झालेल्या ॐ या ईश्वर-वाणीरूप प्रणवाचा मुख्यार्थ आहे.

लिहिण्यांत बिंदु रेषा आणि अक्षर असा प्रघात आहे. त्याचाही अर्थ -

*** बिंदुरूप परमात्मा**

*** रेषारूप माया** आणि

*** अक्षररूप सृष्टि;**

असा आहे.एवं लिहिण्यात आणि ॐकारांत ॐ शब्दाचा अर्थ सत्य ब्रह्मच आहे अन्य नाही. ॥ इति प्रणवार्थः ॥

व्याहृतीचा अर्थ

व्याहृतीत **भूः, भुवः, स्वः,** अशी तीन पदें आहेत त्या प्रत्येक पदाचा अर्थ सांगतो.

॥ भूः ॥

विग्रह - **'भवतीति भूः'** जो होतो तो **भूः** म्हणावा.

'भू सत्तायाम्' मूळव्याकरण पाणिनीयकृत धातुपाठ. **भू** धातु सत्तार्थी आहे. सत्ता हे भाववाचक नाम असल्यामुळें त्यांतून मूळ शब्द **सत्** निघतो सत् म्हणजे अस्तित्त्व.

विग्रह - **'यस् तिष्ठति - त्रिषु कालेषु न बाधते तत् सत् ॥'**

जे असते आणि भूत भविष्य वर्तमान काली ज्याचा नाश नाही त्याला सत् म्हणतात. यावरून सत् म्हणजे सदैव असणे, पण भू - भव (असणे) या धातू वरून साधलेले नाम **भूः** होय. निघंटूत **भूः** हे अंतरिक्ष नाम आहे.

विग्रह - **यस् सर्वान्तो ईक्षति, यस्यान्तं कोऽपि नेक्षति, सोऽन्तरिक्षः ॥**

तो सर्वांचा अंत पाहतो परंतु ज्याचा अंत कोणी पाहत नाही, तो अंतरीक्ष म्हणावा.

ईक्ष पश्यने ।

ईक्ष धातु 'पहाणे' याच्या अर्थी आहे म्हणून सर्वान्तर्यामी सर्वाधिष्ठान.

ज्याच्या सत्यत्वावाचून मिथ्या जगताला अस्तित्वच नाहीं तें सत्.

सदैव असणेपण. असें जे ब्रह्म तेंच **भूः** या पदाचें वाच्य आहे याचे स्पष्टीकरण पुढे तत् शब्द करितांना होईल. *- इति प्रथम प्रकरणम् ॥*

॥ भुवः ॥

भुवः = भुवर्.

हे नाम लोकतिष्ठनाधिष्ठानार्थी आहे.

विग्रह - **यस् सर्वान् भावयतीति भुवः ॥**

जे सर्वांना भाविविते म्हणजे त्यांच्या भावना उत्थित करून भावगम्य विषयांना जाणविते, ते चेतन चिद्रूप होय.

विग्रह - **यत् चेतति चेतयति वा, संज्ञापयति सर्वान्, तत् चित् ॥**

अर्थ - जे चेतन असून सर्वांना चेतविते म्हणजे जाणविते ते चित् होय. अर्थात् चित् = चैतन्य.

व्याख्या - **यत् स्वयं ज्ञायते च सर्वान् ज्ञापयति, तत् चैतन्यम् ॥**

''जे स्वतःलाही जाणते व दुसऱ्यालाही जाणून जाणविते ते चैतन्य होय.'' त्यातूनच सर्व भावनांचे उत्थान होते आणि भावनेच्या योगाने भावगम्य विषयांत स्वतंत्र प्रवृत्ति होते. भावना नसली तर प्रवृत्त होत नाही.

प्रमाण- शांकरभाष्य द्वितीयाध्याय द्वितीय-पादाच्या बाराव्या सूत्रावरील

''नह्यचेतनं चेतनेन विना स्वतन्त्रं प्रवर्तते वा प्रवर्तयति ॥''

अर्थ - अचेतन म्हणजे जड. ''जे आहे'' ते चेतनावाचून स्वतंत्र आपल्या इच्छेने प्रवृत्त होत नाही व दुसऱ्याला प्रवृत्त करितहि नाही.

यावरून सर्वांच्या भावनेला प्रवृत्त करविणारे जे अखंड असणारे चिद्रूप ब्रह्म तेंच **'भुवः'** शब्दाचे वाच्य आहे. *- इति द्वितीय प्रकणरम् ॥*

॥ स्वः ॥

'स्व' शब्द आत्म्याच्या अर्थी आहे. संस्कृतात प्रथमा विभक्तीस 'स्'प्रत्यय होत असतो.आणि कोणी शब्द जर पुढे नसला तर 'स्'चा विसर्ग होतो.

प्रमाण - सूत्रवृत्ति सारस्वतव्याकरण -

अथ षड् लिङ्गाः - सूत्र - **स्त्रोर्विसर्गः** (४)

सकार-रेफयो विसर्जनीयादेशो भवत्यधातोः॥

अर्थ - **स** आणि **रे** किंवा **र** यांचा **अधातोः** म्हणजे पुढे शब्द नसतांना विसर्गरूप आदेश होतो आणि शब्द पुढें असला तर त्याचा- विसर्गाचा क्रमाने **'सक्'** आगम होतो. यावरून **स्व** शब्दाला **स्** प्रत्यय लावून पुढें कोणी शब्द न ठेविला तर त्या **स्** चा **विसर्ग** झाल्यामुळें प्रथमाविभक्त्यन्तक एकवचनीय **स्वः** असा ॐकार होतो आणि त्याच्याच पुढें ॐ (ओम्) लाविला तर विसर्गाचा रेफ

होऊन स्वरोम् असा उ्गार होतो.

'स्व' शब्द आत्म्याचा वाचक आहे.

विग्रह -

यः सर्वान् व्याप्नोति-अन्तर्यमयति- आनन्दयति आनन्दरूपो स आत्मा ॥

अर्थ - जो सर्वांना व्यापून, चित्ताचे नियमन करीत होत्साता, आपल्या आनंदाने, सर्वांना आनंद देतो तो आत्मा होय.

याचाच प्राकृत अर्थ **'आपण'** असा आहे

यावरून **''अहं ब्रह्मास्मि''** (मी ब्रह्म आहे) या महावाक्याचा अर्थ -

जो सृ्दिानंदरूपाने जीवब्रह्मैक्य अपरोक्ष ज्ञानरूप आहे, तोच **स्वः** शब्दाचे वाच्य आहे. यावरून जो प्रणवाचा वाच्यार्थ तोच व्याहृतीचाही आहे.

- इति व्याहृत्यर्थः॥ - इति तृतीय प्रकरणम् ॥

तत्सवितुर्वरेण्यम्

॥ तत् ॥

हे गायत्री सर्वनाम आहे याचा प्राकृत अर्थ तो असा -

प्रमाण -**''सदेव सोम्येदमग्रासीदेकमेवाद्वितीयं 'तत्त्वमसि' श्वेतकेतो''**

– सामवेदीय छांदोग्य उपनिषद् श्रुति.

श्रुत्यर्थः - हे सोम्य श्वेतकेतो, ह्या सृष्टीपूर्वी एकटेच अद्वितीय (भेदत्रयशून्य) सद्रूप ब्रह्मच होते. ते आतांहि तसेच आहे. तुझ्या स्वरूपानेंही सदैव तेच आहे. या श्रुतीवरून तत् शब्दाचा अर्थ जगत्कारण! महावाक्याचा विषय ब्रह्म असा आहे.

॥ सवितुः ॥

ही षष्ठी किंवा पंचम्यन्त असल्यामुळें यातील मूळ शब्द **सवितृ** आहे.

विग्रह - **'यस्सोत्युत्पादयति सर्वं जगत् स सविता ॥'**

अर्थ - जो अखिल जगताची उत्पत्ति करितो तो सविता होय.

प्रमाण - **वी- प्रसवे.** (पाणिनीयकृत धातुपाठ **'वी'** धातु प्रसवणार्थी आहे.

विग्रह - **यस् सर्वान् वियति स सविता ।**

अर्थ - जो सर्वाना उत्पन्न करितो तो सविता होय. एवम् ।

अथवा सायणाचार्यकृत सवितृ शब्दाचा अर्थ 'सूर्य' ग्रहण केला तरी दोष नाहीं.

मात्र सवितुः या शब्दाची **पंचमी** केली पाहिजे आणि मागील अर्थाप्रमाणे **षष्ठी** होते कोणताही अर्थ घेतला तरी इष्टच आहे परंतु मागील अर्थाप्रमाणे

वरेण्यम् शब्दाचा अर्थ निराळा करावा लागतो आणि -

सायणाचार्यांच्या अर्थाप्रमाणे **सवितुर्वरेण्यम्** एवढ्या पदाचा एकदम अर्थ करावा लागतो म्हणजे दोहो अर्थाची जुळणी समान होते.

वरेण्यं हा शब्द वरिष्ठार्थी आहे.

परंतु सवितुः शब्दाच्या **षष्ट्यन्तक** प्रथमार्थाप्रमाणे याचा विग्रह निराळा करावा लागतो.

॥ वरेण्यम् ॥

विग्रह - **वरेण्यं वर्तुम् अर्हम् ॥**

पहिला अर्थ – जे स्वीकार करण्याला योग्य तें वरेण्यम् या शब्दाने बोलिलें.

हा विग्रह मी भगवान् कृतयुगोत्पन्न श्रीमत् यास्काचार्य- तत्कृत निरूक्तावरून केला आहे.

मागील **सवितुः** पदाची षष्ठी करून वरेण्यं या शब्दानें समानार्थीकरण केलें तर सवितुः म्हणजे जगत्कर्ता जो परमात्मा, त्याचें वरेण्यं म्हणजे स्वीकार करण्यास योग्य. असे जे 'महावाक्यविषय ब्रह्म' ते वाच्य आहे.

दुसरा अर्थ – आणि सायणाचार्यकृत सवितृ शब्दाचा अर्थ सूर्य असा घेऊन त्याला वरेण्यं हे वरिष्ठार्थी पद लाविले म्हणजे **सवितुर्वरेण्यम्** या दोहों पदांचा एकदम अर्थ -

सूर्याहून जे वरिष्ठ म्हणजे जेथे सूर्य, चंद्र, अग्नि इत्यादिकांचा प्रकाश नसून ज्ञानमय स्वयं प्रकाशवान् जें ब्रह्म ते; असा आहे.

प्रमाण पहिले -

भगवद्गीता अध्याय १५ श्लोक ६ वा

'न तद् भासयते सूर्यो न शशांको न पावकः ॥
यद्गत्वा न निवर्तन्ते तद्धाम परमं मम ॥१॥'

अर्थ - हे पार्था, ब्रह्मवेत्ते ज्या पदाप्रत गेले असतांना पुनः परतून येत नाहींत, अशा त्या माझ्या परमधामरूप ब्रह्मपदाला सूर्य चंद्र व अग्नि प्रकाश युक्त करू शकत नाहीत.

प्रमाण दुसरे -

कृष्ण यजुर्वेदीय श्वेताश्वतर उपनिषदाच्या चौथ्या अध्यायांतील श्रुति -

यदाऽतमस्तन्न दिवा न रात्रि र्न सन्नचास्तच्छिव एव केवलः ।
तदक्षरं तत् सवितुर्वरेण्यं प्रज्ञा च तस्मात् प्रसृता पुराणी ॥१८॥

अर्थ – जेव्हा अज्ञानरहित असते तें नाशरहित आणि तेच सवितुर्वरेण्यं म्हणजे सूर्याहून वरिष्ठ, जे दिवस आणि रात्रीही नव्हे त्यापासूनच जुनाट जी प्रज्ञा म्हणजे बुद्धि अथवा शुद्ध सत्त्वमय प्रकृति ती प्रसार पावते. एवम् ॥

॥ भर्गः ॥

शुद्ध स्वरूप. भर्ग म्हणजे शुद्ध स्वरूप असे निरुक्तांत म्हटले आहे. यावरून ज्याचे ठाई गुणत्रयांचा कलंक नाही, असे **'सत्यकाम सत्यसंकल्परूपीं जगत्कर्तृ ईशत्व** तेच सवितृ पुल्लिंगी नाम होय. येथे पुन्हा सवितुर् शब्द घ्यावा लागतो.

॥ देवस्य ॥

तत् सवितुर्देवस्य ।
विग्रह - **दीव्यति, वा प्रकाशयति सर्वान् इति देवः॥**

॥ धीमहि ॥

अर्थ - जो स्वयंप्रकाशमान् त्या सवितारूप देवाचे **वरेण्यं** स्वीकार करण्याला योग्य असे धीमही (ध्यायेमही) आम्ही ध्यान करितो.

॥ धियो यो नः प्रचोदयात् ॥

यः म्हणजे जो
नः (अस्माकं) म्हणजे आमच्या
धियः म्हणजे बुद्धीना
प्रचोदयात् म्हणजे प्रेरणा करो.

एवं अखंड सच्चिदानंदघन सर्वव्यापक जें ब्रह्म तेंच सद्गुरुपासून मिळालेल्या महावाक्याने अपरोक्ष झालेले, बुद्धि-साक्षीरूप, समष्टि-व्यष्टि-संज्ञक, जीवेश्वरेकप्रत्ययरूप, त्याचे ठाई बुद्धि विशेषज्ञानाने लीन होऊन जीवन्मुक्तिसुख अखंड प्राप्त(त्व) जें ब्रह्म तेच प्रणवाचें, व्याहृतीचे व गायत्रीचे निश्चयें करून वाच्य आहे, म्हणून त्याचीच उपासना करणें कोणत्याही प्रकारे ब्राह्मणांना इष्ट आहे.

वोवी : श्री ज्ञानेश्वर कृपाप्रसादे । वोवी वाक्य लिहिलीं नुसुधे ।
ती सर्वही परमानंदे । स्वीकरोत सज्जन ॥१॥
सद्गुरु ज्ञानेश्वरांचे पायी । प्रेमभावे ठेवूनि डोई ।
या गायत्री अर्थाची उहीपुही । समर्पिली ॥२॥

॥ ॐ तत्सदिति श्रीगायत्र्यार्थं यथा बुद्ध्या गुरुकृपया च कृतं तत् ज्ञानेश्वरार्पणमस्तु ॥

———

भक्तिपदतीर्थामृताचा मराठी अर्थ

॥ सद्गुरु श्री बाबाजीमहाराज पंडित ॥

(परमगुरु श्रीगुलाबरावमहाराजांचे उत्तराधिकारी सद्गुरु श्री बाबाजीमहाराज पंडित यांनी पेठच्या कात्यायनीत सांगून (डिक्टेट करून) लिहवून घेतलेला अर्थ (१९६१) - कृ.मा.घटाटे)

तरंग १ ला : भक्त्युपक्रम

हे सदगुरो आपणाला वंदन असो! आपण परब्रह्माचा उपदेश करणारे आचार्य असून आपण आत्मस्वरूपाचेच ठिकाणी रममाण होणारे आहात – म्हणजे आपले सर्व व्यापार आत्मस्वरूपच आहेत. आपण कशापासून उत्पन्न होत नाही व आपणापासून दुसरे काही उत्पन्न होत नाही ॥१॥ सर्व जनांना आपले परब्रह्मस्वरूपाचे सुख प्राप्त करून देऊन त्यांच्या आध्यात्मिक, आधिदैविक व आधिभौतिक या तिन्ही प्रकारच्या दुःखांचा समूळ नाश करावा, या उद्देशाने आपण सगुणस्वरूप धारण केले आहे ॥२॥ हा संसारसमुद्र मृगजळाप्रमाणे खोटा आहे– म्हणजे तो अस्तित्वांतच नाही. म्हणून जीव हा खरोखर बुडालेला नाही; पण नसत्याच संसारसमुद्राच्या अस्तित्वाची कल्पना करून तो आपल्याला त्यांत बुडालो, असे समजतो. हे जाणून त्याला वर काढण्याकरितां आपण आपला हात दिला ॥३॥ किंवा अविनाशी अशा निर्गुण आत्मस्वरूपाच्या प्राप्तीनेहि समाधान न होता सगुण स्वरूपाच्या प्रेमाच्या भुकेने तळमळणाऱ्या जीवाला भक्तिप्रेमरूप दुग्ध पाजण्याकरितां आपण प्रगट होत असतां ॥४॥ म्हणूनच तुमच्या कृपेने अन्तःकरणांत परमप्रेमरूप वृत्तीची लाट उसळून पतिपत्नीसंबंधाने भगवंताचे प्रेम करावे किंवा स्वानंदसुखाचे सोहळे भोगावे, अशी तीव्र इच्छा उत्पन्न झाली आहे ॥५॥ आपण एकट्यानेच ते सुख न भोगता दुसऱ्यालाहि ते प्राप्त करून द्यावे असे जे वाटते, ते औदार्य, तुमच्या कृपाप्रसादाचेच फळ होय ॥६॥ तो प्रसाद अंतःकरणांत उल्हासरूपाने प्रगट होऊन या ग्रंथाला अधिष्ठाता– म्हणजे ग्रंथ करण्यास कारण होऊन महावाक्याचा अर्थ स्पष्ट करणारा ''भक्तिपदतीर्थामृत'' नामक हा ग्रंथ प्रारंभ करीत आहे ॥७॥ तरी हे सद्गुरु आई! ''मी ग्रंथकर्ता आहे'' हा कर्तृत्वाभिमान उत्पन्न होऊ न देता, अशी ख्याति उत्पन्न होऊ न देता माझ्या मस्तकावर कृपाहस्त ठेऊन आपण ग्रंथसिद्धी करावी ॥८॥ असे हे बोबडे बोल ऐकून माझे तात श्रीज्ञानेश्वर महाराज परम संतोष पावले व मग त्यांनी अभय देऊन ''उठ, ग्रंथ कर'' असे म्हणून ग्रंथाला आश्रय दिला ॥९॥ श्रीगुरु श्रीज्ञानेश्वर माउलींनी मजवर आपल्या कृपेची सावली केली व माझ्याविषयीं प्रेमप्रसादाचा पान्हा येऊन माझ्या मुखात अत्यंत स्नेहाने तिने आपला स्तन दिला ॥१०॥ माउलीच्या स्तनातील ते सुंदर प्रेमदुग्ध पिऊन लोकांना संसारसमुद्रातून भक्तिसाम्राज्यात नेण्याकरिता हा जहाजरूपी पंच अध्यायात्मक ग्रंथ प्रगट करीत आहे ॥११॥ त्यात ''भक्तीचा उपक्रम'' या नांवाचा पहिला अध्याय संतकृपेने निश्चित सुस्पष्टरीतीने सांगितला जाईल ॥१२॥ तरी जीवांना ब्रह्मप्राप्ति व्हावी, हा या ग्रंथाचा उद्देश आहे आणि या ब्रह्मप्रातीलाच

वेदाने ''मोक्ष'' असे म्हटले आहे ।।१३।। जीव आणि ब्रह्माचे खरोखर मुळांत अत्यंत ऐक्यच आहे; पण जीवाने (ब्रह्माशी असलेले ऐक्य विसरून) आपल्याला संसाराशी जखडून घेतले आहे ।।१४।। तो संसार उपाधिजन्य असल्यामुळे उपाधीचा नाश झाल्यावांचून नुसत्या ज्ञानाने संसाराचा नाश होत नाही. या विषयी दृष्टान्त सांगतो, ऐका ।।१५।। आरशासमोर जास्वंदाचे फूल ठेवले असता त्याचे आरशांत लाल प्रतिबिम्ब पडते ।।१६।। आता आपण आरसा पाहून आरसा लाल नाही, तो स्वच्छ आहे, असे जरी जाणले तरी त्या आरशातील दिसणारा रक्तवर्ण नाहीसा होत नाही. तो रक्तवर्ण न दिसण्याकरता एकच उपाय आहे ।।१७।। (तो उपाय म्हणजे) आरसा फोडून टाकावा किंवा जास्वंदाचे फूल चोळामोळा करून फेकून द्यावे अथवा त्या दोहोंना एकमेकांसमोर ठेवू नये ।।१८।।यांपैकी कोणता तरी एक उपाय केल्यावांचून आरशातील रक्तवर्णाचा प्रतिभास नाहीसा होऊन आरशाचा मूळचा स्वच्छपणा अनुभविता येणार नाही ।।१९।। या दृष्टान्तावरून आता निश्चित सिद्धान्त काढू. श्रुतीनेहि हाच सिद्धांन्त सांगितलेला आहे ।।२०।। 'मी देह आहे' हे दृढ विपरीत ज्ञानच जीवाची उपाधि असून देहसुखाची वासना हीच जीवाला बांधणारी बेडी आहे. ज्ञानानेच ती कळते म्हणून ज्ञान तिला साधक होते. अर्थात् ज्ञानाने ती निश्चित् निवृत्त होऊं शकत नाही ।।२१।। ज्ञानाने उपाधि जाणली जाते; पण ती कधीहि निवृत्त होत नाही; (ज्ञानाने 'उपाधि आहे' हे कळते.जर ती ज्ञानाने नाहीशी झाली असती, तर ती कळलीच नसती; म्हणजे कळते तेव्हा- ज्ञानकालीहि ती राहते, हे सिद्ध आहे. (अर्थात् ज्ञानाशी तिचा विरोध नाही.) आणि उपाधि म्हणजे विपरीत ज्ञान व उपाधेय म्हणजे ब्रह्म हे दोन्ही एकमेकांपासून अलगहि करता येत नाहीत ।।२२।। (कारण) आत्म्याची सत्ता सर्वत्र व्यापाक आहे तो कोठे नाही असे नाही; म्हणून विपरीत ज्ञान व दृढ वासना यांचा आत्म्याशी असलेला संबंध सुटू शकत नाही ।।२३।। आणि उपाधि नाहीशी झाल्याखेरीज शुद्ध सृ्दिानंद स्वरूपाचा प्रत्यय येत नाही. आणि दृढ वासना ही उपाधि ज्ञानाने तर नाहीशी होत नाही ।।२४।। या सर्व श्रुती असे सांगतात की हृदयांतील विषयवासना निःशेष नाहीशा झाल्यानंतरच जीवन्मुक्त होतो.नाही तर तो केवळ पांडित्याची बडबड करणारा होय.या बोलण्यावरून उपाधि निःशेष नाहीशी होते असे अनुमान करतां येते ।।२५-२६।। सारांश, केवळ ज्ञान झाल्याने उपाधीचा निःशेष नाश होत नाही व उपाधीचा नाश होत नाही तोपर्यंत मोक्ष किंवा ब्रह्मप्राप्ति होत नाही ।।२७।। असा हा शुद्ध सिद्धान्त असल्यामुळे उपाधीचा नाश करण्याकरिता ज्ञानाशिवाय दुसरे यथार्थ कारण शोधणे भाग आहे ।।२८।। ते कारण म्हणजे सगुण परमेश्वराची भक्ति हे होय. **परमेश्वरापासून विषयसुख मिळविण्याची यत्किंचित् इच्छा न धरता परमेश्वर व मी एक आहे, असे जाणून त्याचे आत्मप्रेमवत् म्हणजे स्वाभाविक निःसीम प्रेम करणे याला भक्ति म्हणतात.** ही भगवान् व श्रीगुरु यांचे ठिकाणी सारखीच असायला पाहिजे ।।२९।। ज्यांचे भगवंताचे व श्रीगुरूचे ठिकाणी निःसीम प्रेम आहे त्यांच्याच बुद्धीत वेदाने प्रगट केलेले अर्थ जसेच्या तसेच यथार्थ प्रकाशित होतात.।।३०।। आणि गीतेत स्वतः भगवानहि ज्ञान-कर्म-योग यांच्यापेक्षा भक्ति श्रेष्ठ आहे असेच सांगतात ।।३१।। याप्रमाणे **सत्त्वगुणाच्या पाशाने ज्ञानाहंकाराचे बंधन होते,** रजोगुणाच्या पाशाने कर्माचा बंध होतो आणि तमोगुणाच्या पाशामुळे जीवाला व्यर्थ दुःखे भोगावी लागतात ।।३२।। याप्रमाणे हे सत्त्वादि तिन्ही गुण जीवाला बद्ध करणारे आहेत; म्हणून माझी अनन्यभक्ति केली

असता पुरुष त्रिगुणरहित होतो ।।३३।। मग त्याच्या सर्व वासना ब्रह्मरूपच होऊन जातात. तोच परब्रह्माच्या प्राप्तीला पात्र होतो. आणि तोच जीवन्मुक्तीच्या घरी पाहुणा होतो, म्हणजे त्याला जीवन्मुक्तस्थिति प्राप्त होते ।।३४।। ही जीवन्मुक्त स्थिति प्राप्त झाल्यावरहि जो भगवंताची निष्काम प्रेमभक्ति करतो. भगवान्, मनापासून सर्वस्वी त्याच्या स्वाधीन होऊन राहतो ।।३५।। याप्रमाणे ''सर्व मार्गांपेक्षा भक्ति श्रेष्ठ आहे,'' असा जो भक्तीचा उत्कर्ष भगवान नारदांनी व शाण्डिल्य ऋषींनी सांगितलेला आहे, त्याचाच आधार घेऊन येथेहि भक्तीचा उत्कर्ष सांगितला जाणार आहे ।।३६।। **''कर्म-योग-ज्ञान या मार्गांचें अनुष्ठान करून या मार्गांनी खरोखर पूर्ण निर्विकल्प ब्रह्मप्राप्ती होत नाही, म्हणून या मार्गांचे अनुष्ठान आता पुरे झाले'' असे ज्याला वाटत असेल तोच या भक्तीचा अधिकारी होय,** असे ''अथातो भक्तिजिज्ञासा'' या सूत्राने सांगितलें आहे. आतां शांडिल्यांनी त्या भक्तीचे जे लक्षण सांगितलें तें श्रवण करू ।।३७।। विषयसुख प्राप्तीच्या इच्छेने ईश्वराचें प्रेम किंवा भजन करणे हे जे गौण प्रेम आहे, ते विषाप्रमाणे निःशेष सोडून देऊन निष्काम चित्ताने केवळ एका भगवंताचेच अखंड प्रेम करणे यालाच शांडिल्य मुनि 'भक्ति' म्हणतात ।।३८।। आणि भगवान् श्रीनारदाचार्यांचेहि असेच निश्चित मत प्रसिद्ध असून भक्ति ही **'स्वयं फलरूपत्त्वात्'** स्वतः फलरूप आहे. ती कोणत्याहि साधनांनी साध्य होणारी नाही. तशीच ती शब्दानी न सांगता येण्याजोगी प्रेमरूप आहे, असे ते म्हणतात ।।३९।। (विषयसुख प्राप्तीच्या इच्छेने भगवंताचे प्रेम करणे किंवा निष्कामचित्ताने भगवंताचे आत्मवत् प्रेम करणे, असे) भक्तीचे गौणी व परा हे दोन्ही भेद टाकून देऊन भगवंताचा अखंड संयोग (याला) नारदांनी प्रेमलक्षणा पूर्ण भक्ति म्हटले आहे ।।४०।। या प्रेमभक्तीचे लक्षण काय, हे भगवान् श्रीनारदांनी स्वतः आपल्या सूत्रांत सांगितले आहे. तेच प्रमाण येथे आम्ही सांगणार आहो ।।४१।। **''प्रेमरूप भक्तीचे स्वरूप सांगण्याजोगे नाही– म्हणजे केवळ अनुभविण्याजोगे आहे''**

***अज्ञान असेतोपर्यंत स्थूलदेहाचे प्रेम असते आणि **आत्मज्ञान झाल्यावर ''मी ब्रह्मस्वरूप आहे'' अशी वृत्ति धरून ठेवण्याचे प्रेम असते.** हे दोन्ही प्रकार टाकून देऊन नामरूपाने एक सृ्दिानंद परमात्माच नटला आहे, असे समजून नामरूपासह सृ्दिानंद परमात्म्यावर स्वाभाविक प्रेम असणे, याला अनिर्वचनीय प्रेमरूप भक्ती म्हणतात ।।४२।।जारिणी स्त्रियेचे परपुरुषावर जे प्रेम असते किंवा पतिव्रता स्त्रियेचे ठिकाणी स्वपतिविषयी जो थोर विरह असतो, त्या दोहोतील वैषयिकभाव नाहीसा करून जी केवळ शुद्ध प्रेमवृत्ति उरते, तशी शुद्ध प्रेमवृत्ति सगुण भगवंताचे ठिकाणी जडणे, याला भक्ति म्हणतात ।।४३।। पुत्रादिरूपाने असे प्रेम असणे हीहि भक्ति गौणच असून अत्यंत भगवद्विरहात्मक परमप्रेमरूप भक्ति हीच सर्व श्रेष्ठ आहे. आणि हीच भगवान् श्रीनारदांनी सूत्रांत सांगितली असून 'तत्त्वमसि' या महावाक्यातूनहि तीच परम भक्ति सांगितली आहे ।।४४।। तो 'तत्त्वमसि' महावाक्यातील परमप्रेमरूप भक्तीचा उपदेश, श्रीसद्गुरु श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या कृपेने पुढील अध्यायात अत्यंत सुरस व सुखरूप असा प्रगट केला जाईल ।।४५।। कृपादृष्टीने मजकडे पाहून, मला आपला समजून व माझ्या निरूपणाकडे लक्ष देऊन तो उपदेश संतांनी आनंदाने श्रवण करावा ।।४६।। असो. ही सर्व ओव्यारूपी फुलें ''भक्ति उपक्रम'' या विषयरूप सूत्रांत गुंफून, ही फुलांची माळ श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या चरणांवर अर्पण केली ।।४७।। भक्तिमातेच्या चरणतीर्थरूपी अमृतसागरांतील गुरुस्तवनाने केलेला

मंगलाचरणपूर्वक भक्त्युपक्रम निरूपण नामक हा पहिला तरंग होय ॥१॥

तरंग २ रा

हे सद्‌गुरु आई! तुझ्या चरणांना प्रेमाने नमस्कार करतो. तूं या सर्व विश्वाला आधार झाली आहेस, हा तुझा बालपणा म्हणजे खेळ आहे किंवा तुझे विश्वाला आधार होणे हे अज्ञान्याच्या दृष्टीनेच म्हटले जाते ॥१॥सांख्यशास्त्ररूपी आळ्यात योगशास्त्ररूपी पाणी घालून वेदान्तशास्त्ररूपी वृक्षांचे वन टवटवित करणारा वसंत ऋतु तूच आहेस ॥२॥ **सांख्याचिया आळणी :-** ज्याप्रमाणे झाडाला केलेले आळे पाणी धरून ठेऊन झाडाला वाढविण्यास पोषक होते, त्याप्रमाणे श्रीगुरु सांख्यशास्त्रातील प्रकृति-पुरुष विवेकरूप सिद्धान्ताचे निरूपण करून शिष्याच्या बुद्धीला ''तू संपूर्ण प्रकृतीहून अगदी निराळा आहेस'' हे पटवून देतात.अशा रीतीने सांख्यशास्त्र हे झाडाच्या आळ्याप्रमाणे आत्मानात्मविवेक करण्यापुरते वेदान्तशास्त्राला पोषक आहे. **योगाचिया पाणी :-** ज्याप्रमाणे रोपट्याला आळे केल्यानंतर त्यांत पाणी घातल्या खेरीज ते जमिनीत मूळ धरत नाही, त्याप्रमाणे ब्रह्मप्राप्तिरूप रोपट्याला प्रकृतिपुरुषरूप सांख्यशास्त्राचे आळे केल्यानंतर त्यात अनुभवाचे पाणी घातल्याखेरीज ब्रह्मप्राप्तिरूप रोपटे मूळ धरून दृढ होत नाही. हे योगाचे अनुभवरूप पाणी श्रीगुरुच घालतात. **वेदान्ताचिया तरुवनी । वसंत तूं :-** वसंतऋतूच्या आगमनाने सर्व झाडे जशी तरूण व टवटवित होतात, त्याप्रमाणे श्रीगुरूच्या मुखाने वेदान्त श्रवण होऊन शिष्याला सर्वत्र एक परब्रह्मच भरले आहे असा अनुभव येतो.धोत्र्याचे बी खाल्ले असता खाणाऱ्याचा मतिभ्रंश होऊन तो आपण ब्राह्मण असून स्वतःला शूद्र समजतो ॥३॥त्याप्रमाणे आपल्याला अद्वैतस्वरूपाचे विस्मरण होऊन जे द्वैत भासू लागले त्याला अविद्या म्हणतात. आणि त्या अविद्येचा अभिमान धारण करून त्या अविद्यादोषाने युक्त असलेल्या चैतन्याला अशुद्ध जीव म्हणतात ॥४॥हे सद्‌गुरो! जीवाच्या त्या अविद्येचा नाश करण्याकरिता आपण करुणेने सगुण साकार स्वरूप धारण करून प्रगट झाले आहात ॥५॥ आणि मग त्याला आपले बाळ समजून मोक्षरूपी सुंदर भाताच्या भोजनाच्या मिषाने तू त्याला आपले प्रेमच वाढतेस ॥६॥ आई! तुझ्या कृपादृष्टीने बंधच मोक्षरूप होऊन जातो आणि जड-चेतन हा भेद नाहीसा होऊन त्यांचे, एका चैतन्यरूपाने ऐक्य झालेले स्पष्ट अनुभवाला येते ॥७॥ मोक्ष देण्यात तू इतकी उदार आहेस की पात्रापात्रतेचा विचारच तू करीत नाहीस; कारण तुझ्या ठिकाणी पाहणारा व पाहणे हे दोन्ही भाव नाहीत ॥८॥ मुळीच अस्तित्वांत नसलेले हे जड-विनाशी विश्व ''आहे'' असे जेव्हा वाटते तेव्हा ते आत्मस्वरूपाचा विसर होऊनच वाटते.अशा स्थितीत म्हणजे या संसार मार्गात तुझी प्राप्ति झाली असता तुझ्या कृपेने हे विश्वच सुंदर परब्रह्मरूप होऊन जाते ॥९॥ हे सद्‌गुरु मायबहिणी! तूं अशी समर्थ असल्यामुळे जीव-मन-देहादि हे सर्व तुझ्या चरणाचे ठिकाणी मी समर्पण केले आहे. आता कृपा करून अवधान दे ॥१०॥ मागील अध्यायांत जो भक्तीचा उपक्रम केला गेला त्यावरून भक्तीच्या स्वरूपाचा बोध झाला.तोच भक्तीचा बोध 'तत्त्वमसि' महावाक्याच्या पदातून सांगितला गेला आहे, असे सिद्ध करावयाचे आहे ॥११॥तेथे तुज सद्‌गुरुनाथाच्या कृपेने ''तत्त्वमसि'' महावाक्य हे भक्तिप्रतिपादन करणारे आहे, हे सहज कळून येते ॥१२॥ असो. हे काय बोलावयाचे? सद्‌गुरूच्या भक्तीपुढे परब्रह्म स्थितीचेहि वाणणे (वर्णन करणे) निःसंशय कमी प्रतीचे वाटते ॥१३॥ तरी तो महावाक्याचा, सद्‌गुरूकृपेने स्फुरलेला, भक्तिरूप अर्थच खरा असून तोच ''ज्ञानेश्वर'' या नामाच्या प्रेमरूपाने अनुभवाला येतो ॥१४॥ चार वेदांची जी चार महावाक्ये आहेत, त्यात 'तत्त्वमसि' हे मुख्य आहे (१) **''तत्त्वमसि''- सामवेद**, (२) **''अहंब्रह्मास्मि'' यजुर्वेद** (३) **''प्रज्ञानं ब्रह्म''** - **ऋग्वेद**, (४) **''अयमात्मा ब्रह्म''- अथर्वणवेद.** अशी ही चार वेदांची चार महावाक्ये आहेत ॥१५॥''वेदामध्ये सामवेद मी आहे'' असे माझे पति भगवान् श्रीकृष्ण यांनी गीतेत सांगितले असल्यामुळे त्या सामवेदातिल ''तत्त्वमसि'' महावाक्य हे बाकीच्या तीन महावाक्यांपेक्षा श्रेष्ठ आहे ॥१६॥ तेथे

आधी ''तत्त्वमसि'' महावाक्यातील 'तत्' पदाचे विवरण करणे प्राप्त झाले; म्हणून प्रथम त्याचे निरूपण करणे अवश्य वाटते ॥१७॥ जोपर्यंत 'तत्त्वमसि' महावाक्यातील सर्व ज्ञान होत नाही तोपर्यंत त्या महावाक्याचा अर्थ समजणे शक्य नाही; म्हणून आधी त्यातील 'तत्' पदाचे निरूपण करतो ॥१८॥ परब्रह्म अखंड सच्चिदानंदस्वरूप आहे. तोच महावाक्याचा प्रतिपाद्य विषय आहे. तेच 'तत्' या पदाने सांगितले असल्यामुळे तत्पदाचा वाच्यांशाने व लक्ष्यांशाने वेगवेगळा अर्थ सांगतो ॥१९॥ **अखंड** :- सत्, चित्, आनंद, या तीन पदांचे तीन अर्थ नसून ''सत तेचि चित । चित तोचि आनंद । वस्तु नोहे त्रिविध । एकपद निजानंदे'' या नाथ वचनाप्रमाणे तिन्ही पदे एकपदरूप असून त्या सर्वांचा एक परब्रह्मच अर्थ आहे, तत्पदाने संबोधल्या जाणाऱ्या सच्चिदानंद परब्रह्माचे ''तटस्थ'' आणि ''स्वरूप'' असे दोन प्रकारचे लक्षण आहे. वाच्यांशाला 'तटस्थ' लक्षण म्हणतात आणि लक्ष्यांशाला 'स्वरूप' लक्षण म्हणतात ॥२०॥ तटस्थलक्षणाच्या योगाने ईश्वर बद्ध झालेला नाही; म्हणूनच गौण भजनाच्या मार्गाने त्याच्या स्वरूपाचे विवरण केले पाहिजे ॥२१॥ ज्याप्रमाणे राजाचे मंत्री, सेवक इत्यादि लोकच युद्ध करतात व त्यांनाच जय प्राप्त होतो; पण राजाला जय प्राप्त झाला असेच म्हटले जाते ॥२२॥ त्याप्रमाणे खरोखर कल्पनारूप मायेने हे जड-विनाशी जगत् निर्माण केले असताना अज्ञानी लोक त्याचे कर्तृत्व ईश्वराकडे देतात; पण भगवंताने स्वतः हे जग निर्माण केले नसल्यामुळे भगवान साक्षीरूपाने तटस्थच राहतो ॥२३॥ या तटस्थलक्षणाने जाणले जाणारे भगवंताचे स्वरूप निर्गुण असते. या तटस्थवाच्यांशाचा निरास करून लक्ष्यांशाने स्वरूपभूत सगुण परमात्मा घेतला पाहिजे ॥२४॥ या सच्चिदानंद स्वरूपलक्षणात्मक सगुण लीलाविग्रहाची अखंड अवतार लीला, त्याचे अमर्याद ऐश्वर्य व अभिमानरहित स्वातंत्र्य हे सर्व त्याच्या स्वरूपलक्षणभूत सच्चिदानंदाचाच आश्रय करून राहतात. (मायेचा आश्रय करून राहत नाहीत) ॥२५॥(श्रीमद्भागवत दशमस्कंध वेदस्तुतीतील ३८ व्या श्लोकावर टीका करताना श्रीधराचार्यांनीहि, जे जे मायाजन्य ते ते सर्व मर्यादित व अपूर्ण राहत असल्यामुळे परमेश्वराचे अमर्याद ऐश्वर्य मायाजन्य नाही, ते अपरिमित सच्चिदानंदस्वरूपाला धरून असल्यामुळेच अपरिमित आहे. असे म्हटले आहे.) जिचे कार्याहून निराळे स्वरूप शब्दांनी सांगता येत नाही असे मायेचे अनिर्वचनीय- म्हणजे खोटेहि म्हणता येत नाही (कारण तिचे कार्य दिसते) व खरेहि म्हणता येत नाही (कारण तिचा विचार केला असता तिचे अस्तित्वच सिद्ध होत नाही.) असे खरेखोट्याहून विलक्षण स्वरूप आहे ॥२६॥ या मायेत भासणाऱ्या अधिष्ठान चैतन्याला ईश्वर म्हणतात व हेच ईश्वराचे तटस्थलक्षण होय. येथे जो आभासवाद स्वीकारला आहे त्याचा प्रतिबिंब असा अर्थ करू नये ॥२७॥कारण सत्य उपाधि व सत्य अधिष्ठान यांचा संबंध होऊन जो खोटा भास होतो त्याला प्रतिबिंब म्हणतात ॥२८॥आणि दोरीवर जो सर्पाचा भ्रम होतो, तो विवर्तरूप भ्रम असून त्याला आभास म्हणतात. त्या सर्पाभासाच्या योगाने दोरी नाश पावत नाही. किंबहुना दोरीचेच लांबी वगैरे धर्म सर्पाच्या ठिकाणी दिसतात ॥२९॥ आणि तेथे प्रतिबिंबवाद मानला असता उपाधि सत्य होऊन कायमचेच द्वैत मानणे गळी येते ॥३०॥ पण तसा प्रकार येथे नाही. हा मृगजलासारखा केवळ खोटा आभास आहे. मृगजलाने मृग बद्ध होतो म्हणजे त्याला खरेच पाणी आहे, असे भ्रमाने वाटते व मनुष्याला नुसत्या जलाचा भास आहे असे वाटते; म्हणून तो बद्ध होत नाही ॥३१॥आणि चक्रवाक पक्षाला जलाचा भासहि होत नाही. (त्याला केवळ प्रकाशच दिसतो.) त्याप्रमाणे भगवद्भक्तांना जड-विनशी जगताचा भासच होत नाही ॥३२॥(अज्ञानी जनांना मृगाची उपमा दिली, कारण त्यांना मृगाप्रमाणे जड-विनाशी जगत् सत्य वाटते व ते त्यात बद्ध असतात. ज्ञानी पुरुषांना जगताचा भास राहतो म्हणून त्यांना मनुष्याची उपमा दिली आणि भगवद्भक्तांना जगताचा भासच नसतो. त्यांना सर्वत्र एक सच्चिदानंद श्रीकृष्णरूपच दिसते; म्हणून त्यांना चक्रवाकाची उपमा दिली आहे.) किंवा ज्याप्रमाणे खऱ्या पतिव्रतेला वेश्यापणाची कल्पनाच येत नाही, त्याप्रमाणे भगवद्भक्ताचे चित्तात जगताची कल्पनाच उठत नाही ॥३३॥ ती भगवद्भक्ति प्राप्त होण्याकरिता श्रीगुरूची कृपा हेच एक साधन

आहे. श्रीगुरूच्या मुखाने 'तत्त्वमसि' महावाक्याच्या भक्तिपर अर्थाची उपदेशप्राप्ति झाली असतांच भगवंताच्या भजनाचा अनुभव येतो ।।३४।। या भगवद्भजनाची मर्यादापूर्वक व प्रेमपूर्वक अशी दोन प्रकारची रीति आहे. मर्यादापूर्वक भजन भगवंताच्या वाच्यांशाला धरून होते व प्रेमपूर्वक भजन भगवंताच्या लक्ष्यांशाला धरून होते ।।३५।।भगवान् जगत्कर्ता असून तोच आपल्या कर्माचे फळ देणारा आहे; म्हणून आपण त्याचे भजन केले नाही, तर तो आपल्याला शिक्षा करील ।।३६।।अशा प्रकारच्या भजनाचे, चित्तांतील अज्ञानजन्य भय कारण असते आणि या भजनाने ईश्वर प्रसन्न झाला तरी ती तटस्थ राहून जीवाच्या कर्माप्रमाणेच फळ देतो ।।३७।।किंवा ज्याप्रमाणे ब्राह्मण यज्ञयागादि कर्मे सूर्यप्रकाशाच्या साहाय्याने करीत असतात पण सूर्य तटस्थच राहतो ।।३८।।त्याप्रमाणे आपल्या खऱ्या आत्मस्वरूपाचा विसर पडून व 'मी देहच आहे' असे समजून व त्या देहाला दुःखप्राप्ति होईल या भीतीने जे भगवंताचे भजन केले जाते, ते भजन मायेचाच व्यापार असल्यामुळे आत्मरूप भगवान तेथे तटस्थच राहतो किंवा ते भजन म्हणजे तटस्थलक्षणात्मक भगवंताचे भजन करणे होय ।।३९।।(ओवी ३६ ते ३९ पर्यंत भगवंताच्या भजनाच्या वाच्याशांचा पहिला प्रकार सांगितला) हे रजोगुणी भजन होय.वरील भजन हे भगवंताच्या वाच्यांश भजनाचा पहिला प्रकार होय. आता दुसरा प्रकार ऐका. मनांत मोक्षप्राप्तीची इच्छा धरून जो भगवंताचे भजन करतो ते त्याचे भजन करणे वाच्यांश भजनाचा दुसरा प्रकार होय ।।४०।। आपल्या ठिकाणी संसाराची व त्याच्या आसक्तिरूप बंधनाची कल्पना करून त्यातून मुक्त होण्याकरिता भगवंताचे भजन करतो; म्हणून हे सात्विक मायारूप भजन भगवंताच्या तटस्थ लक्षणाचेच होय ।।४१।।याप्रमाणे तटस्थलक्षणयुक्त परमेश्वराचे भजन वाच्यांशाचे होत अयल्यामुळे ते मायिक व मिथ्या आहे. आता स्वरूपलक्षणात्मक लक्ष्यांश अशा सगुण भगवंताच्या भजनाचे निरूपण करतो ।।४२।।आपल्या अद्वैत स्वरूपाला जाणून सर्व द्वैताचा निरास केला असता तेच भेदरूप द्वैत अद्वैत अशा आगळ्या (म्हणजे अद्वैताला यत्किंचितहि विरोधी न होता) स्वरूपाने राहते ।।४३।।हा 'त्वं' पदाचा लक्ष्यांश विचार हो त्याचे विवेचन पुढील अध्यायात केले जाईल प्रस्तुत 'तत्' पदाचा लक्ष्यांश जो सगुण साकार परमात्मा त्याचेच निरूपण येथे करीत आहे ।।४४।। आपल्या 'त्वं' पदाचा लक्ष्यांश जाणून ज्यांनी स्थूळ, सूक्ष्म, कारण या तिन्ही देहाचा असलेला ऐक्यभाव निःशेष सोडला, तोच या लक्ष्यांशरूप परमेश्वराच्या भजनाचा अधिकारी होतो ।।४५।। तिन्ही देहांचा अभिमान जेव्हा नाहीसा होतो, तेव्हाच कर्तृत्वाचा निःशेष निरास होऊन संपूर्ण कर्माचा संबंध सुटतो. मग कर्मामुळे मिळणारे सुखदुःखरूप फळे बंधन करीत नाहीत.(तिन्ही देहाचा निरास झालेल्या ज्ञान्याच्या अंतःकरणांत मी सुखी, मी दुःखी अशी भोगवृत्ति उठत नाही, असा अर्थ) ।।४६।। ज्याप्रमाणे पतीच्या घरी नांदावयाचे असल्यास आईबापांच्या कुलाचा अभिमान सोडून पतीच्याच कुलाचा अभिमान घरावा लागतो. तेव्हाच ऋतुकाली पतीचे सुख भोगता येते ।।४७।। त्याप्रमाणे 'तत्पद' लक्ष्यांश अशा परमेश्वराला अंतःकरणात साठवावयाचे असल्यास 'त्वंपद' अशा जीवाने इह-पर-संपूर्ण विषयांची निःशेष वासना सोडून प्रथम आपले 'लक्ष्यांश' स्वरूप जाणले पाहिजे व नंतर 'असि' पदाचे ठिकाणी परमेश्वराशी प्रेमाने ऐक्य पावले पाहिजे ।।४८।। (लक्ष्यांश असे 'चित्' पद व 'आनंद' पद ही दोन्ही वृत्तिरूप म्हणून सगुण साकार असल्यामुळे तदधिष्ठानभूत 'तत्पद' लक्ष्यांशहि सगुण–साकारपणानेच अनुभवाला येतो.) दोरीवर सर्प भासला तरी दोरी सर्प होऊन जात नाही. ती दोरीच राहते, त्याप्रमाणे परमेश्वर जगदुत्पत्ति–स्थिति–लयकर्ता आहे, असे मायाभ्रांतीने वाटले तरी तो खरोखर अकर्ताच आहे ।।४९।। ज्याप्रमाणे दोरीवर भासणाऱ्या सर्पाचे ठिकाणी दोरीचेच पीळादि धर्म दिसतात, त्याप्रमाणे लक्ष्यांशाला धरून असणारे स्वातंत्र्यादि स्वरूपभूत उत्तम धर्म हे भगवंताचे ठिकाणी खरेच असतात ।।५०।। म्हणून भगवान मला शिक्षा करील या दुःखाच्या भयाने देहाचे संरक्षण करणे. येथेच भगवंताचे वाच्यांशरूप कनिष्ठ भजन होते ।।५१।।आणि कर्माची फळे कांहीही होवोत, त्यांना आश्रयच नाही कारण हे सर्व नामरूपात्मक

जगत् सगुण सच्चिदानंदस्वरूपच आहे, असा प्रत्यय असतो ।।५२।। ज्याप्रमाणे दोरीवर भासणारा सर्प नाहीसा झाला तरी दोरी सर्पाभासकाली वर्तुळाकार झाली नव्हती, ती मूळच्या पीळरूपाने जशीच्या तशीच होती ।।५३।। त्याप्रमाणे हें जगत् मिथ्या झाले तरी भगवंताचे साकारपण नाहीसे होत नाही. ते प्रभूच्या ठिकाणी लीला-विग्रहरूप असल्यामुळे जसेच्या तसेच राहते ।।५४।। (लीला विग्रह :- भक्तीशी प्रेमक्रीडा करण्याकरिता मायारहित घेतलेला विग्रह)ज्याप्रमाणे गंगेचा एक बिंदू मुखात पडला असतां श्लेष्माच्या साहाय्याने सर्वांगाला (गंगेप्रमाणे) पवित्र करतो, त्याप्रमाणे भगवंताची सगुणसाकार लीलाविग्रही मूर्ति एकदेशीय असली तरी संपूर्ण जगाचा उद्धार करते ।।५५।।जोपर्यंत ऋतुप्राप्ति होऊन पतिसमागम होत नाही, तोपर्यंतच त्याची भीति वाटते, मग त्याच्या प्रेमाचा अनुभव आल्यावर दर्शनाने भीति वाटत नाही ।।५६।।त्याप्रमाणे जोपर्यंत भगवंताची भक्ति आंगी बाणत नाही व स्वरूपसाक्षात्कार व्यापक आणि दृढ होत नाही, तोपर्यंतच भगवंताचे तटस्थलक्षणाचे भजन भय उत्पन्न करणारे होते ।।५७।। श्रवणभक्तिपासून आत्मनिवेदन-भक्तिपर्यंत लीला-विग्रह अशा सगुण स्वरूपाच्या आधाराने प्रेमकौशल्याने चढत असता, भगवंताच्या षड्गुणैश्वर्य संपत्तिरूप मंदिरात निस्सीम सुख प्राप्त होते ।।५८।। मग सच्चिदानंद स्वरूपलक्षणात्मक-तत्पदलक्ष्यांशभूत-मायारहित-स्वतंत्र-षड्गुणैश्वर्यसंपन्न-अखंड सच्चिदानंदघन असा सगुणसाकार परमात्मा भगवंत-कृपेनेच अनुभवाला येतो ।।५९।। मग जे जे विषय दिसतील ते ते सगुण साकार श्रीकृष्ण स्वरूपानेच दिसू लागतात. अशी व्रजातील गोपींची अनुभव स्थिति होती. भक्तिसूत्रकारांनी व भागवतकारांनी तिचेच गोडवे गायिले आहेत ।।६०।। ज्याप्रमाणे अलंकाराच्या इच्छेने सोनाराला द्रव्य देऊन आपण सोन्याचा अलंकार घडवितो; पण सोनाराचे प्रेम नुसते सोन्याकडे असते व अलंकार घडविणाऱ्याचे प्रेम अलंकाराकडे असते, तसाच प्रकार येथेहि असतो ।।६१।।आधीच सोने प्रिय असते. त्यावरहि आवडीचा अलंकार घडविला असता अलंकारामुळे ते अधिक प्रिय होते; म्हणून सोने व अलंकार या दोन्ही दृष्टीने पाहता आवडीच वाढते ।।६२।।त्याप्रमाणे केवळ सच्चिदानंद अशा निर्गुण स्वरूपाने भगवान मायास्वतंत्र असून आणखी तोच सगुण साकार अशा चतुर्भुजाने प्रगट होतो; म्हणून निर्गुण व सगुण ही दोन्ही प्रकारची भगवंताची निर्विकार मायारहित लीलाच आहे ।।६३।।याप्रमाणे संपूर्ण नामरूपात्मक विश्व हे केवळ भगवंताची स्वतंत्र म्हणजे मायारहित चिन्मय लीलाच आहे. ते सच्चिदानंद परमेश्वराहून भिन्न आणि जडविनाशी नाही असा अनुभव येतो. तेव्हा द्वैत अद्वैत असे वाद किंचितहि उरत नाहीत ।।६४।।दोरीवर सर्प भासला असता तो सत्य वाटून त्याची भीति वाटते; म्हणून त्याची निवृत्ति झाली असता फार सुख होते ।।६५।।आणि सुवर्णाचे अलंकार पाहिले असता चित्त प्रेमाने वेधले जाते; म्हणून ते अलंकार मोडून आटून टाकावे अशी मूर्ख देखील इच्छा करीत नाही ।।६६।। म्हणून जोपर्यंत सोने आहे तोपर्यंत अलंकाराला खोटेपणा नाही आणि अलंकाराची उपेक्षा करून ते मोडले तरी देखील कोणत्या तरी आकारात सोने राहीलच ।।६७।।दोरीवर भासणाऱ्या सर्पाची गोष्ट तशी नाही. दिवा आणून पाहिल्याबरोबर सर्प नाहीसा होऊन नुसती दोरीच अनुभविली जाते. पण सुवर्णालंकाराच्या या दृष्टान्ताप्रमाणे भगवंताच्या सगुणसाकार सच्चिदानंदघन लीलाविग्रहाचा सिद्धान्त अबाधित आहे ।।६८।।सच्चिदानंद आत्मस्वरूपाला विसरून ''मी देह आहे'' ही झालेली विपरीत समजूतच अविद्यारूपी महासर्प असून तीच सर्व प्रकारच्या दुःखभयाचे कारण आहे; म्हणून त्या विपरीत समजूतरूप अविद्येची निवृत्ति व्हावी असे साहजिकच वाटते ।।६९।।पण चतुर्भुज सगुण साकार परमात्मा, हा अधिष्ठानभूत सच्चिदानंदघन अशा परब्रह्माचा विसर न पडताच साक्षात् त्याच्यावरच त्याच्याच विवर्तरूपाने भासतो म्हणून त्याच्या निरसनाची इच्छा करणारा अज्ञानी मूर्ख होय ।।७०।। एखाद्या अज्ञानी मूर्खाने भगवंताच्या लीलाविग्रही सगुणसाकार विग्रहाचा आदर केला नाही तरी त्या लीलाविग्रहाची कीर्ति नाहीशी होत नाही. उलट चैतन्य व परमप्रेमरूप स्वभावामुळे भगवंताला सगुण साकार असणें हेच योग्य आणि भूषणावह आहे ।।७१।।प्रेमाने मनाला वेधून घेण्याचे कार्य नुसत्या सोन्याने

होत नाही. ते अलंकारानेच होते ।।७२।।आणि अलंकार नाहीसा केला तरी सोन्याला कोणता तरी आकार राहणारच; कारण आकारावाचून सोने पाहता येत नाही–(अनुभविता येत नाही) मग अलंकार नाहीसा करण्याचा हट्ट कां धरावा? ।।७३।। (श्री नाथांनी हाच अभिप्राय ''म्हणे म्यां सोने पहावे दृष्टी । तरी समोर ठेविजेल खोटी । खोटीवाचून सोने दृष्टी । न पडे कदा'' या ओवीने स्वात्मसुखांत दाखविला आहे) त्याप्रमाणे ज्या निर्गुण परब्रह्माला किंवा डोळ्याने पाहता येत नाही त्या परब्रह्माचे ठिकाणी जीवभाव किंवा अहंवृत्ति मुरविता येत नाही ।।७४।।आणि भगवंताचे ठिकाणी सगुणसाकारपणा हा खरोखर अविनाशी व सत्य स्वरूपाने आहे, ज्ञानेश्वरीतील ६ व्या अध्यायात सांगितलेल्या लययोगाने सत्पुरुष याचा प्रत्यक्ष अनुभव घेतात ।।७५।।मग हा लीलाविग्रही सगुण साकार परमात्मा, निर्गुण निराकार अशा परमाणूंच्या पुंजाप्रमाणे किंवा लययोगात अनुभवाला येणाऱ्या रूपकमलाप्रमाणे तत्पदलक्ष्यांशाच्या म्हणजे सृदिानंदाच्या गुंफेप्रमाणे अनुभवाला येतो ।।७६।।अशा श्रीकृष्णरूप भगवद्विग्रहाचे ठिकाणी, परमार्थाकरिता पतिव्रता स्त्रियेची मनोवृत्ति स्थापन करून सर्व समर्थ अशा श्रीज्ञानेश्वर महाराजांचे चरणी ती समर्पण केली ।।७७।। हे श्री सद्गुरु ज्ञानेश्वर आई! तुझ्या चरणावर मी आपला आत्मभाव समर्पण केला आहे. आता पुढच्या तरंगात 'त्वं' पदाचा अर्थ जी भक्ति तिचे निरूपण करविण्याकडे लक्ष दे ।।७८।।हे ज्ञानेश्वर आई! तुझ्या कृपेकरून हा ग्रंथ पूर्ण होवो व शेवटी तो तुझ्याच चरणाचे ठिकाणी समर्पण असो ।।७९।। श्रीसद्गुरु ज्ञानेश्वरार्पणमस्तु ।।

तरंग ३ रा

हे सद्गुरु जननीये! तू ब्रह्मानंदाचा विग्रह धारण करणारी असून आपले ब्रह्मसुख दुसऱ्याला देण्यासहि अत्यंत उदार आहेस. तुझा जयजयकार असो. हे संपूर्ण विश्व तुझे ठिकाणी असून ते तुझ्या स्वरूपाशी विषमसत्ताक आहे (म्हणजे तू कधी नाश न पावणारी अशी सत्स्वरूप असून विश्व हे जीवाने अज्ञानाने कल्पिलेले असल्यामुळे विरोधी नाही) ।।१।। तुझे चरणकमळ जसेजसे ध्यानाने हृदयात दृढ ठसतात तसतसे हे विश्वरूपी मायाजळ अनुभवालाच येत नाही ।।२।। तुझ्या प्रेमाला अंत नाही. वेदांनी सांगितलेल्या फळांनी तू भरली आहेस. म्हणजे वेदोक्त फळे तू आपल्या सामर्थ्याने देऊ शकतेस व तू आपल्या भक्तावर अखंड कृपेची सावली करतेस ।।३।। ''माझ्याद्वारा तीन वर्णासच ज्ञान प्राप्त करून घेता येईल'' हा वेदाचा अभिमान नाहीसा करण्याकरिता ''श्रोतव्यः मन्तव्यः निदिध्यासितव्यः'' हा वेदाचा नियम मोडून टाकला व मला वेदश्रवण न करता ज्ञान प्राप्त करून दिलेस आणि आपली अन्यथाकर्तुंशक्ति लोकांना प्रगट करून दाखविलीस ।।४।। हे सखे! जे कोणी संसारतापाने तप्त होऊन तुला शरण आले, ते तुझ्या नामस्मरणाचा आश्रय करून संसार मुळी अस्तित्वातच नाही असा अनुभव घऊन परम सुखाला प्राप्त झाले ।।५।। तरी पण हे ब्रह्मज्ञान प्राप्त होण्याला तुझी कृपाच पाहिजे किंबहुना तुझ्या कृपेवाचून प्राप्त होणारे ज्ञान हे ज्ञान नसून अज्ञानच होय. (गुरुकृपेवाचून ज्ञान स्थिति बाणण्याऐवजी अज्ञानजन्य नुसता ज्ञानाहंकारच आंगी बळावतो, असा अर्थ) ।।६।। हे जननी! आणि तू कृपा केली असता ज्ञान देखील अज्ञानच वाटते. म्हणून या दोन्ही दृष्टीने अज्ञानाची वार्ता मिथ्या ठरते. (अखंड, अफुट, पूर्ण सृदिानंदस्वरूप राहणाऱ्या जीवाची, मी बद्ध होतो आता मुक्त झालो. पूर्वी मी अज्ञानी होतो आता ब्रह्मज्ञानी झालो ही जाणीव, अशी दोन्ही प्रकारची जीवाची अविद्याभ्रांतिच होय, हेच श्रीज्ञानेश्वर माउलीनी ''जिती अविद्या ऐसी। अन्यथाबोधाते गिंवसी । तेचि यथाबोधेसी । निमाली उठी'' (अमृ. प्र. ३-१०) या ओवीत सांगितले आहे.) ।।७।। तेव्हा अज्ञानाचा नाश करण्याकरिता ज्ञानाची खटपट व्यर्थ वाटत असून, हे आई! मला तुझी प्रेमभक्ती गोड वाटते ।।८।। स्वतः पूर्ण ब्रह्म होऊन जर तुझ्या चरणाला विसरला म्हणजे तुझ्या सगुण स्वरूपाची प्रेमभक्ति करणार नाही, तर आम्ही त्या ब्रह्मस्थितीपेक्षा निश्चयेकरून नरकच श्रेष्ठ मानतो. (व्यतिरेकब्रह्मज्ञानी स्वतः ब्रह्मरूप होऊनहि

नामरूपाना मिथ्या पदार्थ मानून द्वैतच शिल्लक ठेवीत असल्यामुळे व व्यवहारकाली ब्रह्मानंद भोगू शकत नसल्यामुळे त्याची ती व्यतिरेक ब्रह्म स्थिति तुच्छच होय, असा अर्थ) ।।९।। जर तुझी प्रेमभक्ति केली तर ब्रह्मस्थिति पायावर लोळते, हे स्पष्ट जाणून आम्ही ज्ञानाची खटपट सोडून केवळ तुझ्या चरणांवर मस्तक ठेविले ।।१०।। हे ज्ञानेश्वर आई ! अशी तू कृपाळू व प्रेमळ आहेस, म्हणून आपल्या चरणाच्या सेवेचे सुखच जन्मोजन्मी आम्हाला दे ।।११।। यावाचून दुसरे काही एक मी तुला मागत नाही आणि तूही या माझ्या मागणीला अनुमोदन देऊन प्रोत्साहन दे ।।१२।।हा तुझा दास तुझ्या आशीर्वादाने ग्रंथ पूर्ण करो! आणि ग्रंथकर्तृत्वाचा अभिमान नाहीसा होऊन मी अखंड तुझ्या सेवेत रत होवो ।।१३।।मागील अध्यायात तत्पद लक्ष्यांशाचे निरूपण करण्यापूर्वी येथे अधिकारी होण्यास 'त्वंपद' जाणणे हीच मर्यादा आहे. असे सांगितले ।।१४।।आई! मी स्वतः तुज सद्गुरूच्या कृपापक्षाचा आश्रय करून भक्तीच्या अपेक्षेने त्वंपदाचे वाच्यांश आणि लक्ष्यांश कोणते याचे निरूपण करतो ।।१५।।देहाचा अभिमान व कर्माने प्राप्त होणाऱ्या विषयसुखरूप फळाची मनात दृढइच्छा, या अविद्येचा आश्रय करूनच जीव राहत असतो ।।१६।।हा त्वंपदाचा ''अशुद्ध वाच्यांश'' होय. आता त्वंपदाचा शुद्धवाच्यांश स्पष्ट सांगतो. संसाराचा निरास करून आपणाला मोक्ष प्राप्त व्हावा, अशी इच्छा असणे, हा त्वंपदाचा शुद्ध वाच्यांश होय ।।१७।।या शुद्ध वाच्यांशाचा वाच्य होणारा सात्विक जीव होय.पण तो अविद्येत आभासरूप असल्यामुळे कलंकयुक्त असून कामक्रोधादि अनादि षड्विकाररूप शत्रुसैन्यांनी वेढला आहे ।।१८।। ईश्वर मायेत आभास असला तरी तो मायेहून निराळा असा तटस्थ राहतो आणि जीव अविद्येत आभास असून तो अविद्यारूढ आहे म्हणूनच ईश्वर व जीव या दोघांनाहि श्रुतीने आभास ठरविले आहे (ऐक्याभिमान न धरता केवळ आश्रय होणे तटस्थता होय. ईश्वर मायेशी आपले ऐक्य करीत नाही - म्हणजे मायेच्या स्वाधीन होत नाही; म्हणून ईश्वर तटस्थलक्षणात्मक होय.जीव आपले अविद्येशी ऐक्य करून देहाभिमानी होतो-म्हणजे अविद्येच्या स्वाधीन होऊन राहतो. हेच जीवाचे अविद्यारूढ होणे होय) ।।१९।।स्वरूपतः जीवहि परब्रह्म आहे; कारण तो चेतनस्वरूप असल्यामुळे त्याचे चेतन परब्रह्माशी पूर्ण ऐक्यच आहे; पण सामर्थ्याच्या दृष्टीने मात्र जीव व ईश्वर यांचा भेद आहे. (उपरम - म्हणजे निराळेपणा) ।।२०।। खरोखर परमार्थ दृष्टीने द्वैत, अद्वैत असे काहीच नसल्यामुळे हे द्वैतासारखे दिसत असले तरी पूर्ण अद्वैतच असल्यामुळे अकृत्रिम भक्तीची प्रतीति यानेच येत असते ।।२१।।कर्माच्या फळांच्या प्राप्तीची म्हणजे विषयसुखाच्या प्राप्तीची इच्छा धरून परमेश्वराचे भजन करणे हे त्वंपदाचे अशुद्धवाच्यांशाने भजन होत असल्यामुळे खोटे म्हणजे कपटी प्रेमभजन होय. आणि मोक्षाच्या इच्छेने भजन करणे तेहि वाच्यांशानेच होत असल्यामुळे त्याचीहि गणना त्याच सदरात होते ।।२२।।मनुष्य ज्याप्रमाणे स्वप्नात राजा किंवा भिकारी झाला तरी जागा झाल्यावर त्या दोन्ही अवस्थांचा त्याच्याशी यत्किंचितहि संबंध नसतो, त्याप्रमाणे बद्धपणा व मुक्तपणा हे दोन्हीहि अविद्यात्मक विपरीत ज्ञानरूप स्वप्नातीलच प्रकार आहेत ।।२३।। मृगजळाच्या पुरात एक मनुष्य बुडाला किंवा मृगजळाच्या पुरातून दुसरा मनुष्य तरून गेला या दोन्ही म्हणण्यात जसा काही एक अर्थ नाही ।।२४।।त्याप्रमाणे आत्मस्वरूपाच्या ठिकाणी खरोखर अविद्याभ्रम कालत्रयींहि, नसल्यामुळे तो कधी बद्ध होत नाही, म्हणून मुक्तहि होत नाही. सूर्यकिरणांचे कंपन हे जलाप्रमाणे दिसते. हे न जाणणारे मृग ज्याप्रमाणे ते जल समजून त्याकडे धांवतात, त्याप्रमाणे आपली अखंड नित्यमुक्तता विसरून जीवहि भ्रांतीने आपल्याला बद्ध-मुक्त समजतो ।।२५।।हा वर सांगितलेला दोन्ही प्रकारचा त्वंपदाचा वाच्यांश होय. आता याहून निराळा असलेला जो त्वंपदाचा लक्ष्यांश तो सद्गुरुकृपेने सांगतो ।।२६।।स्थूल-सूक्ष्म-कारण-महाकारण या चारी देहाविषयीची सत्यबुद्धि सोडून देऊन, अन्वयाने मीच ब्रह्मस्वरूपाने सर्वत्र व्याप्त आहे असे जाणून आणि साक्षीरूप होऊन बुद्ध्यादिकांचा व्यापार तटस्थपणाने जो पाहत राहतो ।।२७।।ज्याने विषयकामना निःशेष सोडून देऊन संचित कर्माचे मुंडकेच तोडून टाकले आणि क्रियमाण कर्माचाहि पुढील संपूर्ण वंशच्छेदच केला

॥२८॥आणि जो प्रारब्ध भोगण्यास आनंदाने तयार झाला, असा जीव त्वंपदाचा लक्ष्यांश होय. इतके झाले तरी भगवंताच्या भक्तिवाचून ही स्थितिदेखील व्यर्थ आहे ॥२९॥मुलीचा विवाह झाल्याबारोबर मातृकुळाशी संबंध तुटतो व ती पतिघरची स्वामिनी होते. एवढ्यानेच जर पतीची सेवा करणार नाही, तर तिला पतिव्रता म्हणता येत नाही ॥३०॥ ती स्त्री पतीच्या आज्ञेत वागून पतीची सेवा करील तरच तिचे गृहस्वामिनीपण शोभते व सुखकर होते; नाही तर लोक तिच्या कपाळी वेश्यापणाचा शिक्का मारतात ॥३१॥मग अशा स्त्रीवर कोणताहि भलता पुरुष आपली सत्ता चालवू शकतो व त्यामुळे दुःखपरंपरा भोगावी लागते. आणि इतके कष्ट करूनहि कोणाचे सुखाचे शब्द देखील ऐकण्याचा प्रसंग येत नाही ॥३२॥त्याप्रमाणे आत्मज्ञानाने ''मी ब्रह्मस्वरूपच आहे'' असे जाणून व ब्रह्मत्वाच्या केवळ अभिमानाने फुगून जाऊन जर कोणी भगवंताच्या सगुण स्वरूपाला तुच्छ लेखील तर तो भक्तिसुखाला सर्वस्वी अंतरला, असे समजावे ॥३३॥(राजाने) लोखंडाची बेडी काढून सोन्याची बेडी घातली तर आणखी चोराचे भय उत्पन्न होऊन चित्ताला अखंड काळजी लागते ॥३४॥पुनः सोन्याची बेडी आपल्या मालकीची होत नाही व पाय दुखणे कायमच राहते. याप्रमाणे बंधन कायम राहूनच पुनः त्या बेडीचा संरक्षक होण्याचा प्रसंग येतो ॥३५॥त्याप्रमाणे सगुण भगवंताची भक्ति न करता ''मी ब्रह्म आहे'' या ज्ञानाभिमानाने फुगून राहणारा ज्ञानाहंकाराच्या खरोखर बंधनात पडतो व त्यामुळे त्याची व्युत्थानाच्या भयाने- म्हणजे देहावर येण्याच्या भीतीने होणारी चित्ताची व्याकुळता सुटत नाही ॥३६॥असे व्युत्थान झाल्यावर प्रारब्धाचे भोग भोगल्यावाचून सुटत नाहीत आणि ब्रह्मरूप होऊनहि अशा प्रकारे प्रारब्धाचे भोग भोगत जगणे, हे तर अत्यंत लाजिरवाणे होय ॥३७॥म्हणून व्रजभूमीत प्रगट झालेला अखिल सौंदर्याचा पुतळा जो श्रीकृष्ण त्याचे भजन न करणारा सर्व जगात काळतोंडा समजावा. आम्ही अशा वितंडवाद्याच्या तोंडाला तोंड देऊ इच्छित नाही ॥३८॥ज्या भगवंताच्या वेदोपदेशाने जीव निश्चयेकरून संसारापासून मुक्त होऊन पूर्ण ब्रह्मस्वरूप होतो त्या हरीच्या चरणाची प्रेमभक्ति न करणारे ते अकृतज्ञ लोक शेवटी त्याच्या ऋणातून कधी मुक्त होत नाहीत ॥३९॥आणि मी ब्रह्म झालो या ज्ञानाभिमानाने सगुण भगवंताला हा एक तुच्छ लेखीत असला म्हणून हरीची थोरवी कांही कमी होत नाही उलट हाच ज्ञानाहंकाराच्या तडाख्यात सापडला जातो ॥४०॥ अरे लेका! कामवासनेने जडलेल्या गोपिकांचा देखील ज्याने स्वसामर्थ्याने उद्धार केला, ते सामर्थ्य तुझ्या ठिकाणी येणे शक्य नाही; म्हणूनच आत्मप्राप्तिनंतरहि नंदनंदन अशा श्रेष्ठ गोपालकृष्णाचे भजन केले पाहिजे ॥४१॥बाबा तू स्वतः जरी आत्मज्ञानाने ब्रह्मस्वरूप झालास तरी तुझा देह मात्र पांचभौतिकच राहील- तो बदलणार नाही- पण जर हरिभक्ति करशील तर त्या देहासह तू ब्रह्मस्वरूप होऊन जाशील ॥४२॥ श्रीहरीचा देह पूर्ण ब्रह्मस्वरूप आहे म्हणून तूहि शरीरासह ब्रह्मरूप झाला पाहिजे. तेव्हाच तू हरिस्वरूप झालास असे म्हणता येईल. बरें तुझ्या म्हणण्याप्रमाणे जर अन्वय आणि व्यतिरेक हे दोन्ही करून तू ब्रह्मस्वरूप झाला आहेस तर मग तुझी तनु पांचभौतिक कशी राहिली?

''मृद्रूपो हि यथा कुंभो तद्वद्देहो ऽ पि चिन्मयः ।
आत्मानात्मविभागो ऽ यं मुधैव क्रियते बुधैः ।'' अपरोक्षानुभूति.

ज्याप्रमाणे पूर्ण घट मातीस्वरूप असतो, त्याप्रमाणे देहहि चिन्मय आहे, असा अन्वयाने अनुभव येतो. या आचार्य वचनाचा आधार घेऊन महाराजांनी ही ओवी दिली आहे) म्हणून, बापा! असे करू नकोस. आपला त्वंपदलक्ष्यांश जाणून त्या त्वंपदलक्ष्यांशाने तत्पदलक्ष्यांश अशा भगवंताची भक्ति केली असताच ब्रह्मज्ञान शोभून दिसते ॥४४॥व्यतिरेकाने आपल्याला देहादिकाहून निराळे जाणून घेऊन देहाचा अभिमान साडून द्यावा व सर्व नारूपाने एक भगवानच नटला आहे, या अन्वयाने भगवंताची सेवा करावी. हे स्वरूपभजनाचे रहस्य असून सद्गुरु कृपेनेच ते समजू शकते ॥४५॥ महावाक्यातील 'असि' पदाचा विवरण प्रकार म्हणजे हा सद्गुरुकृपेचा विचार असल्यामुळे पुढल्या प्रकरणात तो विशेष रीतीने विस्तारपूर्वक सांगण्यात येईल ॥४६॥मग त्या

'असि' पद विवरणाने संपूर्ण संशयाचे निराकरण होऊन अंतःकरणात सगुण श्रीहरीची प्रेमभक्ति प्रगट होईल व मुक्ति वेश्येप्रमाणे लाजून तटस्थ उभी राहील- म्हणजे ब्रह्मज्ञानाने झालेली मुक्ति आपला यत्किंचितहि मोठेपणा मिरविताना दिसणार नाही ॥४७॥ते भक्तीचे सुख प्राप्त होण्याकरिता सर्व देहादि अहंकार सोडून देऊन श्रीज्ञानेश्वर माउलीला शरण जावे व तिच्या चरणकमलाचे ठिकाणी दीन होऊन अत्यंत नम्रभावाने तिला नमन करावे ॥४८॥ श्रीज्ञानेश्वरमाउली ही सर्व जगाची आई असल्यामुळे तिला शरण गेल्याबरोबर ती शरणागताला अभय देते, म्हणून तिच्या चरणांगुष्ठाचे ठिकाणीच आत्मनिवेदन करून- म्हणजे अहंताममता समर्पण करून राहू ॥४९॥
श्रीसद्गुरुज्ञानेश्वरार्पणमस्तु

तरंग ४ था

हे सद्गुरु मायबहिणी! हे कृपारूपिणी ज्ञानेश्वर आई! तुझाच अखंड जयजयकार असून तुला माझा नमस्कार असे॥१॥सखे! तुझ्या कृपेने आपल्याच ठिकाणी परब्रह्माचा ''मीच ब्रह्म आहे'' असा अनुभव येतो व मग 'माझा आणि परका अशा भावाची जाणीवच उरत नाही, असे तुझ्या कृपेचे नवल सामर्थ्य आहे ॥२॥तुझ्या कृपेने एका पूर्ण प्रेमाचेच शुद्ध सुख मिळते, असाच माझ्या अंतःकरणात शुद्ध भाव आहे ॥३॥म्हणून सखे आई! तुझ्यावाचून मला कांही एक नको, हाच अंतःकरणाचा निश्चय करून बसलो आहे ॥४॥ज्याप्रमाणे अनेक नवयौवन सुंदर स्त्रियातून आपल्या आईला ओळखेल तरच तो तिचा मुलगा होय ॥५॥त्याप्रमाणे सर्व त्रैलोक्यात फिरत असता मला श्रीज्ञानेश्वर आईचे चरण प्राप्त झालेत व तेच माझे स्तनपान होय ॥६॥त्या स्तनातील सामर्थ्य देणारे दुग्ध पिऊन तिने केलेल्या कोडकौतुकाच्या साहाय्याने आता पुढे ''असि'' पदाचे विवरण करीत आहे ॥७॥'तत्' आणि 'त्वं' या दोन्ही पदांचे ऐक्य करणे यालाच 'असि' पदाचे विवरण म्हणतात आणि हेच ऐक्यभजन असून सर्व भजनांचे सारभूत भजन आहे ॥८॥भगवंताचे हे भजन तीन प्रकारचे आहे. ओघानेच ते दृष्टांत देऊन सांगणे प्राप्त होते; म्हणून आधी दृष्टान्ताचे स्पष्टीकरण केले पाहिजे ॥९॥ज्याप्रमाणे स्त्री लहानपणापासूनच- म्हणजे पतीची कांही एक माहिती नसते तेव्हापासूनच- पतीच्या नांवाने कपाळाला कुंकू लावित असते. त्याप्रमाणे तत्पदवाच्यांश जो ईश्वर त्याच्या विशेष स्वरूपाचे ज्ञान नसतानाहि जगदुत्पत्तिस्थितिलयकर्ता परमात्मा आहे, येवढेच सामान्यतः समजून त्याचे नामस्मरण करणे, हे अलंकार भजन होय ॥१०॥ आणि नंतर मुलगी विवाह योग्य झाल्यावर विवाहाचे वेळी जेव्हा पतीचे नांव प्रगट होते, तेव्हाच तिला पतीची व पतीच्या नामाची ओळख होते. या दृष्टान्तावरून सिद्धान्ताचे निरूपण करू ॥११॥ ॥१२॥ शिष्य प्रेमळ आहे, असे पाहून सद्गुरुनाथ त्याला द्वादशाक्षरी नामाचा उपदेश करतात व प्रेमळ अंतःकरणाने शिष्य जेव्हा त्या मंत्राचा जप करू लागतो, तेव्हा त्या मंत्राचा वाच्य परमात्मा श्रीहरि अंतःकरणात प्रगट होतो ॥१३॥येथपर्यंत अलंकार भजनाचे स्वरूप आहे. आता स्वरूपभजन सांगतो. ऐका ज्याप्रमाणे लग्न झाल्यावर सासू-सासऱ्याच्या आज्ञेने ती पतीची सेवा करते ॥१४॥ त्याप्रमाणे अंतःकरणात ध्यानाने हरि भरला असतानाच ''परमात्माच एक सर्व जगद्रूप झाला आहे'' या संताच्या आज्ञेचे परम रहस्य जाणून परमेश्वराचे भजन करावे ॥१५॥आणि ज्याप्रमाणे ऋतुप्राप्ति झाली असता पतीसह मंचकावर ती शयन करते त्याप्रमाणे सर्वत्र भगवद्भावनेने भगवंताची सेवा केली असता तो (परमात्मा) प्रत्यक्ष सगुण-साकार होऊन डोळ्यासमोर उभा राहतो ॥१६॥ येथपर्यंत स्वरूपभजनाची मर्यादा आहे. आता ऐक्य भजन सांगतो, ते ऐका. यालाच 'असि' पद विवरण म्हणतात.ज्याप्रमाणे स्त्री-पुरुष कामासक्त झाले असता सुरतक्रीडेस प्रवृत्त होतात, त्याप्रमाणे आंत-बाहेर एक सगुण-साकार भगवान श्रीहरीच अनुभविला जातो ॥१८॥सुरत-सुखात स्त्री व पुरुष या दोघात जशी एक भोगवासनाच अंतर्बाह्य व्यापून असते, त्याप्रमाणे भक्त व भगवान श्रीहरि या दोघात एक निष्काम प्रेमच राहते. हेच 'असि' पदाचे परम विवरण आहे ॥१९॥'तत्' पदाचा

वाच्यांशपरमात्मा तटस्थ म्हणजे साक्षीभूत निर्गुण राहतो.'त्वं' पदाचा वाच्यांश असलेल्या जीवाचे कामनिक प्रेम कृत्रिम -म्हणजे मायिक असते. माझा पति जो भगवान श्रीकृष्ण तो 'तत्' पदाचा लक्ष्यांश असून सच्चिदानंद स्वरूपलक्षणात्मक आहे, अशा 'तत्' पद लक्ष्यांश सच्चिदानंदस्वरूपलक्षणात्मक भगवंताचे ठिकाणी असलेले जीवाचे निष्काम परम प्रेम हा 'त्वं' पदाचा लक्ष्यांश होय. ॥२०॥ विषयकामना निःशेष टाकून देऊन दोन्ही प्रकारच्या प्रेमाचे ऐक्य करून 'तत्' पदलक्ष्यांश असलेल्या भगवंताचे भजन करणे हे अकृत्रिम भक्तीचे लक्षण आहे. या भक्तीने मग सर्व भूते, सगुण-साकार- श्रीकृष्णस्वरूपानेच अनुभवाला येतात ॥२१॥ ज्याप्रमाणे अलंकाराकरिताच सोन्याचे प्रेम केले जाते त्याप्रमाणे भक्तिसुखाकरिताच परब्रह्माचे प्रेम असते. भक्तीनेच ''विपरीत-ज्ञानरूप'' व ''ब्रह्माभिमान-ज्ञानरूप'' अशा (दोन पायांत असलेल्या) दोन शृंखला तुटल्या जातात. (पाशैर्विवध्यते स पशुः) याप्रमाणे कालाग्निरुद्रोपनिषदांत आणि माधवकृत सूतसंहितातात्पर्यदीपिकेत सांगितल्यावरून अविद्या, काम, कर्म-पाशांनी बांधलेला तो ''पशु-जीव'' म्हणावा. ते जीवत्व आरूढ लक्षणी आहे. म्हणून पशुत्व- त्याची बेडी- म्हणजे विपरीत ज्ञानरूप व ब्रह्माभिमान ज्ञानरूप अशा दोन्ही पायात असलेल्या दोन बेड्या) ॥२२॥परब्रह्माच्या सदंशावरच अज्ञानभ्रांतीने जड- विनाशी अशा जगताचा भास होतो.चिदंशावर जीवत्वाचा प्रत्यय येतो आणि आनंदांशावर सगुण श्रीहरीचा प्रत्यय येतो ॥२३॥असे ऐक्य जाणून केलेले भजन थोडे वरकरणीच होय खरे पारमार्थिक भजन याहून वेगळे आहे. ज्याप्रमाणे पतिव्रता स्त्री पतीपासून कामसुख प्राप्त होवो किंवा न होवो पतिसेवा करणे हा आपला धर्म आहे असे ती समजते, ॥२४॥त्याप्रमाणे आनंदाची प्राप्ति होवो किंवा न होवो, तरी सगुण परमेश्वराचे ठिकाणी सहज स्वाभाविक प्रेम असणे, याला खरी सहजभक्ति म्हणतात ॥२५॥ पांढरेपणा, सुवासिकता व नरमपणा हे तिन्ही मिळून जसा कापूर असतो, त्याप्रमाणे सत्-चित्-आनंद हे तिन्ही मिळून एकरूप परमात्मा आहे ॥२६॥सत्पद हे त्याचे अस्तित्व असून चित्पद हा त्याचा अनुभव होय आणि आनंदपद हे त्याचे तिन्ही मिळून एकरूप झालेले सगुण स्वरूप होय ॥२७॥पण हे बोलणेहि योग्य नाही. ही स्वरूपस्थितिच आहे आणि ते स्वरूप सहज अस्ति-भाति-प्रिय स्वरूप आहे ज्याप्रमाणे साखर आणि तिची गोडी चाखणारी जीभ या दोहोत गोडी ही एकच असते, त्याप्रमाणे भगवान् सेव्य व भक्त सेवक असा भेदासारखा प्रकार असला तरी त्या दोघात प्रेम मात्र एकच असते ॥२९॥सेव्य असलेला सगुण साकार श्रीहरि हा तत्पदलक्ष्य असतो आणि त्याची सेवा करणारा जीव हा 'त्वं' पदलक्ष्य असतो आणि ज्या प्रेमामुळे दोघांचे ऐक्य होते ते प्रेमच 'असि' पद होय ॥३०॥ सत्ता चैतन्याहून निराळी नाही, चैतन्यरूपच आहे आणि चैतन्य आनंदाहून निराळे नाही, आनंदरूपच आहे; म्हणून तिन्ही मिळून एक सच्चिदानंद घन वस्तुच आहे ॥३१॥वृत्तीचे निराळेपण जेथे भासते त्याला 'सत्' पद म्हणतात. वृत्तीचे निराळेपण जेथे भासत नाही त्याला 'चित्' पद म्हणतात आणि अखंड हरिप्रेम तोच आनंद होय. असा हा हरि स्वयं सच्चिदानंदस्वरूप आहे ॥३२॥ज्याप्रमाणे पित्याचे मारणे हे उत्तम शिकविण्याकरिता म्हणजे बऱ्याकरिताच असते, त्याप्रमाणे सन्मार्गाला लावण्याकरिताच भगवान दुःख देतो. वास्तविक विचार करून पाहता हे दुःख स्वानंदाकरिताच आहे असे भक्त समजतात ॥३३॥भक्ति न करता ''अहं ब्रह्मास्मि'' असेच केवळ चिंतन करीत राहिल्यास व्युत्थान म्हणजे प्रारब्धामुळे देहावर येणे हे चुकत नाही तसे श्रीहरीच्या भक्ताचे व्युत्थान होत नाही; म्हणून सर्वांनी भक्तिमार्गानेच जावे, हे उत्तम ॥३४॥अहो, भगवन्नामस्मरण करणे हे भगवंताच्या संदेशाचे ग्रहण करणे होय. भगवंताच्या सगुणरूपाचा अनुभव हा चिदंशाचा अनुभव होय आणि भगवंताच्या अविरत निस्सीम प्रेमाचे सुख तोच ब्रह्मानंद होय ॥३५॥ ''त्याचा तू आहेस'' हा भेदमूलक सेव्य-सेवक संबंध रजोगुणी असून 'ते ब्रह्म तू आहेस' हो ऐक्यसंबंध सत्वगुणी आहे आणि 'हे भगवंता! एक तूच सर्व आहेस' असे भगवंताचे स्तवन हाच 'तत्त्वमसि' महावाक्याचा अहंकार-रहित शुद्ध-लक्ष्यांश आहे ॥३६॥'त्याचा तू आहेस' हे विपरीत ज्ञान होय. 'तेच तू आहेस' हा ज्ञानाहंकार होय आणि 'तत्त्वमसि' म्हणजे

सर्व सगुणरूपाने एक परमात्माच आहे, हेच जाणीवरहित प्रेमरूप ऐक्यभजन होय ॥३७॥परमात्मसत्ता अमर्याद व्यापक असल्यामुळे नामरूपात्मक उपाधीचा व परमेश्वराचा संबंध सुटत नाही; म्हणून परमात्मा केवळ नामरूपरहित निर्गुण नसून सगुणच आहे. ॥३८॥ 'ते सर्व नामरूपात्मक ब्रह्मच मी आहे' असे मानल्यास विराटाभिमान उत्पन्न होईल; म्हणून सर्व नामरूपे परमेश्वराला अर्पण करून- म्हणजे सर्व नामरूपात्मक एक परमात्माच आहे असे समजून - आपण केवळ सेवकपण घेऊन राहावे ॥३९॥ज्याप्रमाणे स्त्रियेला आपले घरांतील कोणतेहि काम करताना संकोच वाटत नाही व पतीपुढे भोगप्रार्थना करताना ती अत्यंत लीन होते ॥४०॥ त्याप्रमाणे ज्याला परमेश्वराचा सेवक होण्यात यत्किंचितहि संकोच वाटत नाही; उलट भगवंताचे पूजन करण्यात आनंद वाटतो आणि या व्यतिरिक्त आत्मज्ञानादिकापासून जो उपराम पावतो ॥४१॥मग त्याच्या दृष्टीने अज्ञानग्रंथीच उरत नाही. तशा अवस्थेत त्याने आत्मज्ञानाची खटपट कशाला करायला पाहिजे ॥४२॥ज्याप्रमाणे सूर्यप्रकाश असताना दिवा लावला असता त्याचा काहीच उपयोग होत नसल्यामुळे व्यर्थ श्रम होतात. ॥४३॥त्याप्रमाणे ही अद्वैत ब्रह्मस्थिति मूळचीच परिपूर्ण आहे. ती कधीच भंगली नाही. अशा स्थितीत ''मी ब्रह्म आहे'' या जाणिवेचा काही उपयोगच नसल्यामुळे ती वागविणे, हा व्यर्थ शीण आहे ॥४४॥म्हणून असे काही करू नये. जसे दिवसा सूर्यप्रकाशानेच पाहावे, हे योग्य; तसेच तन-मन-धन इत्यादि सर्व पूर्ण अशा भगवंताला अर्पण करून त्याचे भजन करावे, हेच उत्तम ॥४५॥ आत्मज्ञानाने अज्ञानजन्य विपरीत ज्ञान नाहीसे करावे आणि भगवद्भक्तीने ज्ञानानंतर होणारे व्युत्थान नाहीसे करावे. असे केले असता दुःखरूप प्रारब्ध देखील भगवद्भजनाने सुखरूप होते ॥४६॥जेवढे काही विश्वात आहे ते ते सर्व भगवान श्रीहरिच असून त्या सर्वांच्या सुखाचा साक्षी (आणि भोक्ता) तो श्रीकृष्ण परमात्माच आहे ॥४७॥ज्याप्रमाणे एक थेंबभर अमृत मिळाले तरी अमृताच्या सागराचे अमर करण्याचे संपूर्ण सामर्थ्य आपल्या हाती येते -म्हणजे आपण अमर होतो; पण अमृताच्या सागरात बुडाल्यास घाबरून गेल्याने एक बिंदूहि मुखात जात नाही व आपण अमर होत नाही ॥४८॥त्याप्रमाणे सगुण साकार श्रीकृष्ण विग्रहाचे भजन केले असता पुरुष पूर्ण निर्विकल्प सच्चिदानंदस्वरूप होतो; पण ''मी सच्चिदानंद ब्रह्म आहे'' असे कोरडे शब्द घोकल्याने सगुण स्वरूपाची प्राप्ति तर होत नाहीच पण निर्गुण स्वरूपाची प्राप्तिहि होत नाही (ब्रह्मस्थितिऐवजी नुसता अहंकारच हाती येतो, असा अर्थ) ॥४९॥हे सर्व जाणून जो सगुण साकार भगवान श्रीहरीचे भजन करतो तो प्रेमळ भक्तच पूर्ण होय ॥५०॥ मग मर्यादेने म्हणजे शास्त्ररूप भगवदाज्ञेचे पालन करून तो भगवंताचे भजन करीत असला तरी तेहि भगवत्प्रेमच होय. याप्रमाणे वाच्यांश व लक्ष्यांश या दोन्ही प्रकाराने भजन करीत असताना त्यांत एक भगवत्प्रेमच ओतप्रोत भरलेले असते ॥५१॥या भक्तिसुखाचे असे नवल आहे की, ही भक्ति सर्व रसांची जननी असून- म्हणजे या भक्तीत सर्व रसांची प्राप्ति होत असून, ही भगवद्भक्ति चित्ताला निर्वासन करून (शांतरसाचा स्थायिभाव जे वैराग्य त्याने वासनारहित करून) करुण संपन्न करते ॥५२॥ आता या भक्तीने सर्व रसांचा अनुभव कसा येतो, ते सांगतात -

(१) शृंगार रस

सगुण साकार परमेश्वराच्या भक्तीने संपूर्ण विश्व सगुणसाकार सच्चिदानंदस्वरूप असे चिद्विलासरूपाने अनुभवाला येऊन त्या रूपाने तेथे प्रेम बसणे हाच भक्तींतील ''शृंगार रस'' होय.

(२) वीररस

पूर्ण अद्वैत ब्रह्मप्राप्तीने झालेल्या आनंदामुळे जडविनाशी व दुःखरूप अशा जगताची प्रतीतिच न येणे हा भक्तीत येणारा ''वीर'' रसाचा अनुभव होय ॥५३॥

(३) कारुण्य रस

एक परमात्माच कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम् असा समर्थ असून तोच जगदुत्पत्ति-स्थिति-

लय कर्ता आहे, असे दृढ जाणून अश्रुपूर्ण नयनांनी भगवंताला जगत् समर्पण करणे; हा भक्तीत येणारा करुण रस होय.

(४) शांतरस

जग हे क्षणभंगुर असून एक भगवानच अखंड, अविनाशी, अचल आहे या अनुभवाने भक्तीने चित्त निर्वासन होते; म्हणून हा भक्तीत येणारा शांतरसाचा अनुभव होय ॥५४॥

(५) हास्यरस

भक्तीने प्राप्त होणाऱ्या अखंडानंदाने भक्ताची उन्मत्तासारखी लोकबाह्य स्थिति असणे, हा भक्तीत येणारा हास्यरसाचा अनुभव होय.

एवं व्रतः स्वप्रियनामकीर्त्या जातानुरागो द्रुतचित्त उच्चैः ।
हसत्यथो रौदिति रौति गायत्युन्मादवन्नृत्यति लोकबाह्यः ॥४०॥ (भाग स्कं ११ अ. २)

असे भागवंतातहि म्हटले आहे.

(६) भयानक रस

शास्त्ररूप भगवदाज्ञेचे उल्लंघन न करता त्याचे भीतीने पालन करणे. हाच भक्तींतील भयानक रस होय ॥५५॥

(७) अद्भुतरस

भगवान् श्रीकृष्ण पूर्ण सच्चिदानंद परब्रह्म असून सर्वज्ञ सर्वशक्तिमान् व अपरिमित षड्गुणैश्वर्यसंपन्न आहे. या माहात्म्यज्ञानाने अद्भुतरसाचा अनुभव येतो.

(८) बीभत्स रस

आणि अशा सगुण परमेश्वराच्या प्रेमभक्तिपुढे 'मी ब्रह्म आहे' हा ज्ञानाभिमान लाजून नाहीसा होतो हा भक्तींतील बीभत्सरस होय ॥५६॥

(९) रौद्र रस

भक्त भगवंतावर प्रेमाने रागावतात, हा रौद्ररसाचा अनुभव होय.

(१०) माधुर्य रस

श्रीहरीचा अत्यंत विरह-म्हणजे क्षणभराच्या विरहाच्या कल्पनेने युगविरहाचे दुःख होणे, हा भक्तीतील ''माधुर्य रसाचा'' अनुभव होय. ''क्षणमपि युगमिव यांसा येन विना भवेत्'' (भागवत स्कं.१०) आंब्याच्या झाडाचे सारभूत तत्त्व म्हणजे मुख्यतः गोडी, ज्याप्रमाणे त्याच्या फळात सर्वच्या सर्व आलेली असते; त्याप्रमाणे भगवंताच्या रासक्रीडेत वर वर्णन केलेले दहाहि रस सहज लीला करीत असतात. प्रत्येक रसाने येथून जाणार नाही' असा निर्धार केलेला असतो ॥५८॥तो सर्व सुगंधमय व सर्व रसमय आहे' हे श्रुतीचे म्हणणे सगुण साकार भगवंताविषयीच आहे. आणि 'हा रस प्राप्त करून जीव आनंदस्वरूप होतो' ही श्रुतीहि भक्तीने परमानंद प्राप्त होतो, असेच सांगत आहे ॥५९॥ भगवान् श्रीहरि रसरूप असून तोच रसाचे अधिष्ठानहि आहे; म्हणून त्याला भक्तिप्रेमरस समर्पण करून- आपणहि परमसुख प्राप्त करून घेऊन अखंड सुख स्वरूप होऊन राहावे ॥६०॥

हेच 'तत्' व 'त्वं' या दोन पदांचे ऐक्यरूप 'असि' पदाचे विवरण आहे. परमात्माच रसरूप असून तोच रसाचा भोक्ता आहे व रसाला अधिष्ठानहि आहे. प्रेमानेच भगवंताशी निर्भय ऐक्य होते. पण भगवान श्रीकृष्ण कशाच्याहि साहाय्यावांचून केवळ एका प्रेमाने सेवा करण्याजोगा आहे ॥६१॥हे द्वैतासारखे दिसत असले तरी हेच पूर्ण अद्वैत आहे. हाच खरोखर शुद्ध भगवत्प्राप्तीचा मार्ग आहे; म्हणून या मार्गानेच श्रीज्ञानेश्वर महाराजांचे चरणांचे ठिकाणी संतांनी लीन होऊन विश्रांति घ्यावी ॥६२॥अंतःकरणात ज्ञानेश्वर माउलीच्या चरणांची अखंड गोडी धरून त्या चरणांवर या भक्तिरसाच्या कावडीचा अभिषेक करावा, या उत्कट इच्छेने ती कावड समर्पण केली ॥६३॥ते ज्ञानेश्वर माउलीच्या चरणाभिषेकाचे तीर्थ पुढील पांचव्या अध्यायांत सांगितले जाणार आहे. श्रोते सज्जनांनी एकाग्र चित्त देऊन श्रवण करावे ॥६४॥सर्व सुखाची

पुरवणी करणारी सखे ज्ञानेश्वर माय बहिणी! मी आपला संपूर्ण जीवभाव तुझ्या चरणाचे ठिकाणी वाहिला आहे. हे आई! आता माझ्या मस्तकावर आपला कृपाहस्त ठेव ॥६५॥हे सख्या सद्गुरुनाथ मायबापा! हे ज्ञानेश्वर प्रभो! आता आपल्या कृपेने आपल्या प्राप्तीचा सोपा मार्ग मला सर्वदा मिळो ॥६६॥तरी आता जन्मोजन्मी मला हाच परमार्थ द्यावा याशिवाय दुसरें कांहीहि नको ॥६७॥

तरंग ५ वा

सर्व जगाचे पोषण करणाऱ्या सच्चिदानंद करुणामूर्ते! स्वतःचे सुख देण्यात अत्यंत उदार असलेल्या भक्तवत्सल सगुणरूपा श्रीज्ञानेश्वर सद्गुरुनाथा! आपणाला नमस्कार असो! ॥१॥तू आपल्या भक्तजनांची माउली असून त्यांच्याकरिता तू पूर्ण प्रेमाने पान्हावलीस. ही सर्व माझी झालेली तापरहित स्थिति तुझ्या या कृपेमुळेच आहे ॥२॥'परब्रह्माला अत्यंत अद्वैत अवस्थेत राहणे सुखकर वाटत नाही' हे श्रुतीचे म्हणणे सत्य करून दाखविण्याकरिता आपल्या भक्तांच्या प्रेमाला वश होऊन आपण लीलेने सगुण साकार स्वरूप धारण करून प्रगट झालात ॥३॥असे माउलींनीहि अमृतानुभवात सांगितले आहे.अन्वय पूर्ण झाला असता जाणणें बंद पडून सर्व जाणीवस्वरूपच होऊन जाते. हा निर्गुण प्रत्ययहि आटला जाऊन आम्हांला त्या ठिकाणी तुझ्या सगुण स्वरूपाच्या चरणांचा अनुभव आला ॥४॥हे माझे आई ! तू अशा प्रकारची असल्यामुळे वाचेला मौन पडून मी संपूर्ण आपल्याला तुझ्या चरणांवर समर्पण केले आहे. आता नित्यच तुझ्या चरणांचे ठिकाणी मी नमून राहीन, असे कर ॥५॥ज्याप्रमाणे पतीच्या कामभोगाचे पतिवीर्यापासून उत्पन्न होणारे बाळ हेच फळ मिळते व त्यामुळे स्त्रियेच्या अंतकरणांत पतीचे चरण दृढ होतात ॥६॥त्याप्रमाणे 'तत्त्वमसि' महावाक्यातील भक्त्युपदेशाप्रमाणे भक्ति केली असता साक्षात् सगुण साकार षडगुणैश्वर्यसंपन्न भगवान् पतिरूपाने प्राप्त होतो व मग भक्त केवळ प्रेमरूप स्त्री बनतो. भगवान् केवळ प्रेमरूप पति होतो व त्याच्यापासून केवळ प्रेमरूप पुत्राची प्राप्ति होते ॥७॥तेव्हा विषयकामनारूप रात्रीचा अंधःकार नाहीसा होऊन निष्काम सुखावह प्रेमाची पहाट उजाडते आणि ब्रह्मज्ञानरूप सूर्याची ''अहंब्रह्मास्मि'' ही ज्ञानाहंकाररूप प्रखरताहि निःशेष नाहीशी होते ॥८॥मग कोटी सूर्यांच्या तेजाप्रमाणे तेजस्वी, पण कोटी चंद्राच्या किरणाप्रमाणे शांत व आल्हादकारक अशी सुकुमार घनसांवळी भगवंताची मूर्ति अंतर्बाह्य अनुभवाला येते ॥९॥आत्मज्ञान पूर्वीची श्रवणकीर्तनादिरूप जी नवविधा व आर्त, जिज्ञासू व अर्थार्थी यापैकी आर्तभक्ति सात्विक असली तरी ती तीन प्रकारची भक्ति गौणच आहे (आर्तभक्त अत्यंत दीन असतो, म्हणून तो सत्वगुणी म्हटला जातो) ॥१०॥

आत्मनिवेदनरूप भक्तीने त्रिगुणाचे बंधन नाहीसे होते आणि ''मी सच्चिदानंद ब्रह्म आहे'' हा ज्ञानाचा अभिमान सगुण भगवंताच्या परमविरहरूप माधुर्यभक्तीने नाहीसा होतो ॥११॥मग शेवटी गौणीभक्ति आणि पराभक्ति असा भेद नाहीसा होऊन एकरूप प्रेमलक्षणा पराभक्तिच होऊन राहते ॥१२॥कानाने भगवंताचे गुण श्रवण करणे, मुखाने भगवंताचे गुण वर्णन करणे, हाताने भगवंताचे गंधपुष्पादि षोडशोपचारांनी पूजन करणे, पायांनी भगवंताच्या मंदिराचा मार्ग आक्रमण करणे- यात्रा करणे ॥१३॥नाकाने भगवंताच्या निर्माल्याचा सुवास घेणे, डोळ्यांनी भगवंताची श्यामसुंदर मूर्ति पाहणे, मन आणि बुद्धि भगवंताच्या प्रेमात निमग्न असणे ॥१४॥अशा प्रकारे सर्व इंद्रियांच्या द्वारा हरिप्रेमच प्रगट होते. (कर्तृत्वबुद्धि उत्पन्न न होता केवळ हरिप्रेमानेच इंद्रियांचे सर्व व्यापार होऊं लागतात) आत्म्याचे ठिकाणी एक प्रेमच भरून राहते व परमात्म्याचे महात्म्यज्ञान प्रेमात एक होऊन जाते ॥१५॥प्रेमाची परीक्षा पाहण्याकरताच परमात्मा विरहप्रेमदुःखाची शिक्षा देतो. प्रेमळ भक्त, भक्तसखा अशा परमात्म्याची व परमात्मा, आपल्या भक्तसख्याची नित्य सारखी वाट पाहत असतो ॥१६॥भक्त व भगवान यांचे परस्परांवर एकच निःसीम प्रेम असल्यामुळे त्यांचे दोनपण विरून गेलेले असते. सर्व इंद्रियांचे ठिकाणी प्रेमच

उमटलेले असते ॥१७॥अशा प्रेमळ भक्ताला लौकिक व्यवहाराचे किंवा वैदिक आचरणाचे बंधन राहत नाही. त्याच्या दृष्टीने सर्व आश्रम धर्म हे संन्यासधर्मच असतात ॥१८॥प्रेमळ भक्तांची संपूर्ण विषयसुखरूप कर्मफळाची इच्छा निःशेष नाहीशी झालेली असते. म्हणून कर्म व कर्तृत्व हेहि त्यांना मुळीच भासत नाहीत. ते अन्तर्बाह्य एक भगवत्प्रेमरूपच होऊन राहतात ॥१९॥

हरिप्रेमाने कंठ सद्‌गद होणे हाच भक्तांचा **'प्राणायाम'** होतो. हरिप्रेमामुळेच त्यांची इंद्रिये विषयाकडे वळतच नाहीत, हाच त्यांचा **'प्रत्याहार'** होय. सगुण स्वरूपाचे ठिकाणी सारखी चित्ताची प्रेमवृत्ति धावणे हीच त्यांची **'धारणा'** होय. प्रेमामुळे अखंड भगवदाकार चित्त होणे, हेच त्यांचे **'ध्यान'** होय. व हीच त्यांची सेवा होय ॥२०॥ सतत प्रेम ओसंडून येणे, हीच **'समाधी'** होय. प्रारंभीचे यम- नियम-आसनादि ही अंगेहि प्रेममयच असतात. तसेच शेवटीहि प्रेमच उरते, हे त्रिवार सत्य आहे ॥२१॥असे भजन होत असताना द्वैत दिसत असले, तरी प्रेमामुळे अद्वैतच असते किंबहुना या प्रेमामुळे द्वैत आणि अद्वैत या दोहोंचेहि भाव राहत नसल्यामुळे दोन्ही नाहीसे होतात व त्या प्रेमात रासेश्वरी-राधेसह वर्तमान असलेल्या भगवान श्रीकृष्णाची भेट होते ॥२२॥असो. हा प्रेम कौतुकानेहि शब्दाने सांगता येत नाही. याच्या अविरोधाने नामरूपात्मक संपूर्ण विश्व राहते (कारण विश्वातहि ते प्रेम दिसून पडते. विरोध समसत्ताक असतो. विषमसत्तेंत विरोध नसतो.) ॥२३॥कमळाचे ठिकाणी जशी भ्रमरी लंपट होते, तसेच व्रजराज नंद हे ज्याचे पिता आहेत, त्या भगवान श्रीकृष्णाच्या चरणांचे ठिकाणी आम्ही लंपट झालो आहो ॥२४॥किंवा गोपिकांच्या चरणधूलीप्रसादाने आम्हीहि भगवत्प्रेमाने प्रेमळ होऊ, असा प्रबळ विश्वास अंतःकरणात धरून आम्ही भगवंताचे चिंतन करतो ॥२५॥

(सच्चिदानंदघन षडगुणैश्वर्यसंपन्न असा एक परमात्माच सर्व विश्वात आहे, त्यावाचून दुसरे कोणी नाही,) हे महात्म्यज्ञानहि प्रेमच होय आणि याने जारपणाचाहि दोष येत नाही; म्हणून भगवद्विषयक कामच मोक्षसुखाहूनहि श्रेष्ठ ठरला आहे ॥२६॥अशी ज्यांची स्थिति आहे, त्या गोपिकांच्या चरणी वारंवार प्रेमाने वंदनादिक सेवाच माझे ठिकाणी वृद्धि पावो ॥२७॥ज्या रासामध्ये भगवान शंकरांनी स्वतः स्त्रीरूपाने मृदंग वाजविण्याची सेवा स्वीकारली त्या रासातील प्रत्यक्ष पूर्ण ब्रह्म असे श्रीकृष्णरूप तेच आम्ही होऊ ॥२८॥आणि ब्रह्मरूप होणे हे देखील ज्याच्या पायावरून ओवाळून टाकावे, तेच एक सांवळे परब्रह्म आम्ही अंतर्बाह्य पाहू ॥२९॥''शिवस्वरूप होऊन शिवाचे भजन करावे'' ह्या श्रुतिसखीचे साह्य घेऊ आणि तिचीच प्रार्थना करून तिच्यापासून भक्ति मागून घेऊ ॥३०॥

प्रेमाची परम सीमा करूं आणि परमप्रेमरूप ब्रह्मरस भगवंताला अर्पण करू. सख्याने, चला ! आपण श्रीकृष्ण चरणारविंदाचे ठिकाणी अत्यंत स्वस्थ चित्त अशा भृगी होऊन राहू ॥३१॥वाच्य-लक्ष्यमिथ्या इत्यादि पक्ष त्याचप्रमाणे सर्व व्यापक-एकदेशी प्रत्यक्ष इत्यादि सर्व साक्षात् भगवान आहे ॥३२॥व्रजाचा राजा भगवान श्रीकृष्ण हा परमप्रेमाने घेतलेले सगुण स्वरूप होय. वेणुवादनाचा संकल्प करून तो अविनाशी आहे ॥३३॥भगवान श्रीकृष्ण म्हणजे सनकादि ऋषींची, अखंड ध्येय-मूर्ति होय व नारदाचार्यांची, कीर्ती अखंड गायन करण्याची मूर्ति होय, अशी ही प्रेममूर्ति सख्यांनो! रासामध्ये पाहूं चला ! ॥३४॥जे ब्रह्मसुख सर्वत्र भरले आहे, ते दोन हाताच्या संपुटीत घेतले जाईल असे आपण स्वतःच एकवटून, तेच सच्चिदानंदब्रह्ममुसेत सांवळे सगुण असे ओतले गेले आहे. ॥३५॥

मुखाने ज्यांचे नामस्मरण केले असता जड शरीरही ब्रह्मरूप होते तेच आमचे पति श्रीकृष्ण परमप्रेम देणारे आहेत, म्हणून त्यांच्या चरणांची निस्सीम सेवा करू ॥३६॥परमप्रेमात कल्पना आणि अभिमान हे दोन्ही प्रेमरूपच असतात आणि त्यात सच्चिदानंदाच्याच अनुभवाची खूण असते ॥३७॥प्रेमामध्ये भोळा आणि ज्ञानी दोघेहि सारखेच असतात. हे श्रीकृष्णरूप प्रेममय फळ हाती आले असता महावाक्याचा अर्थ वृक्षासारखा वाढतो म्हणजे दृढ व व्यापक होतो ॥३८॥वसंत (उद्दीपन भाव), श्रृंगार (रस), रति (श्रृंगाररसाचा स्थायीभाव) मोह व मदन वगैरे सर्व हरिप्रेममय होऊन जातात ॥३९॥वृत्तीचे वृत्तिपण नाहीसे होते, जीवाचे जीवपणहि राहत नाही व मुक्तिबीजाला भक्तिसुखाचे अंकुर येतात. ॥४०॥

खरोखर, असे म्हणणेहि गौण आहे. बीज आणि फळ दोन्ही भक्तिच होऊन जाते

श्रीमहाराजांच्या वाङ्‌मयीन मूर्तीचे शिल्पकार

श्रीबाबाजीमहाराज पंडित

'गुरुभक्तीची परी । सांगो गा अवधारी'

वयाच्या १९ व्या वर्षी चंद्रपूरचे नारायण पैकाजी पंडित प्रज्ञाचक्षु श्रीगुलाबराव महाराजांकडे आले. १९०५ मध्ये त्यांनी आई-वडिल घरदार शिक्षण वगैरे सर्व सोडून देऊन सद्गुरुसेवेस आरंभ केला. महाराजांचे कपडे धुणे, आंघोळीस पाणी देणे, स्वतः स्वयंपाक करून महाराजांना जेऊं घालणे वगैरे लहानमोठी सर्व प्रकारची कामे जीव ओतून केलीत. जणुं ज्ञानेश्वरीतील सद्गुरुसेवा मूर्तिमंत साकार झाली.

हरिभाऊ केवले, गंगाधर मुळे वगैरे ग्रंथलेखनिकांत ते प्रमुख होते.त्यांनी महाराजांची अगदि निरपेक्ष सेवा केली पण त्यांनी महाराजांना केव्हाच काहीहि मागितलं नाही.त्यांचे ते निर्व्याज आणि उत्कट प्रेम पाहून महाराजांनी उद्‌गार काढले - ''मी पंडिताला वश झालो आहे''

गुरुभक्तीनं ओथंबलेल्या अन्तकरणाला आणखी काय हवं असतं? शेवटच्या वेळी तर महाराजांनी आपण होऊन आशीर्वाद दिला -

''अरे पंडित, आजवर मी तुला काही दिलं नाही.
माझे ग्रंथ वाच. तुला समजतील! ''

या अमोघ शब्दांनी 'ये हृदयीचं ते हृदयी सामावलं.' पंडितांचं सारं जीवनच उजळून गेलं. त्या सोज्वळ प्रकाशात महाराजांच्या ग्रंथांची सर्व हस्तलिखिते सूक्तिरत्नावलीच्या रूपाने प्रकाशित झालीत अन् पंडितांच्या अखंड परिश्रमांनी महाराजांची वाङ्‌मयीन मूर्ती साकारली. दृष्ट लागावं असं अक्षरशिल्प मुद्रांकित होऊन सर्वांना उपलब्ध झाल!

प्रथम यष्टीतील

कान्तकान्तावाक्यपुष्पम्

॥ श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

॥ मंगलाचरण ॥

यत्कृपालेशमात्रेण महिषो वेदपारगः।
ज्ञानेश्वरं तमाचार्यं वंदे बद्धांजलिर्मुदा ॥१॥
तपोभिः क्षीणपापानामिहामुत्रविरागिणाम् ।
सत्संवादमिषेणात्र भक्तिर्ज्ञानं च कथ्यते ॥२॥

सद्गुरु श्रीबाबाजीमहाराज पण्डित यांनी केलेला मराठी अनुवाद -

अर्थ - ज्यांच्या किंचित कृपाप्रसादाने रेडा वेद बोलू लागला त्या सद्‌गुरु ज्ञानेश्वर महाराजांना हात जोडून वंदन करतो ॥१॥ तपश्चर्येने ज्यांनी आपली पापे धुवून टाकली व ऐहिक व पारलौकिक सुखावर तिलांजली दिली असा साधकांकरिता भक्ति व ज्ञान विषयक संवाद सांगतो ॥२॥

विषयनिवृत्त्यनंतरमात्मज्ञानेनैव ब्रह्मणः सच्चिदांशद्वयम् अविद्यानिवृत्तिपूर्वकं ज्ञातुं शक्यते ।

अर्थ - वैराग्यप्राप्तीनंतर आत्मज्ञानाने अज्ञान घालविल्यावर ब्रह्माच्या सदंश व चिदंशांचे म्हणजे साक्षीस्वरूपाने ज्ञान मिळू शकते.

किंतु स्वानंदप्राप्तये भक्तिरेव गरीयसीति श्रुतिस्मृतिपुराणेतिहासानां अभिप्रायः ।

अर्थ - ब्रह्मानंद प्राप्तिकरिता श्रुति स्मृति पुराणादि इतिहासावरून असे दिसते की भक्तिच श्रेष्ठ आहे. म्हणजे भगवंताची भक्तीच केली पाहिजे.

तत्र भूबीजांकुरतरुफलरूपा निरूपाधिमायोपाधिसूत्रविराड् विष्णवश्चैते पंचेश्वरपुरुषा नीलकंठोक्ता भवन्ति ।

अर्थ -

१. **'भू'रूप** म्हणजे निरूपाधिक ब्रह्म किंवा शुद्ध ब्रह्म.
२. **'बीज'रूप** म्हणजे मायोपाधिक ब्रह्म.
३. **'अंकुर'रूप** म्हणजे हिरण्यगर्भ किंवा ब्रह्मदेव.
४. **'तरु'रूप** म्हणजे विराटस्वरूप.
५. 'फल'रूप म्हणजे विष्णु, शिव, रामकृष्णादि अवतार.

- असे ईश्वर पुरुषांचे पांच प्रकार नीलकंठाचार्यांनी सांगिले आहे.

तत्र ब्रह्मैव भगवद्भक्तानुग्रहकरणेक्षणात् विष्णुरूपेण स्वयमाविर्भवति ।

अर्थ - हे ब्रह्मच स्वेच्छेने विष्णुरूपाने भक्तावर अनुग्रह करण्यासाठी अवतार घेते.

स आविर्भावोऽपि नित्यः सुखैकानुग्रहकरणेक्षणमात्रत्वात् ।

अर्थ - भक्तावर सुखरूप अनुग्रह करण्याच्या इच्छेने अवतार होत असल्यामुळे तो नित्य म्हणजे अविनाशी आहे.

अयमेव भक्तिसदनम् ।

अर्थ - हेच भक्तीचे मंदिर होय म्हणजे अशा या अवताराचीच भक्ती होऊ शकते.

तद्वाररक्षकज्ञानप्राप्तये शांकरपदार्थानुदाहरति ।

अर्थ - ज्ञान हे भक्तीचे द्वाररक्षक आहे म्हणजे ती भक्ति ज्ञानानंतर होते असे हे ज्ञान श्रीशंकराचार्यांनी सांगितले, ते असे -

ईशो माया महान् जीवः संबंधो भेद एव च ।
अत्र पंचानादि सान्ताश्चेशोऽनादिरनन्तकः ॥३॥
ईशो हि ब्रह्मशब्देन वेदान्ते समुदाहृतः ।
मायाऽज्ञान प्रधानाद्याः पर्याया मुनिसंमताः ॥४॥
मायोपाधिर्जगद्योनिः सर्वकृच्छबलो महान् ।
हेमगर्भोऽपरेशश्च पर्यायौ शबलांशकौ ॥५॥

अर्थ - (१) ईश्वर, (२) माया, (३) मायोपाधिक ब्रह्म, (४) जीव, (५) चैतन्य व अविद्या यांचा संबंध, (६) जीव व ईश्वर यांचा भेद; ह्या सहा पदार्थांमध्ये ईश सोडून बाकीचे अनादि व सान्त आहेत. ईश म्हणजे शुद्ध ब्रह्म अनादि व अनंत आहे. ॥३॥ वेदान्तात 'ईश' शब्दाने ब्रह्मच सांगितले आहे व माया, अज्ञान, प्रकृति, अव्यक्त, प्रधान एकाच अर्थाचे आहेत, असे मुनींनी अंगीकारिले आहे. ॥४॥ या जगताचे कारण मायोपाधिक शबल ब्रह्म आहे. हिरण्यगर्भ हा अपरेश म्हणजे गौण ईश्वर आहे. यालाच शबलब्रह्म किंवा मुख्य जीव म्हणतात. ॥५॥

मायां तु प्रकृतिं विद्यान्मायिनं तु महेश्वरम् ।
तस्यावयवभूतैस्तु व्याप्तं जगदिति श्रुतिः ॥६॥
मम योनिर्महद्‌ब्रह्म तस्मिन्गर्भं दधाम्यहम् ।
संभवः सर्वभूतानां तस्मादिति परा श्रुतिः ॥७॥

माया म्हणजे प्रकृति व मायेला धारण करणारा तो महेश्वर जाणावा. ह्या प्रकृतिनेच सर्व जग व्यापिले असे श्रुति म्हणते. ॥६॥ सर्व भूतांचे उत्पत्तिस्थान म्हणजे परमात्म्याची त्रिगुणात्मक प्रकृति, त्या महद्‌ब्रह्मरूप प्रकृतीच्या ठिकाणी परमेश्वर सामर्थ्यरूप बीज स्थापन करतो म्हणजे परमेश्वराचे सत्तेने ही प्रकृति कार्य करू लागते असे गीतेत म्हटले आहे. ॥७॥

अस्येशादिपदार्थत्रयस्य लक्षणानि भक्तिपदतीर्थामृतात् बुधैरुपहर्तव्यानि ।

अर्थ - ईश, माया, महान् म्हणजे मायोपाधिक ब्रह्म ह्या तीन पदार्थांची लक्षणे भक्तिपदतीर्थामृत या ग्रंथात मी विस्तृत केली आहेत, ती शहाण्यांनी जाणून घ्यावी.

पदार्थषट्कलक्षणानि अपेक्षितानि चेत् शारीरकशांकरभाष्यप्रोक्तानि अत्र विस्तरभयान्नास्माभिर्लिख्यन्ते ।

अर्थ - शारीरक शांकरभाष्यात सहा पदार्थांची लक्षणे केली आहेत. विस्तारभयास्तव ती आम्ही येथे सांगत नाही. अपेक्षा असल्यास ती मूळग्रंथावरून पाहून घ्यावीत.

''परापरेति भेदेन द्वे विद्ये'' मुंडकोक्तितः ।

अर्थ - विद्येचे परा व अपरा असे दोन प्रकार मांडुक्योपनिषदात सांगितले आहेत.

तत्रोपनिषत्पुराणेतिहासवर्जितवेदवेदांगप्रतिपाद्याऽपरा ।

अर्थ - वेदातील उपनिषत् भाग व पुराणेतिहासादिकातील ज्ञानभाग सोडून वेदवेदांगादिकांतून वर्णन केलेला भाग ही **अपराविद्या** होय.

उपनिषत्पुराणेतिहासप्रतिपाद्या परेति ''वेदार्थादधिकं मन्ये पुराणानि वरानने'' इति नारदोक्तितः स्पष्टमेव प्रतीयते ॥

अर्थ - उपनिषत् पुराणेतिहासात सांगितलेली विद्या **पराविद्या** होय, हे ''वेद अस्पष्टार्थबोधक असून पुराण स्पष्टार्थबोधक आहेत'' या श्रीनारदाचार्यांच्या वचनावरून स्पष्ट आहे.

शिष्य उवाच -

यदेकं निष्कलं ब्रह्म व्योमातीतं निरंतरम् ।
यस्मिन्नतद्व्यावृत्या चकितं वदति श्रुतिः ॥८॥
तस्मिन् शुद्धे चिदाकाशे लक्ष्यज्ञानैकगोचरे ।
अनादि जडरूपाया मायायाः किमुत प्रमा ॥९॥
ब्रह्मरूपात् पृथक् सास्ति ह्यपृथग्वाऽथ विद्यते ।
कस्य स्याद् बंधनं तस्याः कस्य नेति वेदस्व भोः ॥१०॥

अर्थ - शिष्य म्हणतो : ब्रह्म जर अंशरहित, आकशाच्या पलीकडे असणारे व अविनाशी आहे तर ब्रह्माहून जे निराळे भासते त्याची निवृत्ति करून वेद भीत भीत ब्रह्माचे ''नेति नेति'' असे वर्णन कां करतात ॥८॥ अशा या शुद्ध ज्ञानप्रकाशात व जे ब्रह्मज्ञानाने प्राप्त होते. त्यात जडरूप असणाऱ्या मायेची उत्पत्ति कशी झाली ॥९॥ *(ती माया ब्रह्माहून वेगळी आहे का की एकरूप आहे तिचापासून बंधन कोणाला होते आणि कोणाला होत नाही हे स्वामी आपण सांगा ॥१०॥* ***टीप*** *- हा अर्थ मुळात श्रीबाबाजीमहाराजांचा अनुवाद नसल्यामुळे वेगळा केला आहे.- संपादक.)*

श्रीगुरुरुवाच -

श्रृणु वत्स गुरुशास्त्रयोः साधनदशायां सिद्धदशायां च यत्प्रयोजनं तत्ते सादिभ्रमानादिभ्रमनिवृत्तिमिषेण फलरूपतयोपदिश्यते ।

अर्थ - श्रीगुरु म्हणतात : हे वत्सा ! साधनदशेत साधकाला व सिद्धदशेत ज्ञान्याला गुरु व शास्त्राचा काय उपयोग आहे, ते ऐक -

सादिभ्रम म्हणजे भ्रमाचा आरंभ व अनादिभ्रम म्हणजे भ्रमाला आरंभच नाही, अशा या दोन्ही भ्रमाची निवृत्ति करण्याच्या निमित्ताने उपदेश करतो.

प्रकृतिं पुरुषं चैव विद्ध्यनादि उभावपि ।
विकारांश्च गुणांश्चैव विद्धि प्रकृतिसंभवान् ॥११॥
ज्ञेयं यत्तत्प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वाऽमृतमश्नुते ।
अनादिमत् परं ब्रह्म न सत्तन्नासदुच्यते ॥१२॥
ब्रह्मैवानादिरूपं हि मायाऽनादिस्वरूपिणी ।
तस्मान्माया ब्रह्मरूपात्पृथक्,,ापि न विद्यते ॥१३॥
सादिभ्रमोपदेशे तु मुक्तानां बंधसंभवः ।
तस्मादनादिरूपेण माया तिष्ठतु सर्वदा ॥१४॥
सादिभ्रमस्य निवृत्तेः साधनं नैव विद्यते ।
तस्मादेषा ह्यनादिः स्यान्मायाऽविद्या च मे मतिः ॥१५॥

अर्थ - गीतेत म्हटले आहे की, प्रकृति व पुरुष हे अनादि आहेत म्हणजे त्यांचा आरंभच नाही. सत्त्व, रज, तम हे गुण व त्यांचे विकार हे प्रकृतीचे कार्य आहेत. ॥११॥ ज्याला ज्ञेय म्हणतात ते मी सांगतो - जे जाणले असतां जीव अविनाशी होतो ते उत्पत्तिरहित असलेले परब्रह्म होय. त्याला सत् म्हणता येत नाही व असत्हि म्हणता येत नाही. ॥१२॥ ब्रह्म अनादि आहे व माया हीहि अनादि आहे, म्हणून माया ब्रह्मस्वरूपाहून वेगळी कोठेहि राहत नाही ॥१३॥ भ्रम म्हणजे माया. हिचा आरंभ मानला तर मुक्तांना बंध होतो असे मानावे लागेल. हा दोषपरिहार करण्याकरिता माया अनादि आहे म्हणजे मायेला आरंभ नाही, असे म्हटले आहे. ॥१४॥ जर मायेचा आरंभ काल असला तरी तिच्या निवृत्तीचे कोणतेच साधन नाही. म्हणून माया/अविद्या अनादि आहे असे माझे मत आहे ॥१५॥

ब्रह्मात्मैक्यप्रत्ययेऽपि विस्मृतेः प्रत्ययो वृथा ।
सोऽयं सादिभ्रमस्तस्य निवृत्तिश्चास्ति नास्ति वा ॥१६॥
गुरुवाक्येन निवृत्तिं यः पश्यति स पश्यति ।
न पश्चन्ति ज्ञानमूढा ब्रह्मालस्याभिमानिनः ॥१७॥
यस्य ब्रह्माभिमानोऽस्ति देहेऽपि ममता तथा ।
न स योगी न वा भोगी केवलं दुःखभागसौ ॥१८॥
अनादिभ्रमनिवृत्तिर्न शास्त्राध्ययनं विना ।
सादिभ्रमस्य निवृत्तिर्न गुरोर्वचनं विना ॥१९॥
यस्य देवे पराभक्तिर्यथा देवे तथा गुरौ ।
तस्यैते कथिता ह्यर्थाः प्रकाशन्ते महात्मनः ॥२०॥

अर्थ - जीव ब्रह्मैक्य झाल्यावरहि आत्मविस्मृतीचा प्रत्यय व्यर्थच राहतो. त्याला सादिभ्रम म्हणावे. या भ्रमाची निवृत्ति होते किंवा नाही. (होते) ॥१६॥ गुरुवाक्याने भ्रमनिवृत्ति ज्याची झाली त्याचीच खरी भ्रमनिवृत्ति झाली. ब्रह्मज्ञान झाले असे समजून आळशी होऊन राहणारे पढतमूर्ख यांच्या भ्रमाची निवृत्ति होत नाही. ॥१७॥ ज्याला 'ब्रह्मज्ञान झाले' असा अभिमान असतो व ज्याची देहावर ममता किंवा

प्रेम असते तो ज्ञानी नव्हे किंवा भोगी नव्हे. तो केवळ दुःख भोगणाराच होय ॥१८॥ अनादिभ्रमाचा निरास शास्त्राध्ययनाने होतो व सादिभ्रमाचा निरास गुरुवाक्याने होतो. ॥१९॥ ज्याची देवाचे व श्रीगुरूचे ठिकाणी सारखी पराभक्ति असते त्या पुरुषाला श्रुतीचा यथार्थ बोध होतो ॥२०॥

चक्रवाकखगस्यात्र मृगतोयं करोति किम् ।
तथा माधवभक्तस्य ह्यविद्या किं करिष्यति ॥२१॥
दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया ।
मामेव ये प्रपद्यन्ते मायामेतां तरन्ति ते ॥२२॥
मृगांबुजन्मनिवृत्तिं चक्रवाको न चेच्छति ।
तथा माधवभक्तोऽपि मायासत्वमुपेक्षते ॥२३॥
चक्रवाकैरदृष्टाऽपि मृगैर्दृष्टा मरीचिका ।
अज्ञानिभिः संप्रदृष्टा भक्तो ऽविद्यां न पश्यति ॥२४॥
एतत्ते कथितं गुह्यं ज्ञानेश्वरकृपालवात् ।
यो जानाति यथा वत्स सुखमत्यन्तमश्नुते ॥२५॥
कान्तकान्तावाक्यपुष्पग्रथनं गद्यपद्ययोः ।
यः सेवते प्रभातेऽस्मिन् व्रजेद्धि परमां गतिम् ॥२६॥

अर्थ – ज्याप्रमाणे चक्रवाक् पक्ष्याला मृगजलाची बाधा होत नाही, त्याप्रमाणे भगवद्भक्ताला अविद्येची बाधा होत नाही. (ह्या वचनाचे समर्थन गीतेतील श्लोकाने होते) ॥२१॥ त्याचा अर्थ असा :- ''माझी ही त्रिगुणात्मक माया पार करणे दुस्तर आहे. पण जे मला शरण येतात तेच ही दुस्तर माया पार करून जातात'' ॥२२॥ मृगजलाबाहेर कसे होता येईल याची चिंता चक्रवाकपक्षी करीत नाही त्याप्रमाणे श्रीकृष्णभक्त मायेच्या भासाकडे दुर्लक्ष करतो ॥२३॥ ज्याप्रमाणे मृगाला मृगजल दिसते परंतु चक्रवाक पक्ष्याला ते दिसत नाही, त्याप्रमाणे अज्ञानी लोकांना अविद्या / माया दिसते. परंतु भगवद्भक्ताला अविद्या दिसत नाही ॥२४॥ श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या कृपेने हे गुह्य तुला कथन केले. जो कोणी हे चांगले समजून घेईल तो हे वत्सा ! अत्यंत सुखी होईल ॥२५॥ जो दररोज सकाळी ह्या पतिपत्नीसंवादाचे मनन करील त्याला सद्‌गति प्राप्त होईल ॥२६॥

॥ इति कांतकातावाक्यपुष्पं समाप्तम् ॥

०००

टीप - हा ''कांतकातावाक्यपुष्पं'' प्रकरणग्रंथ प्रथम यष्टीत अन्तर्भूत आहे पण तेथे श्रीगुलाबराव महाराजांचे उत्तराधिकारी सद्गुरु श्री बाबाजीमहाराज पंडितांनी केलेला मराठी अर्थ मुद्रित करण्याचे राहून गेले सबब या ठिकाणी पुन्हा हे कांतकातावाक्यपुष्पं अर्थासहित मुद्रित केले आहे. - ***प्रा. देवराव भुजाडे,*** *मधुराद्वैतसांप्रदायिकमंडळ,अमरावती.*